नॅशनल बुक ट्रस्टचा ग्रंथ

# ज्वालामुखी

[illegible]


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय ज्ञा-वी
दा. क्र. 8230

IRBK-0108230



पब्लिकेशन्स डिव्हिजन

नॅशनल बुक ट्रस्टचा ग्रंथ

# ज्वा ला मु खी

*एकोणीसशे बेचाळीसच्या भारतीय*
*क्रांतीच्या पार्श्वभूमीवरील कादंबरी*

लेखक : अनंत गोपाळ शेवडे
अनुवाद : सौ. यमुना शेवडे

IRBK-0108230

पब्लिकेशन्स डिव्हिजन,
माहिती व नभोवाणी मंत्रालय
भारत सरकार, दिल्ली ८

पौष, १८८१ ( Pausa, 1881 )
जानेवारी, १९६० ( January, 1960 )

किंमत : रु. १·५०
Price : Rs. 1·50

JWALAMUKHI (Marathi)

© नॅशनल बुक ट्रस्ट, (इंडिया), १९६०

प्रकाशक : डायरेक्टर, पब्लिकेशन्स डिव्हिजन, ओल्ड सेक्रेटॅरिएट, दिल्ली–८
मुद्रक : मा. ह. पटवर्धन, संगम प्रेस प्रा. लि. ३८३ नारायण पेठ, पुणें–२

## स म र्प ण

ज्यांच्या त्यागावर आणि बलिदानावर स्वातंत्र्याचें सुवर्णमंदिर उभें राहिलें, त्या सर्व ज्ञात आणि अज्ञात हुतात्म्यांना समर्पित

# कृतज्ञता

सन बेचाळीसच्या ऑगस्ट क्रांतीमध्यें मला तीन वर्षें तुरुंगांत राहावें लागलें. माझ्या जीवनांतील सर्वांत उज्ज्वल व मंगल असा कालखंड तोच ! तेथेंच संत विनोबांच्या सहवासाचा मला लाभ झाला.

ज्या दिवशीं मी प्रथम नागपूरच्या सेंट्रल जेलमध्यें आलों, त्या दिवशींच्या विनोबांच्या सायंप्रार्थनेचें दृश्य माझ्या मन:पटलावर कायमचें कोरलें गेलें.

७०–८० राजबंदी असलेली ती आठ नंबरची बरॅक ! काजळी अंधारी रात्र आणि झिमझिम पाऊस ! फक्त मिणमिणता एक कंदील त्या ठिकाणीं होता. त्याच्या प्रकाशांत एकमेकांचे चेहरे ओळखणेंहि दुरापास्त होतें. त्या समयीं झालेली विनोबांची ती सामुदायिक सायंप्रार्थना !

बाहेर गोळ्यांचा वर्षाव चालू होता. सरकारच्या क्रूर हिंसेचें सत्र उग्र रूपांत सुरू होतें. भारतीय जनांच्या प्राणांना कांहीं मोलच उरलें नव्हतें. क्रांतिकारकांना कोणत्या वेळीं फांसावर लटकाविलें जाईल किंवा त्यांच्यावर गोळी झाडण्यांत येईल याची शाश्वति नव्हती. अशा भयाकुल वातावरणांत देहभान विसरायला लावणारी ती सायंप्रार्थना ! प्रार्थनेनंतर मधुर रामधुन आणि विनोबांचें छोटेसें प्रवचन ! प्रवचनाचा विषय होता मृत्यु ! मृत्यु शत्रु नसून मित्र आहे. अमंगल नसून मंगल आहे. ईश्वराचा साक्षात्कार घडवणारी ती एक किमया आहे. त्याची भीति बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. उलट सर्वांनीं हसतमुखानें त्याचें स्वागत केलें पाहिजे, असें कांहींसें त्यांनीं त्या दिवशीं सांगितलें.

या प्रवचनानंतर आम्हां राजबंद्यांना किती दिलासा मिळाला हें मला अजून स्मरतें. त्यानंतर १९४३ च्या जानेवारींत नागपूरचा नवयुवक शंकर आणि सिंधचा हेमू कलाणी यांना फांशी झाली. शंकर १८ वर्षांचा आणि हेमू १९ वर्षांचा होता. या घटनांनीं भारतीय लोकांच्या हृदयावर खोलवर जखम झाली.

या नंतर १९४४ आणि १९४५ मध्यें सिवनी जेलमध्यें पुन्हां मला विनोबांचा सहवास लाभला. संकोचामुळें मी त्यांच्यापासून लांबच राहीं. परंतु त्यांची सहृदयता इतकी, कीं माझा हात धरून ते मला आपल्याजवळ बसवीत.

ते दिवस मला चिरस्मरणीय वाटतात. जेलच्या आवारांत सकाळीं सहा ते आठ व्यायामासाठीं विनोबा इकडून तिकडे फेऱ्या मारीत. त्याच वेळीं आमचा विचारविनिमय होई. ज्या व्यक्तींचा जो उपजत गुण असेल, त्याच्या विकासांत मदत करणें, हें विनोबांचें वैशिष्टय आहे. व्यक्तिस्वातंत्र्यांचे ते पुरस्कर्ते आहेत. सर्वांना मारून मुटकून एकाच साच्यांत टाकण्याचा अट्टाहास ते करीत नाहींत. स्वत:च्या अंत:प्रेरणेला अनुसरणारे लोकच त्यांना प्रिय असतात.

आमच्या चर्चेचा विषय बहुधा साहित्य, साहित्याची प्रेरणा, हेतु, ध्येय इत्यादि असे. विश्वाच्या महान् साहित्यकारांवरहि चर्चा त्यावेळीं होत असे. गॉर्की, टॉलस्टॉय, रोमाँ रोलाँ, व्हिक्टर ह्यूगो, ड्यूमा, व्यास महर्षि, ज्ञानेश्वर, टागोर इत्यादि.

त्यांची साहित्यदृष्टि इतकी सखोल, सरस आणि सूक्ष्म असेल याची मला कल्पना नव्हती. त्यांची अष्टपैलू प्रतिभा पाहून हे खरोखरीचे महर्षि आहेत याचा मला प्रत्यय आला.

त्या चर्चेतूनच ज्वालामुखीची कल्पना उदय पावली. 'ज्वालामुखी' लिहीत असतांना जेल-जीवनांतील अनेक कटु आणि मधुर स्मृति उसळल्या तरी त्यांमागें एक स्मृति मात्र अत्यंत स्पष्ट असे. ती

म्हणजे विनोबांची स्नेहसिक्त, प्रेमळ आणि आशीर्वादाप्रमाणें भासणारी मंगलमूर्ति !

त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त करण्याकरितांच वरील चार शब्द लिहिले.

कदाचित् त्यांना माझ्या भावना अज्ञातहि असतील. आपलें जलप्राशन करून किंवा त्यास स्पर्श करून कुणास कशाचा लाभ होतो हें गंगेला कधीं ठाऊक असतें का ?

—लेखक

अनुक्रम 30६२७
विभाग बा.वा.
क्रमांक २६
नों. दि. ५.१.७१
वाचनालय

# ज्वालामुखी

## १

आज अभयकुमारचा विवाहदिन ! मग त्याचें अंतःकरण उल्हासानें भरून आल्यास नवल तें काय ?

त्याची हृदयसम्राज्ञी विजया लौकिक दृष्टीनें आज त्याची होणार ! एरव्ही यांनीं आपलीं हृदयें परस्परांना केव्हांच समर्पित केलीं होतीं. परंतु आज देवांब्राह्मणांसमक्ष, वेदमंत्रांच्या पावन उद्घोषांत तीं दोघें जन्ममरणाचे साथी होणार होतीं ! आज त्यांच्या उत्कट प्रीतीची परिपूर्ति व्हायची होती !

पण ही गोष्ट अशक्य कोटींतील वाटावी असा एक काळ होता ! त्यांच्या आशाआकांक्षांचा चूर करणारीं अनेक विघ्नें त्यांच्या मार्गांत उभीं होतीं. आपल्या सुशिक्षित आणि सुंदर पुतणीचा विवाह अभय-सारख्या निष्कांचन तरुणाशीं करण्यास विजयाचे काका तयार नव्हते. अभयची आई लोकांच्या घरचे कष्ट उपसून कसातरी आपला निर्वाह करीत होती. तिनें अभयचें शिक्षण पोटाला चिमटा घेऊन केलें. अभय एम्. ए. पास झाला, हें तिच्याच तपश्चर्येचें फळ !

नागपूर विश्वविद्यालयाचा रिसर्च स्कॉलर म्हणून अभय पीएच्. डी.साठीं प्रबंध लिहिण्याच्या तयारींत होता !

परंतु विजयाच्या काकांच्या दृष्टीनें यास महत्त्व नव्हतें ! ते स्वतः मध्यप्रांताच्या सिव्हिल सर्व्हिसमध्यें मॅजिस्ट्रेट होते. ई. ए. सी. असणाऱ्या

व पुढेंमार्गें मॅजिस्ट्रेट होणाऱ्या एखाद्या तरुणाशीं विजयाचें लग्न लावण्याची त्यांची इच्छा होती ! याहून दुसरा आदर्श त्यांच्या जमेंत नव्हता. काकांचे हे विचार विजयाला कधीं पटले नाहींत. मॅजिस्ट्रेटची पत्नी बनण्याची कल्पना तिच्या स्वप्नींहि आली नाहीं. तिनें एकदां अभयची निवड केली, आणि त्याच्याखेरीज प्रियकराच्या जागीं अन्य पुरुषाचा विचारहि तिला कधीं शिवला नाहीं. तिच्या काकांना वाटे, "काय विचित्र मुलगी आहे ! स्वत:चें कल्याणहि हिला कळत नाहीं." विजया मॉरिस कॉलेजची विद्यार्थिनी असून बी. ए.च्या दुसऱ्या वर्षांत होती. वृत्तीनें अभ्यासू व नटण्यामुरडण्यापासून अलिप्त ! तिला वाचनाचा नाद असून अधून मधून थोडेंफार ती लेखनहि करी. तिच्या कांहीं कथा आणि कविताहि मासिकांतून झळकल्या होत्या. अभ्यासाव्यतिरिक्त तिचा सारा वेळ लेखन आणि अध्ययन यांत जाई. श्रेष्ठ साहित्यिकांच्या ललितकृती वाचण्याची आपली आवड पुरविण्यासाठीं कॉलेजनंतर ती युनिव्हर्सिटीच्या वाचनालयांत जाई. तेथें तास दोन तास वाचनांत घालवून मग ती घरीं जाई.

तिच्या जीवनांत तें वाचनालय महत्त्वाचें स्थान बनलें. कारण तिची अभयकुमारशीं प्रथम ओळख झाली ती तेथेंच ! तो रीसर्च स्कॉलर असल्यामुळें वाचनालयाचा व त्याचा अविभाज्य संबंध होता. निर-निराळीं पुस्तकें वाचणें व त्यांच्या नोट्स् काढणें यात त्याचा बहुतेक वेळ तेथेंच जाई.

तेथेंच एकदां अकस्मात् विजया त्याच्या नजरेस पडली. तिच्या अभ्यासू वृत्तीमुळें इतर मुलींपेक्षां किती वेगळी होती ती !

परस्परांचा परिचय होऊन त्यास प्रीतीचे अंकुर फुटले व एका वर्षांत विवाहाच्या आणाभाकाहि झाल्या.

विवाह न झाल्यास आजन्म अविवाहित राहण्याची शपथहि त्यांनीं घेतली होती. कारण विवाहास तिच्या काकांचा विरोध होता.

वडिलांच्या मृत्यूनंतर काकांनींच तिचें पालनपोषण केलें होतें. त्यांच्या विरोधाचा प्रतिकार करतां न आल्यास अविवाहित राहण्याची तिची तयारी होती. परंतु त्याबावतींत काकांनीं इतका दुराग्रह धरला नाहीं. दोन तीनदां त्यांनीं तिचें मन वळावण्याचा प्रयत्न केला.कांहीं होतकरू मुलांनाहि चहाच्या निमित्तानें घरीं बोलावलें, परंतु विजयावर त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. "एवी तेवीं नाहीं ना ऐकत ? मग करूं दे तिला जें करायचें तें ! तिचें नशीब तिच्यावरोबर ! एकदां विवाह उरकला कीं आपली जबाबदारी संपली ! " असा त्यांनीं विचार केला.

अभयकुमार त्यांना सर्वस्वीं नापसंत होता, असेंहि नाहीं. तो निकोप, सुंदर आणि गौरवर्ण असून त्याच्या सात्त्विक स्मितांत कुणाचेंहि मन आकर्षून घेण्याची शक्ति होती. त्याची आई निष्कांचन असली तरी तो स्वतः सुशिक्षित असल्यामुळें कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ होता. फक्त तो सरकारी हुद्द्यावर नव्हता आणि शिवाय खादीधारी होता. हा त्यांच्या दृष्टीनें मोठा दोष होता.

मनाविरुद्ध कां होईना पण शेवटीं त्यांनीं त्यांच्या विवाहास संमति दिली. असा त्यांचा तो विवाह आज साजरा होत होता. विजयाच्या सुखास सीमा नव्हती. अभय प्रथम नजरेस पडल्यापासून तिचें हृदयसिंहासन त्यानें अंकित केलें. त्या प्रीतीनें तिचा जणुं कायाकल्पच झाला. तिच्यांत चेतना आली !

अभयचीहि तीच अवस्था ! विजयाच्या मुग्ध प्रीतीचा लाभ होतांच त्याला जणुं कांहीं अतुल बल प्राप्त झालें. त्याच्या पराक्रमास, पुरुषार्थास प्रेरणा मिळाली व जीवनांत चैतन्य निर्माण झालें.

या पूर्वीं कितीतरी वेळा एकांतांत त्यांची गांठ पडली होती, परंतु त्यांनीं कधींहि मर्यादा सोडली नाहीं. मंदिरांत पूजा करायला निघालेल्या खऱ्या भक्तास विकारवश होऊन कसें चालेल ?

विवाहसमारंभांतील होमहवन सुरू होतें. मंत्रोच्चार चालू होते.

त्याच वेळीं बातमी आली : "सिंगापूरजवळ इंग्रजांच्या दोन जहाजांना जपाननें जलसमाधि दिली आणि युद्ध पुकारलें !"

## २

विवाहविधि आटपले. आणि मंडळी घरोघर परतली. तेव्हां अभय म्हणाला, "विजया ! चल आपण आईला नमस्कार करूं या !"

"नाहीं बाळ ! अगोदर देवाला नमस्कार ! मग मला ! त्याच्यामुळंच आज हा दिवस दिसला." आईनें म्हटलं. दोघेंहि देवघरांत गेलीं. त्यांचीं मनें भारावलीं होतीं. त्यांनीं नीरांजन लावलें. आणि त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू चमकले. तीं निःशब्द असलीं तरी दोघांच्या हृदयांत भाव एकच होते. "परमेश्वरा ! आमचं जन्मजन्मांतरींचं पुण्य म्हणूनच आज हा दिवस उगवला. आमचं हें मीलन चिरमीलन ठरो. आमच्या हातून सतत आदर्शाचं पालन होऊन तुझी सेवा घडो". पण त्यांची अशी तन्मय अवस्था होते न होते, तोंच नीरांजनास धक्का लागला ! तें खालीं पडलें व ज्योत मालवली !

विजयाच्या काळजांत चर्र झालें. या अपशकुनामुळें भवितव्याच्या चिन्तेनें तीं दोघें व्याकुळ झालीं !

## ३

आईचा आशीर्वाद घेऊन दोघेंहि खोलींत परतलीं. विजया म्हणाली, "अभय ! मला कसलं तरी भय वाटतंय् ! कांहीं म्हण ! निरांजन मालवण्याचा अपशकुन हा अनिष्टसूचक आहे."

"वेडी कुठली !" तिच्या पाठीवरून हात फिरवीत तो म्हणाला. "आणखी नवा अपशकुन कसला व्हायचाय् ? अगोदरच त्याचीं चिन्हं साऱ्या विश्वाला ग्रासताहेत. युद्धाच्या विकराल ज्वालांनीं सारं जग त्रस्त आहे. मानवच मानवांचा संहार करायला सरसावला आहे. सिंहासनं

कोसळत आहेत. रोजचे नकाशे पालटत आहेत. मानवता रसातळाला जात आहे. या सर्वव्यापी भयानक अनिष्टापुढें आणखी काय अनिष्ट घडायचंय् ? ”

“ तसं नव्हे अभय ! त्या युद्धाच्या ज्वाला अजून आपणांपासून किती तरी लांब आहेत. हा अपशकुन तर आपल्या घरांतच झाला. आपलं घरकुल मांडण्याच्या आंतच तर विस्कटणार नाहीं ना ? ”

“ ज्वाला दूर आहेत कशावरून ? जपाननं सिंगापूरवर आक्रमण केल्याची बातमी आपण नुकतीच ऐकली ना ? विश्वव्यापी युद्ध आतां तर आपल्याच दाराशीं येऊन ठेपलं. आतांपर्यंत तें युरोपमध्येंच सीमित होतं, परंतु आतां पूर्वेकडेहि त्याचे ढग वळूं लागले. त्याची काळी छाया आपल्या देशासहि भेडसावीत आहे. या भीषण लंकाकांडापासून आपण आपला बचाव किती दिवस करणार ? ”

“ तें खरं ! पण अजून आपल्या हिंदभूमीवर कुठें युद्ध अवतरलंय् ? जोंपर्यंत आपल्याला स्वातंत्र्य मिळत नाहीं तोंपर्यंत युद्धांत इंग्रजांना सहकार्य द्यायचं नाहीं; हेंच धोरण आपल्या नेत्यांनीं जाहीर केलं आहे ना ? ”

“ तें खरं असलं तरी आपल्या नेत्यांना विचारतो कोण ? इंग्रजांचे प्रतिनिधि व्हाइसरॉय यांनीं तर भारतीयांतर्फे घोषणाहि करून टाकली कीं इंग्लंडबरोबर भारतहि युद्धांत सामील आहे म्हणून ! आपली प्रातिनिधिक संस्था जी कॉंग्रेस तिच्या मताची पर्वाहि त्यांनीं केली नाहीं. हा उघड अपमान कोणत्या स्वाभिमानी भारतीयास सहन होईल ? आमच्या गुलामगिरीचं हें स्पष्ट द्योतक असून त्याचं शल्य देशवासीयांस बोचल्यास काय आश्चर्य ? ”

“ परंतु प्रत्येक भारतीयास हें शल्य बोचेल तेव्हां ना ? कितीतरी सरकारी अधिकारी आणि राजकीय पक्ष मोठ्या हिरीरीनं युद्धाची सामग्री गोळा करण्यांत इंग्रजांना मदत करीत आहेत. सर्व भारतीयांनीं

एकमुखानं जर असहकार पुकारला असता तर मूठभर इंग्रज इतक्या मोठ्या देशावर कधीं राज्य करूं शकले असते काय ?"

"तुझं म्हणणं बरोबर आहे. आपल्या देशांत सर्वांत मोठी उणीव हीच आहे. गुलामगिरीच्या शृंखला मजबूत करण्यांत आपल्या देशवासियांचाच हात अधिक आहे. हीच लांछनास्पद गोष्ट आहे. गांधींचा त्याग आणि तेजस्वी नेतृत्वही निष्फळ होतं तें यामुळंच ! आपल्या देशांतील वातावरण इतकं पतित झालं आहे कीं गोऱ्या शिपायांनीं जरी आमच्या आया-बहिणींची अब्रू घेतली तरी मूग गिळून स्वस्थ बसण्याचाच आदेश आम्हांला मिळतो. सर्वांच्या तोंडाला कुलपं जडलीं आहेत. लेखण्यांवरहि शृंखला आहेत. आमच्या नशिबीं गौरवास्पद मृत्यूहि नाहीं. इतकं मोठं युद्ध चालूं आहे. इंग्रज आणि फ्रेंच तरुण स्वातंत्र्यासाठीं युद्धांत बलिदान देतात; पण आपल्या मातृभूमीवर इतकीं घोर संकटं आली असूनहि आम्ही निष्प्राण बनलों आहोंत. विश्वव्यापी क्रांति घडत असतांनाहि आम्ही आमच्या देशांत नवं जग निर्माण करूं शकत नाहीं. मरण्याचंहि स्वातंत्र्य नसल्यामुळं आम्ही जिवंत आहोंत इतकंच ! असलं लांछनास्पद जिणं हा देश किती दिवस सहन करणार ? ऋषिमुनींच्या पुण्यभूमींत इतकी असहायता यापूर्वी कधीं तरी आली असेल का ?"

"पण आज ती सारी असहायता आली आहे ना ? मला तर सर्वत्र अंधारच दिसतोय् ! सारा देश स्मशानवत् बनलाय्."

"ही स्मशानशांति नव्हे विजया; वादळापूर्वीची शांतता आहे ही. अशा शांततेची प्रतिक्रियाहि तेवढीच भयंकर होते हें एक ऐतिहासिक सत्य असून भारतांतहि त्याची पुनरावृत्ति झाल्याशिवाय राहणार नाहीं."

"पुढें काय होईल अभय ?"

"काय होणार ? एक प्रचंड क्रांतियुद्ध ! ज्याच्या ज्वाला या विशाल साम्राज्यालाहि गिळून टाकतील. कदाचित् भारतांतील मानवताहि

त्यांत भस्म होण्याची शक्यता आहे. पाशवी सामर्थ्यासमोर आत्मिक सामर्थ्याचा तात्पुरता पराजयहि होऊं शकतो; परंतु आजच्या या पौरुषहीन जीवनापेक्षां तो पराजयहि अधिक गौरवास्पद राहील. कारण ह्या बलिदानाच्या वेदीवर नवं मंदिर निर्माण होईल. निष्ठापूर्वक केलेला खरा त्याग कधींहि निष्फळ ठरत नाहीं यावर माझा पूर्ण विश्वास आहे."

"परंतु इतक्या मोठ्या बलिदानासाठीं आपला देश तयार आहे का? तसं असतं तर इतका भ्याडपणा, इतकी स्वार्थांधता, इतकं पतन सर्वत्र कां दिसावं?" विजयानें विचारलें.

"कोण म्हणतं आपला देश तयार नाहीं?" त्या क्षणीं अंथरुणावरून उठून खोलींतल्या खोलींत पिंजऱ्यांतील वाघाप्रमाणें फेऱ्या मारीत अभय म्हणाला, "या देशाची नाडीपरीक्षा गांधींखेरीज कुणासहि नाहीं. आणि देश त्याग करण्यास तयार नाहीं असं त्यांनीं कधींहि उच्चारलं नाहीं. माझ्यासारखे लाखों युवक बलिदानासाठीं तयार आहेत. मी तर देशासाठीं सर्वस्व अर्पण करण्यासहि कचरणार नाहीं. जीवन केव्हां ना केव्हां नष्ट होणारच! मानवी जीवन एकदांच मिळतं; मग तें देशासाठीं अर्पण कां करूं नये? याहून गौरवास्पद मृत्यू अन्य कोणता?"

मृत्यूचें नांव ऐकतांच विजयाच्या जिवाचा थरकांप उडाला. आजच्या शुभरात्रीं मृत्यूची ही अशुभ चर्चा?

निरांजनाच्या अपशकुनाची आठवण येऊन तिचें चित्त थरारलें. तिनं मनोमय प्रार्थना केली, "ईश्वरा, तुझ्या मनांत काय आहे तें तुलाच ठाऊक! आमचं हें मीलन असंच चिरंजीव राहूं दे आणि माझे पंचप्राण ओवाळून अभयचं संरक्षण कर. अभयच्या अंतरांतील ठिणगी केवळ स्वतःलाच नव्हे तर सभोंवतालच्या साऱ्या विश्वासहि पेटवील. जो आपल्या घरादारावर निखारे ठेवून सतीचं वाण घेऊन

निघाला त्याच्या सुरक्षिततेची काय शाश्वती ? ”

विचारमग्न अभय अस्वस्थ होऊन फेऱ्या घालीत होता.

त्याची ती अस्वस्थता पाहून विजया व्यथित झाली व म्हणाली, “ केवढी रात्र झाली अभय ! आतां झोपायंच नाहीं का ? ”

अभयच्या मनाची उद्विग्नता तिच्याच्यानें पाहवेना. तिनें महत्प्रयासानें त्याला अंथरुणावर बसविलें व त्याचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन स्नेहलपणें ती त्याला थोपटूं लागली. तिचें सारें वात्सल्य वर उसळलें. अभयचें कपाळ जवळ घेऊन तिनें त्याचें चुंवन घेतलें.

अभयनें कृतज्ञतेनें दीर्घ निश्वास टाकला व त्या सुखसमाधींत त्यानें नेत्र मिटले. विजयानें त्यास दीर्घ आलिंगन दिलें.

## ४

१९४१ च्या डिसेंबरमध्यें जपाननें सिंगापूरला इंग्रजांचीं दोन जहाजें ज्यावेळीं बुडविलीं, त्यावेळीं महायुद्ध आपल्या दाराशीं येऊन थडकल्याची भावना साऱ्या भारत देशांत पसरली. भारताच्या पूर्व किनाऱ्यावर आणि बंगालमध्यें पळापळी सुरू झाली. कलकत्ता रिकामा होऊं लागला. साऱ्या देशांत उलथापालथ व घालमेलीचें वातावरण सुरूं झालें. इतक्या भयंकर घटना जगांत घडत आहेत, जुनें जग जीर्ण होऊं पाहात आहे, नव्या जगाच्या निर्मितीच्या प्रसववेदना सुरू आहेत, अशा परिस्थितींतहि आम्ही निष्क्रियपणें बसून राहणार काय ? इतिहासाच्या पानांत आमच्या कर्तृत्वाचें नांवनिशाणहि राहणार नाहीं काय ? आम्हीहि कांहींतरी पुरुषार्थ गाजविला पाहिजे.

परंतु आम्ही करणार तरी काय ? आमच्या हातीं आहे काय ? कांहींच नाहीं. इतका विशाल आमचा देश ! हजारों वर्षांची परंपरा त्याच्या पाठीशीं आहे. एकेकाळीं साऱ्या विश्वाला त्याच्याकडून मार्गदर्शन मिळालें. परंतु आज ! आज मूठभर इंग्रजांनीं त्यास आपल्या

मुठींत ठेवलें ! मोठमोठे पुढारी, साहित्यिक, कलावंत, विचारवंत आमच्यांत आहेत. परंतु त्यांना विचारतो कोण ? किती झालें तरी ते गुलाम देशाचे रहिवासी ! आमच्या मताची विचारपूस न करतांच आम्ही इंग्रजांबरोबर युद्धांत सामील असल्याची घोषणा करण्यांत आली. पतित, लांछित आणि पराधीन देशाचें स्वतंत्र अस्तित्व तरी काय असणार ? गोऱ्या रंगाचा दीडदमडीचा शिपुरडाहि महात्मा गांधींपेक्षां जास्त मानाचा गणला जातो, आणि आम्ही हात चोळीत स्वस्थ बसतों. इतका मोठा देश मुर्दाड झाला ! पौरुषहीन बनला !

युद्धाच्या क्रांतींत आपला वांटा उचलण्यासाठीं देश उत्सुक होता. त्याचें म्हणणें होतें कीं, पोलंडवर जर्मनीनें आक्रमण केलें, त्याचें स्वातंत्र्य हिरावलें, म्हणून तुम्ही शस्त्र उचललेंत ना ? एका देशाच्या स्वातंत्र्या-साठीं जर तुम्ही रक्त सांडतां तर ज्या देशाला रक्ताचा एक थेंबहि न सांडता लेखणीच्या एका फटकाऱ्यासरशीं तुम्ही स्वातंत्र्य देऊं शकतां, तें कां देत नाहीं ? पुढें स्वातंत्र्य देण्याच्या तुमच्या आश्वासनांवर आम्ही विश्वास तरी कसा ठेवायचा ? आम्हांला अगोदर स्वातंत्र्य दिल्यास नंतर आमच्या युद्धांतील मदतीची शाश्वती काय असें कदाचित् तुम्हांला वाटत असेल. स्वातंत्र्य दिल्यानंतर आम्हीं मदत न केली तर तुमचें तेलहि गेलें आणि तूपहि गेलें ! परंतु त्यासंबंधीं आम्ही तसें संधिपत्रहि लिहून देण्यास तयार आहोंत कीं, "तुम्ही आम्हांस अगोदर मुक्त करा, मग आम्ही अगदीं मनापासून तुम्हाला युद्धांत मदत करूं. त्यासाठीं आपलें रक्तहि सांडूं."

परंतु इंग्रजांवर याचाहि परिणाम झाला नाहीं. करण्याची इच्छा असूनहि इंग्रजांनीं या देशास कांहींहि करूं दिलें नाहीं. सारें शासनसूत्र त्यांनीं आपल्या हातीं आवळून धरलें आणि युद्धानंतर आम्ही यंव् करूं नि त्यंव् करूं अशा प्रकारचीं आश्वासनें दिलीं ! परंतु त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. त्यांच्यांतील आणि जनतेंतील खाई अधिकच खोल होत गेली. देशाचा निद्रित पुरुषार्थ कांहीं तरी करून दाखवण्यास

आसुसला होता. त्यासाठीं परकीय सत्ताधाऱ्यांनीं संधि दिली नाहीं. परंतु अशा प्रकारें देशाचा तेजोवध झाल्यास तो मुर्दाड बनेल, मग त्यास उठवणें कठिण, हें गांधीजींनीं हेरलें. सर्वत्र भीतीचें वातावरण पसरलें होतें. इंग्रजांसमोर ब्रहि काढण्याची कुणाची छाती नव्हती. उलट युद्धांत मदत करण्यासहि लोक तयार होते. तरुण लोक फौजेंत भरती होण्यासाठीं उत्सुक होते. व्यापारी धनासाठीं हपापलेले होते. सरकारी अधिकारी युद्धप्रयत्नासाठीं जास्तींत जास्त खपून प्रशंसा मिळविण्यासाठीं आतुर झाले होते. वस्तूंचे भाव भरमसाट वाढून गरजेच्या वस्तूंचाहि अभाव झाला. गरीब जनतेची अन्नान्नदशा झाली रुपेरी आगगाडी गांठण्यासाठीं अहमहमिका सुरूं झाली. पैसा बनविण्यासाठीं धान्यांत गोटेमाती मिसळावी लागली तरी बेहेत्तर! आजची ही वाहती गंगा पुन्हा कुठून दिसणार ? किती हात धुवायचे ते धुऊन घ्या. संपत्तीच्या राशीच्या राशी बनवा. त्यासाठीं परमिट, खुशामत, लांच-लुचपत, युद्धाचा फंड—जो मार्ग सांपडेल तो खुशाल चोखाळा, अशी वृत्ति सर्वत्र दिसूं लागली. प्रतिष्ठित समाजांतील स्त्रिया शिपायांना चहा पाजण्यासाठीं प्रतिष्ठा सोडून कँटीनमध्यें बसूं लागल्या. शिपायांसाठीं लोकरीचे कपडे विणले जाऊं लागले. जखमांसाठीं पट्ट्या, वाचण्यासाठीं पुस्तकें, मनोरंजनासाठीं सिनेमा आणि नाचतमाशे ! लढाईच्या मैदानांत जाईल तोच आजचा देव ! करा त्याची पूजाअर्चा ! भारतीय स्त्रियांची गोऱ्या शिपायांनीं टवाळी केली तरी ती सहन करा ! कोणताहि अपमान झाला तरी 'हँ हँ' करून लांगूलचालन करा ! कांहीं झालें तरी भारतीय नागरिकांचें रक्त मात्र उसळूं देऊं नका ! बर्फाप्रमाणें त्यास थंडगार होऊं द्या ! असें वातावरण सर्वत्र पसरलें. गांधीजी म्हणाले, "देशाची स्मशानभूमि झाली; मानव मानव राहिला नाहीं; पशू बनला ! यावेळीं जर याला वांचवलं नाहीं तर या पुढें याचं जगणं कठिण." शेवटीं हें असह्य होऊन इतक्या पुरातन वद्ध देशास नपुंसक बनवण्याचें पाप ज्यांनीं

अनुक्रम ११
विभाग

केलें त्यांना गांधीजी म्हणाले, "भारत सोडा!"

प्रथम सरकारला वाटलें, "गांधीजींचें डोकें फिरलें. जपानी फौजा हिंदुस्थानच्या सीमेवर उभ्या आहेत आणि संरक्षणकर्त्यांसच गांधीजी म्हणतात 'चालते व्हा'! हें उघडया डोळयानें आगीत उडी मारण्या-सारखें नव्हे काय? असला मूर्खपणा आम्ही कदापि होऊं देणार नाहीं. आम्ही भारताला वांचवल्याखेरीज राहणार नाहीं."

गांधीजींनीं सवाल केला, "वांचवणार खरे! पण कुणासाठीं? स्वत:साठींच ना?"

इंग्रज म्हणाले, "जपानी पंज्यापासून आम्ही तुमचें रक्षण करणार आहोंत. जपानी इतके क्रूर आहेत कीं गोळ्या झाडून तुम्हांला ठार करतील. ते तुमचे कट्टर दुश्मन आहेत."

गांधीजींनीं उत्तर दिलें, "तुम्ही आहांत म्हणून ते आमचे दुश्मन! वास्तविक आमचं कुणाशींहि वैर नाहीं. कारण आम्हीं कुणाचंहि वाईट केलं नाहीं. तुमच्याशीं वैर असल्यामुळें सारे आमचे वैरी! अगोदर तुम्ही चालते व्हा कसे! म्हणजे आमच्याशीं साऱ्यांचं वैर संपेल! इतक्यावर कुणी आमच्यावर शस्त्र उपसलंच तर आम्ही त्याचा समाचार घेऊं. तुम्हांला काय करायचंय?"

इंग्रज म्हणाले, "शत्रूला सामील होण्याचाच हा कट आहे. हें पाठीमागून वार करण्यासारखें आहे. आमच्यावर इतकं घोर संकट आलं असतांना हे म्हणतात चालते व्हा! भारत सोडल्यानंतर जर्मनीशीं लढायचें तें कुणाच्या बळावर? आमच्या देशावर जर्मनींनें खुशाल बाँबचा वर्षाव करावा, आमचे तरुण त्यांच्या तोफांच्या भक्ष्यस्थानीं जावोत, आमच्या स्त्रिया विधवा होवोत, यांना त्याची पर्वा नाहीं. हा दगा आहे. यांत धोकेबाजी आहे. यांना चांगला धडा शिकवला पाहिजे. कडक धोरणाशिवाय हे वठणीवर यायचे नाहींत."

चर्चिलसाहेबांनीं आदेश दिला, "बंडखोरांच्या बाबतींत कसलीहि

दयामाया दाखविण्याची जरूर नाहीं. गरज पडल्यास खुशाल गोळ्या झाडा."

इकडे गांधीजींच्या लेखांतून आणि भाषणांतून अग्निस्फुल्लिग बाहेर पडूं लागले. त्यांच्या अंतरांत धुमसत असलेला ज्वालामुखी बाहेर उसळूं लागला.

ते लेख वाचून, आणि गांधीजींच्या अन्य अनुयायांचीं भाषणें ऐकून अभय उत्तेजित होई. तो म्हणे, "विजया ! आपल्या देशांत नक्की क्रांति होणार. त्यासाठीं तयार राहा. भावी इतिहास आतां घडायचा आहे. त्या पूर्जेत आपणहि आपला अर्घ्य दिला पाहिजे. होऊं दे ! खुशाल मोठा प्रलय होऊं दे. त्यापुढें जगणं नि मरणं यांत मोठंसं तें काय ? एका स्फुल्लिगासारखं तेजोमय जिणं क्षणभरासाठीं जरी जगतां आलं तर मग आणखी काय पाहिजे ?"

विजयानें विचारलें, "म्हणजे ? आहे तरी काय विचार ?"

"बस् ! जें गांधी म्हणतील तें ! त्यांनाच आपल्या देशाची नाडीपरीक्षा आहे. ते सांगतील तोच उद्धाराचा मार्ग ! मग आगींत उडी घ्यावी लागली तरी बेहेत्तर !"

अन् त्याच दिवशीं त्यानें गांधीजींना पत्र लिहिलें :

"**भारताचे भाग्यविधाता पू. बापूजी,**

या देशाच्या चाळीस कोटी जनतेचा श्वास तुमच्या श्वासांत सामावला आहे. तुमचें हृदयस्पंदन म्हणजे समस्त देशवासियांचें स्पंदन आहे. भगवान् राम आणि कृष्णाच्या या भूमींत कितीतरी शताब्दींनंतर तुम्ही आलांत. या देशाच्या आत्म्यास तुम्ही जाणतां ! तुमच्या फक्त आज्ञेचाच अवकाश—माझ्यासारखे लाखो युवक तुमच्या हांकेला तयार आहेत. मीहि तयार आहें."

**—अभयकुमार**

गांधीजीचें तावडतोब उत्तर आलें, " ठीक आहे. पण सध्या जरा सबूर ! लवकरच ती वेळ येणार आहे. आतां जास्त थांबावें लागणार नाहीं. "

ज्या वेळीं हें पत्र त्याच्या हातीं पडलें त्या वेळीं तो आनंदानें बेभान होऊन ओरडला, " ए ऽऽ ! विजया ! बघ बघ ! स्वत: गांधीजींनीं आपल्या हातांनीं मला पत्र लिहिलंय् ! अग वेडे ! आहेस कुठें तूं ! बघ तुझा अभय किती भाग्यवान् आहे तो ! हें पत्र जपून ठेव. अगदीं प्राणापलीकडे ! ही आपली ठेवच समज. "

तें पत्र त्यानें आईला दाखवलें तेव्हां ती म्हणाली, " आण बेटा ! मी तें आपल्या पोथींत ठेवतें. "

## ५

दिनांक १४ जुलई रोजीं वर्ध्यास काँग्रेसच्या कार्यकारी मंडळाची बैठक भरली व " भारत छोडो " हा ठराव पास करण्यांत आला. अभय वर्ध्यास गेला. बजाजवाडींत कार्यकारिणीच्या सभा भरत. सभेस जातांना, येतांना मोठमोठ्या नेत्यांचें दर्शन त्यास घडे. ज्यांनीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं त्याग केला आणि आपल्या मार्गावर जे आमरण अढळ राहिले त्यांच्या धवलवस्त्रांनीं आणि तप:पूत कांतीनें अभयचे डोळे दिपत. त्यांना तो मनोभावें नमस्कार करी. सभेची अखेरची बैठक झाल्यानंतर सरदार वल्लभभाई पटेल शंकरराव देवांबरोबर अतिशय त्वेषानें बाहेर पडले. बाहेर त्यांची निकटवर्ती मंडळी उभी होती, त्यांनीं विचारलें, "काय ठरलं ? " काय करायचंय् ?"

## ६

" सर्व कांहीं–" त्यांचे ते वज्रकठोर शब्द ऐकून अभयला वाटलें, या लोहपुरुषाचें पौरुष देशाच्या नसानसांत खेळेल व देश जागृत होईल.

वर्ध्यानंतर मुंबई ! आणि मुंबईतील तो ७ ऑगस्ट १९४२ चा दिवस ! गवालिया टँकमध्यें अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचें अधिवेशन भरलें होतें. वर्ध्याच्या ठरावावर त्यांत शिक्कामोर्तब व्हायचें होतें. लोकांमध्यें विलक्षण उत्सुकता होती. वातावरण गंभीर होतें. अंतःकरणांत कांहींशी साशंकता असली तरी उत्साहहि होता. आमचे थंडगार झालेलें रक्त कांहींसें गरम बनलें. आजपर्यंतचा निद्रित राष्ट्रपुरुष गाढ निद्रेंतून हळू हळू जांभया देत जागा होत होता. त्याला कांहीं तरी करायचें होतें. केल्याशिवाय राहावत नव्हतें. उद्यां काय घडणार हें कोणासहि ठाऊक नव्हतें. पण कांहीं तरी घडणार निश्चित हें सर्वच जाणत होते. हरकत नाहीं. कांहींहि घडो. पण ही स्मशानशांति, ही जडता, कबरींतल्या फत्तरासारखी शीतलता, नपुंसक निष्क्रियता ही तरी एकदांची नष्ट होवो. मग ती एखाद्या पतंगाची दीपशिखेवर होणारी झडप कां ठरेना ! हा सर्वनाश असला तरी त्यांत गति आहे, जीवन आहे, चतन्य आहे; हा जरी मृत्यु ठरला तरी जीवन अमर करणारी महाचैतन्यशाली अशी ती क्रिया आहे. काय सुंदर पर्व हें ! खरंच, आमच्यासमोर इतिहास घडायचा आहे का ?

अभयकुमार मुंबईला गेला. तो कॉंग्रेसचा प्रतिनिधि नसूनहि केवळ एक प्रेक्षक म्हणून तो तेथें गेला.

घरून निघतांना विजयानें विचारलें,

"कुठें निघालास ?"

"जिथें क्रांतीची ठिणगी पेटणार तिथें !"

"तिथं काय काय घडणार ?"

"कांहीं सांगतां येत नाहीं. पण आजची असहायता, निष्क्रियता मात्र खात्रीनं नाहींशी होणार !"

"मग तुझ्या थिसिस्‌चं काय होणार ?"

"त्यांत मन लागत नाहीं. मला माझ्या नसानसांतून चैतन्य

खेळत असल्याचा भास होतोय्. आतां मी जीवनाचा नवाच प्रबंध लिहिणार आहे."

"परत केव्हां येणार?"

"तें ठाऊक नाहीं, पण परत येईन जरूर. आणि जर नाहींच आलों तर--?"

"तर काय ?" तिनें एकदम घाबरून विचारलें. तिचा आवाज कांपत होता. श्वास दाटला होता.

"ज्वालामुखीचा जेव्हां स्फोट होतो तेव्हां कोण येणार अन् कोण जाणार हें कोण सांगूं शकणार ? विजया ! आज नाहीं तर उद्यां ज्वालेंत भस्म होऊन पंचतत्त्वांतच मिळायचंय् ना ?"

"उगाच अभद्र कशाला बोलतोस ! माझा फार जीव घाबरतोय् !"

"अग वेडे ! त्यांत घाबरण्यासमरखं आहे काय ? ही तर महा-पर्वणी आहे. शिवाचं रौद्ररूप आतां दिसणार आहे. त्याच्या डमरूचा डम्डम् ध्वनि ऐकूं येणार. त्या नादांत धरा, स्वर्ग, सारं त्रिभुवन डोलूं लागेल. हा तर आनंदाचा क्षण आहे. शंकराच्या या तांडवनृत्यांत समरस होऊन आपणहि नाचूं या."

अभय काय जाणें किती तरी वेळ बोलत होता. विजयालाहि ठाऊक होतें कीं आतां हा पूर्वीचा शांत अभय राहिला नसून त्याचा कायाकल्प झाला आहे. विचार, भावना-साऱ्यांची उलथापालथ झाली आहे. तो आतां व्यक्ति नसून एका अज्ञात, अगम्य शक्तीचें प्रतीक बनला आहे. त्या विशिष्ट प्रेरणेनेंच तो आजकाल वागतो आहे. त्याला प्रतिबंध करण्याची कुणांत शक्ति आहे ? गंगेच्या प्रवाहास बांध घालतां येईल का ? दैवी प्रकाशानें दिव्य उजळा मिळण्याचे, चिर आनंदाचे असे क्षण भाग्यवान मानवांच्या जीवनांत कधीं कधीं निर्माण होत असतात. भगवान् बुद्धांना बोधिवृक्षाखालीं ज्यावेळीं ज्ञान झालें, रामकृष्णांना ज्यावेळीं परमहंसांचें

दर्शन घडलें, त्यावेळींही असेंच कांहींसें झालें. विधात्याच्या कृपेनें जेव्हां असे क्षण येतात तेव्हां मनुष्य आनंदानें बेभान होऊन ओरडतो, " सांपडलं ! मला जें हवं होतं तें हेंच ! आतां मला कांहींहि नको ! " या आनंदाच्या तूर्यावस्थेंत जड आणि चेतनाचीं सारीं बंधनें गळून पडतात. मग साक्षात् सच्चिदानंदाचें दर्शन घडल्यास नवल तें काय ?

आजकाल अभयची कांहींशी अशीच अवस्था झाल्याचें विजयास आढळलें. ज्या आपल्या पुरातन देशामागें हजारों वर्षांची संस्कृति आणि परंपरा आहे त्याचें जिवन्त प्रतीक एकमेव गांधीजी आहेत अशी अभयची श्रद्धा जडली. आपल्या देशाची थोरवी तरी काय वर्णावी ? हिमालयाची श्वेत पताका ज्यावर अनादिकालापासून फडकत आहे, वेद आणि उपनिषदांच्या मंत्रसंगीतानें ज्याचीं तपोवनें निनादलीं, गंगा-यमुनांच्या सलिलधारा जेथें मानवाच्या करुणेच्या प्रतीक बनल्या, असा गौरवशाली आमचा देश ! मानवतेच्या मूल्याखेरीज इतर मूल्यांची जोपासना इकडे कधींहि झाली नाहीं. साम्राज्याची आसुरी लालसा त्यानें कधीं बाळगली नाहीं. द्वेष आणि हिंसेस त्यानें थारा दिला नाहीं. भौतिक मूल्यांपेक्षां आध्यात्मिक मूल्यांची नेहमीच प्राणप्रतिष्ठा केली. देव आणि मानव यांतील असणारें अंतर गांठण्याचा ज्यानें प्रयत्न केला; त्याच देशाचे आज गांधी प्रतीक आहेत. व्यास, वाल्मिकी, कबीर, तुलसी, नानक, तुकाराम, मीराबाई आणि लक्ष्मीबाई यांचेंच रक्त त्यांच्या नसानसांतून खेळत आहे ? बस ! भारताचा आजचा प्रकाश तेच आहेत. आपल्या साऱ्या आकांक्षा व स्वप्नें त्यांच्यांतच सामावलीं आहेत. ते करतील तेंच घडेल. एरव्ही कांहींहि घडणार नाहीं. या संबंधीं अभयची पूर्ण निष्ठा जडली, बालंबाल खात्री झाली. आतां त्याच्यासमोर एकच मार्ग, एकमेव ध्येय. तें म्हणजे गांधीजींच्या मागून जायचें ! त्यांनीं म्हटलें की, " विस्तवांत उडी घे, तर मागें पुढें न पाहतां विस्तवांत उडी घ्यायची— कारण उडी घेण्यांतच जीवन असून बाहेर राहणें म्हणजे मृत्यूच ! "

विजया आतां अभयला अडवूं शकत नव्हती. अडविण्याची तिची इच्छाहि नव्हती. जीवनाशीं खेळण्याची त्याची ही वृत्तीच तर विजयाला आवडली होती. अभयचा तिला अभिमान वाटे अशा पुरुषरत्नाचा लाभ झाला या जाणीवेनें तिचा ऊर अभिमानानें भरून येई! उगाच एक धोंड बनून त्याच्या मार्गांत येण्याची तिची इच्छा नव्हती. परंतु आजकाल एका चिंतेनें तिचें मन व्यापलें होतें. तिच्या कुशींत असलेल्या नव्या जिवाची अस्पष्ट चाहूल तिला येत होती. तिच्या हृदयांत अपूर्व स्पंदन होऊं लागलें. आपलें जीवन दिव्य संगीतानें अन् इंद्रधनुष्याच्या विविध रंगांनीं व्याप्त झाल्याचा तिला अनुभव आला.

मातृत्वाच्या रूपानें जणू कांहीं स्वर्गच हातीं येणार असल्यासारखा तिला आनंद होत होता. पण नव्या जीवाच्या संरक्षणाची एक नवीच काळजीहि वाटत होती. ठराविक चाकोरीचें जीवन असतें तर कांहीं पर्वा नव्हती. रीसर्चसाठीं अभयला शिष्यवृत्ति मिळतच होती, एक दोन चांगल्यापैकीं शिकवण्याहि होत्या. अभयची आई कुणाचेंहि न ऐकतां शेजारीं पाजारीं कांहीं काम मिळवतच असे. बेताबाताची मिळकत असली तरी खास कष्ट असे कोणतेहि नव्हते. जीवनाच्या गरजा कशा तरी भागतच होत्या. परंतु अन्यत्र दुर्मिळ असणारी एक गोष्ट त्यांना लाभली होती. ती म्हणजे तिघांचें परस्परांवरील उत्कट प्रेम! त्यामुळें ते स्वतःला सर्व जगापेक्षां सुखी समजत! त्यांच्याकडे जणू कांही स्नेहाचा अखंड वर्षाव होत होता. स्वतःऐवजी दुसऱ्यास सुखी ठेवण्यासाठीं धडपडण्यांत त्या तिघांची जणू कांही चढाओढ लागे. आई गहिंवरून म्हणे, "स्वर्ग आकाशांत आहे किंवा मृत्यूनंतरच तो दिसतो असं कांहीं नव्हे. स्वर्ग या जगांत, याच माझ्या चिमुकल्या घरांत आहे. माझी विजया साक्षात् लक्ष्मी आहे. ती आली आणि आमच्या घराचं स्वरूप पालटलं. बस! आतां मला कांहीं एक नको. भगवंता, विजया नि

अभयला सुखी ठेव व त्यांच्याच खांद्यावरून मला जाऊं दे हीच अखेरची इच्छा आहे."

अभयला वाटे, "अशी आई मला लाभली हें माझं केवढं भाग्य आहे! किती धीरोदात्त, सोशिक आणि समजूतदार आहे!"

तो दोन वर्षांचा असतांना प्लेगनें त्याचे वडील वारले. आईनेच खस्ता खाऊन त्याला वाढवलें. वडील मिडल् स्कूलमध्यें अध्यापक होते. नाही म्हणायला पोस्टांत तीनशे रुपये त्यांनीं मागें टाकले होते. पण त्यापेक्षां अभय आणि त्याची आई यांचें आत्मबल व चारित्र्य या रूपानें असलेली त्यांची सम्पत्ति बहुमोल होती. त्या जोरावरच जीवनाच्या संघर्षांत दोघांचा टिकाव लागला. दारिद्र्य, कष्ट, अपमान–सारें कांही आईला सोसावें लागलें. पण तिने आपल्या मनांत लेशमात्रहि कटुता येऊं दिली नाहीं. कितीहि कडवट घोट असेना का! 'ऊं:! असं चालायचंच!' असें म्हणून ती पचवून टाकी. उपासतापास म्हणजे तिच्या दृष्टीनें अगदीं सहजच गोष्ट होती. चातुर्मासांत ती एकाच वेळीं जेवी. अभयसाठीं दुधाची किंवा गरम कपड्यांची सोय करायची असली कीं हे चातुर्मास बारा मासांचे बनत. सोमवार, एकादशी, शिवरात्र इत्यादि उपास असतच. असा तिचा वर्षानुवर्षाचा स्थायी जीवनक्रम होता.

परंतु त्यामुळें पंचेचाळीस वर्षांच्या वयांतच तिचें केंस पिकले. चेहऱ्यावर वार्धक्याच्या छटा उमटल्या. पण तरी तिनें जीवनाबद्दल कधीं तक्रार केली नाहीं. एक प्रकारचें विलक्षण समाधान तिच्यांत वसत होतें. तिचा चेहरा सात्त्विक असून तिच्या स्मितांत सारें पावित्र्य मूर्त होऊन समोर आल्याचा भास होई.

कोणत्याहि संकटसमयीं तिला डगमगलेलें कुणीं पाहिलें नाहीं. पतीचा मृत्यू झाला तेव्हां शवाबरोबर स्मशानांत जाण्याचा हट्ट तिनें धरला. लोकांनीं परोपरीनें समजावलें. "स्त्रिया का कुठें स्मशानांत जातात?"

"कांहीं झालं तरी मी तुमच्यामागें येईन. त्यांचं सर्व यथाविधि झालेलं मला डोळ्यांनीं बघूं दे." आणि झोपलेल्या दोन वर्षांच्या अभयला घेऊन खरोखर ती जायला निघाली. लोकांना आतां ही चितेंत उडी घेते कीं काय अशी भीति वाटली. शेवटीं तिच्या संरक्षणासाठीं कांहीं लोक तिच्याजवळ राहिले. ती म्हणाली, "तुम्हांला वेड लागलं कीं काय? या चिमुकल्या अभयला एकटं टाकून मी जाईन असं तुम्हांला वाटलं तरी कसं? छे असा भ्याडपणा मी कधींच करणार नाहीं!" आणि कांहीं अंतरावर असलेल्या एका पिंपळाच्या झाडाखालीं बसून उघडया डोळ्यांनीं खरोखर तिनें सारें पाहिलें. मांडीवर झोपलेल्या अभयला त्याच्या घरांतल्या पालटलेल्या विश्वाचा पत्ताहि नव्हता!

तेव्हांपासून आतांपर्यंत अतिशय दक्षतेनें तिनें अभयला वाढविलें. ती स्वत: तीनचार वर्ग शिकली होती. रामायण, गीता इत्यादि वाचण्यापुरतें तिच्या यजमानांनीं तिला शिकवलें होतें. अभयच्या मनांत आपली मातृभूमि, संस्कृति, धर्म, इत्यादींच्या निष्ठांची जोपासना त्याच्या आईनें केली होता. अभय आपल्या आईला दिव्य शक्तीचें स्वरूप मानीत असे. त्याची आई त्याला आनंद, मांगल्य, आणि शांतीचें प्रतीक अशी वाटे.

आईनें गांधीजींना फक्त एकदांच पाहिलें होतें परंतु त्यांना पाहतांच हे राम आणि कृष्णाच्या मालिकेंतील अवतारी पुरुष असल्याची तिची श्रद्धा झाली. "संभवामि युगे युगे" या आश्वासनाप्रमाणें त्यांनीं गांधीजींच्या रूपानें भारतांत जन्म घेतला असल्याची तिची निष्ठा जडली व ती म्हणाली, "गांधी अवतारी पुरुष आहेत. त्यांच्या काळीं आम्ही जगतों आहोंत हें आमचें परमभाग्य आहे! तेच या देशाचे उद्धारकर्ते आहेत. त्यांची सेवा म्हणजे साक्षात् भगवंताचीच सेवा होय."

ती रोज चरख्यावर नियमानें सूत काढीत असे. स्वत: कातलेल्या सुतांत स्वत:चे आणि कधीं कधीं अभयचे कपडेहि ती करी. गीतावाचन, आणि रामधुन हे तिचे नित्याचे नियम होते.

या सर्व गोष्टींचा अभयवर परिणाम झाला व तो गांधींचा कट्टर भक्त बनला. जवळच सेवाग्राम असल्यामुळें वर्षांतून एखादेवेळीं त्याची तेथील वारी होत असे. कॉलेजमधील वादविवादांतून, भाषणांतून, लेखांतून तो गांधीच्या अहिंसावादाचा पुरस्कार करी. गांधींच्या 'हरिजन-'चा तो नियमित वाचक असून त्यांतील एकेक शब्द तो आत्मसात करी. अमेरिकन, इंग्रज, फ्रेंच इत्यादि लेखकांचीं गांधीजींवर असलेलीं सारी पुस्तकें त्यानें वाचलीं. गांधींचे विचार त्याच्या अंत:करणांत खोलवर रुजले होते. परंतु गांधीजींजवळ त्यांना कांहीं विचारपूस करण्यास जावें असें मात्र त्याला वाटलें नाहीं. तो म्हणे, ' उगीचच गांधीजींच्या वेळेचा अपयव्य कशाला करायचा ? माझ्या मनांत जर कांहींच शंकाकुशंका नाहींत, त्यांचा शब्द न् शब्द मला पटतो, तर मग उगीचच काथ्याकूट करायला कशाला जाऊं ? ज्यांच्या मनांत शंकाकुशंका असतील व गांधीजींना भेटल्याबद्दल ज्यांना वर्तमानपत्रांत आपलीं नांवें झळकायला हवीं असतील त्यांनीं खुशाल त्यांच्या भेटीला जावें, मला त्याचा जरूर नाहीं. "

त्यामुळें सरकारी नोकरी न करण्याचा त्यानें निश्चय केला. विश्व-विद्यालयांत रिसर्च करून एखाद्या बिनसरकारी कॉलेजमध्यें प्राध्यापक बनण्याचें त्यानें ठरविलें व उरलेल्या वेळांत जनसेवा करण्याचा निश्चय केला.

## ७

१९४२ सालीं अभयच्या रिसर्चचें शेवटचें वर्ष होतें. रिसर्चसाठीं मिळणारी शिष्यवृत्ति आणि चौधरी मॅजिस्ट्रेटच्या मुलांची शिकवणी यांत त्याचें उत्तम रीतीनें भागत असे. संपत्तीची लालसा त्यांच्यापैकीं कुणा लाच नव्हती. तो आणि त्याची आई याचें फारसें आश्चर्य नाहीं; पण याबाबतींत विजया मात्र अद्भुतच म्हणावी लागेल. कारण संपन्न अशा

माहेराहून ती इकड आली होती तरी कसलीहि उणीव तिला जाणवली नाहीं. एवढेंच नव्हे तर तें घर तिला सुखाचें धाम वाटत होतें. भव्य पलंग, गाद्यागिरद्या, सुग्रास जेवण, क्लब, सिनेमा इत्यादि गोष्टींनीं तिच्या मनाची कधींच पकड घेतली नाहीं. कमलपत्राप्रमाणें या सर्व गोष्टींपासून ती अलिप्त होती. अभय तिचें सर्वस्व होता आणि त्याच्या प्राप्तीनंतर अन्य कोणतीहि कामना तिला उरली नव्हती. तीन खोल्यांच्या छोटया घरांत तिनें जणुं कांहीं स्वर्गच थाटला होता. जेवतांना कधीं भाजी गायब असे तर कधीं आमटी ! दूध कधींमधीं मिळे. तुपाचें दर्शन म्हणजे कपिलाषष्ठीचा योग ! अभय कष्टी होऊन म्हणे, " या खडतर आयुष्याची तुला संवय नाहीं. किती त्रास होत असेल तुला ?"

"उगाच कांहीं तरी ! मला इथें काय कमी आहे ? उलट काकांकडे खाणं, पिणं, झोपणं, गप्पा झोडणं यांखेरीज दुसरा कांहींच उद्योग नव्हता. ना कुठलं ध्येय ना कुठला आदर्श, ना कुठले प्रश्न ! एखाद्या डबक्यांतलं तुंबलेलं जीवन ! आणि इथें जीवनाचा जणुं चैतन्यमय प्रवाह ! किती आनंद, किती सुख आहे यांत ? लहानपणीं आईला अंतरलें पण इकडे मला जिवाभावाची आईच मिळाली. आणि अभय तूं ! तुझा लाभ कोणत्या स्त्रीला गौरवास्पद वाटणार नाहीं ?"

अभय म्हणे, " विजया, तूं खरोखर प्रियदर्शनी आहेस. सारं कांहीं तुला शिवच दिसतं आणि त्या शिवाचीच पखरण तूं सभोंवतालीं करतेस जणुं ! तूं आलीस अन् या छोटयाशा कुटींत मंगलदीप उजळलास."
त्या तिघांत अधिक भाग्यवान् कोण हें ठरवण्याचीच पैज लागे. अन् या पैजेंत प्रत्येकजण आपलाच पहिला क्रमांक लावून आपणास धन्य मानी ! किती सुखी कुटुंब होते तें !

१९४२ च्या ९ ऑगस्टचा स्फोट होण्यापूर्वीं इंग्रजांनीं भारताशीं तडजोड करण्याचा पुन्हा प्रयत्न केला. इकडल्या नेत्यांनाहि सामोपचारानें गोष्टी झाल्या तर हव्या होत्या. म्हणून क्रिप्स-मिशन आलें. अनेक भेटी-

मुलाखती झाल्या. लांब लांब चर्चा झाल्या. वर्तमानपत्रांचे रकाने भरूं लागले. त्या दिवसांत देशांत याखेरीज दुसऱ्या कशाचीहि चर्चा नव्हती.

एक दिवस संध्याकाळीं अभय रेडिओ ऐकून आला आणि म्हणाला, "आई ! समेट झाला. आपले दिवस पालटले !"

"समेट झाला ? तो कसा काय ?" आईनें विचारलें.

"दिल्लीहून अशी बातमी आली आहे कीं अंतिम ठराव वगैरे सारं झालं; आतां फक्त सही व्हायची उरलीय् ! आपलं ध्येय आतां जवळ आलं." अभय उत्साहानें म्हणाला.

"तूं म्हणतोस म्हणून मानणं भाग आहे. पण रक्ताची किंमत दिल्याखेरीज कांहींहि साध्य होत नाहीं असं मला आपलं वाटतं ! आपल्या देशानं पुरा भोग भोगण्यापूर्वीच बसल्या बसल्या स्वराज्य मिळणार कीं काय ? साता समुद्रांपलीकडून एक दिवस गोरे आले आणि गेले स्वराज्य देऊन, यावर माझा तरी विश्वास बसत नाहीं."

आणि शेवटीं आईचें म्हणणें खरें ठरलें. दुसऱ्या दिवशींच क्रिप्स-मिशन फिसकटल्याची बातमी वर्तमानपत्रांत झळकली. मिशनचे लोक आले तसे परत गेले. गांधीजी गंभीर व अबोल झाले !

## ८

देशांत खळबळ माजली. एकदम दडपशाही सुरू झाली. परंतु पुढाऱ्यांनी सांगितलें, "सध्यां शांत राहा. अगोदर बारकाईनें परिस्थिति पाहा आणि मगच पाऊल उचला." क्रिप्स-मिशन कां अयशस्वी झालें याचें विवेचन करण्यासाठीं सर्वत्र सभा झाल्या. ९ एप्रिलपासून साऱ्या देशांत सप्ताह पाळला गेला. १३ एप्रिलला जालियनवाला बागेच्या हुतात्म्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली आणि १८ जूनला झांशीच्या राणीची पुण्यतिथि पाळण्यांत आली. काँग्रेस-कार्यकर्त्यांमध्यें पुन्हा आवेश येऊं लागला. काँग्रेस कमिटींत पुन्हा जीव आला. सभा होऊं

लागल्या. मिरवणुकी निघूं लागल्या. आपल्याला कांहींतरी करायचें आहे, या विचारानें सारे बेचैन झाले.

इकडे गांधीजींनी ललकारी दिली,

" भारत सोडा ! "

तिकडे साऱ्या देशांत त्याचा प्रतिध्वनि उमटला—

" भारत सोडा. "

नोकरशाहीनें आपलीं शस्त्रास्त्रें परजण्यास सुरुवात केली. गुप्त पोलिसांचें जाळें सर्वत्र पसरलें. लष्कर, तुरुंग, पोलिस या खात्यांत नवी भरती होऊं लागली. सरकारी नोकरांना गुप्त सूचना जाऊं लागल्या. ' या वेळीं जो दुबळेपणा दाखवील त्याला पंचमस्तंभी गणलें जाईल आणि दक्षता दाखवील त्याला बढती मिळेल. " अर्थात् दुबळेपणा क्वचितच् दाखवला जाई व कार्यदक्षता दाखविण्याबद्दल स्पर्धा माजली. बन्दुकीच्या नळ्यांची साफसफाई होऊं लागली. जोड्यांच्या टांचांना खिळे ठोकले गेले. तुरुंगांच्या खोल्या स्वच्छ केल्या गेल्या.

मुंबईंतहि हेंच वातावरण. सरदार पटेलांनीं आपल्या भाषणांतून आग पाखडली. आझादसाहेबांनीं जोरदार भाषण दिलें. पंडित नेहरू तर साक्षात् अंगारासारखे भडकले होते ! परंतु अभयकुमारवर सर्वांत जास्त प्रभाव पडला तो गांधीजींचा ! ते वज्रकठोर बनले होते. ते म्हणाले, " मला या देशांत शांतता हवी खरी. परंतु ! ती स्मशानशांतता मात्र नको. इंग्रजांनों ! हिंदुस्थानानं लढाईंत खपावं व मदत करावी आणि त्या नंतर आपण मात्र खुशाल हिंदुस्थानच्या तोंडाला पानं पुसावीं असं तुम्हांला जर वाटत असेल तर तें अशक्य आहे. गुलाम हिंदुस्थानच्या मढ्यास पाठीवर लादून युद्ध करणें तुम्हांला जड जाईल. आधीं हिंदुस्थान सोडा. त्यानंतरच तुमचा भार हलका होईल व प्रेतवत् झालेल्या हिंदुस्थानांत जीव येऊन तो तुमच्या बाजूनं लढेल !

परंतु तुम्हांला हें कुठें हवंय् ? आमच्यावर आपत्ति आली म्हणून

मदत करा, पण स्वत:संबंधीं मात्र चकार शब्दहि काढूं नका, हें तुमचं म्हणणं ! परंतु यापुढें असल्या गोष्टी चालणार नाहींत. 'करूं किंवा मरूं' हाच आमचा अखेरचा निर्णय आहे. त्या खेरीज अन्य मार्ग नाहीं. माझ्याबरोबर कोणी आलं नाहीं तरी वेहेत्तर मी एकटाच जाईन. पण त्यानंतर जर देशांत कांहीं विपरीत घडलं तर त्यास मी जबाबदार राहणार नाहीं. त्याची जबाबदारी सर्वस्वी तुमची ! कांहीं झालं तरी आतां स्वस्थ बसणार नाहीं."

अभय गांधीजींचें भाषण लक्षपूर्वक ऐकत होता. त्यांच्या एकेका शब्दांत सामर्थ्य भरलें होतें. भारताचें सारें संचित जणुं कांहीं महात्माजींत सांठलें होतें. अभयकुमार अगदीं मुग्ध झाला. गांधीजींचे ते शब्द त्याच्या मनांत खोलवर जाऊन रुजले.

"मी जें सांगतो तें फक्त हिंदुस्थानासाठीं नसून साऱ्या जगाच्या दृष्टीनं मी सांगत आहें. साऱ्या देशांना मी मित्र मानतों; इंग्रजांनाहि ! आज चाललेला जगांतील विध्वंस पाहून माझ्या अंत:करणास वेदना होतात. आज मानवाचं अध:पतन होऊन तो पशुतुल्य बनला आहे. परंतु यांतूनच मानवतेस आव्हान मिळेल. माझा अहिंसेवर विश्वास आहे. सर्वत्र अहिंसेचें साम्राज्य पसरलं असतां मी स्वस्थ कसा बसेन ? मी जर स्वस्थ बसलों तर ईश्वरासमोर मला त्याचा जाब द्यावा लागेल. माझी जशी श्रद्धा आहे; त्याप्रमाणें वागणं माझं कर्तव्य आहे. केवळ हिंदुस्थान-च्याच नव्हे तर साऱ्या विश्वाच्या उद्धाराच्या दृष्टीनं मला विचार करायचा आहे. 'तुमचा मार्ग चुकीचा आहे तो सोडा' असं मला साऱ्या जगाला सांगायचं आहे. पण मी जर आपल्याच देशांत कांहीं करूं शकलों नाहीं, तर इतरांना कोणत्या तोंडानं सांगणार ? म्हणून अगोदर स्वातंत्र्य मिळवल्यानंतरच हिंसा सोडा असं मी जगाला सांगूं शकेन. आणि त्याच वेळीं माझ्या शब्दांना कांहीं अर्थ राहील. आज तरी मी सर्वस्वी लाचार आहें.

पण यापुढें असली लाचारी मी स्वीकारणार नाहीं. मी इंग्रजांचा जुना दोस्त आहें. यापुढें माझी दोस्ती टिकवणं किंवा न टिकवणं त्यांच्या हातीं आहे. मी जो मार्गसांगत आहें, तो इंग्रजांच्याच कल्याणाचा आहे. तो जर त्यांना पटला व त्यांनीं हिंदुस्थानला स्वातंत्र्य दिलं, तर साऱ्या जगावर त्याचा जादूसारखा परिणाम होईल आणि युद्धाचा नूरच पालटेल. आमचं स्वातंत्र्ययुद्ध केवळ हिंदुस्थानच्या कल्याणासाठीं नसून जगाच्या कल्याणासाठीं आहे. परंतु इंग्रजांना जर हें न पटलं तर यापुढें अधिक थांबण्यासाठीं मला वेळ नाहीं. 'करीन किंवा मरेन' याखेरीज अन्य उपाय नाहीं."

हें भाषण देतांना झालेली गांधीजींची दृढनिश्चयी मुद्रा अभयच्या अंत:करणावर कायमची कोरली गेली. नेहमींची कुसुमकोमल व्यक्ति आज वज्रकठोर बनली होती. रात्रींच्या त्या प्रशांत वेळीं त्या सभा-मंडपांत जमलेला जनसमूह भारतीय आत्म्याची ती वाणी, तिचा शब्द न् शब्द अंत:करणांत सांठवीत होता. सारें वातावरण पावन होतें. आम्ही जागृत होत आहोंत, उठत आहोंत याची प्रतीति येत होती. काळाच्या पटलावर या चिरंजीवि क्षणांचा ठसा कायमचा उमटणार याची साऱ्यांना जाणीव होत होती. ज्यावेळीं एकाच भाषणानें क्रांति झाली असे प्रसंग विश्वाच्या इतिहासांत कधीं कधीं आले; आजचेंहि भाषण तसेंच होतें.

अभयकुमार भाववश झाला. एखाद्या दिव्य शक्तीचा संचार झाल्याप्रमाणें त्याला वाटलें, 'काय अवतारी पुरुष आहे! लाठी अन् लंगोटी हीच याची संपत्ति. स्वत:च्या घरावर निखारे ठेवून दुसऱ्याचीं घरें आबाद करण्यासाठीं हा निघाला आहे. मरणांतच जीवन आहे हीच याची शिकवण! याच्या अंत:करणांत साऱ्या मानवजातीबद्दल प्रेम व करुणा वसत आहे. त्याला पाहतांच सारी आध्यात्मिक क्षुधा तृप्त होते. त्याच्या हृदयस्पंदनांत साऱ्या भारताचें स्पंदन, त्याच्या श्वासांत साऱ्या भारतवर्षाचे श्वास सामावले आहेत. सारें राष्ट्र एका व्यक्तींत

मूर्त होऊन ठाकलें. आम्ही या युगांत जन्मलों हें आमचें अहोभाग्य! भावी पिढीसहि आमचा हेवा वाटेल.'

अभयकुमारनें त्यांना मनोमन नमस्कार केला व काय जाणें कां, त्याचे डोळे पाणावले.

९

इकडे गांधीजींचे शब्द लोकांच्या कानांत घुमतात न् घुमतात तोंच आठ ऑगस्टच्या त्या अंधाऱ्या रात्रीं पोलिसांच्या मोटारींची घरघर आणि लष्करी बुटांच्या टांचा मुंबईच्या रस्तोरस्तीं दणाणल्या. महात्मा गांधी, जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, व वर्किंग कमिटीचे सभासद रातोरात पकडले गेले, आणि पुण्याहून अहमदनगरच्या किल्ल्यांत खास आगगाडीनें त्यांची रवानगी करण्यांत आली. त्यांच्या स्थानबद्धतेची सारी तरतूद आगाऊच करण्यांत आली होती.

अगोदरच प्रक्षुब्ध असलेल्या जनतेचा क्षोभ पुढाऱ्यांच्या धरपकडीने अनावर झाला. गवालिया टँक येथें झेंडावंदनासाठीं अपार जनसमह जमला होता. त्यांच्यावर घोडे दौडविण्यांत आले. अश्रुधूम सोडण्यांत आला. गोळीबाराच्या बावीस तेवीस फैरी शहरांत झडल्या. बसेस जाळण्यांत, आल्या. ट्राम, आगगाडयांचे रूळ उखडण्यांत आले. विजेच्या तारा कापण्यांत आल्या. जनतेनें मन मानेल त्याप्रमाणें आचरण्यास सुरुवात केली. त्यांचें नेतृत्व करणारा, त्यांना आटोक्यांत ठेवणारा जो नेता होता तो अगोदरच बंदिस्त केला गेला. जणुं कांहीं देशांतील हिंसा आणि अराजकता सरकारच्या दृष्टीनें इष्टापत्तीच होती. कारण त्याचें प्रत्युत्तर हिंसेनें देण्यास सरकारला आयतेंच फावलें. जुलूम, निर्घृणपणा इतक्या पराकोटीला पोहोचला, कीं वर्षानुवर्षें त्याची दहशत भारतीयांच्या मनावर बसावी; त्यामुळें तरी आपलें राज्य कायम व सुरक्षित टिकवतां येईल, असें इंग्रजांना वाटलें.

इकडे भारतीय जनताहि हट्टास पेटली. आणि यावेळीं 'ठोशास ठोसा' हाच न्याय तिनें स्वीकारला. क्षणोक्षणीं पोलिस गोळ्या झाडीत. चार दोन माणसांचा मृत्यू हा नित्याचाच क्रम होऊन बसला. रक्त-सिंचनाखेरीज एकहि दिवस सुना जात नसे.

जनताहि इरेस पेटली. पोलिस ठाण्यावर छापे घालण्यांत आले. सरकारी तिजोऱ्या लुटल्या गेल्या. सरकारी शस्त्रास्त्रें हडप करण्यांत आलीं. न्यायालयें, सरकारी कार्यालयें इत्यादींना आगी लावण्यांत आल्या. एकदोन ठिकाणीं सरकारी नोकरांची हत्याहि करण्यांत आली. आगगाडी उलवटण्याचे, पूल तोडण्याचेहि प्रयत्न झाले.

सरकारी दमनचक्र जोरांत सुरू झालें. कांहीं गांवांना लष्करांनीं चहूंबाजूंनीं वेढलें. घरांत शिरून तेथील सामान जप्त केलें. पुरुषांना पकडलें. शिपायांच्या संगिनींच्या गराड्यांत स्त्रियांनीं मिरवणुकी काढल्या. स्त्रियांची अब्रू घेण्याचे प्रमादहि घडले.

गांधीजींचे अनुयायी शांतता राखण्याचा आटोकाट प्रयत्न करूं लागले. 'जनतेनें निरर्थक हिंसा करूं नये, जनतेस प्राण अर्पण करायचे आहेत तर ते अहिंसेच्या रक्षणासाठीं करावे ! शत्रूवर हात उगारूं नये, त्यांच्याबद्दल हृदयांत द्वेषहि बाळगू नये.' अशी शिकवण ते देऊं लागले. परंतु देशांत कांहीं अन्य गटहि होते. ते म्हणत, "गांधीजी तर सांगून गेले कीं 'करा किंवा मरा!' तेव्हां करा म्हणजे 'वाटेल ते करा'. म्हणून आम्ही कांहींहि शिल्लक ठेवणार नाहीं. मरण्यास आम्ही तयार आहोंत. पण मारून मरूं ! उगाच नाहीं !"

दोन्ही गटांचे लोक आपापल्या मतानें कार्य करीत होते. गांधीवादी हिंसा न घडूं देण्याची दक्षता बाळगीत होते. दुसऱ्या गटाचे लोक गांधीजींच्या गैरहजिरीचा फायदा घेऊन हिंसात्मक मार्गावर आगेकूच करीत होते. ते म्हणत, " ही क्रांति आहे. सारा देश भडकला आहे. साऱ्या देशानें बंड पुकारलें आहे. या गांधीवाद्यांना व्यवहार कळत नाहीं. त्यांचें

ज्ञान पुस्तकी आहे. संयम आणि शांतता असल्या मार्गांनीं का कुठें क्रांति झाली आहे ? ”

भारताचे तुरुंग खचाखच भरले. शेवटीं राजबंद्यांसाठीं नवे तुरुंग बांधण्यांत आले. जेथून एकहि माणूस तुरुंगांत किंवा युद्धाच्या आघाडीवर गेला नाहीं असें एकहि घर उरलें नाहीं. वियोग, दुःख, अपमान यांचें वातावरण सर्वत्र पसरलें. त्या आंदोलनाचें कंबरडें मोडण्यासाठीं दमनचक्राचें सत्र विक्राळ स्वरूपानें पुढें सरसावलें. इकडे नेत्यांच्या अभावामुळें जनता लवकरच हतोत्साह बनली. देशावर प्रेतकळा पसरली. अगोदरच जेलमध्यें नेत्यांना बंद करून देशाचा तेजस्वी आवाज दाबण्यांत आला. बाहेर स्मशानशांति पसरली. एकहि सार्वजनिक नेता बाहेर उरला नाहीं. मग जनतेनें तरी कुणाच्या बळावर लढावें ?

## १०

नेत्यांच्या धरपकडीनंतर मुंबईत जे उरलेसुरले कार्यकर्ते होते त्यांची एक गुप्त सभा भरवण्यांत आली. त्यांत अभयकुमारहि होता. कुणीतरी एक टाइप केलेला कार्यक्रम सादर केला व “ गांधीजी बाहेर असते तर त्यांनीं हाच कार्यक्रम आंखला असता. ” असें छातीठोकपणें सांगितलें. गांधीवादी म्हणाले, “ अहिंसात्मक कार्यक्रमाखेरीज अन्य कार्यक्रमास स्थान असूं नये. ” समाजवादी म्हणत, “ रूळ उखडणें, तारेचे खांब तोडणें अशा गोष्टींचा यांत समावेश होऊं शकतो. इंग्रजांच्या युद्धकार्यांत ज्यामुळें विघ्न उपस्थित होईल अशा सर्व गोष्टींचा यांत समावेश करण्यास कांहीं हरकत नाहीं. ” अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीकडून एक विनंतिपत्रक निघालें. तें विनंतिपत्रक आपापल्या प्रांतीय केंद्रांना पोहोंचल्याखेरीज पकडलें जाऊं नये असें बजावण्यांत आलें. अभयकुमारवरहि या कामाची जबाबदारी आली.

राष्ट्रीय कार्यकर्ते सर्वसामान्यपणें खादीचा कुडता आणि धोतर

नेसत. अभय कुमारचाहि तोच पोषाख असे. या पोषाखांत परत जायला निघाल्यास त्याची कैद अटळ होती. आणि कॉंग्रेसचीं पत्रकें नागपूरला पोहोंचवणें तर निकडीचें होतें. तें आता त्याचें राष्ट्रीय कर्तव्य होतें. मध्यें पोलिसांनीं पकडलेंच तर प्राण गेल्याखेरीज तीं पत्रकें त्यांच्या हातीं लागू द्यायचीं नाहीत असा निर्धार अभयनें केला.

मुबईच्या " चक्षुर्वै " घटनांपाहून एक प्रकारची नशाच त्याला चढली होती. गांधीजींच्या कैदेनंतर जी आग भडकली तिच्या ज्वाला घरोघरीं पोहोंचल्या. देशाचें पित्त खवळलें. गांवोगांवीं, घरोघरीं एकच ध्वनि घुमला. " करेंगे या मरेंगे! करूं किंवा मरूं ! " बस ! हाच पर्वकाल आहे. भारताच्या उत्थानाचा हाच क्षण ! स्वातंत्र्याची जन्मवेळहि हीच ! यावेळीं एकच ध्येय—" देश " ! "राष्ट्र "! त्याचीच हाक कानीं पडत आहे. देशाची हांक ! तीच शक्ति आत्म्यास चिरमीलनासाठीं आवाहन करीत आहे. यावेळीं व्यक्तिगत सुखदु:ख, लौकिकांतील नित्याचे व्यवहार, सारे य:कश्चित ! जीवनाचा प्रत्येक श्वास, प्रत्येक बिंदु देशास समर्पण ! शेवटीं दिल्यानेंच मिळत असतें ना ? हीच धुंदी अभयकुमारला चढली होती ! जुन्या कपडयाच्या लष्करी दुकानांतून अभयनें एक खाकी पोषाख विकत घेतला. त्या पोषाखांत त्याला ओळखणेंहि दुरापास्त होतें. त्यानें सारे कागदपत्र आपल्या कातडी बॅगमध्यें दडपले आणि सुट्टीवर निघालेल्या लष्करी शिपायाच्या झोकांत हातांतील छडी फिरवीत तो हिंडूं लागला. मेल आणि एक्स्प्रेसवर पोलीसांची कडक निगराणी असे म्हणून रात्रींच्या पॅसेंजरनें तो रवाना झाला. पहाटे लागणाऱ्या स्टेशनवर उतरावें, दिवस एखाद्या धर्मशाळेंत काढावा व रात्रीं पुन्हां गाडी पकडावी अशा प्रकारें १६ तासांच्या नागपूरच्या प्रवासास त्यास तीन दिवस लागले. नागपूरला गाडी पोहोंचली तेव्हां रात्रीचे साडेदहा वाजले होते.

त्यानें खिडकींतून बाहेर पाहिलें. पोलिसांचा ताफा मॅजिस्ट्रेटसमवेत प्लॅटफॉर्मवर हिंडत होता आणि प्रत्येक प्रवाशास निरखून पाहात होता.

आपल्या येण्याचा सुगावा पोलिसांना लागलेला दिसतोय्.' अभयला वाटलें. कांहींच्या हातीं सोटे, कांहींच्या हातीं संगिनी व पोलिस इन्स्पेक्टरच्या हातीं पिस्तुलें होतीं. मुंबईहून काँग्रेसचीं पत्रकें घेऊन कोणी तरी येत असल्याचा सुगावा गुप्त पोलिसांमार्फत त्यांना आधींच लागला होता. म्हणूनच त्याच्या स्वागताची ही जय्यत तयारी होती.

प्लॅटफॉर्मवर उतरल्यास आपण नक्की पकडले जाणार हें अभयनें ओळखलें. कॉलेजच्या किती तरी वादविवादांत, व्याख्यानांत त्यानें भाग घेतला होता. नागपूर विश्वविद्यालयाचा तो एक प्रसिद्ध विद्यार्थी होता. शिवाय आज त्याला या खाकी पोषाखांत पाहून तर खात्रीनें कुणाचाहि संशय बळावला असता. आणि जर का त्याच्या सूटकेसची झडती घेतली तर ! कसेंहि करून तीं पत्रकें काँग्रेस कमिटींत पोहोंचलींच पाहिजेत, त्याच्या अगोदर पकडले जाण्याची त्याची इच्छा नव्हती.

गाडी नागपूरहून पुढें जायची नसल्यामुळें तेथेंच सबंध रिकामी झाली. पण रिकाम्या गाडींत बसल तरी पोलीसांच्या लक्षांत येणार ! त्याला काय करावें कांहीं सुचेना !

शेवटीं सामान प्लॅटफॉर्मवर काढून तो अंधारांत हिंडूं लागला. तोंच एकाएकीं "अरे अभय ! इकडे कुठें ?" असे शब्द त्याच्या कानीं आले.

"कोण ? भार्गव ?" अभयनें विचारलें.

"होय ! तूं मला ओळखलंस हें माझं नशीव ! बारा वर्षांनंतर आपण भेटलों ! म्हटलं ओळखतोस कीं नाहीं ?"

अभयला आठवलें, चौथ्या वर्गांत भार्गव आपल्या बरोबर, होता, दोघे बरोबर हॉकी खेळत असूं. शाळेच्या स्काऊटमध्येंहि दोघे बरोबर होतों. आतां हा रेल्वे गार्ड झालेला दिसतोय.

रक्ताच्या संबंधापेक्षांहि जास्त चिवट असे स्नेहतंतू शालेय सोबत्यांमध्यें कधीं कधीं असतात.

शहराला लष्करी शिपायांनीं वेढलें असून आतांपर्यंत चार पांचदां

गोळीबार झाल्याचें वृत्त त्याच्याकडून कळलें. कोणाच्या मतें २३ विद्यार्थी तर कोणाच्या मतें ५७ विद्यार्थी गोळीबारास बळी पडल्याचें कळलें. एक विद्यार्थी सेक्रेटरीएटवर चढून युनियन जॅक काढीत असतांना मारला गेला. शहरांत तऱ्हेतऱ्हेच्या अफवा पसरल्या असून सर्वत्र कर्फ्यू होती. चोहोंकडे भीतीचें वातावरण असून त्यावेळीं शहरांत जाणें धोक्याचें होतें.

वर्तमानपत्रें बंद होतीं. तारा-टेलिफोन कापले जाऊन दळणवळणाचीं साधनें बंद होतीं. पण "हा भार्गव म्हणजे चालतें बोलतें वृत्तपत्रच आहे!" अभयला वाटलें.

"तूं यावेळीं घरीं जाऊं नकोस अभय! तुझ्यावर एकदम गोळीच झाडली जाईल. आपले प्राण निरर्थक कां धोक्यांत कां टाकतोस?"

"पण प्लॅटफॉर्मवर राहणं तरी कुठें सुरक्षित आहे? पोलिसांच्या घिरट्या सारख्या सुरू आहेत."

"चल आपण माझ्या क्कॉर्टरमध्यें चलूं या. तेथें कशीतरी रात्र काढ. मग सकाळीं बघतां येईल."

"माझ्यासाठीं तूं आपली नोकरी धोक्यांत टाकूं नकोस. मला बरं वाटणार नाहीं."

"वा! जुन्या मित्रासाठीं मी एवढंहि करूं नये का? देशासाठीं लढणाऱ्या तुझ्यासारख्या देशभक्तांसाठीं मी एवढंसं केलं तर काय हरकत आहे? आम्ही काय? स्वतःचंच पोट भरणारे क्षुद्र कीटक! तुझ्यासारख्यांची क्षणभर सेवा करण्याचं भाग्यहि आम्हांस लाभूं नये का?"

रेल्वेच्या त्या पोषाखांत एक निर्मल अंतःकरण दडलेलें पाहून अभयचें मन गहिवरलें.

अभयनें क्वार्टरमध्यें जाण्यास नकार दिला. अभयला अजनी लोकलच्या पहिल्या वर्गाच्या डब्यांत बसवून भार्गव म्हणाला, "ही गाडी रिकामी आहे. रात्रभर शंटिंग करीत राहील. यांतच विश्रांति घे. तुझ्याकडे कोणाचंहि लक्ष जाणार नाहीं. सकाळ होतांच गाडी

अंजनीच्या प्लॅटफॉर्मला लागेल. तिथें उतरून जेलच्या मागील रस्त्यानें घरीं जा ! त्या बाजूला पोलिसांचा पहारा नाहीं."

## ११

दुसऱ्या दिवशीं अभय घरीं पोहोंचला. आईनें त्याला ह्या पोषाखांत प्रथम ओळखलें नाहीं. ती म्हणाली, "विजया ! याच्यावरून मीठ-मोहऱ्या ओवाळून टाक बघूं ! चार दिवसांपासून डोळ्याला डोळा कसा तो लागला नाहीं. मुंबईच्या रोजच्या एकेक बातम्या ऐकून जीव सारखा घाबरत होता. तेथील धरपकड, मारामारी, गोळीबार इत्यादीसंबंधीं ऐकून तूं कसा काय सुरक्षित येतोस याचीच चिंता लागली होती. आज जीव भांड्यांत पडला."

अभय म्हणाला, "आई ! असं करून कसं बरं चालणार ? हा तर ज्वालामुखीचा पहिला स्फोट ! क्रांतीचा प्रारंभ ! कांहीं तर या चार दिवसांतच शहीद झाले. आतां या क्रांतीच्या ज्वाला दूरवर पसरणार. तेव्हां काय होईल हें कुणी सांगावं ? घरांतून एकदां बाहेर गेलेला पुन्हां परत सुखरूप येईलच याची शाश्वती काय ? या चिमुकल्या घराऐवजीं राष्ट्राचं विशाल घरच आतां आपलं मानायचं ! गोळीनं ठार होणारा किंवा फांसावर चढणारा म्हणजे भाग्यशाली समजायचा."

"अरे पण हें सारं सांगण्याची काय आवश्यकता ? सर्वत्र आग लागली असतां त्याची आंच आपल्याहि लागल्याशिवाय कशी राहील ? मोठमोठे पुढारी बंदिवासांत गेले. किती तरी घरं उजाड झालीं. त्यांत आपणांसारख्या सामान्य माणसांचा काय पाड ? उद्याचं उद्या पाहूं ! पण आज तूं घरीं सुरक्षित आलास म्हणून आनंदहि मानूं नये कीं काय ?"

"आज आलों खरा ! पण रातोरात पुन्हां निघायचं आहे. मुंबई कॉंग्रेसचा संदेश गांवोगांवीं पोहोंचवायचा आहे. सर्व पुढारी जेलमध्यें

असल्यामुळें एकतर जनता भलत्या मार्गाला लागेल किंवा किंकर्तव्यमूढ होऊन स्वस्थ बसेल. असं व्हायला नको. सत्तावनची अपुरी राहिलेली क्रांति वेचाळीसमध्यें पूर्ण करायची आहे. अशी संधि पुन्हां पुन्हां येत नसते."

"तें सारं खरं ! मला फारसं कळत नाहीं. पण जें घडतं आहे तें सारं ईश्वराच्या प्रेरणेनंच घडतं आहे अशी माझी निष्ठा आहे. तुला योग्य दिसेल तेंच तूं कर. तें भूषणास्पद मात्र असलं पाहिजे. माझा तुझ्या-संबंधींचा मोह तुझ्या मार्गाच्या आड मी येऊं देणार नाहीं. परमेश्वरास सर्वांची काळजी आहे. तोच आपलं रक्षण करील."

## १२

अभयनें कार्यक्रमाच्या पत्रकांचा गठ्ठा स्वयंसेवकामार्फत काँग्रेस कमिटीच्या सेक्रेटरीच्या हवालीं केला आणि तो निश्चिंत झाला. नागपूरहून तीन मैलांवर असलेल्या एका खेड्यांत रात्रीं कार्यकर्त्यांची गुप्त सभा व्हायची असून तिला हजर राहाण्याबद्दल व मार्गदर्शन करण्याबद्दल अभयला विनंति करण्यांत आली. पोलिसांना सुगावा लागूं नये म्हणून कार्यकर्त्यांनीं गुप्तपणें तेथें जमावें व धरपकडीसाठीं येणाऱ्या पोलिसांच्या लॉऱ्या चुकविण्याबद्दल सावधगिरी बाळगावी असें बजावण्यांत आलें. अभयनें त्या आदेशाप्रमाणें वागण्याचें आश्वासन दिलें.

## १३

विजया आपल्या खोलींत गेली. अभय अंथरुणावर पडून होता. त्याचें तोंड भिंतीकडे होतें. डोळे मिटलेले होते. हळूच जाऊन ती त्याच्या पायाशीं बसली आणि तिनें आपले हात त्याच्या पायावर ठेवले. त्या प्रेमळ स्पर्शानें तो द्रवला व म्हणाला, "हें काय ?"

"कांहीं नाहीं, इतका थकून भागून आलास ! तेव्हां म्हटलं जरा पाय चेपावेत !'

“छे ! थकायला काय झालं ? पडलों होतों सहज ! पोलिसांचा ससेमिरा असल्यामुळं दिवसभर घरांत दडून रहावं लागतं. फक्त रात्र तेवढी कामाची.”

“म्हणजे ? आज रात्रींहि कुठें जायचंय वाटतं ! ”

“हो ना ! यापुढें एक क्षण सुद्धां दवडायला वेळ नाहीं.”

“तें समजलं ! पण आज रात्रीं गेल्यावर परत केव्हां येणार ?”

“काय जणं ? ९ ऑगस्टच्या विस्फोटाच्या ज्वाला सभोंवार पसरत आहेत. नेत्यांच्या अभावीं जनतेचा मार्ग चुकूं नये याचीच काळजी वाटते. जनतेचा क्षोभ अनावर आहे. योग्य दिशा न मिळाल्यास भलत्याच मार्गानं त्याचा विस्फोट होईल. हिंसामय मार्गावर विश्वास ठेवणारे जनतेस हिंसेचें प्रोत्साहन देत आहेत आणि सरकारला तेंच हवं आहे. कारण प्रतिहिंसेसाठीं त्यांना आयतंच निमित्त मिळेल. एखाद्या कचेरीला जर लोकांनीं आग लावली तर सरकार गांवंच्या गांवं भस्म करील. एखाद्या सरकारी ऑफिसरचा खून झाला, तर साऱ्या जमावावर मशीनगन चालवण्यांत येऊन असंख्य लोकांचे मुडदे पडतील. हिंसेचं प्रत्युत्तर देणं सरकारला चांगलंच अवगत आहे. अहिंसेसमोर मात्र सरकार नांगी टाकतं. नामर्दपणापेक्षां हिंसा बरी हें जरी खरं असलं तरी त्याच्या उलट सरकारनं केलेल्या निर्घृण हिंसेपुढें जनतेचं कांहीं एक चालणार नाहीं. म्हणून कसं तरी करून त्यास प्रतिबंध करणं अवश्य आहे. यासाठींच मी आपल्याकडून आटोकाट प्रयत्न करणार आहें.”

“पण अशा रीतीनं किती दिवस काम करतां येईल ? कारण शेजारचा रावसाहेबांचा मुलगा म्हणत होता कीं, परवांच गुप्त पोलिस येऊन तुझी चौकशी करून गेले. तुला लौकरच पकडण्याचा त्यांचा इरादा दिसतो.”

“शक्य आहे–सर्वांना शोधशोधून पकडण्याचा पोलिसांनीं सपाटा लावला आहे. या वेळीं पकडलं जाणं अगदीं सोपं आहे. परंतु अशानं

काम कसं होणार ? कार्यकर्त्यांनीं शक्यतों बाहेर राहून प्रचारकार्य करण्याची आज आवश्यकता आहे. त्याकरितां सतत हिंडावं लागेल. एका ठिकाणीं एका रात्रीपेक्षा अधिक राहणं धोक्याचं आहे. "

" तें खरं ! पण प्रचार करतांना सांगणार काय ? "

'मुंबईच्या पत्रकांत लिहिलं आहे तेंच !' 'युद्धाच्या बाबतींत सरकारशीं असहकार करा ! कायदेभंग करा ! गांधीजींच्या मार्गावर अढळ राहून सरकारची शासनव्यवस्था बंद पाडा ' हेंच ! जिथं जनता शांत आहे तिथें सरकार कांहीं तरी कुरापत काढून जनतेला मुद्दाम चिथावणी देतं. म्हणजे त्यानंतर सरकारला शस्त्र उचलण्याचं चांगलंच निमित्त मिळतं. यापासूनच जनतेला वाचवायचं आहे. "

" पण आतां तुला जास्त दिवस बाहेर राहतां येईल असं मला वाटत नाहीं. समज, तूं पकडला गेलास तर किती दिवस जेलमधें राहावं लागेल?"

" जेलमधें निरर्थक सडणं कुणाला आवडतं ? कामाच्या दृष्टीनं शक्यतों मी जेल टाळण्याचा प्रयत्न करीन. तुरुंगांत जाण्यांत कसला आलाय् धोका ? पकडलेल्या लोकांना युद्ध संपेपर्यंत तिथें डांबून ठेवण्याची शक्यता आहे. आणि युद्ध तीन चार वर्षं किंवा त्यापेक्षांहि जास्त लांबू शकतं ! खरं सांगायचं म्हणजे धोका आहे तो बाहेर ! आणि खऱ्या कार्यकर्त्यांचं कार्यक्षेत्र यावेळीं बाहेरच आहे. "

" बाहेर राहण्यांत कसला धोका ? " विजयानें विचारलें.

" बाहेर धोका आहे तो पोलिसांच्या लाठीहल्ल्याचा किंवा गोळी-बाराचा ! आमच्यासारख्या गुलामांचं दुसरं मूल्य काय ? युद्धांत आम्ही विघ्न उपस्थित करतों या निमित्तानं आमच्या मिरवणुकीच्या मिरवणुकी गोळीबाराचं भक्ष्य बनतात. देशभक्तांना दहशत बसावी म्हणून फांशी, काळं पाणीहि कांहीं अशक्य नाहीं. सत्तावनच्या बंडासारखी ही क्रांति आहे. यांत कुणाला काय किंमत द्यावी लागेल हें अगोदर कोण सांगूं

शकणार ? जो दिवस पार पडला तो आपला ! उद्याची शाश्वति कुणी द्यावी ? ”

अभयच्या अशा गोष्टी ऐकल्या कीं विजयाच्या जिवाचा थरकांप होई ! आणि लग्नाच्या दिवशींचा निरांजन विझण्याचा अपशकुन तिला आठवे. तिच्या डोळ्यांस टचकन् पाणी आलें. अभयहि द्रवला. तिचें सांत्वन करीत तो म्हणाला, “ वेडी कुठली ! रडायचं कशाला ? आपण ऐतिहासिक काळांत जन्मलों हें आपलं भाग्य समज ! स्वातंत्र्याचं युद्धपर्व पुन्हा पुन्हां का येत असतं ? आपण जिंकलो तर देश स्वतंत्र झालेला पाहूं ! आणि जर हरलों तर तें अपयश पाहण्यासाठीं आपण जगूं तेव्हां ना ? यश मिळेपर्यंत लढायचं व नाहीं तर लढतां लढतां मरायचं, याशिवाय आमच्यासमोर अन्य मार्ग नाहीं. गांधीजी आमरण उपवास करणार असल्याची अफवा मुंबईमध्यें पसरली होतीच. यावरून त्यांचा निश्चय या वेळीं किती दृढ आहे, आणि आपणांसहि किती खंबीर व्हायचं आहे हें दिसून येईल. या वेळीं तिळमात्र कसूर करतां कामा नये ! हें आपलं अंतिम स्वातंत्र्ययुद्ध आहे. वाटेल ती किंमत देऊन हें या वेळीं जिंकायचं ! यावेळीं सतत गीतेच्या संदेशाचं स्मरण ठेवायला हवं !

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वा वा मोक्ष्यसे महीम् ।
तस्मात् उत्तिष्ठ कौन्तेय ·युद्धाय कृतनिश्चय ! ।। ”

अभयच्या त्या ओजस्वी भाषणानें विजयाहि प्रभावित झाली व म्हणाली,

“ मग या संग्रामांत मीहि आपली आहुति कां देऊं नये ? ”

“ तूं ? तुझ्यावर जर नव्या जिवाची जबाबदारी नसती, तर मी तुला अडविलं नसतं. पण आतां तुला काळजी घ्यायला पाहिजे. ” विजयाच्या त्या अवस्थेची जाणीव होतांच सहानुभूतीनें आणि चिंतेनें त्याचें मन व्याकुळ झालें. त्यानें विचारलें, “ लेडी डॉक्टरकडून तपासून घेतलंस ना ? काय म्हणत होती ? ”

" सर्व कांहीं ठीक आहे. फक्त कॅल्शियमचीं इंजक्शनं घ्यायला तिनं सांगितलीं, तीं मी घेतें आहें. "

" बघ ! आतांपासून सांगून ठेवतों, मुलगी झाल्यास ' क्रांति ' नांव ठेवायचं नि मुलगा झाल्यास ' क्रांतिकुमार ' ! अन् समज, या स्वातंत्र्य-युद्धांत मी कामीं आलों तर होणाऱ्या मुलाला सांग कीं ' जोंपर्यंत या विशाल देशांतून पारतंत्र्याचं उच्चाटन होत नाहीं तोंपर्यंत स्वातंत्र्ययुद्ध चालूं ठेव ! ' आईची सोबत तुला असल्यामुळं मला कांहीं काळजी नाहीं. किती समंजस आणि सोशिक आहे ती ! ती नसती तर माझं काय झालं असतं कुणास ठाऊक ? "

" खरं आहे. माझ्याहि आईची उणीव त्यांनीं भरून काढली. अगदीं आकाश कोसळलं तरी हातपाय गाळायचं त्यांना ठाऊक नाहीं. इतकं धैर्य, इतका सोशिकपणा त्यांच्यांत कुठून आला कुणास ठाऊक ? "

इतक्यांत देवघरांतून येणारे आरतीचे स्वर त्यांच्या कानीं पडले,—

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची–।

दोघेंहि लगबगीनें तेथें गेलीं आणि आईच्या त्या स्वरांत त्यांनीं आपला स्वर मिसळला.

## १४

संध्याकाळीं ढग आल्यामुळें अंधार लवकरच झाला. आईनें दोघांचीं पानें बरोबर वाढलीं. विजयाला संकोच वाटला. पण आई ऐकेच ना.

" आज दोघं बरोबर जेवा. पुन्हा कधीं एकत्र बसायला मिळेल कुणास ठाऊक ? " विजयाचें मन खिन्न झालें. आजकाल आई विजयाला जास्त काम पडूं देत नसे. आईची अंगकाठी मजबूत होती. घराची सर्व जबाबदारी तीच सांभाळी.

अशा प्रकारें बरोबर जेवण्याचा हा पहिलाच प्रसंग होता, अशांतला भाग नाहीं, पण आज त्या घरांत एक प्रकारचें गंभीर वातावरण होतें. जेवणाच्या वेळीं कोणी कुणाशीं बोललें नाहीं. विजयाच्या घशाखालीं घांस उतरेना ! अभयहि कसे बसे घांस गिळत होता. आईला सारें दिसत होतें. जेवणानंतर लागलीच कॉंग्रेसचा स्वयंसेवक येणार होता. त्याच्याबरोबर अभयला तीन मैलांवर सभेसाठीं जायचें होतें. तेथूनच त्याचा एका खेडेगांवीं दौरा होता. पोलिसांचा त्याच्यामागें ससेमिरा होताच. त्यांच्या तावडींतून जितक्या दिवस निसटतां येईल तितकें त्याला हवें होतें. पोलिसांच्या तावडींत सांपडून कोणत्या दिवशीं कुठें रवानगी करण्यांत येईल याचा कांहीं नेम नव्हता. देशाच्या जीवन-मरणाच्या लढ्यांत सर्वत्र उठलेल्या तुफानांत बापड्या अभयचा काय पाड ? अन्य माणसांप्रमाणेंच त्याची वाट ! पृथ्वीच्या गर्भांत दडलेला ज्वालामुखी वर उसळला होता. तो केव्हां शांत होणार कुणालाच ठाऊक नव्हतें. त्यांत किती घरें उजाड होणार, किती प्राणांना आहुति द्यावी लागणार कोण सांगणार ? शंकराचा रुद्रावतार होता तो ! स्थितीचें कार्य बाजूला सारून परमेश्वरानेंच संहारकार्य आरंभलें, अशा वेळीं काय घडणार हें त्याचें त्यालाच ठाऊक.

अभय, विजया व त्याची आई यांच्यासमोरील त्या वेळचा मार्ग एखाद्या अंधाऱ्या भुयारासारखा होता. हें भुयार किती खोल आहे हें सर्वथव अज्ञात होतें. परंतु त्याच मार्गानें जायचें असून ते आतां सर्वस्वीं नियतीच्या हातचें खेळणें बनले होते. त्यांच्या व्यक्तिगत सुखाचा सूर्य अस्ताला गेला होता. तो पुन्हां केव्हां उगवेल याची शाश्वती नव्हती. पण पारतंत्र्याच्या रात्रीचा अंधःकार नाहींसा होऊन स्वातंत्र्य-सूर्याचा तेजस्वी अवतार होण्यासाठीं व्यक्तींच्या मिणमिणत्या पणत्यांना विझावेंच लागणार !

जेवण आटोपतें न आटोपतें तोंच हातांत काठी घेतलेला, वर

कांबळें पांघरलेला एक स्वयंसेवक घरीं आला. अभयनें आपलें कांबळें व काठी घेतली व तो जाण्यास निघाला.

“आज आपला राम वनास निघाला!” आईच्या मनांत आलें. विजयाला वाटलें, “सीतेसारखं बरोबर जाण्याचं भाग्य आपल्या नशिबीं नाहीं.”

देवास नमस्कार करून अभय म्हणाला, “बरंय् आई! जातों आतां!” त्यानें आईला नमस्कार केला. आईचें अंतःकरण भरून आलें. पण बाह्यतः तिनें शांत मुद्रा धारण केली होती. कुरवंडीचें तवक आणून तिनें अभयला ओवाळलें व त्या स्वयंसेवकाला आंत बोलावलें.

“तुझं नांव काय बेटा!”

“दीनबंधू.”

“दीनांचा वाली तुझं रक्षण करो!” असें म्हणून आईनें त्यालाहि ओवाळलें. निरांजनाच्या त्या प्रकाशांत दीनबंधूचा चेहरा अभयला प्रथम दिसला. त्याला छोटीशी दाढी होती. चेहऱ्यावर सुरकुत्या होत्या. एकदोन दांत पडलेले होते. तो अभयपेक्षां दहा वर्षांनीं मोठा असून त्याच्या चेहऱ्यावर एक अपूर्व शांति विलसत होती. त्याचा चेहरा म्हणजे त्याच्या निर्मल हृदयाची साक्षच!

दीनबंधूनें आईला वांकून नमस्कार केला.

“पहा, बेटा, तूं अभयहून मोठा आहेस. तूं त्याला वाट दाखविण्यासाठीं आलास ना? मग त्याला सदैव साथ दे! ईश्वर तुमचं रक्षण करो.”

“होय आई! कमिटीकडून मला अभयबरोबर जाण्याचाच आदेश मिळाला आहे. अभयबाबू कॉलेजमध्यें असल्यामुळें ते नवखे असले तरी मला येथील कोनाकोपरा माहित आहे. आमचे सेक्रेटरी म्हणत होते कीं अभय म्हणजे हिरा आहे हिरा! त्याचा प्रकाश जास्तींत जास्त

फांकावयास अवसर मिळावा म्हणून या युद्धांत मला त्याला साथ देण्याचं काम मिळालं आहे. "

" परंतु आतां अगदीं निघालंच पाहिजे. नाहींतर सभेला पोहोंचायला उशीर होईल. तीन मैलांचं अंतर, खडबडीत रस्ता, शिवाय अंधारी रात्र." असें म्हणून अभय जोडे घालूं लागला, तोंच विजयानें खालीं वाकून त्याला नमस्कार केला. अभयचा गळा भरून आला. डोळ्यांत अश्रू दाटले.

"स्वत:च्या प्रकृतीला जप. आईकडे लक्ष ठेव. तिचं छत्र तुला आहेच ! घावरायचं कांहीं कारण नाहीं अं ! हं, दीनबंधू, चला ! "

डाव्या हातांत काठी आणि उजव्या खांद्यावर कांबळें घेऊन पुढें दीनबंधू व मागें अभय असे ते निघाले. एकदां मागें वळून त्यानें दोघींकडे पाहिलें.

त्या दोघी पाषाणाच्या मूर्तीप्रमाणें निश्चल हालचाल न करतां उभ्या होत्या आणि अंधारांत विलीन होणाऱ्या त्या दोघांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे शून्य नजरेनें पहात होत्या.

दोघींच्या डोळ्यांतून आंसवें पाझरत होतीं. ते दृष्टिपथांतून अदृश्य होईतों दोघी तशाच उभ्या होत्या आणि नंतर त्यांनीं दीर्घ निश्वास टाकला. कांहीं जणूं अंत:करणांतली सारी वेदना त्या निश्वासांच्या रूपानें बाहेर पडली. यापुढें त्यांच्यासमोर अंधकाराखेरीज दुसरें होतें तरी काय ?

## १५

त्या सभेचें गांव छोटेसें होतें. सारीं पन्नास साठ घरेंच काय तीं तेथें असतील. तेथील एका शेतकऱ्याच्या गोठ्यांत ही सभा झाली. जमिनीवर चटया आंथरलेल्या असून तीन कंदिल प्रकाशासाठीं ठेवलेले होते. सभेसाठीं साठ सत्तर कार्यकर्ते जमले होते. पोलिसांचा सुगावा

लागतांच कार्यकर्त्यांना सूचना देतां यावी म्हणून सभोंवतालीं स्वयंसेवकांचा पहारा होता. सभेवर पोलिसांचा छापा पडण्याची भीति सतत होती. प्रत्येकास गांठून पकडण्याचा पोलीसांनीं चंग बांधला होता, आणि कार्यकर्त्यांची बंदिवासास तयारी असली तरी यावेळीं पोलिसांच्या हातांवर तुरी देऊन कार्य करीत राहण्यांत मर्दुमकी होती. क्रांतीचा वणवा एकदां खेडोपाडीं पोहोंचला कीं तेथेंहि कार्यकर्ते निर्माण होतील. त्यानंतर पकडलें गेलें तरी हरकत नाहीं.

सभेस आलेले सारेजण अभयला अपरिचित होते. अजून पकडले न गेलेले कॉंग्रेसचे सेक्रेटरीही त्यांत होते. गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणेंच हा वागेल असा अभयवर त्यांचा पूर्ण भरंवसा होता ! म्हणून युद्धाचीं सूत्रें त्याच्या हातीं देण्यांत त्यांना कांहीं धोका वाटला नाहीं. शिवाय तो एक सुशिक्षित, समंजस युवक होता. त्याच्या वाणींत साक्षात् सरस्वती होती. त्याच्या व्यक्तित्वाची एकदम छाप पडत असे. जनतेच्या नेतृत्वास अवश्य असणारे गुण त्याच्यांत होते. शिवाय मुंबईच्या पहिल्या स्फोटाच्या वेळीं तो तिकडे हजर असल्यामुळें तेथील उफाळलेल्या स्वातंत्र्याच्या भावनेचें प्रतिनिधित्व करण्यास तोच सर्वस्वीं समर्थ होता. अभयसारख्या कार्यकर्त्याचा लाभ म्हणजे आपल्या शहराचें अहोभाग्य असें त्या सेक्रेटरींना वाटल्यास नवल नाही. अज्ञात अशा नव्या नेत्यास क्रांति सदैव जन्म देत असते.

अभय येतांच सभेस सुरुवात झाली. सेक्रेटरी म्हणाले, "मित्रहो, हा क्रांतीचा काळ आहे. देशांत चोहोंकडे क्रांतीचा वणवा पेटला आहे. गांधीजींनीं 'करूं किंवा मरूं' ची घोषणा केली आहे. आपल्या लढ्याचें हेंच घोषवाक्य राहील. आन्दोलनाचें नेतृत्व करतां येऊं नये म्हणून आमचे सारे नेते बंदिवासांत टाकण्यांत आले आहेत. परंतु हें आन्दोलन नसून क्रांति आहे. आन्दोलनाचें संचालन नेते करतात. क्रांतीचें नेतृत्व जनता करतें. आपल्यापैकीं वीर अभयकुमार मुंबई विस्फोटाच्या वेळीं हजर होते. तिथें त्यांनीं ज्या घटना पाहिल्या, जो संदेश ऐकला, तो ते

आतां तुम्हांला सांगतील. ते अजून पकडले गेले नाहींत हें आपलें नशीब ! मुंबईहून त्यांनीं पत्रकें आणलीं असून इकडच्या लोकांना ते चिथावणी देत आहेत अशा संशयामुळें पोलीस हात धुऊन त्यांच्यामागें लागले आहेत. हे किती दिवस म्हणण्यापेक्षां किती तास मोकळे राहूं शकतात हें सांगणें कठिण आहे. परंतु त्या पूर्वीं जास्तींत जास्त काम उरकण्याची यांची इच्छा आहे. अगोदर इथें असलेल्या प्रत्येक माणसानें येथील कामकाज गुप्त राखण्याबद्दल आणि क्रांतीशीं एकनिष्ठ राहण्याबद्दल शपथ घ्यावी."

"क्रांतीशीं आम्ही एकनिष्ठ राहूं आणि येथील गोष्टी गुप्त ठेवूं !" दबलेल्या स्वरांत साऱ्यांनीं घोषणा केली.

"ठीक आहे. अभयबाबू, आतां तुम्ही बोला." सेक्रेटरी म्हणाले.

अभय म्हणाला, "मित्र हो ! आपण या क्रांतियुगांत जन्मलों हें आपलं भाग्य ! स्वातंत्र्याच्या अंतिम युद्धांत भाग घेण्याची आपणांस संधि मिळाली. याबद्दल भावी पिढीला आपल्याबद्दल अभिमान आणि हेवा वाटेल. आज आपण सर्व एका धाग्यानं बांधले गेलों आहोंत. 'करा किंवा मरा' असं म्हणून नेत्यांनीं आपणांस आवाहन केलं आहे. आपल्याला कांहींतरी करून दाखवायचं आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणं आणि गरज पडल्यास त्यासाठीं आहुति देण्यासहि ,तयार रहाणं हें आपलं कर्तव्य आहे. राणी लक्ष्मीबाईनीं १८५७ सालीं ज्या कार्याची मुहूर्तमेढ रोवली तें कळसास नेण्याचं कार्य आपणास करायचं आहे.

"आपला देश पुरातन आहे. त्याचा इतिहास महान् आहे. पण त्यावर आपली सत्ता नाहीं. जे आपल्या जातीचे नाहींत, धर्माचे नाहींत, संस्कृतीचे नाहींत असे साता समुद्रापलीकडील लोक आपल्यावर सत्ता गाजवीत आहेत. आज आपली गणना मानवांत नसून पशूंत आहे. ही परिस्थिति उद्वेग आणण्यासारखी आहे. ही परिस्थिति बदलणं हेंच आमचं कर्तव्य आहे. तें बजावल्याखेरीज आम्ही स्वस्थ बसणार नाहीं. इंग्रज साम्राज्य एका भयानक विनाशी युद्धांत गुंतलं आहे. या युद्धांत त्यांचा

पराजय व्हावा अशी आमची विघ्नसंतोषी वृत्ति नाहीं. परंतु आम्हांला स्वातंत्र्य न दिल्यास त्यांचा पराजय अटळ, ही गोष्ट निर्विवाद आहे. आम्हांला जर स्वातंत्र्य मिळालं तर बरोबरीच्या नात्यानं आम्ही त्यांना सहकार्य देऊं. त्यांच्या खांद्याशीं खांदा भिडवून आपल्या आणि त्यांच्या स्वातंत्र्याकरितां लढूं! परंतु इंग्रज सरकारास हें पटेल तेव्हां ना! आमच्या अनिच्छेनं, बळजबरीनं आम्हांला युद्धांत खेचलं जात आहे. हें सारं आतां बंद झालं पाहिजे. जनता भडकली तरच युद्धप्रयत्नांना खीळ बसेल. युद्धाच्या मार्गांत विघ्नं उतस्थित झालीं पाहिजेत. पण जें काय करायचं तें गांधीजींनीं सांगितलेल्या अहिंसापूर्ण मार्गानं, हें लक्षांत असूं द्या. शेळपटासारखं मरण्यापेक्षां हिंसा परवडली, परंतु किडामुंगीचा मृत्यू नको. पुरुषार्थासाठीं देह वेंचला गेला पाहिजे. असा मृत्यू उठल्या सुटल्या मिळत नसतो. देशासाठीं मरणारास स्वर्गाचींही दारं खुलीं होतात. कांहीं हिंसावादी क्रांतिकारी शस्त्रात्मक क्रांतीची भाषा बोलतात. त्यांनीं खुशाल कोणताहि मार्ग स्वीकारला तरी आपल्या दृष्टीनं गांधींचाच मार्ग श्रेयस्कर आहे. हा मार्ग भ्याडपणाचा नसून मर्दपणाचा आहे, दुर्बलांचा नसून समर्थांचा आहे. त्या मार्गानंच आपणांस सरकारी शासन बंद पाडायचं आहे. त्यांचा खजिना रिता झाला पाहिजे. युद्धाचं काम बंद पडलं पाहिजे, दळवळणाचीं साधनं बंद झालीं पाहिजेत."

"म्हणजे आम्ही रेल्वेचे पूल उडवूं शकतों ना?" एका तरुणानें उत्साहानें विचारलें.

"होय! परंतु अट ही, कीं धोक्याची सूचना म्हणून लाल झेंडा दाखवून अगोदर निरपराध उतारूंना सर्वनाशापासून वांचवा!"

"वा! मग त्यांत काय मजा?" तो तरुण म्हणाला.

"म्हणजे? यांत मजेचा काय प्रश्न? निरपराध प्रवाशांच्या प्राणांवर गदा आणून काय करायचंय्? युद्धाचं सामान पोंहोंचण्यांत विघ्न उपस्थित व्हावं म्हणून पूल उडवायचा इतकंच!"

"पोलीस ठाणीं तर जाळूं शकतों ना?" दुसऱ्यानें विचारलें.

"होय! परंतु पोलिसाला नाहीं! वाटल्यास त्यांचा पोषाख उतरून तो तुम्ही जाळू शकतां. कारण विदेशी सत्तेचं तें प्रतीक आहे. त्यांचा पोषाख, सरकारी कागदपत्रं जाळल्यानं ब्रिटिश सत्तेची प्रतिष्ठा धुळीस मिळवल्यासारखं होईल. परंतु पोलीसांच्या केसालाहि धक्का लावायचा नाहीं. हें परिवर्तन जनतेच्या अंतःकरणांत घडवणं आमचं कर्तव्य आहे."

"आम्ही स्त्रियांनीं काय करावं?" एका तरुण स्त्रीनें विचारलें.

अंधुक प्रकाशांत जमलेल्या त्या मेळाव्यांत स्त्रियाहि आहेत याची अभयला आतांपर्यंत जाणीव नव्हती. तो म्हणाला—

"वा! स्त्रिया तर केवढं कार्य करूं शकतात. जगज्जननीच्या प्रतीक आहेत त्या! त्या स्फूर्ती आणि प्रेरणेचं अधिष्ठान आहेत. त्यांनीं जर क्रांतींत भाग घेतला तर मग जयाची शंकाच नको!"

"आम्ही तयार आहोंत. फक्त आम्हांस मार्गदर्शन पाहिजे."

"आमच्या गुप्त प्रचाराचं काम आपण चांगल्या रीतीनं करूं शकतां! कार्यक्रमाचीं पत्रकं आणि बुलेटिन्स घरोघरीं वांटणं, गुप्त संदेश पोहोंचवणं, लाठीहल्ला आणि गोळीबारांत जखमी झालेल्याची शुश्रुषा करणं, क्रांतीसाठीं पैसे गोळा करणं अशीं कितीतरी कामं आहेत."

"ठीक आहे. आम्ही त्याकरितां स्त्रियांचं पथक तयार करूं".

इतक्यांत मोटारीच्या प्रकाशाचा झोत अंधारांत दूरवर दिसला. स्वयंसेवकांनीं लगेच आगाऊ सूचना दिली आणि म्हटलें, "सबंध रस्ता कच्चा आणि चिखलाचा असल्यामुळं मोटार येथवर येऊं शकत नाहीं. पण पोलीस थोड्या वेळांतच येऊन थडकतील."

सेक्रेटरीनें सभा तावडतोब बरखास्त झाल्याची सूचना दिली.

"ठीक आहे! साथीदारांनो, रामराम! आतां एकतर आपण स्वतंत्र भारतांत भेटूं, नाहींतर स्वर्गांत! एकमुखानं सारे जयघोष करा—

'करेंगे या मरेंगे"

सर्वांनीं गंभीर स्वरानें जयघोष केला "करेंगे या मरेगे!"

सेक्रेटरी म्हणाले, "दीनबंधू! अभय आणि या दोन महिला यांना मागच्या रस्त्यानं ताबडतोब खाप्री स्टेशनवर पोहोंचवा! त्या दोघांना नागपूरच्या गाडींत बसवून तुम्ही दोघं वर्धा किंवा पुलगांवच्या बाजूला निघून जा! जा, निघा पटकन्. पोलिसांची नजर अभयकुमारवर आहे. त्यांचा बचाव करणं आपलं आद्य कर्तव्य आहे.

"ठीक आहे. चला. झटकन्" असें म्हणून दीनबंधूनें आपली काठी उचलली.

पांच मिनिटांच्या आंत तीं चौघें भराभर पावलें टाकीत मोटारीच्या विरुद्ध दिशेनें जात अंधारांत विलीन झालीं. पुढें दीनबंधू, मध्यें त्या स्त्रिया व शेवटीं अभय याप्रमाणें तीं निघालीं. प्रत्येकाच्या हातीं काठी होती! चोहोंकडे अंधार, वाटेंत कांटेकुटे आणि चिखल! परंतु त्यांकडे होतें कुणाचें लक्ष? ते तसेच पुढें चालले होते. त्यांचीं मनें अपूर्व उत्साहानें भरलीं होतीं. ध्येयाची अंतिम मजल केव्हां गांठणार हें त्यांना पूर्णपणें अज्ञात होतें. फक्त जायचें, पुढें जायचें, एवढेंच त्यांनाठाऊक होतें.

परंतु कोणाच्याहि मनांत भीतीचा लवलेशहि नव्हता. त्यांचीं पावलें दृढनिश्चयानें पडत होतीं. इतिहासांत आपल्या कार्याची नोंद राहील याबद्दल त्यांना जणूं काय पूर्ण भरवंसा होता! स्वत:चें सुखदु:ख या वेळीं त्यांच्यासमोर य:कश्चित् होतें. क्रांति सफल होऊन आपला देश पुन्हा केव्हां स्वतंत्र होतो, ही एकच त्यांना आस! केवळ देश! आपला प्राणप्रिय देश!

## १६

त्या रात्रीं विजयाला झोंप कुठली? दिवस उंगवतांच अभय येतो काय आणि आणि मावळतांच जातो काय? केवढी त्याची कर्तव्य-

निष्ठा! काय ते त्याचे तेजस्वी विचार? केवढी त्याची धडाडी? आपल्या ध्येयामार्गे अगदीं वेडा झाला आहे. स्वत:च्या लाभहानीचा हिशेब त्याच्या गणतींतच नाहीं. एखाद्या ज्योतीप्रमाणें आहे तो. स्वत:ला जाळून सभोंवार प्रकाश पसरविणें हाच त्याचा धर्म ! ध्येयासाठीं सर्वस्व समर्पण करायलाच निघाला आहे तो!

विजयाबरोबर कॉलेजमध्यें शिकणाऱ्या इतर मैत्रिणींचें ध्येय म्हणजे लठ्ठ पगारवाला नवरा, बंगला, मोटार, नोकर-चाकर, क्लब, सिनेमा हेंच होतें. पण हे तिला कधींच रुचलें नाहीं. तिच्या काकाकडे हेंच वातावरण होतें. त्याचा तिला उबग येई. असलें जीवन म्हणजे त्याला जीवन तरी म्हणायचें काय? जगांत केव्हां आला, केव्हां गेला, काय कमावलें याचा कांहींच आलेख नाहीं. पृथ्वीच्या पाठीवर असे कितीतरी प्राणी रोज जन्मतात व मरत असतात. त्याचा कुणाला तरी पत्ता असतो काय? या मनुष्यजीवनांत आणि त्यांच्यांत फरक तो काय? कालाच्या पटलावर जर कोणताहि ठसा उमटला नाहीं, जीवनांत जर कांहींच केलें नाहीं, आणि आपल्या मृत्यूनें कुणाला रडविलें नाहीं तर तें जिणें निरर्थक नाहीं का? विजया अशा वृत्तीची असल्यामुळें तिनें आपलें सर्वस्व अभयच्या चरणीं अर्पण केलें आणि त्याबद्दल तिला क्षणभरही पश्चात्ताप झाला नाहीं. ह्या माणसाबरोबर लग्न म्हणजे सुळावरची पोळी! ऐषआराम, सुखासीनता यांना त्यांत अवसर नाहीं. कधीं वरण आहे, तर भाजी नाहीं, दूध नासलें तर चहा नाहीं, माहेरून आणलेल्या साड्यांनंतर एक वारहि कापड तिनें कधीं विकत घेतलें नाहीं. कांचेच्या बांगड्यांखेरीज दुसरा अलंकार नाहीं. परंतु तिच्या आनंदांत कोणत्याहि प्रकारची उणीव तिला कधीं भासली नाहीं. अभयच्या प्राप्तीनें तिला धन्य धन्य वाटलें. अशा पुरुषरत्नाची प्राप्ती म्हणजे खरोखर जन्मजन्मांतरीचें पुण्यच! प्रीतीबरोबरच तिला त्याच्याबद्दल भक्तीहि वाटू लागली होती. त्याच्या रूपानें प्रत्यक्ष परमेश्वरच मिळाल्यासारखें तिला

वाटलें. अशा परिस्थितींत इतर स्त्रियांना तिच्या सौभाग्याच हेवा वाटल्यास नवल काय ?

आणि अभय ? विजयेच्या प्राप्तीनंतर त्याला अगदीं परिपूर्ण झाल्यासारखें वाटलें. ती त्याची केवळ प्रीतिदेवताच नव्हे तर स्फूर्ति-देवता होती. तिच्या प्रेमानें त्याला उन्मत्त किंवा विलासी न बनवतां पुरुषार्थाची शिकवण दिली. अपूर्व त्याग आणि संयमाचीच दीक्षा जणूं कांहीं त्याला मिळाली. कर्तृत्वाच्या अस्मानांत त्यानें उंच उंच उडावें आणि आकाशांतून नक्षत्रें तोडून आणावीं हेंच तिचें स्वप्न होतें. त्याचा पुरुषार्थ पाहून ती स्वत:ला धन्य मानी. त्याच्या आनंदांत तिचा आनंद सामवला होता.

अभय जणूं कांहीं विजयाच्या रोमरोमीं खिळला होता. तिच्या रक्ताचा थेंबन् थेंब, तिच्या हृदयाचा श्वासन् श्वास अभयच्या व्यक्तित्वानें भरला होता. दिव्य प्रीतीच्या चिरमीलनाचें हेंच स्वरूप नाहीं का ? असें असतां अभय तिच्यापासून दूर जाण्याची गोष्टच कशाला ?

तरीसुद्धां आज तीन्ही सांजा अभय दीनबंधूबरोबर जाऊं लागला तेव्हां तिला तीव्र वेदना झाली. अमावास्येचा हा भीषण काळोख त्याला गडप तर करणार नाहीं ना, या शंकेनें ती व्याकुळ झाली. पृथ्वी दुभंगून ज्वालामुखी वर उसळतो तेव्हां त्याच्या विक्राळ दाढेंत कोण कोण गडप होतें हें कधीं ठाऊक असतें का ? त्या अज्ञात भीतीनें तिच्या हृदयाचा थरकांप उडाला. अंथरुणावर पडल्या पडल्या तिनें देवीला नमस्कार केला, "देवी अंबाबाई ! माझ्या सौभाग्याचं रक्षण कर !"

तिचा डोळा लागतो न लागतो तोंच दरवाजावर थाप पडली. अशा अपरात्रीं, घरांत त्या दोघीच असतांना बाहेर ही थाप कुणाची ? कदाचित् भास असेल म्हणून ती तशीच पडून राहिली. परंतु पुन्हा आणखी जोरांत थाप पडली.

"कोण आहे ?"

" पोलीस ! " बाहेरून कणखर आवाज आला.

" थांबा, उघडतें. " विजयानें धैर्य एकवटून म्हटलें. तिनें दिवा लावला. साडी नीट केली. आणि आईला उठवायला जवळच्या खोलींत ती गेली. आईची झोंप अगोदरच उघडली होती. तिनें विचारलें,

" आले वाटतं चांडाळ ! "

बाहेरून पुन्हां जोरजोरानें दार धडधडूं लागलें.

" दार उघडतां कीं नाहीं ? कीं गोळीनें उडवूं ? " बाहेरून गर्जना झाली.

विजयानें दार उघडलें.

एक धिप्पाड पोलिस ऑफिसर एका हातांत पिस्तूल व दुसऱ्या हातांत टॉर्च घेऊन समोर उभा होता. त्याच्यामागें तीन चार ठाणेदार ! घराला तीस चाळीस पोलीसांनीं गराडा घातला होता. दूर रस्त्यावर पोलिसांच्या दोन मोठ्या काळ्या लॉऱ्या विजेच्या प्रकाशांत दिसल्या. त्या ऑफिसरनें विजयाकडे करड्या नजरेनें पहात विचारलें,

" अभयकुमार कुठं आहे ? "

" ते इकडे नाहींत ! "

" मग कुठे गेले ? "

" ते आम्हांला ठाऊक नाहीं. "

" आजच सकाळीं तो मुंबईहून आला नी आजच्या आजच तो गेला कसा ? पहा, बजावून ठेवतों; खरं सांगा ! नाहींतर तुमची धडगत नाहीं ". डिप्टीसाहेब म्हणाले.

" काय धडगत व्हायची ? मी खरं तेंच सांगतेय्. "

" मग बऱ्या बोलानं सांगा कुठें गेला तो. "

" माहीतच नाहीं तर सांगणार तरी काय ? कुठें जाताहेत हें सांगितलंच नाहीं त्यांनीं ! "

" अरे बघतां काय ! " पोलिसांकडे वळून ते म्हणाले, " घराला

सभोंवार गराडा घाला अन् घराची कसून झडती घ्या. लपवून तरी कुठें ठेवणार त्याला? ती काय मनीबॅग आहे?"

सभोंवार बुटांच्या टांचा वाजूं लागल्या. आई घाबरली. तिनें तांब्या उचलला, अन् संडासाकडे धांव घेतली.

"ए! बुढ्ढी! चाललीस कुठें? या वेळीं संडास वगैरे बंद! चल उभी रहा इथंच!"

आईच्या हातून तांब्या निसटला आणि धाड्दिशीं जमिनीवर कोसळला.

झडती सुरूं झाली. डिप्टीसाहेब विजयाला म्हणाले, "अगोदर आमच्यापैकी कुणाची तुम्हांला झडती घ्यायची असेल तर घ्या!"

"कांहीं जरूर नाहीं. तुमची सचोटी तुमच्याबरोबर!"

असें म्हणून तिनें कंदील उचलला आणि त्या घरांतला कोनाकोपरा ती दाखवूं लागली. प्रत्येक कपाट, प्रत्येक पेटी तिनें दाखविली. दोन तासपर्यंत कसून झडती झाली. कागदाचा एकेक कपटा मुंबईच्या पत्रकांसाठीं धुंडाळला गेला. अभयच्या साऱ्या पुस्तकांची उलथापालथ झाली. अभयचा एक पोर्ट्रेट आणि कांहीं कागदपत्रें त्यांनीं उचललीं. अभय व विजयाच्या पत्रव्यवहाराकडेहि त्यांची नजर गेली, परंतु विजयानें त्यांना विरोध केला. अधिकाऱ्यांनी तें एकलें. पत्राच्या प्रत्येक पाकिटावरील हस्ताक्षराबद्दल मात्र त्यांनीं खात्री करून घेतली.

सारीकडे चौखूर घोडे उधळावे अशी त्या घराची अवस्था त्यांनीं करून सोडली. मुंबईचीं पत्रकें आणि अभयकुमार यांपैकीं कांहींच हातीं लागलें नाहीं. तेव्हां हात चोळीत डिप्टीसाहेब परत जाण्यास निघाले. जातां जातां ते तिला म्हणाले, "हें पाहा! अभयकुमार घरीं येतांच कळवलं पाहिजे. त्याच्यावर गंभीर स्वरूपाचे आरोप असून वॉरंट सुटलं आहे. गुन्हेगारांना पकडण्यांत सरकारला मदत करणं

तुमचं कर्तव्य आहे. नाहींतर तुम्होहि पुढें मागें पकडल्या जाल."

"पुढच्या मागच्या गोष्टी कशाला? आजच न्या कीं!"

"या वेळीं तर सोडून देतों. पण पुढें मागें संशय आल्यास जरूर पकडल्या जाल."

"अन् हें सारं घर अस्ताव्यस्त केलं तें कोण आवरणार?"

"तें काम आमचं नाहीं." पोलिस अधिकारी म्हणाला.

"मग कुणाचं आहे? तुम्हीच तर तेव्हांपासून धुमाकूळ घातलाय् ना?"

"ए! पोरी! तोंड सांभाळून बोल! कुणाशीं बोलतेस कांहीं कल्पना?" डिप्टीसाहेब डोळे वटारून म्हणाले.

"काय करणार येऊन जाऊन गोळी झाडणार ना? बायकांवर हात उचलणं यांतच पुरुषार्थ असेल तर झाडा गोळी!"

"फारच तोंड चालवतेय! पकडा पाहूं हिला!" डिप्टीसाहेबांनीं हुकूम देतांच तीन चार पोलिस पुढें सरसावले.

दुसरा अधिकारी म्हणाला "थांबा जरा!"

तो डिप्टीसाहेबांच्या कानीं लागला. त्यांनीं विजयाच्या अवस्थेकडे निरखून पाहिलें व विचार सोडून दिला.

"जाऊं द्या! आपणांस अभयचं काम आहे. हिची पिडा बरोबर कशाला? निघा लवकर." असें म्हणून ते निघाले. पोलिसांचा वेढा उठला. पांच मिनिटांत सारे मोटारींत -बसले आणि घरघर करीत मोटार दिसेनाशी झाली. विजयानें घड्याळाकडे पाहिलें. तीन वाजले होते!

## १७

अभयकुमार, दीनबंधू आणि त्या दोघी दोनअडीचला खाप्री स्टेशनवर पोहोंचल्या. लांबून स्टेशनाचा उंच दिवा दिसूं लागतांच त्यांना हायसें

दा. क्र. ... (२३ ०नों. दि ........
वि. ...... बा.पा.क्र. ..................



वाटलें. गाडी येण्यास तीन तास अवकाश होता. "चला, थोडी विश्रांती घेऊं या." दीनवंधु म्हणाला.

सारेच थकले होते. अंग टाकतांच दीनबंधू घोरूं लागला. शान्ताच्या मैत्रिणीलाहि गाढ झोप लागली. पण शांता आणि अभयला झोप येईना. तीन तासांनीं अभयच्या सहवासास आपण मुकणार. पुन्हा कधीं भेट होणार काय जणं ?" असें शांताला वाटलें. ती नागपूरला वीमेन्स कॉलेजमध्यें बी. ए. च्या वर्गात होती. तिचे वडील १९२३ च्या झेंडा सत्याग्रहांत प्राणांतिक उपोषण करतांना वारले. त्यावेळीं ती एक वर्षाची असेल. परंतु आज पितृऋण चुकविण्यासाठीं क्रांतियज्ञांत उडी घेण्यास ती आतुर होती.

अभयचें नांव तिच्या कानीं आलें होतें. डिबेटमध्यें एकदोनदां त्याचें भाषणहि तिनें ऐकलें होतें. मुंबईंतील क्रांतीची घोषणा आणि नेत्यांची धरपकड होतांच तिला राहवेना व तिनें आंदोलनांत उडी घेतली. कॉंग्रेस सेक्रेटरीनें तिला गुप्त सभेच्या जागीं जाऊन अभयची भेट घेण्यास सांगितलें. म्हणून एका मैत्रिणीसह चिखल तुडवीत ती तेथें आली होती. अभयबद्दल तिच्या मनांत आदर होता. एखाद्याचें व्यक्तित्वच इतकें उज्जवल व निर्मल असतें कीं पाहतांच मनांत ठसतें. अभयनें आगींत उडी घ्यायला सांगितली असती तरी तिनें खुशाल घेतली असती. इतकी तिची त्याच्यावर निष्ठा जडली.

गाडी येण्याची घंटा वाजली. शांतानें विचारलें, माझ्यासाठीं कांहीं खास काम ?"

"क्रांतीच्या कार्यक्रमाबद्दल मी सभेंत सांगितलंच."

"हो ! पण त्याखेरीज आणखी कांहीं विशेष काम ?"

"त्याखेरीज ?" अभय विचार करीत म्हणाला, "आमच्या घरीं एखादे वेळीं जाऊन विजयाची विचारपूस केल्यास बरं ! तिच्या प्रसूतीच्या वेळीं मी कुठें राहीन कुणास ठाऊक !"

" आपण या बाबतींत निश्चित असा. कांहीं विद्यार्थिनींचं पथक मीं तयार केलं आहे. विजयाताईंना आम्ही कांहींच कमी पडूं देणार नाहीं."

" बस् ! त्याबाबतींत आपलाच आधार आहे." भाववश होऊन तो म्हणाला. निरोप घेतांना विजयची करुणमूर्ति त्याला दिसूं लागली.

गाडी आली नि गेली. त्या दोघी जणी त्या गाडीनें नागपूरला परतल्या. किती तरी वेळ नागपूरकडे जाणाऱ्या त्या गाडीच्या मागच्या दिव्यांकडेच तो पाहात राहिला. ! त्याला तर घराच्या विरुद्ध दिशेनें दूरदूर जायचें होतें. अज्ञात दिशेकडे ! पारतंत्र्याचा अंधार नाहीसा करून मंगल प्रकाशाचा उदय करण्याकरितां मार्गांतच ठेंचाळून कोलमडावें लागलें तरी त्या दिशेनें जाणें हेंच एक त्याचें कर्तव्य ! हाच एकमेव धर्म ! हातांतील काठी पुढें टाकीत तो म्हणाला—

" दीनबंधू ! चला, पुढें जाऊं या."

## १८

दीनबंधू म्हणजे विलक्षण माणूस होता ! त्याच्या तुरुंगवासाशिवाय एकही आंदोलन सुनें गेलें नाहीं. सोळा वर्षांच्या कोवळ्या वयांतच गांधींच्या २१ सालच्या असहकारितेच्या चळवळींत त्यानें भाग घेतला व आईबापांच्या हातावरे तुरी देऊन स्वारीनें १४४ कलमाचा भंग केला. सतत तीन महिने जेलमध्यें दळणाचें जातें चालवून बाहेर निघाले ते अगदीं जर्जर अवस्थेंत ! त्या दिवसांत जेल म्हणजे साक्षात् यमपुरी होती. सहा महिन्यांच्या आजारानंतर कसेबसे बरे झाले तर पुन्हां १९२३ चा झेंडा सत्याग्रह सुरू झाला. झालें ! दीनबंधू पुन्हां पटेलांच्या सेनेंत भरती झाले. १९३० च्या आंदोलनांत बुलेटिन्स वाटतांना पुन्हां पकडले गेले. १९३२ मध्यें नऊ महिन्यांचा कारावास भोगलाच ! १९४० मध्यें व्यक्तिगत सत्याग्रह झाला तर विनोबा भावे यांच्यासमवेत दीनबंधू हजर ! दीनबंधूंनीं देशाच्या हांकेला ओ दिली नाहीं असें कधीं झालें नाहीं. देश-

भक्तीचें वेड नाहींसें होऊन त्याचें लक्ष संसारांत लागावें म्हणून आई-वडिलांनीं जबरदस्तीनें त्याचें लग्न. केलें तरी त्याच्यांत अजिबात कांहीं परिवर्तन झालें नाहीं. धंदा होता घड्याळें दुरुस्त करण्याचा, पण कुठें मिरवणूक निघाली कीं दुकान बंद करून तींत ते सामील ! कोणी नेता पकडला गेला कीं हरताळाची सुरवात त्यांच्या दुकानापासून ! घडयाळ-दुरुस्तीच्या कामांत ते निष्णात होते. बडयाबडया लोकांचीं मौल्यवान घडयाळें त्यांच्याकडे दुरुस्तीसाठीं येत. परंतु या देशसेवेमुळें आठवडेच्या आठवडे तीं पडून राहात ! एकदां त्यांच्या दुकानांत दुरुस्त झालेलें घडयाळ पुन्हां दुरुस्तीला येण्याची गोष्टच कशाला ? १९२४ पासून २९ पर्यंत राजकारणाच्या आघाडीवर कांहींशी शिथिलता होती त्यावेळीं घडयाळ–दुरुस्तीचें काम शिकण्याकरितां वडिलांनीं त्यांना मुंबईला पाठवलें. तेथें एका स्विस कंपनीमध्यें उमेदवारी करून दीनबंधू काम शिकले. त्यांची बुद्धि कुशाग्र होती. शिवाय त्यावेळीं कुठलें आंदोलन झालें नाहीं हें नशीब ! नाहींतर कुठली कंपनी अन् कुठली घडयाळ-दुरुस्ती ! मुंबईहून शिकून आल्यानंतर दोन वर्षांच्या आंतच त्यांनीं आपला चांगला जम बसवला. त्याच सुमारास त्याचें लग्न झालें व त्याचे आईवडील वारले. आपला मुलगा मार्गाला लागला, आतां आपला वंश चालेल अशा समाधानांत तीं गेलीं.

परंतु दैवगति अशी कीं दीनबंधूचा वंश चालला नाहीं. दोन तीन मुलें झालीं. पण कांहीं तीन महिन्यांत तर कांहीं जन्मतांच वारलीं. त्याची बायको लक्ष्मी हिनें हाय खाल्ली तर तो म्हणे, "रडण्यांत काय अर्थ आहे लक्ष्मी ? देवानं दिलीं व देवानंच नेलीं. आपल्या भाग्यांतच मुलं नाहींत तर कशीं मिळणार ? देवाची मर्जी" !

परंतु यानें धीर येण्याऐवजीं तिला अधिकच दुःख होई. तिचा सारा दिवस घरच्या कामकाजांत जाई. नवऱ्याच्या तुटपुंज्या मिळकतींत कसा बसा संसार चालवी. दीनबंधूचा घरीं कधीं पत्ता नसायचा. सकाळ-दुपार

दुकान ! संध्याकाळ झाली, कीं दुकान बंद करून सरळ काँग्रेस ऑफिस ! तेथें एखाद्या स्वयंसेवकाप्रमाणें पडेल तें काम निष्ठेनें करायचें. मग वेळ प्रसंगीं ऑफिस झाडण्याचें कामहि कां असेना ! स्वयंसेवकांच्या प्रमुखाचा त्याच्यावर पूर्ण भरंवसा होता. त्यानें हातीं घेतलेलें काम म्हणजे काळ्या दगडावरची रेघ ! १९३० मध्यें गढवाल-दिवस पाळतांना मिरवणुकीच्या अग्रभागीं दीनबंधू ! पोलीस आणि लष्करानें ती मिरवणूक अडवली. परंतु दीनबंधूच्या आदेशाप्रमाणें सारी मिरवणूक तेथेंच धरणें देऊन बसली. पोलीसांनीं मिरवणूक उधळून लावण्याचा हुकुम दिला. संगिनी रोखल्या गेल्या ! वरून घोडेस्वार दौडण्याची भीति घालण्यांत आली. बंदुकीच्या नळ्या साफ झाल्या. परंतु दीनबंधूवर त्याचा कांहीं एक परिणाम झाला नाहीं. त्यांच्या हातांतली तकली तशीच शांतपणें चालू होती. त्यांचा तो निर्विकारपणा व बेडरपणा इतका प्रेरक होता की सारी मिरवणूक त्यांच्या-प्रमाणेंच निश्चल बसून राहिली. शेवटीं पोलिसांचेंच अवसान गळालें व बारा वाजतां लष्कर तेथून हलविण्यांत आलें आणि मिरवणूक पुढें सरसावली.

परंतु इतकें सारें होऊनहि दीनबंधूच्या अंत:करणास अहंकार कधीं शिवला नाहीं. "मला अमुक कमेटींत घ्या मला व्यासपीठावर येऊं द्या वर्तमानपत्रांत माझें नांव येऊं द्या." असें त्यांनीं कधींहि म्हटलें नाहीं; उलट कोणी स्तुति केली तर संकोचानें त्यांची अर्धमेली अवस्था होई व ते एकदम विषय बदलीत. काँग्रेसच्या कामासाठीं त्यांनीं कधीं एका पैचीहि मागणी केली नाहीं. उलट त्यांच्याच खिशाला कितीतरी वेळा चाट बसे. एखाद्या कामाच्या मागें ते लागले कीं तहानभूक, घरदार—साऱ्यांचा त्यांना विसर पडे. विचारी लक्ष्मी मात्र त्यांच्या वाटेकडे डोळे लावून बसे. कधीं कधीं परत येण्यास त्यांना रात्रीचा एकदीडहि होई. पण लक्ष्मी तरी एक अजब स्त्री होती. ते केव्हांहि येवोत त्यांचें जेवण झाल्याखेरीज ती कधीं

जेवली नाहीं. त्यांनीं हजारदां बजावले कीं, "माझ्यासाठीं थांबूं नकोस. माझें ताट ठेवून तूं जेवून घेत जा!" पण तिला तें पटेल तेव्हां ना. ती म्हणे, "तुम्ही मात्र उपाशी पोटी दिवसभर वणवण हिंडायचं अन् मी घरीं बसल्या बसल्या खुशाल जेवून घ्यायचं." परंतु दीनबंधूच्या त्या बजावण्यांत आणि लक्ष्मीनें तें न ऐकण्यांत कधींहि खंड पडला नाहीं. अपरात्रीं एकदीड वाजतां, कंदिलाच्या मिणमिणत्या प्रकाशांत जेव्हां ती दोघें साधेंसुधें भाकरीचें जेवण बरोबर जेवीत; तेव्हां स्वर्ग पृथ्वीवर आल्यागत वाटे. लक्ष्मीच्या श्रद्धेस दीनबंधूहि सर्वथैव पात्र होता. ती दीनबंधूला देवतुल्य मानी त्याप्रमाणें दीनबंधूहि तिला देवता मानी. दीनबंधू देशापायीं अगदीं वेडा झाला होता. त्यापुढें तो पैशाचीहि पर्वा करीत नसे. घरांत अठराविश्वे दारिद्र्यच असलें तरी त्यांच्या देशभक्तींत कधीं अंतर पडलें नाहीं. शेजारणी-पाजारणी लक्ष्मीला म्हणत, "तूं त्यांना रोकत कां नाहींस? त्यांनीं जर नीट धंद्यांत लक्ष घातलं, तर तुझा संसार नीट नाहीं का चालणार? जेव्हां पहावं तेव्हां निघाले मिरवणुकींत नाहींतर जेलमध्यें! अन् इकडे पाहावं तर तुझी अवस्था लंकेच्या पार्वतीसारखी!"

लक्ष्मी म्हणे, "मी कां म्हणून उगाच त्यांना अडवूं? त्यांचं सुख तेंच माझं सुख! जर त्यांचं पाऊल वाकड्या मार्गाला असतं तर गोष्ट वेगळी! ते देशाचं काम करतात एवढंच ना? त्यांना पिण्याचं व्यसन नाहीं कीं जुगार खेळण्याचं नाहीं. विडी, तंबाखू-कशालाही स्पर्श करीत नाहींत. घरीं आले कीं अगदीं आनंदीआनंद निर्माण करतात. एवढं माझं सौभाग्य असतांना उगीच त्यांच्या मार्गांत धोंड बनून आपल्याच पायावर धोंडा पाडून घेऊं? छे! तें मला रुचायचं नाहीं." शेजारणी येत नि हात-चोळीत परत जात. आणि लक्ष्मीची पतिपरायणता तशीच अखंड चालूं राही.

परंतु त्या दिवशीं लक्ष्मीला फार जाणवलें. तिला तिसरें अपत्य झालें. त्यापूर्वी झाल्या त्या साऱ्या मुली होत्या. जन्मतांच त्या मरण पावल्या.

परंतु हा मुलगा चांगला चार महिन्यांचा झाला. त्याचें कोडकौतुक करण्यांत लक्ष्मीला साऱ्या गोष्टींचा विसर पडे. तिचा आनंद पाहून दीनबंधू म्हणे, "परमेश्वरा! कमींत कमी याला तरी वांचव म्हणजे लक्ष्मीचे कष्टमय जीवन सुसह्य होतील."

कारण दुसरें महायुद्ध सुरूं झालें आणि गांधीजी आतां रणशिंग फुंकणार असें स्पष्ट दिसूं लागलें. अन् या वेळचा तुरुंगवास लहानसहान न राहतां एखादे वेळीं लढाई संपेपर्यंतहि तुरुंगांत सडावें लागेल. मग बिचाऱ्या लक्ष्मीचें काय होईल कोण जाणें? त्यामुळें तिला जरा मुलाचा विरंगुळा असला तर बरें राहील. परंतु ईश्वरेच्छा कांहीं वेगळीच होती. न्याहारी करून दीनबंधू दुकानावर गेले. मुलाचें अंग तापलें. लक्ष्मीच्या उरांत धडकी भरली. तिनें शेजारच्या वैद्याला बोलावलें. वैद्यानें एक दोन पुड्या दिल्या.

दोनतीन तासांनंतर दीनबंधूला बोलावण्यासाठीं दुकानांत माणूस पाठवला तर कळलें कीं दुकान बंद असून दीनबंधूचा पत्ता नाहीं!

सन बेचाळीसची तेरा एप्रिल होती ती! जालियनवाला दिवस जोरांत पाळला जावा म्हणून उत्साहानें तयारी चालली होती. स्वराज्याचें युद्ध सुरू होण्याचीं चिन्हें दिसत होतीं. वातावरण उत्साहमय होतें. मिरवणुकींत हजारों लोकांनीं भाग घेतला होता. सभाहि विशाल भरत व जोरदार भाषणें होत. त्यामुळें जनतेच्या चित्तवृत्ती उफाळत. सभोंवार असें वातावरण असतांना दीनबंधूंचा उत्साह काय विचारावा? दिवसभर साऱ्या शहरांत हिंडून त्यांनीं मिरवणुकीची घोषणा केली. त्यामुळें रात्रीं अशी भव्य मिरवणूक निघाली कीं सांगतां सोय नाहीं. काँग्रेसचे पुढारी जनतेचा तो उत्साह पाहून थक्क झाले. मोठी मिरवणूक असल्यामुळें संध्याकाळीं साडेसातच्या ऐवजीं साडेनऊला संपली. त्यानंतर जाहीर सभा सुरू झाली. सभेंत आवेशपूर्ण भाषणें झालीं. उच्च स्वरांत जयघोष झाले. राष्ट्रीय गाणीं झालीं. हें सारें आटपेपावेतों रात्रीचा एक वाजला!

दीड वाजतां दीनबंधू घरीं पोचले तों लक्ष्मी धाय मोकलून रडत असलेली त्यांच्या दृष्टीस पडली. तिच्या हृदयभेदक किंकाळ्या रात्रीच्या नीरवतेस जणुं कांहीं विदीर्ण करीत होत्या. तिच्याजवळ एकदोन वायका बसल्या होत्या. मळकें फडकें पांघरलेला तान्हा मुलगा जवळ जमिनीवर पडला होता. अगदीं निश्चेतन !

हें दृष्य दिसतांच कर्पाला हात मारून दीनबंधू मटकन् खालीं बसला !

## १९

मुलाचें क्रियाकर्म आटोपून तासाभरांत दीनबंधू परतला. तेथेंच जमिनीवर लक्ष्मी जरा आडवी झाली होती. तिचा अंमळ डोळा लागला होता. गालावर ओघळलेले अश्रू स्पष्ट दिसत होते. दीनबंधूचें अंत:करण द्रवलें. गेल्या जन्मीं कोण जाणे कोणतें पुण्य केलें होतें म्हणून हिच्यासारखी पत्नि मिळाली ! नांवाप्रमाणेंच खरोखर लक्ष्मी. या घरांत तिला कांहीं सुख मिळालें नाहीं. ना धड खायला ना धड प्यायला ! जेव्हां पाहावें तेव्हां हातातोंडाशीं गांठ कशी पडेल हीच विवंचना ! तिला मुलांचा फार लळा ! पण ईश्वरानें तिला तेंही सुख लाभूं दिलें नाहीं. मी दिवस दिवसभर बाहेर भटकतों. माझ्यापासून तिला काय सुख मिळालें ? पण तिनें मात्र मला कशाचीहि उणीव भासूं दिली नाहीं. माझ्या तोंडांत घास गेल्याखेरीज ती कधीं उष्टावत नाहीं. मग त्यासाठीं चोवीस तासांचा उपवासही कां घडेना ! दहा रुपये दिले तर जें समाधान तेंच दहा पैसे दिले तरी. माझ्या या खडतर आयुष्याशीं समरस होऊन ती कसा काय संसार चालवते राम जाणे ! साक्षात् देवताच आहे. असे विचार करीत कितीतरी वेळ पत्नीच्या चेहऱ्याकडेच ते पाहात राहिले. तो अश्रुप्लावित क्लांत आणि श्रांत चेहरा पाहून श्रद्धेनें त्यांचें मस्तक नत झालें.

आवाज न करतां त्यांनीं हळूच चरखा काढला. परंतु जरा चाक

फिरतें न फिरतें तोंच लक्ष्मीचा डोळा उघडला. ती लगबगीनें उठली व म्हणाली,

"आग लागो या झोपेला! केव्हां आलांत कांहीं कळलंच नाहीं!"

"हा नुकताच आलों."

"काय मेली ही झोप तरी!"

"काय झालं झोप लागली तर! स्वस्थ पड पाहूं आणखी!"

"वा! तुम्ही दिवसभराचे उपाशी अन् मी खुशाल झोपा काढूं? थांबा, चूल पेटवून पटकन् खिचडी टाकतें."

"नको ग! आज कांहींच नको मला. पण तूं जर का चार घांस खात असशील तर मीच खिचडी टाकतों."

"छे! छे! भलतंच! मला अजिबात इच्छा नाहीं."

"मग मला पण इच्छा नाहीं. जा झोप पाहूं!"

"अन् तुम्ही?"

"थोडं सूत काढीन म्हणतोंय्! पुढच्या पंचमीला तुझा वाढदिवस आहे विसरलीस वाटतं! त्या दिवशीं मी आपल्या हातच्या सुताची साडी तुला नेसवीन. भद्दूखां म्हणाला, तुम्ही सूत आणून द्या. एका दिवसांत साडी विणून दिली नाहीं तर माझं नांव बदलून टाका." लक्ष्मीनें चटई आणली आणि ती जवळच आंथरून तीवर ती लवंडली. दीनबंधूनें हळूंच आपल्या डाव्या मांडीवर तिचें मस्तक घेतलें. लक्ष्मीनें निमूटपणें डोळे मिटले. त्या वेळीं तिच्या मुद्रेवर शोकाचा मागमूसहि नव्हता. एक प्रकारची अपूर्व तृप्ति आणि शांति तिच्या चेहऱ्यावर विलसत होती.

दीनबंधूचा चरखा चालूं झाला. त्याचा घूंऽऽऽ असा आवाज सुरू झाला. चरख्याच्या स्वरांत आपला स्वर मिसळून ते गुणगुणूं लागले.

"हम गरिबोंके गलेका हार वंदेमातरम्–
छीन सकती है नहीं सरकार वंदेमातरम्॥

"आपल्या मोठ्या मुलाचीं लक्षणं कांहीं ठीक दिसत नाहींत. हा मुलगा आपल्या तोंडाला केव्हां ना केव्हां काळोखी फासणार!" नुकतेच कोर्टांतून आलेले चौधरी मॅजिस्ट्रेट म्हणाले. इतके अस्वस्थ ते कधीं झाले नव्हते.

"काय झालं? केलं तरी काय त्यानं?" पत्नीनें विचारलें.

"खुशाल विद्यार्थ्यांच्या मिरवणुकींत सामील झाला म्हणे!" शहरांत १४४ कलम आहे हें त्या गाढवाला ठाऊक का नाहीं? त्या कलमाचा भंग करणारा ताबडतोब पकडला जाईल. मग तो मॅजिस्ट्रेटचा मुलगा असो कीं त्याच्या बापाचा!" चौधरी गरजले.

चौधरीसाहेब शहराचे हेडक्वार्टर मॅजिस्ट्रेट होते. चळवळ सुरू झाल्यापासून त्यांच्या जबाबदाऱ्या वाढल्या होत्या. दिवसभर कोर्ट, नंतर रात्रीं-अपरात्रीं झडत्या, धरपकड, गस्त घालणें–एक ना दोन! शांतता व सुरक्षितता यास जरा धोका दिसला कीं गोळी झाडण्याचा हुकुम! सकाळीं एकदां चढवलेली पॅंट दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत बदलणें कर्म-कठिण! अजब दिवस होते ते! थोडीथोडकी नव्हे, बावीस वर्षें नोकरी झाली, पण इतकें काम त्यांच्यावर कधींहि पडलें नाहीं. हिंदू-मुसलमानांचे मोठमोठे दंगे त्यांनीं निस्तरले. सत्याग्रहाच्या चळवळीही निवारल्या. पण यावेळचा प्रकार कांहीं औरच होता. सरकारी हुकूमहि इतके कडक होते कीं सांगतां सोय नाहीं. दावा साधून कोण कोणत्या वेळीं कमिशनराचे कान भरील व त्यामुळें नोकरीवर गदा येईल याचा कांहीं नेम नव्हता. जो दिवस निभला तो आपला!

आज त्यांना पोलिसांतर्फे बातमी कळली कीं त्यांचा मुलगा महेन्द्र मिरवणुकींत सामील होण्यास निघाला. ते इतके घाबरले कीं त्याच क्षणीं तशाच फायली टाकून ते घरीं परतले व बायकोवर असे आग-पाखडू लागले कीं जणू कांहीं तिचाच दोष असेल!

" गेला आहे मिरवणुकींत तर पकडला जाईल. त्याला मी काय करूं ? गुप्ता जज्जसाहेबांची मुलगीहि गेली म्हणे. पांड्यांचा मुलगा तर कालच धरला गेला."

" हें सारं तुला कसं कळलं ?"

" डिप्टीसाहेबांची बायको आत्तां आली होती तिनं सांगितलं. तिच्याच यजमानांनीं त्याला पकडलंय् ! "

" छान ! म्हणजे माझ्या आधीं सारी बित्तंबातमी तुला ! पण महेन्द्र पकडला गेला तर मींच त्याला फूस दिली अशी शंका कमिशनरला येईल ना ? "

" कांहीं तरीच ! कसली शंका नी कसला संशय ? घरोघरीं लोण पसरलं आहे. कुणाकुणाला प्रतिबंध करणार ? अन् केला तरी ऐकायला बसलंय् कोण ! महेन्द्र मला म्हणाला कीं जर का मी पकडला गेलों तर मी घर सोडून निघून गेलों, व माझा तुमचा कांहीं संबंध नाहीं असं द्या सांगून ! पाहिजे तर लेखी लिहून देतो. असं सुद्धां तो म्हणाला. यावर काय बोलायचं सांगा. "

" महेन्द्र तरी अजब निघाला ! धाकटा मात्र समजूतदार दिसतो." चौधरी म्हणाले.

" कसला समजूतदार ! तो घुम्या आहे. इतकंच ! पण आज त्यांनंहि सांगितलं कीं दादा पकडला गेला, तर मी सुद्धां चळवळींत भाग घेईन. दादानं शूरपणा दाखवावा अन् मी मात्र भागूबाई बनून घरांत बसून राहावं ? "

" परमेश्वरा, यापुढं माझ्या नोकरीचं काय होणार ? माझींच मुलं मला जुमानीत नाहींत हें कमिशनरसाहेबांना मी कसं पटवणार ? "

" मुलं तुम्हांला जुमानीत नाहींत आणि मलाहि नाहीं. अभय-बाबूंची सारखी वाखाणणी करीत असतात. "

"कोण म्हणालीस ? अभय ? " मॅजिस्ट्रेटसाहेब इतके घाबरले कीं

जणूं काय समोर एखादा राक्षसच असावा! "त्याच्यावर वॉरंट सुटलं आहे. फार गंभीर स्वरूपाचे आरोप आहेत त्याच्यावर! त्याची मला मुळींच धडगत दिसत नाहीं. त्यानं कैद चुकविण्याचा प्रयत्न जर का केला तर त्याला गोळीनंहि उडवण्याचा हुकूम आहे."

"अयाई ग! गोळीचा हुकूम? पण त्या बापड्यानं असं केलंय् तरी काय? किती लाघवी आहे तो! आपल्या मुलांना शिकवायला यायचा त्यामुळं मला त्याचा अनुभव आहे. अतिशय सुस्वभावी आणि निर्मल अंतःकरणाचा! मुलांना भावासारखं मानी. मला माताजी म्हणे. गोळी झाडण्यासारखं त्यानं केलं तरी काय?"

"मुंबईहून बंडाचीं पत्रकं त्यानंच आणलीं आणि त्यामुळं सर्वत्र आग पसरली. त्याच्याच भाषणामुळं स्वयंसेवक भडकले. त्यांनीं एका शिपायालाहि मारलं. सध्यां तो वर्ध्याच्या आसपास आहे म्हणे! तेथील गांवंच्या गांवं सरकारच्या विरुद्ध उठलीं आहेत. एखाद् दुसरा खूनहि तिथें झाला म्हणे!"

"पण तो तर मुंगी मारणंहि पाप समजतो! तो कसं खुनाचं प्रोत्साहन देईल? एखाद्याला विनाकारण फांसावर लटकावायचं असेल तर खुशाल लटकवा! माझं कांहीं म्हणणं नाहीं."

"काय? काय बरळत सुटलीस? हें सुद्धां डिप्टीसाहेबांच्या बायको-नंच सांगितलं वाटतं!"

"ती बिचारी कशाला सांगेल? अभयकुमारच्या बाबतींत असली अभद्र गोष्ट कोण सांगणार?"

आपल्या पत्नीचा तो दृढ विश्वास पाहून चौधरी हतबुद्ध झाले. गड्याला चहा करायला सांगून चौधरींची पत्नी देवघरांत गेली आणि देवाजवळ दिवा लावून तिनें प्रार्थना केली,

"अभयच्याबद्दल जें कांहीं ऐकलं तें सारं खोटं ठरो. ईश्वरा, अभयचं रक्षण कर."

आन्दोलनाची आग शहरांत पसरली आणि तिच्या ज्वाला खेडोपाडीं जाऊन भिडल्या. साऱ्या जनतेंत विद्रोहाची भावना उफाळली. सर्वांना विदेशी साम्राज्याचा वीट आला होता. इंग्रजी शासनाच्या शंभर दीडशें वर्षांच्या मगरमिठींत ती भावना मरगळल्यासारखी वाटली, तरी पूर्णपणें मेली नव्हती. संधि मिळतांच ती वर उसळूं लागली. ऑगस्ट क्रांतीच्या तेजस्वी संदेशानें मुर्दाडांतहि चैतन्य निर्माण झालें. पत्थरासारखीं निर्जीव भासणारीं माणसें शूराप्रमाणें ललकारी मारून उठलीं. व 'हें स्वातंत्र्याचें अंतिम युद्ध आहे' अशा भावनेनें पुढें सरसावली. "जें काय करायचें आहे, तें आतांच! मरायचें असेल तरी तें आतांच. मोक्ष साधण्याची हीच वेळ आहे. अशी संधि पुन्हा येणार नाहीं." असा विश्वास साऱ्यांना वाटत होता. गांधीजींच्या जीवनप्रणालीवर अभयची श्रद्धा होती. त्यांच्या अहिंसा भय मार्गानें भारतास स्वराज्य मिळेल, अशी त्याची निष्ठा होती. आणि त्यांच्या नेतृत्वाखालीं भारत जर का दास्यमुक्त झाला तर अन्य परतंत्र राष्ट्रांनाहि यामुळें आपल्या दास्याच्या शृंखला तोडण्याचा मार्ग सांपडेल. अशा प्रकारें अन्य राष्ट्रेंहि अहिंसा-वादाची कांस धरतील आणि मग युद्धाच्या दावानलांत होरपळलेल्या विश्वाला मानवधर्माची स्थापना करणारा खरा मार्ग दिसेल. हिंसा आणि प्रतिहिंसेच्या दुश्चक्रांत पाश्चिमात्य देश इतके गुरफटले होते कीं त्यांतून निघणेंच त्यांना दुरापास्त होतें. त्या कर्दमांत त्यांचें प्रत्येक पाऊल अधिकाधिक खोल रुतत चाललें होतें. जे स्वतःलाच वांचवूं शकत नाहींत, ते इतरांना काय वांचवणार? दुःख आणि निराशा यांनीं जर्जर झालेल्या विश्वाला गांधीजींची अद्भुत शक्तीच शांतीचा मार्ग दाखवून वांचवूं शकेल. म्हणून या देशांतील आंदोलनाचें महत्त्व फक्त देशाच्या स्वातंत्र्या पुरतें मर्यादित नसून, विश्वाच्या शांतीसाठीं आणि कल्याणासाठीं आहे.

अशा विचारांनीं प्रेरित होऊन अभयकुमार आन्दोलनाचें संचालन अहिंसामय मार्गानें करीत होता. १९४०-४१ च्या व्यक्तिगत सत्याग्रहांत ज्याप्रमाणें कोणत्याहि पक्षाच्या व्यक्तीला भाग घेण्याची मुभा होती त्याप्रमाणें याहि चळवळींत होती. त्याचा परिणाम असा झाला कीं क्रांतिकारी लोकांचें दल जनतेला खजिने, शस्त्रागार इत्यादि लुटण्या-साठीं, जुलमी सरकारी ऑफिसरांचे खून करण्यासाठीं, डायनामाइटनें रेल्वेपूल उडविण्यासाठीं प्रवृत्त करीत होतें. शहरांतील कांहीं विभाग गांधीवादी होते त्यांनीं अहिंसेचा मार्ग धरला. परंतु कांहीं विभागाचें नेतृत्व सशस्त्र क्रांतिकारकांनीं हस्तगत केलें. त्या विभागास पोलिस आणि लष्कराचा वेढा पडला. लष्कराकडे शासनाचे सारे अधिकार सोपविण्यांत आले होते. त्यांच्याजवळ मशीनगन्स असून हुकुमबंदी केल्यास त्याच क्षणीं गोळ्या झाडण्याचें त्यांना फर्मान होतें. जनतेमध्यें दहशत निर्माण करून क्रांतीचें कंबरडें मोडल्याशिवाय ब्रिटिश राजवट टिकविण्याचा अन्य मार्ग नव्हता. येनकेनप्रकारेण जनतेंत निराशेची भावना निर्माण झाली कीं सारी कथा संपली, हें सरकारला पुरेपूर ठाऊक होतें.

## २२

घुघरी गांवाच्या उत्साहाला उधाण आलें होतें. एरव्हींच तें जागृत गांव होतें. आतां तर बोलून चालून क्रांतीचें वातावरण! मग काय विचारतां! 'करा किंवा मरा' या घोषवाक्यानें सारें गांव दुमदुमलें. दोन अडीच हजार वस्तीचें तें गांव! पोलीसठाणें, पोस्ट ऑफिस, प्रायमरी शाळा तेथें होती. परंतु राजकीय जागृतींत मोठमोठ्या तहसिलींनाहि मार्गे सारणारें तें गांव होतें. नेत्यांना या गांवाबद्दल पूर्ण भरंवसा वाटत होता. पाटील, पटवारी अशा लोकांचीं मोजकीं घरें सोडून दिल्यास राष्ट्रीय झेंडा आणि गांधींची तसबीर

या दोन गोष्टी नसणारें एकहि घर तेथें सांपडलें नसतें. राष्ट्रीय गीतें आणि भजनें गाणाऱ्या लोकांचें तेथें एक मंडळहि होतें. त्यांच्याजवळ हार्मोनियम, तबला, झांजा, चिपळ्या, एकतारी वगैरे सारा साज होता. गांवाच्या पंचक्रोशींतील इतर खेड्यांप्रमाणें तें गांवहि बाबा मानवदासांचे परमभक्त होते. बाबाजी याच गांवचे असून भगवद्भक्ति म्हणजेच मानवसेवा अशा धर्माची शिकवण देत. साकार मानवांतच निराकार परमेश्वर वसतो असा विवेकानंदांप्रमाणें त्यांचाहि संदेश होता. खंजिरीवर भजनें गातांना ते इतके रंगून जात कीं ऐकतांना जनताहि दंग होत असे. भजनाची भाषा आणि भाव सरळ असल्यामुळें अशिक्षितांच्या अंतःकरणासहि तीं जाऊन भिडत. भक्ति आणि कर्माचा समन्वय झाला पाहिजे अशी त्यांची निष्ठा असल्यामुळें कपाळाला गंध फांसून ध्यान करतांना ते आणि त्यांचे भक्त कधीं दिसले नाहींत. उलट सफाईचा झाडू, औषधांची पेटी, पाटी-पेन्सिल, असलींच उपकरणीं त्यांच्या हातीं दिसायचीं. ग्रामसफाई, आजाऱ्यांची सेवा-शुश्रुषा, साक्षरताप्रसार असल्या मोहिमांमुळें ग्रामसुधारणा होई. बाबा मानवदास गांधीजीचे भक्त होते. गांधीजोंना ते अवतार मानीत. सेवाग्रामला जाऊन प्रत्यक्ष गांधीजींनाहि त्यांनीं तसें सांगितलें. प्रत्यक्ष राजकारणाशीं बाबाजींचा कांहीं संबंध नसून फक्त विधायक कार्यक्रमाशीं होता. ते फारसे शिकले नव्हते. परंतु त्यांचीं प्रवचनें विचारपरिप्लुत असत. त्यांच्या वाणींत माधुर्य, हृदयांत प्रेमळपणा आणि आचरणांत सौजन्य होतें. त्यांच्या सान्निध्यांत येणारी प्रत्येक व्यक्ति त्यांची भक्त बने.

त्या दिवशीं गुरुवार होता. बावाजींच्या भक्तमंडळींनीं भजनाचा कार्यक्रम ठेवला. रात्रीं नऊ वाजतां भजन सुरू झालें. सभोंवतालच्या आठदहा गांवांतील लोक तेथें गोळा झाले. बायका, पुरुष, मुलें मुली —सारे! आदल्या दिवशींच तीन मैलांवर असणाऱ्या आमगांवांत

गोळीबार झाला होता. त्यांत फागू नांवाचा एक शेतकरी मारला गेला. स्त्रियांवर अत्याचार झाल्याच्या बातम्याहि कानीं आल्या. लोकांचीं मनें शोकानें आणि रोषानें भरलीं होतीं. फागू हा स्वभावानें सरळ व गरीब असून लोकप्रिय होता. तो बाबाजींचा भक्त होता. त्याच्या अकारण मृत्यूमुळें लोकांच्या मनास धक्का बसला. जिवाला विरंगुळा वाटावा म्हणून पोराबाळांसहित सारेजण मानवदासांचें भजन ऐकण्यासाठीं घुघरीला आले होते. फागू शेतकऱ्याची दुर्दैवी आईहि त्यांच्यांत होती. तिच्याच्यानें चालवेना, म्हणून दोन युवकांनीं तिला खांद्यावर बसवून आणलें. तिच्या अश्रूंना खंड नव्हता. फागू तिचा एकुलता एक मुलगा होता. " ज्यानें माझ्या निरपराध फागूला खाल्लं त्या मेल्या इंग्रज सरकारचं तळपट होवो "! असे शिव्याशाप ती देत होती.

भजनाच्या स्थानीं तिचा प्रवेश होतांच लोक आपसांत कुजबुजले, " फागूची आई. " तिचे पाझरणारे डोळे पाहून लोकांनींहि आपले डोळे पुसले. तिला पाहतांच बाबा मानवदासांनीं व्यासपीठावर राहून तिला उत्थापन दिलें. आणि आदरपूर्वक नमस्कार करून ते म्हणाले,

" आई ! तुम्ही फार भाग्यशाली आहांत. तुमचा मुलगा देशासाठीं हुतात्मा झाला ! "

त्या दिवशींचें भजन अपूर्व झालें. बाबाजी भजनांत तल्लीन झाले. ते मस्त होऊन गात होते. त्यांच्याबरोबर जनताहि धुंद झाली. त्या दिवशीं कांहीं औरच रंग चढला. ते तन्मय होऊन सूरदासाचें भजन गाऊं लागले.

" अबकी टेक हमारी, लाज राखो गिरिधारी ! "

जणूं कांहीं ते प्रत्यक्ष ईश्वरालाच आवाहन करीत होते. " सारा भारत परकीय अत्याचारांनीं त्रासला आहे. जनता त्राहि भगवान् झाली आहे.

अशा वेळीं हे ईश्वरा, तूं ये आणि भारताची लाज राख." ते पुढें म्हणाले—

"जैसी लाज राखी अर्जुनकी भारत युद्ध मंझारी
सारथी होके रथको हांको चक्र सुदर्शनधारी" ।।
जैसी लाज राखी द्रौपदीकी होने न दीन्हि उधारी ।। "

ही ओळ जेव्हां त्यांनीं म्हटली, तेव्हां कौरवांची सभा डोळ्यासमोर मूर्तिमंत दिसूं लागली. दु:शासनानें केलेलें वस्त्रहरण, पांडवांची असहायता, द्रौपदीचा करुण धावा! त्या धाव्याशीं बाबाजी एकरूप झाले. मानवदास म्हणूं लागले—

"सूरदासकी लाज राखो, अब को है रखवारी"-

सारा श्रोतृसमुदाय मुग्ध होऊन भक्तिरसांत डुंबला. आपल्या दु:खांचा त्यांना विसर पडला. फागूची आईहि भजनांत दंग झाली व नेते जरी तुरुंगांत गेले तरी आपण आतां एकाकी किंवा असहाय नाहीं, साक्षात् भगवंताचा आपणास आसरा आहे असें लोकांना वाटलें. भजनाच्या आनंदसागरांत डुंबत असतांनाच बाबाजींनीं नवें भजन सुरू केलें.

"क्या सोया गफलतका माता, जागरे नर जाग रे।।"

श्रोतृसमुदाय हळूहळू समाधींतून जागा होऊं लागला.

"सुन लो प्यारो क्या सोया गफलतका माता जाग रे नर!"

त्यांचा पहाडी आवाज आसमंतांत दुमदुमला. त्यांची खंजिरी शंकरांच्या डमरूप्रमाणें डमडमूं लागली. लोक जागृत झाले. त्यांच्यांत चैतन्य आलें. बाबाजी म्हणूं लागले—

"ऐसी जाग न जाग पियारे, जैसी ध्रुव-प्रल्हाद रे।
ध्रुव को दीनी अटल पदवी, प्रल्हादको राज रे।"

आणि मग ते म्हणाले,

"मन है मुसाफिर, तनुका सराविच, तू कीता अनुराग रे।
रैन बसेरा, कर ले डेरा, उठ चलना परभात रे!"

त्यानंतर आनंदघनांचें एक भजन त्यांनीं भैरवींत म्हटलें–

"अब हम अमर भये न मरेंगे।"

आणि शेवटीं रामधुन म्हटली,–

"रघुपति राघव राजाराम, पतित पावन सीताराम।"

सारा श्रोतृसमुदाय रामधुन म्हणूं लागला. सतत चार तास भजन ऐकून आलेला उल्हास त्या रामधुनेंत प्रतिबिंबित झाला होता. अर्धा तास रामधुन चालूं होती. आतां लय वाढली होती. चिपळयांची छुनछुन, खंजिरीची फडफड, मृदंगाचे धिन् धिन् आणि साऱ्या श्रोतृसमुदायाच्या टाळचा यामुळें एक अद्‌भुत वातावरण निर्माण झालें. त्यावेळीं साऱ्या भौतिक जगाचा विसर पडला. फक्त बाबा मानवदासांची नेत्रोन्मीलित मूर्तीच तेवढी समोर होती. त्यांची दाढी, त्यांचे पांढुरके केस, गळ्यांतील फुलांच्या आणि रुद्राक्षांच्या माळा, त्यांचीं भगवीं वस्त्रें याखेरीज दुसरें कांहींच दिसत नव्हतें.

भजन समाप्त होतांच 'बोलो प्रभु रामचंद्र की जय ! भगवान कृष्ण की जय ! भारत माता की जय ! " अशा जयघोषांनीं सारें आकाश दुमदुमलें.

"बाबाजींचें आजचें भजन अगदीं अपूर्व होतें. आज अगदीं कृतार्थ झालों." असें सर्वांना वाटलें.

पहाटेच्या सुमारास लोक आपापल्या घरीं पोहोंचतात न पोहोंचतात तोंच पोलिसांनीं आणि लष्करानें घुघरी गांवाला गराडा घातला आणि बाबा मानवदासांना पकडून तुरुंगांत टाकलें !

## २३

बाबा मानवदासांना पकडल्यामुळें जनता प्रक्षुब्ध झाली. काल फागला मारलें, आज बाबाजींना कैद केलें. आतां न्यायनीति कांहीं उरली नाहीं. आणि हें सारें आम्ही खुशाल हातावर हात ठेवून स्वस्थ पहात बसायचें.

थू ! आमच्या जिनगानीवर ! गडयांनो, चला, आपणहि कांहीं करून दाखवूं ! " करूं किंवा मरूं " असे तेथील जनतेस वाटलें.

घुघरी गांवांतील सारे तरुण एकजात पुढें सरसावले. गांवच्या पाटलांनीं समजावण्याचा प्रयत्न केला. पुराणिकबोवांनीं जपून पाऊल उचलण्याबद्दल बजावलें. एक दोन वृद्धांनींहि उपदेश केला, " वेळ आणी-बाणीची आहे, नीट पुढचा मागचा विचार करा. "

परंतु तरुण रक्त कोणालाहि जुमानण्यास तयार नव्हतें. ' जास्तींत जास्त होणार काय ? फांशीच ना ! होऊं द्या ! केव्हांतरी मरायचंच तर देशासाठीं तरी मरूं ! " झालें ! यावर कोण काय बोलणार ?

घुघरीहून सात मैलांवर असणाऱ्या एका गांवीं त्या दिवशीं अभयकुमारचा मुक्काम होता. बाबा मानवदासांच्या कैदेमुळें लोक खवळले असल्याची बातमी त्याच्या कानीं. येतांच तो म्हणाला, " दीनबंधू चला, घुघरीला जाऊं या. "

" पण तिथें तर पोलिस अन् मिलिटरी यांचा डेरा आहे ! तुम्ही व्यर्थ पकडले जाल. उगीच वाघाच्या जबडयांत मान कशाला देतां ? तुम्हांला पकडण्यासाठीं पोलिस जंगजंग पछाडीत आहेत. "

" पण या वेळीं घुघरीच्या जनतेला आटोक्यांत ठेवणं अतिशय जरुरीचं आहे. त्यांच्या क्षोभास योग्य मार्ग मिळाला पाहिजे."

दोघे घोडयावरून तासाभरांतच घुघरीला पोहोंचले. तेथील लोक दीनबंधूला ओळखत होते. पण अभयकुमार त्यांना फक्त नांवानेंच माहीत होता.

घर सोडून पंधरा दिवस झाले. तेव्हांपासून अभयला दाढी करायला फुरसत मिळाली नव्हती. डी. आय. जी.ची व लष्करी अधिकाऱ्यांची खास तुकडी त्याला पकडण्यासाठीं नेमण्यांत आल्याचें कळतांच, दाढी वाढवण्याचा त्यानें निश्चय केला. अभयच्या मूळच्या गौरवर्ण, सुदृढ बांध्यास काळ्या दाढीमुळें शोभा आली होती.

घुघरीच्या जनतेनें मोठ्या प्रेमानें त्यांचें स्वागत केलें.

तो घुघरीला पोहोंचला, त्या पूर्वीच मानवदासाला कैद करून पोलीसांचा तांडा रवाना झाला होता. एक ठाणेदार व सर्कल इन्स्पेक्टर तेथें दौरा करण्यास आले होते. त्यांच्याबरोबर सात आठ शिपाई होते तेवढेच! घुघरीचें प्रक्षुब्ध वातावरण पाहून सर्कल इन्स्पेक्टरनें कुमक पाठवण्याबद्दल जिल्हासाहेबांना निरोप पाठवला. जिल्हासाहेबांनीं मॅजिस्ट्रेटला ताबडतोब मोटारीनें रवाना केलें. ते दोन चपराशांसह घुघरी डाकबंगल्यांत येऊन पोहोंचले व पोलिसांच्या कुमकेची मार्गप्रतीक्षा करीत बसले.

२४

घुघरीला १०-१२ प्रमुख मंडळींची गुप्त बैठक भरली. गांवाच्या प्रमुखानें विचारलें, " अभयबाबू ! यापुढें काय कारायचं तें सांगा ! तुम्ही हुकुम द्यायचाच अवकाश, कीं आगींतहि उडी टाकण्यास आम्ही मागंपुढं पाहाणार नाहीं. होय ना रे सोमा ! "

" हो तर ! आम्ही सारे तयार आहोंत. " सोमाच्या स्वरांत साऱ्यांनीं स्वर मिसळला.

" विनाकारण आगींत उडी कशाला घ्यायची ? ज्यामुळं क्रांतीचं पाऊल पुढें पडेल तेवढंच फक्त करायचं. मग आगींत उडी घ्यावी लागली तरी कच खायची नाहीं, इतकंच ! "

" नाहीं साहेब ! आम्हीच स्वत: आग शिलगावूं व तींत भस्म होऊं. सरकारनं परवां फागूला गोळी झाडली. आज बाबाजींना पकडलं. कांहीं ठिकाणीं म्हणे स्त्रियांवरहि हात टाकला तरी आम्ही बांगड्या भरून स्वस्थ बसायचं का ? "

" कुणी म्हटलं बांगड्या भरा म्हणून ? खुशाल प्रतिकार करा. सरकारची शासनव्यवस्था बंद पाडा. "

" आम्ही आज मिरवणूक काढून पोलिस ठाणं कबजांत घेऊं. जर पोलिसांनीं विरोध केला तर ठाण्याला आग लावूं."

"छे! छे! ठाण्याला कशाला आग लावायची? सरकारी कागदपत्रं फक्त नष्ट करायचीं. ठाण्याला आग लावली तर आंतील पोलिस, अधिकारी वगैरे विनाकारण भस्म होतील." अभय म्हणाला.

"होऊं द्या भस्म! आम्हांला काय त्याचं? आमचा फागू विनाकारण गोळीनं उडवला गेला तो? भजनपूजन करणाऱ्या बाबाजींना पकडण्याची काय जरूरी होती? पोलिसांवर सूड उगवल्याखेरीज आमचा जीव शांत होणार नाहीं." सोमा शिंपी म्हणाला,

"छे! छे! असली सूडाची भाषा आपणांस शोभत नाहीं. आपणांस गांधींच्या मार्गानं जायचं ना? पोलिसांवर सूड कां म्हणून? सरकारी कागदपत्रं जाळा. पोलीस व अधिकारी यांची वर्दी काढून तिला आग लावा. कारण विदेशी शासनाचीं तीं प्रतीकं आहेत. ठाण्यावर तिरंगी झेंडा फडकवा. हाच तुमचा विजय! त्यांतच सूडहि घेतल्यासारखं होईल. जनतेची सत्ता औट घटकेसाठीं कां होईना ठाण्यावर प्रस्थापित झाली की जनतेचं राज्य आलं असं समजायचं!" अभय म्हणाला. परंतु त्या लोकांना सारेंच कांहीं उमजलें नाहीं. सोमानें विचारलें, "अन् पोलिसांनीं जर प्रतिकार केला तर?"

"ते तर प्रतिकार करणारच, पण तुम्ही तशीच पुढें धडक मारून कबजा घ्यायचा, गोळीबार झाला तर तोहि सहन करायचा! तुमचीं माणसं पडतील, जखमी होतील, पण ठाण्याचा कबजा मिळतांच तें सर्व बलिदान सार्थ होईल. मिरवणूक जर शांत राहिली तर विजय मिळाल्या-खेरीज राहाणार नाहीं. एकतर पोलीसांच्या गोळ्या खतम् होतील किंवा बंदुकींवरून त्यांचे हातच निसटतील. सरकारी नोकरांत हृदय-पालट झाला तर मग इतकं मोठं राज्य चालणार कसं? गांधींच्या अहिंसक क्रांतीचा हाच हेतु आहे."

"अभयबाबू, आम्ही शक्यतों शांत राहण्याचा प्रयत्न करूंच. पण

पोलिसांनीं जर का कुरापत काढली तर मग काय होईल हें आम्ही सांगूं शकत नाहीं. जनता भडकली आहे. तिला अडवलं तरी संकट, नाहीं अडवलं तरी संकट ! "

" असं आहे तर मी तुमच्यावरोबर राहतों. तुमच्या भल्याबुऱ्यांत मी तुम्हांला साथ देईन व गांधीजींच्या शिकवणीला कलंक लागूं न देण्याची काळजी घेईन. "

" छे ! छे ! आम्ही तुम्हांला आमच्याबरोबर येऊं देणार नाहीं. घुघरीचे लोकच जें काय करायचं ते करतील. " प्रमुख म्हणाला.

" त्यांत कसला धोका आलाय् ? धोक्याच्या आयुष्याशींच तर आतां आमची गांठ आहे. सारा देशच युद्धक्षेत्र बनल्यावर कोण सुरक्षित राहणार ? सांगा पाहूं ?

" तें खरं असलं तरी तुमच्या जिवाला जर धक्का पोहोंचला तर घुघरीच्या तोंडाला काळिमा लागेल. तुम्ही सांगितलं त्याप्रमाणें वागण्याचं आम्ही आश्वासन देतों. तेव्हां तुम्हीहि आमचं म्हटलेलं ऐकलं पाहिजे. पटकन् घोड्यावर स्वार व्हा आणि परत जा. आम्ही तुमच्या-बरोबर शिधासामुग्रीची तरतूद करतों. "

" वा सोमा ! काय सोळा आणे बोललास ! " एक वयस्क गृहस्थ म्हणाले.

" तुम्ही आणि दीनबंधू येथून ताबडतोब निघा, म्हणजे आम्ही निश्चिंत होऊं. " आणि अभयनें कांहीं म्हणण्यापूर्वीच सर्व सामग्रीसह त्या दोघांना घोड्यांवर बसवून पिटाळण्यांत आलें.

## २५

घुघरी गांवाच्या इतिहासांत इतकी मोठी मिरवणूक कधीं निघाली नव्हती. बाबा मानवदासांची भक्तमंडळी अग्रभागीं होती ! स्त्रियांची संख्या पुरुषांइतकीच होती. कांहींच्या कडेवर मुलेंहि होतीं.

"आज गोळीबाराची शक्यता आहे. तुम्ही येऊं नका." म्हणून किती बजावलें पण त्यांनीं जुमानलें नाहीं.

उलट त्या म्हणाल्या, "फागू मेला तशा आम्ही मरूं. आमच्या डोक्यावर लाठ्या पडोत कीं गोळ्या झडोत, आम्ही तर येणारच. जें काय आमचं होईल तेंच आमच्या मुलाबाळांचं!" त्यांच्या या दृढ निश्चयापुढें सारे निरुत्तर झाले.

सोमा म्हणाला, "मुखियाजी, येऊं द्या त्यांना. त्या आम्हांला मातेसमान आहेत. त्यांच्यामुळें उलट आम्हांला अवसान येईल. पुरुषांनाहि त्यांच्यासमोर पळपुटेपणा करायची लाज वाटेल."

मिरवणुकीनें सकाळीं आठ वाजतांच खवळलेल्या समुद्राचें स्वरूप धारण केलें. किती तरी राष्ट्रीय निशाणें त्या मिरवणुकींत फडकत होतीं. कांहींच्या हातांत घोषवाक्याचे फलक होते. एकावर लिहिलें होतें, "सत्तावनचें काम बेचाळीसमध्यें पूर्ण करा." दुसऱ्यावर "इंग्रजांनों! भारत सोडा!" तिसऱ्यावर, "करेंगे या मरेंगे." कांहींनीं हातांत काठ्याहि घेतल्या होत्या. मुखियाजींनीं प्रतिबंध केला तर लोक म्हणाले, "बाहेर निघतांना आम्ही नेहमीच हातांत काठी घेतों. आम्हांला कुणी छेडलं नाहीं तर आम्ही कोणतेंहि अयोग्य कृत्य करणार नाहीं."

"आज आपण ठाण्यावरच हल्ला चढवणार! मग पोलिस अडवणारच!"

"त्यांनीं निमूटपणें पकडलं तर आम्ही शांत राहूं. पण जर का आमच्या बायकांवर हात टाकला तर मग आम्हीहि आपलं पाणी दाखवूं त्या बेट्या पोलिसांनाहि. या भोला पहेलवानाच्या आखाड्याचा दम एकदां बघूं द्या!" हनुमान आखाड्याचा संचालक भोला आपल्या मिशांवर ताव मारीत म्हणाला. मुखियाजींना इथेंच धोका दिसला व ते म्हणाले—"भोला ठाकुर! आजची मिरवणुक पूर्णपणें शांत राहिली पाहिजे. आम्हांला निरर्थक कुणाला मारायचं नाहीं.

प्रसंग आल्यास मरण्यासाठीं तयार रहायचंय. मग लाठी लागो कीं गोळी. आम्ही प्रत्युत्तर देणार नाहीं. गांधींच्या हुकुमाप्रमाणें–"

"गांधीजींनीं हुकुम दिला 'करा किंवा मरा'; तुम्ही खुशाल मरत बसा; आम्ही मात्र कांहीं तरी करणार!"

"करेंगे याचा अर्थ स्वातंत्र्य मिळवणार व मरेंगे म्हणजे त्या-करितां लढतां लढतां मरूं. करेंगे म्हणजे खून पाडूं असा अर्थ नव्हे!" मुखियाजी म्हणाले

"मुखियाजी, आमच्या डोक्यांत यांतलं कांहीं शिरत नाहीं बुवा! आमच्याजवळ हें लाल पत्रक आहे. यांत तर सारा कार्यक्रम स्पष्ट लिहिला आहे." असें म्हणून भोलानें आपल्याजवळचें चुरगळ-लेलें एक लाल हँडबिल काढलें. त्यांत क्रांतिकारक पक्षाचा कार्यक्रम लिहिला होता. ठाणीं जाळणें, पूल उडविणें, शस्त्रागार लुटणें, कडक ऑफिसरांना शिक्षा देणें इत्यादि गोष्टींचा उल्लेख होता.

"अरे! हें तर दुसऱ्या पक्षाचं पत्रक आहे! आपल्या पक्षाचं– गांधीजींचं मुळींच नाहीं हें!" मुखियाजी घाबरून म्हणाले.

"म्हणजे प्रत्येक पत्रकावर गांधीजींची सही राहील कीं काय? शिवाय ते बसले आहेत जेलमध्यें. ते कशी सही करणार! अन् समजा, आहे दुसऱ्या पक्षाचं पत्रक! पण तेहि हिंदुस्थानीच आहेत ना! चांगला छापील कार्यक्रम आहे. तो कसा चूक असेल?" भोलानाथ म्हणाला.

इतक्यांत सोमा मागून येऊन म्हणाला,

"मुखियाजी! जनता मागून रेटारेटी करीत आहे. तुम्ही हें चालवलं आहे काय? पुढें चला ना!"

"बोलो भारतमाताकी जय! हिंदुस्थान हमारा है, करेंगे या मरेंगे, हिंदुस्थान हमारा है! बढे चलो नवजवान! बढे चलो!" जयघोष होऊं लागले. गगनभेदी जयजयकार सर्वत्र घुमले. मिरवणुकीच्या अग्रभागीं गाणीं सुरू झालीं.

" मारने का नाम मत लो, पहले मरना सीख लो । "

भोला पहलवानाचें पथक गाऊं लागलें.

" मा ! रंग दे बसंती चोला । "

मिरवणूक ठाण्याकडे जाऊं लागली. गांवाबाहेर एका टेकाडावर ठाणें होतें. सर्व घरांतील लोकांनीं मिरवणुकींत उत्साहानें भाग घेतला होता. फागूच्या आणि मानवदासांच्या घटनेमुळें घुघरी गांवांत चैतन्य निर्माण झालें होतें. आज मशीनगन् चालली तरी हंसत हंसत प्राणहि देण्यास सारे तयार होते. 'भाग्यरेखा कुणी मिटवूं शकत नाहीं. शेवटीं व्हायचें असेल तेंच होणार ' अशा वृत्तीनें सारे आले होते.

यावेळीं ठाणेदार गुलाबराव होते. एक वर्षापासून त्यांच्याकडे त्या ठाण्याचें काम होतें. त्यामुळें गांवातील खडान् खडा माहिती त्यांना होती. त्यांची पत्नि जानकीबाई देवीची भक्त होती. पूजेअर्चेंत तिचा अर्धाअधिक वेळ जाई. ठाणेदारसाहेबांची परवानगी नसूनहि आदल्या दिवशीं रात्रीं जमादार रामप्रसादच्या बायकोबरोबर ती भजनाला गेली होती. अंधार असल्यामुळें कुणाच्या तें लक्षांत आलें नाहीं. मानवदासांना पकडल्याबद्दल तिलाहि दुःख झालें होतें. परंतु याला आपला पति जबाबदार नाहीं हें तिला पूर्ण ठाऊक होतें. जानकीबाईच्या प्रभावामुळें गुलाबरावांत थोडें फार मार्दव आलें होतें. शक्यतोंवर ' दादा बाबा " म्हणून तो आपलीं कामें करी, म्हणून लोक त्याचें ऐकत.

परंतु त्या ठाण्याचे जे सर्कल इन्स्पेक्टर होते ते अगदींच भिन्न प्रकृतीचे होते. त्यांचें नांव होतें बाबूराम ! पण आपल्या हाताखालच्या शिपायांकडून लाला बाबूरामसाहेब म्हणवून घेण्यांत त्यांना भूषण वाटे. कांहींना तें जमे, तर कांहींना तें जमत नसे. या बद्दल उठतांबसतां शिपायांना त्यांच्या शिव्या खाव्या लागत. कांहीं लोक त्यांची खुशामत करण्याकरतां म्हणत ' डिप्टीसाहेब. ' हें ऐकून ते खुश होत व म्हणत, " अरे बाबा, अजून डिप्टीसाहेब कुठे बनलोय् ! जर का मी ही चळवळ

समूळ दडपून टाकली तर मात्र त्यानंतर माझी डिप्टीगिरी निश्चित! स्वत: डी. आय. जी. साहेबांनीं मला तसं आश्वासन दिलं, म्हणून तर या जंगली मुलुखांत तडफडलों येऊन."

लाला बाबूराम चांगले धष्टपुष्ट होते. रंग अगदीं कुळकुळीत शाळिग्रामासारखा! तोंडांत नेहमीं पानांचा तोबरा! त्यामुळें दांतहि काळे झाले होते. मिशा भरदार असून त्यांना सदान् कदा पीळ भरीत. मुर्गी, बकरा याखेरीज त्यांना जेवण हजम होत नसे. रात्रीं पिऊन झिंगत. आठवडयांतून एकदां तरी बायकोला बडवीत. मारल्यानंतर ती रडली कीं वरून आणखी झोडपीत. त्यांना आठ वर्षांचा एक मुलगा व बारा वर्षांची मुलगी होती. पण तरी बायकोला बडवण्याच्या नित्यक्रमांत मात्र कधीं खंड पडला नाहीं. लाथाबुक्क्यांबरोबरच हंटर, बूट यांचाहि कधीं कधीं प्रयोग होई. एखादवेळीं गोळीनें उडविण्याचीहि धमकी देण्यांत येत असे. याचा मुलाबाळांवर काय परिणाम होईल असा विचारमात्र त्यांना शिवला नाहीं. त्यांच्या बुटाची चाहूल लागतांच मुलें घाबरून खोलींत दडत व झोपेचें सोंग करीत. बिचाऱ्यांची झोंपहि इतकी गाढ असे कीं शेजारच्या खोलींत कांहींही रणधुमाळी माजो, झोप उघडण्याचें नांव नाहीं!

बायको-मुलांना आपल्या डोळ्याला डोळा भिडवण्याचीहि हिंमत नाहीं या गोष्टीचें लालाजींना मोठें भूषण वाटे. "शिस्त म्हणतात ती ही," असें म्हणून ते मोठ्या दिमाखानें आपल्या मिशांना पीळ भरूं लागत. चुकूनमाकून कधीं काळीं बायकोस धर्मपत्नि म्हणून संबोधत इतकेंच काय तें! नेहमीं दीर्घ मुदतीचे दौरे करावे लागत, त्यामुळें दुसरे रंगढंगहि चालत. त्यांच्या हाताखालचे ठाणेदार, जमादार त्यांना पूर्णपणें ओळखून होते. दौऱ्यावर ते त्यांचा पुरा इंतजाम करीत. कशानें कां होईना, सर्कलसाहेब 'एकदां खुश होवोत म्हणजे मिळविली. साहेबांना पगार किती कां असेना, परंतु त्यांना चणचण भासतांना कधीं दिसली नाहीं. सिव्हिल सर्जन व डॉक्टर जर प्रायव्हेट प्रॅक्टिस करूं शकतात,

तर पोलीसवाल्यांनींच काय घोडं मारलंय ? त्यांच्या या सवालाला कोणी जवाब देऊं शकत नसे. तो जवाब मिळाल्यास मी प्रायव्हेट प्रॅक्टिस सोडून देईन असें ते म्हणत. परंतु तो जवाब कधीं मिळाला नाहीं व प्रॅक्टिस सुटली नाहीं. न्यायाबद्दल म्हणाल तर वायकोच्या पाठीवरील काठीचे वळ झांकण्यास रेशीम आणि सॅटिनखेरीज दुसरी गोष्ट नसे. दागिनेसुद्धां भारी असत. समजा, जर का भाग्यचक्र पालटलें तर त्याखेरीज दुसऱ्या कशावर विसंवणार ? म्हणून विचारे जिवापाड मेहनत करून या गोष्टींचा संग्रह करीत. त्यांच्या हातांखालील दरोगा, मुनशी किंवा शिपाई त्यांना कर्दनकाळ समजत. परंतु ज्यांना त्यांची नाडीपरीक्षा होती, ते त्यांना शेपूट घातलेल्या कुत्र्यासारखे नाचवीत. त्यांचा दौरा निघाला म्हणजे एखाद्या बडया मालगुजाराकडे खुनाच्या चौकशीच्या निमित्तानें ते तळ ठोकीत. अनायासें मुरगी, अंडयापासून पलंग-मच्छरदाणीपर्यंत सारी सोय होई. निरोप घेतांना एखादी अंगठी किंवा सोन्याची सांखळी भेटीदाखल मिळे ती वेगळीच ! वरिष्ठहि त्याच्यावर खुष होते. कठोरपणा आणि क्रूरपणा अवश्य असलेलीं विकट कामें त्यांच्यावरच सोपविण्यांत येत. कारण तीं हटकून फत्ते होत. त्या दिवसांत पोलिसखात्यांत लाल बाबूरामचा बोलबाला झाल्यास नवल तें कसलें ?

घुघरी ठाण्याची विस्कटलेली घडी नीट बसविण्यासाठीं लालाजींची तेथें नियुक्ति करण्यांत आली होती. चार दिवसांपासून त्यांचा तेथें तळ होता. आमगांवांतील गोळीबार, बावाजींची धरपकड या प्रकरणांत त्यांचीच कार्यकुशलता कामीं आली होती. शासनाच्याविरुद्ध बंड पुकारणाऱ्या घुघरी गावांस कायमचा धडा शिकवण्याचा त्यांनीं चंग बांधला होता. हें काम फत्ते झालें कीं मग डिप्टीसाहेबी मिळण्यांत कसला उशीर ?

## २६

पोलीस ठाणें जसजसें जवळ येऊं लागलें, तसतसा लोकांचा उत्साह वाढूं लागला. जयघोष जोराजोरानें होऊं लागले. राष्ट्रगीतांत उत्कट

भावना व्यक्त होऊं लागली. जनसमुदायाच्या आवेशास भरती आली. ठाण्याहून दहा यार्डांवर एक शाळा होती. तेथें रामनाथ मुखियाजींची पत्नि रामेश्वरीदेवी हातांत कुरवंडीचें तबक घेऊन सामोरी आली. मिरवणुकीचे प्रमुख तेथें येऊन पोहोंचतांच तिनें त्यांना कुरवंडी केली. रामनाथजी, भजनसमाजाचे सेक्रेटरी रामदास, व मुलींच्या शाळेची अध्यापिका सरस्वतीबाई या साऱ्यांना तिनें हार घातले व कुंकुमतिलक लावून प्रत्येकाला ओवाळलें व तबक बाजूला ठेवून साऱ्या मिरवणुकीला तिनें साष्टांग नमस्कार केला. रामेश्वरीदेवीसारख्या प्रतिष्ठित महिलेनें जमिनीवर साष्टांग नमस्कार करतांच साऱ्या जनसमुदायांच्या भावना उचंबळल्या व प्रचंड जयघोष सुरू झाले. जणू कांहीं कुरुक्षेत्रांतील पांचजन्यच! त्या गगनभेदी जयजयकारांनीं आकाश कोसळेलसें वाटूं लागलें. "करेंगे या मरेंगे" करेंगे या मरेंगे" "महात्मा गांधी की जय!" काय ती धक्काबुक्की! रेटारेटी! त्या अफाट जनसमुदायांत कोणती शक्ति संचरली होती, कोण जाणें! ती खेडुत जनता कालपर्यंत इतकी निमूट होती कीं जणूं कांहीं गायच! त्यांनीं कधीं हूं की चूं केलें नाहीं. त्यांचें रक्त इतकें गारठलें होतें कीं उसळायचें नांवच नको. हीं जिवंत माणसें आहेत कीं निर्जीव पुतळे, हेंच ओळखणें कठिण! परंतु त्या दगडी पुतळ्यांत आज कोठून चेतना आली होती कुणास ठाऊक? त्यांच्यापैकीं मोजक्या व्यक्तींखेरीज कोणीही गांधीजींना पाहिलें नव्हतें, तरी साऱ्याचीं अंतःकरणें गांधीमय बनलीं होतीं. कालचा प्रशांत सागर आज तळापासून खवळला होता. कालच्या सौम्य मानवानें आज शंकराचें रौद्ररूप धारण केलें होतें. कालचा सुप्त ज्वालामुखी आज जागृत झाला होता. मानवाचें इतकें क्रांतिकारी परिवर्तनम्हणजे अगम्य आणि गूढच नाहीं काय?

## २७

जनतेचा हा नूर पाहून ठाणेदार गुलाबराव हतबुद्ध झाला. सर्कल इन्स्पेक्टर बाबूरामहि गर्भगळित झाले. परंतु अशा प्रसंगीं कडकपणा व

दहशत यांनींच काम होतें असा त्यांचा विश्वास होता. वोलून चालून हिंदी माणसें ! यांच्यांत विरोध करण्याची ताकद ती काय असणार ? यांची हिंमत म्हणजे पाण्याचे बुडबुडे ! जरा हवा आली कीं क्षणांत निकाल ! चाळीस कोटि लोकांवर लाख दीड लाख परकीय खुशाल राज्य करतात ते उगीच का ? त्यांच्यासमोर हिंदी लोक म्हणजे नामर्द ! भ्याड ! शुद्ध मेंढरें ! जरा भीति दाखवा कीं सुटले पळत जीव घेऊन ! अशा लोकांच्या मिरवणुकीची विल्हेवाट लावायला कितीसा अवधि लागणार ? त्यांनीं आपल्या पँटमधलें भरलेलें पिस्तूल चांचपून पहिलें.

पोलीसांची कुमक अजून आली नव्हती, एवढीच लालाजींना रुखरुख होती. त्यांचे डोळे कुमकेच्या वाटेकडे लागले होते. गुलाबरावांनीं सर्कल-साहेबांना सल्ला दिला, " घुघुरीची जनता मुळांत शांत आहे. गोडी-गुलाबीनें घेतल्यास विशेष नुकसान ते करणार नाहींत. त्यांना जास्त न भडकावतां काय पाहिजे हें शांतपणें अगोदर विचारावं. "

" पण हें विचारणार कोण ? " सर्कलसाहेबांनीं विचारलें.

" मी जातों अन् त्यांच्या प्रमुखाशीं बोलणं करतों. " ठाणेदार म्हणाला.

" पण यांत पोलिसांचा कमकुवतपणा दिसेल व ते जास्तच शिरजोर होतील. " लाला बाबूराम म्हणाले.

" तसं नव्हे साहेब. मी या लोकांना जाणतों. आंजारून गोंजारून यांच्याकडून वाटेल तें करवून घ्यावं. परंतु जरा वांकडेपणा दाखवा कीं मग हे कुणाच्याहि देवाला बधत नाहींत. वेळ बिकट आहे. जरा जपून घ्यायला हवं. "

" त्यांना हवं तरी काय ? शिवाय येऊन जाऊन ते करणार तरी काय ? "

" माझ्याजवळ गुप्त पोलिसांचा रिपोर्ट आला आहे. सरकारी कागदपत्रं आणि आपली वर्दी जाळून त्यांना आपला झेंडा ठाण्यावर

लावायचा आहे."

"परंतु आपण इथें असतांना, आपल्या डोळ्यादेखत हें कसं घडूं द्यायचं?"

"साहेब, कसंतरी निभावून नेण्याची ही वेळ आहे. आपल्याजवळ सध्यां कोणतेहि महत्त्वाचे कागद नाहींत. एकदोन चौकशीचे काय ते मामले आहेत. तीनचार प्राथमिक रिपोर्ट आहेत, हजिरी रजिस्टर, रवानगी रजिस्टर हीं जळालीं तर कांहीं अडत नाहीं. अन् आपली एक वर्दी जळली तर दुसरी केव्हांहि मिळूं शकते. त्यापासून फारसं नुकसान होणार नाहीं. समजा, त्यांनीं क्षणभर आपला झेंडा चढवला, तरी पोलिसांची कुमक येतांच, पुन्हां सरकारी झेंडा चढवून देऊं. औट घटकांचाच तर प्रश्न! वादळ जसं उठलं तसं शमेलहि!"

"काय वाहियांत गोष्टी करतां ठाणेदारसाहेब! तुम्ही पोलिस अधिकारी आहांत कीं अबकारी खात्याचे? म्हणे कागद जळूंद्या, वर्दी जळूंद्या. झेंडा चढूंद्या! डी. आय. जी. आपणांस फाडून खाईल. तुम्हांला कांहीं समजतं कीं नाहीं? डी. आय. जी. म्हणजे नांवाप्रमाणें टायगर आहे टायगर! यावेळीं जो कमकुवतपणा दाखवील त्याची रेवडीच उडेल. शिवाय हे मिरवणूकवाले असं करणार तरी काय? चार दोन गोळ्या झाडायचाच अवकाश कीं पळतां भुई थोडी होईल त्यांची. छट्! म्हणे कागदपत्रं जाळूं द्या! वर्दी जाळूं द्या! भलतंच!"

पण आपल्याजवळ काडतुसं तरी किती आहेत? तुमचं अन् माझं पिस्तुल भरलेलं आहे. एखाद् दुसरं आणखी असेल हें खरं, परंतु फायर केल्यानंतर जर का लोक बिथरले, तर काडतुसं भरण्यास तरी आपल्याला वेळ मिळेल का?"

"पण तुमच्याजवळ इतकींच काडतुसं कशीं? आणखी असतील ना?"

"आहेत; पण तो एक बेल्ट घरीं आहे."

"मग तेंहि मागवून घ्या. एकदोनदां फायर केले कीं मिरवणूक अस्ताव्यस्त होऊन सैरावैरा पळत सुटेल. दुसऱ्यांदा काडतुसं भरण्याची वेळ येतेच कशाला? हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत आणि गेल्या आंदोलनांत अशा प्रकारच्या कितीतरी प्रसंगांना मी तोंड दिलें आहे. माझ्या जागीं आणखी कुणी असत, तर आतांपर्यंत खुशाल डी. एस. पी.हि बनता."

"साहेब! अशा रीतीनं वागल्यास धोका आहे. हें माझं निर्वाणीचं सांगणं आहे. आपली येथून सुरक्षितपणें सुटका करणं हें माझं कर्तव्य आहे. इतक्यावर आपण जसा हुकुम द्याल–"

"अहो! कसला धोका नि कसलं काय? कांहीं मिनिटांतच मी परिस्थिति आटोक्यांत आणतों. मॅजिस्ट्रेटसाहेबांना येण्यासंबंधीं निरोप मात्र पाठवा."

"तो केव्हांच पाठवला. परंतु डाक बंगला नाल्याच्या पलीकडच्या बाजूला असून नाला काठोकांठ भरला आहे; त्यामुळं त्यांना यायला वेळ लागेल. अन् इकडे मिरवणूक तर फाटकापर्यंत येऊनहि थडकली."

जयघोषांच्या स्वरांत आतां इतर कांहीं ऐकूं येणें दुरापास्तच होतें. ठाण्याच्या सभोंवतालीं चोहोंकडे मिरवणूक पांगली.

आतां या घोषणा चालू होत्या–

"जेलके फाटक तोड दो हमारे नेता छोड दो–"

आणि नंतर

"थानेका फाटक तोड दो, सरकारी कागज़ जला दो."

बस आतां हेंच त्यांच्या मोर्च्याचें लक्ष्य! "थानेका फाटक तोड दो, सरकारी कागज़ जला दो" या घोषणा सुरूं असतांच लाला बाबूराम गर्जून म्हणाले, "खबरदार जर का फाटकाच्या आंत पाऊल टाकलंत तर–गोळीच झाडीन!"

लाला बाबूरामचा आवाज मांसाहारावर पुष्ट झालेला होता. तो सर्वत्र असा दणाणला कीं कांहीं क्षणांकरतां खरोखरीच शांतता पसरली. परंतु रामनाथ मुखियाजी व सोमा दर्जी यांनीं हातांतील झेंडे उंच सरसावून मोठ्यांदा पुन्हां गर्जना केली—"थानेका फाटक तोड दो, सरकारी कागज़ जला दो." मिरवणुकीनें घसा खरवडून गर्जना करायला सुरुवात केली. आणि भोला पहेलवानाच्या आखाड्याच्या लोकांनीं मिरवणुकीला मागून इतक्या जोरानें पुढें रेटलें कीं फाटक खरोखरीच कोलमडलें. आणि ही धक्काबुक्की चालू असतांना गर्दी ठाण्याच्या आवारांत शिरली. फाटक तोडतांच मिरवणुकीनें विजयी स्वरांत पुन्हां जयघोष केला— "थानेके फाटक टूट गये, थानेके फाटक टूट गये"!

जमावाची ही आक्रमक प्रवृत्ति पाहून सर्कलसाहेबांनीं पिस्तूल काढून जमावावर बार सोडले. थाड् थाड्! एक गोळी रामदासाच्या मांडीला लागली. दुसरी सरस्वतीबाईच्या पोटाला! दोघेंहि धाडकन् जमिनीवर कोसळलीं. रामदास बेशुद्ध झाला व "हाय रे राम" म्हणून सरस्वती-बाई क्षणांत गतप्राण झाली!

या घटनेमुळें जमावाच्या एका बाजूंत घबराट निर्माण होऊन पळण्यास सुरुवात झाली. तेव्हां स्त्रियांनीं त्यांची सपाटून निर्भर्त्सना केली. "कुठें चाललांत! एक अबला गोळी लागून मृत्युमुखीं पडली नि तुम्ही भागूबाईप्रमाणें पळ काढतां? नामर्द कुठले!" पळणाऱ्यांचीं पावलें जागच्या जागीं थांबलीं व ते पुन्हा ठाण्याकडे निघाले. सर्कलसाहेबांनीं हुकुम दिला—"पाहतां काय ठाणेदारसाहेब? फायर करा. नाहींतर माझ्या हातीं पिस्तूल द्या. तुम्ही फक्त भरण्याचं काम करा." गुलाब-रावांनीं ताबडतोब आपलें पिस्तूल त्यांच्या हवालीं केलें व ते पिस्तूल भरण्याचें काम करूं लागले. सर्कलसाहेबांनीं पुन्हां दोनदां पिस्तूल

झाडलें. थाड् थाड् ! पुन्हां दोन प्रेतें पडलीं. लाला बाबूरामचा नेम अचूक होता. केवळ भीति दाखवण्यसाठीं नव्हे तर जीव घेण्यासाठीं ते फायर करीत होते.

एक गोळी भोलानाथांच्या अंगाजवळून निसटून आखाडचाच्या एका स्वयंसेवकाच्या खांद्याला लागली. तो खालीं कोसळला. सर्कल-साहेबांचें पिस्तूल रिकामें झालेलें दिसतांच भोलानाथानें वाघाप्रमाणें झडप घालून बाबूरामाच्या गळ्यावर झेप घेतली व इतक्या जोरानें गळा दाबला कीं त्याला घरघरच लागली. हें पाहून दलांतील इतर लोकहि पुढें सरसावले व गुलाबरावाच्या हातून त्यांनी पिस्तूल हिसकलें. सारीं काडतुसें जमिनीवर सांडलीं तीं एका माणसानें हस्तगत केलीं. इतकें झालें तरी सर्कलसाहेब घसा खरवडून सांगतच होते—

"ठाणेदारसाहेब, धरून लवकर काडतुसं मागवा. फायर करा. माझे प्राण चालले. ..."

गुलाबरावांनीं जवळच क्वार्टरमध्यें जवानाला पाठविलें. परंतु तो जो गेला तो गेलाच. त्याला कांहीं काडतुसें मिळालीं नाहींत. मिळणार कशीं ! जानकीबाईनें केव्हांच तीं विहिरींत फेकून दिलीं होतीं ! तो शिपाई घाबरल्यामुळें थरथर कांपू लागला.

जेव्हां भोलानाथला कळलें कीं ठाण्यांत काडतुसें नाहींत, पिस्तुलें बेकाम झालीं तेव्हां काय विचारतां ? त्यानें त्य। जमावाला हुकूम दिला,

"पाहतां काय ? ठाण्यावर कबजा मिळवा. यांच्या गोळ्या खतम् झाल्या !"

इतकें म्हणायचा अवकाश, तोंच जनतेनें ठाण्यावर धावा पुकारला.

गुलाबरावांना वर्दी मागण्यांत आली. त्यांनीं ती निमूटपणें काढून दिली. दोनतीन शिपायांनींहि मुकाटचानें दिली. परंतु लाला बाबूराम व जमादार मुन्नूखानें प्रतिकार केला. त्यांच्यांत आणि भोलानाथाच्या माणसांत गुद्दागुद्दी सुरू झाली. भोलानाथनें हुकुम दिला कीं, "यांना

खांबाला बांधून टाका.' त्याप्रमाणें दोघांना वेगवेगळ्या खांबांना बांधण्यांत आलें. हवालतींतील सारीं कागदपत्रें गोळा करण्यांत आलीं. टेबल, खुर्ची, तुटकें फाटक व भोंवतालचीं लाकडें जमवून एक मोठी होळी तयार करण्यांत आली. रॉकेलचे डबे आणून, सगळीकडे रॉकेल फासण्यांत आलें. रामनाथ व सोमा यांनीं किती नाहीं म्हटलें. पण त्यांना कोणीं जुमानलें नाहीं. भोलानाथ आणि त्यांच्या आखाड्याच्या माणसांकडे आतां नेतृत्व गेलें होतें. पाहतां पाहतां ठाण्याला आग लागली व तिच्या ज्वाला अस्मानाला जाऊन भिडल्या.

त्यांतच लाला बाबूराम व जमादार मुन्शी मन्नूखां यांचीहि होळी झाली. पोलिसांनीं तिघांचा जीव घेतला, जनतेनें त्याचा सूड म्हणून इंग्रजी शासनाच्या दोन अधिकाऱ्यांना जिवंत जाळलें ! त्यांना कोणी आटोक्यांत ठेवणारें असतें तरी ते कुणालाहि जुमानण्यास तयार नव्हते. पोलिस आणि जनता दोन्ही नियतीच्या हातचें बाहुलें बनून त्यांचा भीषण खेळ सुरू होता. कोणाचाच स्वत:वर तावा नव्हता. कुठल्या तरी अनियंत्रित व उद्दाम भावना उफाळून येऊन ते मन मानेल तें करीत होते. त्यावेळीं त्याचा अर्थ, प्रयोजन कुणासहि आकलन होत नव्हतें.

घुघरी ठाण्याची ती छोटीशी इमारत धाड्धाड् जळूं लागली. ज्यांनीं इंग्रजी नमक खाऊन पोटासाठीं कोणतेंहि दुष्कृत्य करण्याचें शिल्लक ठेवलें नाहीं असे दोन अघोरी मानवी जीवही तींत जळत होते !

घुघरी ठाण्याचें अग्निकांड व सर्कल इन्स्पेक्टर व जमादार यांना जिवंत जाळण्याच्या घटनेनें राजधानी पुरी हादरली. चीफ सेक्रेटरी, आय. जी. पी. आणि एक दोन वरिष्ठ अधिकाऱ्यांची गव्हर्नमेंट हाऊसमध्यें बैठक झाली. फक्त एकच हिंदी अधिकारी त्यांच्यांत होता. बाकी सारे इंग्रज होते. त्या बैठकींत या घटनेचा उहापोह होऊन सविस्तर चर्चा झाली. तींत अंतर्भूत असलेल्या राजनीतीच्या बाजूचाहि गंभीरपणें विचार

झाला व घुघरी म्हणजे ब्रिटिश शासनास प्रत्यक्ष आव्हान आहे, असें सर्वांचें मत झालें. ऑगस्ट क्रांतीच्या चळवळींत भारतीय अधिकाऱ्यांच्या निष्ठेबद्दल सर्वत्र संशयास्पद वातावरणच होतें. कारण प्रत्येकाच्या जवळच्या किंवा दूरच्या नातलगाचा आंदोलनाशीं संबंध होता. गांधीजींचा प्रभाव घरोघरीं दिसत होता. सरकारी अधिकाऱ्यांच्या बायकाहि गांधीजींच्या फोटोची पूजा करतात, असें गुप्त पोलिसांचा रिपोर्ट सांगत होता. तिकडे इंग्लंडमध्यें तुमुल युद्ध सुरू असून, इंग्लंडवर बॉंबगोळ्यांचा वर्षाव चालू आहे. इंग्रज अधिकाऱ्यांचे नातलग गोतलग सारे लढाईंत खपत होते याचें त्यांच्या मनावर जबरदस्त दडपण होतें. त्या अशा वेळीं शासनाबद्दल दरारा व धाक जनमनांत कायम ठेवण्याची विशेष आवश्यकता होती. या आंदोलनांत त्यांचीहि बाबूरामसारखी गत होऊं शकते अशी दहशत बसवल्याखेरीज ब्रिटिश शासन टिकणें कसें शक्य होतें ? छे ! कांहीं झालें तरी घुघरीचा सूड कडकपणें घेतला पाहिजे. घुघरीचे पुरें कंबरडें मोडल्याखेरीज इतरांना धडा मिळणार नाहीं. यापुढें घुघरीची पुनरावृत्ति पुन्हां होऊं न दिली पाहिजे. कारण तो सरकारच्या इभ्रतीचा आणि प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. म्हणून त्या सभेंत कांहीं महत्त्वाचे निर्णय घेण्यांत येऊन त्यांचा तावडतोब अंमल करण्याचा हुकुम देण्यांत आला.

लाला बाबूरामच्या विधवेस पांच हजारांचें इनाम आणि मुन्नुखांच्या बायकोस दोन हजार इनाम प्रत्यक्ष डी. आय. जी. टायगर यांच्या हस्तें दिलें जावें असें ठरलें.

घुघरीच्या अग्निकांडाच्या थोड्या वेळापूर्वीच अभयकुमार नांवाचा एक तरुण तेथें हजर असल्याचें पोलिस रिपोर्टावरून कळलें. मुंबईहून त्यानेंच पत्रकें आणलीं होतीं आणि आजपर्यंत पोलिसांच्या हातीं तो तुरी देत होता. त्याला तावडतोब पकडण्यांत यावें व त्याच्या फोटोचे पोस्टर्स ( भित्तिपत्रकें ) ठिकठिकाणीं लावण्यांत येऊन जो

त्याला जिवंत किंवा मृत पकडून आणणाऱ्यास दहा हजारांचें रोख इनाम जाहीर करण्यांत यावें. घुघरीच्या भोळसट आणि खेडवळ जनतेस खुनासाठीं प्रवृत्त केल्यामुळे पर्यायानें खुनाचा आरोपहि त्यांच्या-वर येऊं शकतो असें ठरलें. या खेरीज घुघरीच्या जनतेला कायमचा धडा शिकवण्यासाठीं मॅजिस्ट्रेट व डी. आय. जी. यांच्यासह मिलिटरीची एक तुकडी घुघरीला पाठवण्यांत आली.

घुघरीकांडानें प्रांतीय शासनाच्या सत्तेच्या केंद्रास जणूं कांहीं सुरुंगच लागला. खुनाचा जबाब खुनानें, आगीचें प्रत्युत्तर आगीनें, व्यक्तिगत हिंसेचा जबाब शासनाच्या संघटित हिंसेनें देण्याची परंपराच इंग्रजी राज्यांत नेहमीं अबाधित राहिली. १८५७ मध्यें घडलें तें १९५७ मध्येंहि कां घडूं नये ?

मिलिटरी घुघरीला पोहोंचली त्यावेळीं तेथें सर्वत्र शांत होतें. सकाळच्या अग्निकांडानंतर तेथील शाळा, बाजारहाट सर्व ओस पडले होते. सरस्वतीबाई आणि इतर दोघा तरुणांचा अंत्यविधि उरकून सारे आपा-पल्या घरीं स्वस्थपणें बसले होते. सारें गांव जणूं कांहीं सुतक पाळीत होतें. माणसेंच काय, सारे पशूपक्षीहि शोकसागरांत बुडाले होते. सकाळीं अग्निसंस्काराच्या वेळीं वाहणारें वारेंहि आतां बंद होतें. साऱ्या गावांत भयानक स्मशानशांति पसरली होती. चौकांत हनुमानमंदिराजवळ असलेला पिंपळाचा वृक्षहि निस्तब्ध, मौन उभा होता. त्याचें पानहि हालत नव्हतें. रामनाथ, सोमा दर्जी व भोलानाथ पहेलवान यांच्यावर खुनाचा आरोप येऊं शकतो म्हणून पोलिस येण्यापूर्वींच त्यांनीं जंगलांत पळून जावें असें लोक कुजबुजूं लागले. सरकार आतां क्रूरपणानें सूड उगवणार, त्यापासून वांचणें कठिण, असें सारे म्हणूं लागले. परंतु प्रमुखांना ही गोष्ट रुचली नाहीं. ते म्हणाले, " भित्र्या भागूबाईप्रमाणें आम्ही कां पळ काढावा ? जें केलें आहे तें खुशाल कबूल करूं. त्यासाठीं जी काय सजा होईल ती आनंदानें भोगूं. आम्ही जें योग्य किंवा अयोग्य केलें

तें सारें देशासाठीं केलें. देशासाठीं मरण्याचा जर प्रसंग आला तर तो चुकविण्यासाठीं तोंड कां लपवायचं? जें काय व्हायचं असेल तें खुशाल होऊं द्या" !

घुघरीला पोहोंचतांच अर्ध्या तासांत लष्करानें चोहोंबाजूंनीं वेढा दिला. गांवाचे सर्व रस्ते रोखले. ठाण्याजवळ एक मोठा तंबू लावून तेथें डी. आय. जी. साहेबांनीं आपला तळ ठोकला. लष्करी शिपायांना गांवांत पाठवलें. हातांत बंदुकी घेऊन ते घरोघरीं शिरले आणि घरांतील पुरुषांना त्यांनीं पकडलें. कोणी प्रतिकार केला, कीं ते खुशाल संगीन खुपसत. स्वयंपाकघर असो कीं देवघर असो, आपल्या जंगी बुटांसह ते कोठेंहि खुशाल शिरत. प्रत्येक खोलीची झडती घेत. पेटचा, मातीचे रांजण, खळा, सगळ्या ठिकाणांची झडती घेतली गेली. किती द्रव्य, किती दागिने गेले, याची गणती नाहीं. तोंडानें शिवीगाळहि चालू असे. बायकांनाहि ते अभद्र शब्द म्हणत. त्यामुळें तरुणांचें रक्त उसळे. भोलानाथाला शेवटीं राहवेना. तो म्हणाला, "एSSS शिपुडर्या! तोंड सांभाळून बोल. जास्तींत जास्त काय तूं फांसावरच लटकवशील ना! पण त्याच्या आधीं तुझी विल्हेवाट लावली नाहीं तर मी बजरंगबलीचा चेलाच नाहीं. समजलास!"

शिपाई जरासा वरमला. पण चार साथीदारांना बोलावून त्यानें भोलानाथाला गराडा घातला. त्याच्या हातापायांत हातकड्या व बेड्या घातल्या. चालतांना तो अडखळूं लागला, तर मागून बुटांच्या ठोकरा मारीत ते त्याला फरफटूं लागले. या अपमानानें भोलानाथाच्या डोळ्यांत खून चढला. परंतु पाशवी बळासमोर कुणाचें काय चालणार?

सोळापासून चाळीस वर्षांपर्यंतचे सारे पुरुष पकडले गेले. त्यांची संख्या १९२ भरली. सर्वांना कांजी हाऊसमध्यें बंद करण्यांत येऊन भोंवतालीं लष्कराचा पहारा बसला. संशयास्पद म्हणून पकडलेलीं सारीं माणसें जेव्हां कांजी हाऊसमध्यें जमलीं तेव्हां दोनदोन माणसांची रांग करण्यांत

आली. दोन्हीकडे असलेल्या सशस्त्र पोलिसांच्या समवेत त्यांना बाहेर नेण्यांत आलें. माती खणणें, विटा तयार करणें या कामापासून ठाण्याची पूर्ण इमारत बनवण्यापर्यंतचीं कामें त्यांना देण्यांत आलीं. ज्यांनीं तें ठाणें जाळलें त्यांच्याचकडून पुन्हा तें बांधण्यांत आलें. त्या कामांत जर का कुणी कुचराई केली तर वरून बुटांचे लत्ताप्रहार होतच होते! एका हातानें डोळे पुसत, दुसऱ्या हातानें लोकांचें काम चालू होतें. चटणी-भाकर खाण्यासाठीं एकादा तास विश्रांति मिळे तेवढीच काय ती ! एरव्ही त्यांच्या कामांत खंड नव्हता. गांवांतील दुकानें आणि खळे जप्त करण्यांत येऊन मगच त्या चटणी-भाकरीची सोय झाली होती. अशा प्रकारें तीन दिवसांतच ती इमारत पुन्हा उभी झाली. त्यानंतर गांवांतल्या साऱ्या बायका व उरलेल्या पुरुषांची एक मिरवणूक सशस्त्र पहाऱ्यांत काढण्यांत आली. पहिल्या ओळींतल्या पुरुषांच्या हातीं यूनियन जॅक देण्यांत आलें. ती मिरवणूक इतकी शांत व मूक होती कीं जणूं काय लोकांचे मुडदे चालले होते. फक्त शिपा-यांच्या बुटांचाच काय तो आवाज ! मधून मधून त्यांच्या संगिनी परस्परांस टकरावल्यास त्यांचाहि झणत्कार !

मिरवणुकींत बहुसंख्य स्त्रिया होत्या. त्यांचे चेहरे उदास होते. मन खिन्न झालें होतें. केवळ यंत्रवत् हालचाल तेवढीच उरली होती.

मिरवणूक जेव्हां ठाण्यावर पोहोंचली तेव्हा कांजी हाऊसचें फाटक उघडून आंतील माणसें त्या मिरवणुकींत सामील करण्यांत आलीं.

तीन दिवसांच्या अविश्रांत श्रमानें अस्थिपंजर झालेल्या मुखिया रामनाथाला एका पोलिस ऑफिसरनें दरडावून बोलावलें. रामनाथ इतका निस्तेज व फिक्कट झाला होता कीं त्याच्या अंगांतून रक्ताचा थेंब काढ-ण्यासहि एका इंचाची खोल जखम करावी लागली असती. त्याची ती अवस्था पाहून त्याची पत्नी रामेश्वरी हुंदके देऊन रडूं लागली. तें पाहून इतरहि बायका रडूं लागल्या.

डी. आय. जी. साहेबांनीं जवळच्या हिंदी ऑफिसरास खुणावलें.

त्यानें रामनाथला विचारलें " काय तूंच रामनाथ ना ? "

" होय. "

" त्या दिवशीं मिरवणुकीचा पुढारी तूंच होतास ना ? "

" होय. "

" ठाण्यावर तिरंगी झेंडा तूंच चढवलास ना ?"

" होय ".

" मग हा घे सरकारी झेंडा आणि तूंच आपल्या हातांनीं तो वर चढव. "

रामनाथ अडखळला. त्याचा हात पुढें होईना. परंतु इतक्या जोरानें त्याच्या थोबाडींत बसली की त्याला घेरीच आली. मोठ्या प्रयासानें तो सांवरला.

" झेंडा पकडतोस कीं नाहीं ? उशीर केलास तर खबरदार –" ऑफिसर गरजला.

रामनाथ एकदम सुन्न झाला. आपण काय करीत आहोंत याचेंहि भान हरपलें. झेंड्याची दोरी कशी बशी तो पकडून होता. तोंच मागून एक रट्टा बसला. दोरी ओढली गेली, अर्धा झेंडा वर गेला. मागून पुन्हा दुसरा रट्टा बसला. झेंडा वर चढला ; वारें नसल्यामुळें झेंडा फडकला नाहीं. रामनाथाच्या डोळ्यांत अश्रु तरळले. त्यानें झेंड्याकडे पाहिलें आणि क्षणांत चक्कर येऊन धाडकन् खालीं कोसळला. दगडावर डोकें आदळल्यामुळें डोक्याला खोंच पडली.

## ३०

मिरवणुकींतून एका स्त्रीचें विव्हळणें ऐकूं आलें–

" हाय राम. "

९ ऑगस्टनंतरच्या पहिल्या दोन सप्ताहांत सरकारचें आसन डळमळलें. जनतेच्या विद्रोहाचा पुरेपूर अंदाज घेण्यास सरकारला जरा अवधि

लागला. पहिला विस्फोट इतका अनपेक्षित होता कीं त्याचा अदमास करणें कठिण होतें. वादळाचा जोर किती राहील हें अगोदर कोणी सांगू शकतो का ? परंतु नंतर सरकारच्या संघटित हिंसेनें निर्घृणपणानें आंदोलनास दडपून टाकलें. तुरुंग खच्चून भरले होते. बाहेर स्मशानशांतता होती. क्रांतीचे कार्यकर्ते तुरुंगांत होते, त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगणारेहि आतां तटस्थ बनले होते आणि त्यावेळीं तटस्थ असणारे आतां सरकारच्या बाजूचे झाले. लढाईच्या कामांत मदत करणें, सरकारी अधिकाऱ्यांची खुशामत करून त्यांची शाबासकी मिळविणें, हाच त्यांचा धर्म उरला. आंदोलनाबद्दल आपणांस सहानुभूति आहे, याचा तिळमात्रहि संशय येऊं नये यासाठीं ते झटत. १९२१ पासून जे पांढरी टोपी घालत, त्यांनीं सुद्धां रंगाऱ्याला अधेली देऊन टोपीचा रंग काळा करवून घेतला. व्यवसायी आणि धंदे करणाऱ्यांचें तर जास्तच नैतिक पतन झालें ! नव्याण्णवच्या फेऱ्यांत ते इतके जबरदस्त सांपडले कीं कुठले गांधी व कुठला देश, अशी त्यांची अवस्था झाली. फौजेंत अधिकाधिक भरती होऊं लागली. अधिक चलन वाढल्यामुळें किमती भराभर वाढूं लागल्या. गरीब व मध्यमवर्गास दोन्ही वेळच्या जेवणाची भ्रांत पडल्यामुळें तो वर्ग युद्धाच्या नोकरीकडे आकृष्ट झाला ! युरोप आणि ॲबिसिनीयांत रक्ताचे पाट वहात असतांना भारतांत चांदी लुटली जात होती. त्या चकाकणाऱ्या शुभ्र धातूनें काळीं अंत:करणें असलेल्या निर्धन आणि प्रतिकारहीन भारतीयांचें मन आकृष्ट केलें. ब्रिटिश सरकारनें भारतांत आणि ब्रिटिश पार्लमेंटमध्यें मोठ्या अभिमानानें घोषणा केली कीं गांधींच्या आंदोलनामुळें युद्धकार्यांत तिळमात्रहि फरक पडला नाहीं. त्याची आंकडेवारीहि दाखविण्यांत आली. ४० कोटि जनतेपैकीं १० कोटि मुसलमान, १३ कोटि संस्थानांची प्रजा, अकरावारा कोटि दलित वर्ग आणि ३० कोटि हिंदुसभावादी हिंदी जमात गांधींची अनुयायी नाहीं. परंतु ४० कोटीपैकी ६४ कोटी गांधींच्या प्रभावापासून अलिप्त राहिले. हें गणित कुठल्या मुलुखाचें देव जाणे ? अचूक

अशा गणितशास्त्रावरहि कुरघोडी करून आपल्याच मनांतले सिद्धान्त त्या शास्त्रावर लादणाऱ्या मानवाची धन्य नव्हे काय ?

परंतु गांधीजी व अन्य पुढारी जेलमध्यें बंद असल्यामुळें भारताचा आत्मा दुखावला गेला, हेंहि तेवढेंच सत्य होतें. भारतांत यावेळीं दोन शक्ति होत्या. एक विदेशी सरकारची व दुसरी भारताची ! एक सत्तारूढ व सुसंघटित असल्यामुळें कर्तुमकर्तुम् असल्याचें आव्हान देऊं शकत होती. आणि दुसरी सत्ताविहीन व विस्कळित असल्यामुळें वनवासाचें अपमानित जिणें कंठीत होती. सिंहासनावर बसण्याऐवजीं भगवान् रामचंद्र वनवासी झाले आणि राज्यमुकुटाऐवजीं कांटेरी मुकुट त्यांच्या डोक्यावर चढला, तरी त्यांचा रामपणा कांहीं नष्ट झाला नाहीं. राम अयोध्येंत असोत कीं पंचवटींत, राम हे रामच राहिले. त्याचप्रमाणें गांधीजी तुरुंगांत असले, तरी जनमनांत वास करीत होते. ब्रिटिश शासनाच्या पोलादी चौकटींत जनतेचें शरीर यंत्राप्रमाणें काम करीत असलें तरी त्यांचा हृदयाधिपति आगाखानमंदिरांत बंदिस्त झालेला एक लंगोटचा फकीर होता. भगवान् कृष्णापासून आजतागायत बंदींची परंपरा फार उज्ज्वल राहिली. लोकांनीं अगोदर ज्यांचा छळ करून सुळावर चढवलें, त्यांचीच मागून पूजाहि केली. काळचक्राची विराट् लीला जाणणारे लोक पुरेपुर ओळखून होते कीं एकट्या गांधीजींनीं जरी ब्रिटिश शासनास हटण्याचा आदेश दिला, तरी आज नाहीं उद्यां ब्रिटिशांना येथून हटावेंच लागेल. मशीनगन्स, बंदुका इत्यादींची सारी फौज एकवटली तरी त्यांचें राज्य टिकूं शकत नाहीं.

बहुसंख्य लोकांचीं मनें विषण्ण होतीं. चातुर्मासाचे सारे सण उदासीनतेंत गेले. कारण जेथून तुरुंगांत किंवा युद्धभूमीवर कुणी गेलें नाहीं, असें एकहि घर उरलें नाहीं. दोन्ही क्षेत्रांतील प्रेरणा वेगवेगळ्या असल्या तरी घरांतील मंडळींच्या वियोगाची भावना एकच होती. दिवाळीला दिवे लागले नाहींत, कीं गोडधोड झालें नाहीं; साऱ्या

देशांत उदासीनता होती.

हें वातावरण पाहून अभयकुमार म्हणाला,

"दीनबंधु! आतां बाहेर राहून तरी काय फायदा? राष्ट्रानं तेज दाखवायचं तें दाखविलं, पण आतां सारं वातावरण पालटलं. मग आतां कैद टाळण्यांत काय अर्थ? शिवाय माझ्या आसपास पसरलेलं पोलिसांचं जाळं पाहून मला यापुढें अधिक दिवस बाहेर राहणं अशक्य वाटतं."

"तुमचं म्हणणं ठीक आहे. पण जाणूनबजून उखळांत शिर कशाला द्यायचं? आंदोलनाच्या कार्यकर्त्यांना तुम्ही बाहेर आहांत हाच केवढा आधार आहे! आज जरी सारे आपल्या जागीं स्वस्थ बसले आहेत, तरी ते योग्य संधीची वाट पाहात आहेत. पूर्वेकडे बिकट युद्ध होत असून सुभाषबाबूंकडे साऱ्यांचे डोळे खिळले आहेत. सध्यां ते जर्मनी किंवा जपानमध्यें असतील. ज्यावेळीं त्यांची मुक्तिसेना आक्रमण करील, त्याच वेळीं येथून आपणांसहि धडाका उडवला पाहिजे."

बी. एन्. रेल्वेच्या छोटया लाइनवर हे दोघे गाडीची वाट पाहात बसले होते. पहाटेचे साडेचार वाजले होते. अजून अंधार होता. दीनबंधूची आधींच दाढी होती. आतां अभयनेंहि दाढी वाढविली होती. भगव्या वस्त्रांमुळें दोघे संन्यासी वाटत होते. दीनबंधूच्या हातांत चिमटा व अभयच्या हातांत कमंडलु होता. याच वेषामुळें आजपर्यंत ते पोलिसांच्या हातून निसटले होते. परंतु पोलिसांचा पंजा दिवसेंदिवस आपल्या अधिकाधिक जवळ येत असून, त्यापासून बचावणें कठिण; कदाचित् आपल्या नरडीचा घोट घेतल्यानंतरच तो पंजा स्वस्थ बसेल, अशी त्यांची खात्री होऊं लागली.

फांशीचा विचार येतांच अभयकुमारच्या अंगावर कांटा उभा राहिला एक प्रकारचा विचित्र थकवा त्याला वाटूं लागला. असा थकवा आजपर्यंत त्यानें कधीं अनुभवला नव्हता.

पेंव फुटूं लागलें आणि अंधारानें आपलें पटल आवरण्यास सुरवात केली. मुशाफिरखान्यांतहि अंधाराचें साम्राज्य नाहीसें होऊन हळहळू सभोवतालीं सूर्यकिरण फाकूं लागले. तोंच अभयचें लक्ष अकस्मात् भिंतीकडे गेलें.

"दीनबंधू ! तें बघितलंत का ?"

दीनबंधूला तेथें एक विशाल पोस्टर दिसलें. त्यांत अभयकुमारचा भव्य फोटो असून त्याखालीं लिहिलें होतें–

**"इनाम ! दहा हजार रुपये इनाम !"**

व त्या खालीं सरकारी घोषणा होती :–

"युनिव्हर्सिटीचा रिसर्च स्कॉलर अभयकुमार हा एक बंडखोर असून पोलिसांना चुकवून हिंडत आहे. जनतेला भडकावणें, राजद्रोह आणि खून इत्यादिसाठीं जनतेला प्रवृत्त करणें, हे त्याच्यावर आरोप आहेत. घुघरीच्या अग्निकांडास आणि हत्याकांडास तोच सर्वस्वी जबाबदार आहे. शांतता आणि सुरक्षितता यास त्याच्यामुळें धोका आहे.

म्हणून जो त्यास जिवंत किंवा मृत पकडून आणील, त्यास दहा हजार रुपयांचें रोख इनाम दिलें जाईल. अभयकुमार कायद्याच्या दृष्टीनें अट्टल गुन्हेगार असल्यामुळें त्याला खाद्यसामुग्री पुरविणें किंवा कोणत्याहि प्रकारची मदत करणें म्हणजे भयंकर गुन्हा आहे. हा गुन्हा करणाऱ्यास कडक शासन केलें जाईल असें सरकार जाहीर करीत आहे."

(सरकारी पोलिस खात्यातर्फें)

अभयनें पुन्हां पुन्हां त्यांतील शब्दन् शब्द वाचला. त्याचे डोळे भरून आले. मन भयाकुल झालें आणि तो दीनबंधूला म्हणाला,

"बघा बरं दीनबंधू तें समोरचं दुकान उघडलं का ? जरा चहा पिऊं या म्हणजे थकवा दूर होईल."

तें पोस्टर पाहिल्यावर यापुढें बस किंवा आगगाडीचा प्रवासहि धोक्याचा, म्हणून त्यांनीं पायीं प्रवास सुरू केला. याप्रमाणें भटकत भटकत छिंदवाडा जिल्ह्यांतील सातपुड्याच्या गिरिकंदरांत ते आले होते. तामियाच्या खालीं असलेल्या पातालपानीच्या खिंडारांत ते सध्यां लपले होते. अभय म्हणाला,

"दीनबंधू! आतां आपलं स्वतंत्र जीवन लवकरच संपणार! एकदां का जेलमधें कोंबले गेलों कीं हे पर्वत, स्वैरपणें गाणारे निर्झर, हें क्षितिज पुन्हां केव्हां दिसेल कोण जाणें? त्यापूर्वीं महादेवाचं एकदा दर्शन घेऊं या. तिथें दोनचार दिवस जरी निवांतपणें घालवण्यास मिळाले तरी मला बरं वाटेल. 'माझ्यामागून विजया आणि आईचं रक्षण कर' अशी मी त्याला प्रार्थना करीन."

"कल्पना चांगली आहे. येथून फार तर ३०-३५ मैलांचं अंतर असेल. जंगलांतील पायवाटेनं यात्रेकरूंच्या बरोबर जाऊंया. म्हणजे आपण ओळखले जाणार नाहीं." दीनबंधू म्हणाला.

अभयकुमार कांहीं वेळ विचारमग्न झाला व म्हणाला, "दीनबंधू जेलमधें बंद होण्यापूर्वीं एकदां विजयाला भेटतां येईल का? तिची राहून राहून आठवण येते. या पोस्टरसंबंधीं तिच्याहि कानीं गेलं असेल. तिची काय अवस्था झाली असेल कोण जाणें!"

"तुमच्या घरावर तर सध्यां कडक पाहरा असेल अभयबाबू! तिकडे गेलांत कीं पकडले गेलाच समजा व भेट राहील बाजूला! व्यर्थ जोखीम कशाला?"

"तुमचं म्हणणं पटतं मला. पण मनांत जरा कमकुवतपणा आला खरा! चला, आधीं महादेवाला तरी जाऊं. बचावलों तर पुढचं पुढें पाहतां येईल."

महादेव पर्वत पचमढीलगतच आहे. शंकराच्या पिंडीच्या आकाराचा

तो पर्वत युगानुयुगें तसाच उभा आहे. पचमठीहून सात मैल असणाऱ्या पर्वतराजींनीं वेढलेल्या एका सुंदर गुहेंत महादेव विराजमान आहेत. त्या गुहेंत एक सुंदर झरा आहे. त्यांतून अंधारांत चालत जाऊन पिंडीजवळ जावें लागतें. दर्शन घेण्याच्या आधीं झऱ्याच्या त्या चैतन्यमय प्रवाहांत लोक आंघोळ करतात. तेथील लोक त्या स्थानास अत्यंत पवित्र मानतात व त्याला बडा महादेव म्हणतात. दोनदोनशें मलांचें अंतर चालून साऱ्या प्रदेशांतून लोक तेथील यात्रा करण्यास येतात. महाशिवरात्रीच्या वेळीं तेथें फार मोठी जत्रा भरते. हें स्थान अतिशय निवांत व रमणीय आहे. ते दोघे यात्रेकरूंच्या एका मेळाव्यांत सामील झाले. यात्रेची पाऊलवाट फारच सुंदर होती. नुकताच वर्षाऋतु सुरू झाल्यामुळें सातपुड्याचें वन हिरवेंगार झालें होतें व गिरिकंदरांत आपलें अनुपम संगीत ऐकवीत झरे इतस्तत: खळाळत होते. कुठे चांगलेंसें दृश्य दिसलें कीं तेथेंच आपली काठी टेकून अभय त्या सौंदर्याचें अधीरतेनें पान करी. निसर्गाच्या त्या विलासांत तो काय शोधत होता देव जाणे ! तऱ्हेतऱ्हेचे विचार त्याच्या डोक्यांत भ्रमण करीत. किती सुंदरभूमि आहे ही ! परंतु हिच्यावरहि आपला अधिकार नसावा ? या भव्य गिरिशिखरांवर, या चैतन्यमय नद्यांवर स्वातंत्र्य-सूर्याचीं किरणं कधीं फांकतील का ?

महादेवाच्या गुहेंतील झऱ्यांत आंघोळ करतांच त्याला अपार शांति मिळाली. त्या पाण्याच्या स्निग्ध स्पर्शानें त्याच्या अंतरांत भडकलेल्या साऱ्या भावना शांत झाल्या. इतक्या दिवसांच्या परिश्रमां-नंतर त्याचें शरीर तर थकलेंच होतें. पण आतां मनहि श्रांत होऊं लागलें. एक तीव्र वेदना त्याच्या अंतरांत खोलवर घर करूं लागली. घुघरीचें अग्निकांड, आणि साऱ्या देशांत चालूं असलेलें निर्घृण दमनचक्र, पोलिस आणि लष्कराचे अत्याचार, जनतेची असहायता आणि लाचारी हें सर्व पाहून त्याचें हृदय पिळवटून निघे.

अशा वातावरणांत जीवनास अर्थ तरी काय? आपल्या देशबांधवांना असीम दुःखापासून सोडवण्याचा एखादा मार्ग नाहीं का? त्या दुःखाचें परिमार्जन करण्याकरितां आपण आपले प्राणहि पणाला लावूं.

महादेवाच्या पिंडीजवळ माथा लववून त्यानें नमस्कार केला व तो म्हणाला, "परमेश्वरा, तूं कैलासांत वास करतोस. रामेश्वरांतहि तुझं वास्तव्य आहे आणि देशाच्या मध्यभागांत या सातपुड्याच्या गिरिकंदरांतहि तुझं वास्तव्य आहे. तुझी प्राणप्रतिष्ठा नाहीं, असा एकहि कोनाकोपरा या देशांत नाहीं. परंतु ज्या पवित्र भूमींत तुझी एवढी प्रतिष्ठा आहे तिथें तुझ्या भक्तांचं निशाण नसून परकीयांचं निशाण फडकत आहे याचा तुला संताप कां येत नाहीं? हे परकीय तुला पाषाण आणि तुझ्या भक्तांना पशुतुल्य समजतात. या विशाल देशांत ९ ऑगस्टपासून एकहि अत्याचार व्हायचा उरला नाहीं. तुझ्या भक्तांचा कोणता छळ झाला नाहीं? तुझ्या हिंदकन्यांचा कोणता अपमान व्हायचा उरला आहे? मग हें सारं पाहूनहि तूं आपला तिसरा डोळा कां उघडत नाहींस? कोणत्या दिवसासाठीं तो तूं राखून ठेवला आहेस? देशाला जी असीम व्यथा व दुःख भोगावं लागत आहे तें असह्य होऊन एखादे दिवशीं त्याची कंबर पुरी खचणार तर नाहीं ना? आणि असं जर झालं तर मग तुझी पूजा तरी कोण करणार? शेकडों वर्षांच्या लांछनास्पद पारतंत्र्यामुळें भारतीय नागरिकांप्रमाणें तूंहि निस्तेज झालास कीं काय? हें प्रलयंकर शंकरा, आतां उठा. आपल्या डमरूच्या नादानं साऱ्या देशास खडबडून जागृत करा! मग आपल्या तांडवनृत्याचा प्रारंभ करा. म्हणजे त्यांत आमचं सारं पाप' सारी गुलाभी भस्म होईल. आणि आम्हांस जुने गौरवपूर्ण दिवस प्राप्त होतील."

महादेवानें हें सारें ऐकलें कीं नाहीं तोच जाणे! आणि ऐकलें असेल तर त्याच्यावर काय परिणाम झाला हेंहि त्याचें त्यालाच

ठाऊक ! पण एकदां मनांतलें सारें बोलून झाल्यानंतर अभयकुमारचें मन मात्र शांत झालें. आपली काठी उचलीत तो म्हणाला, " दीनबंधू, आपली यात्रा तर निर्विघ्न पार पडली. आतां सरळ घरीं जायला हरकत नाहीं. मग जें काय व्हायचं असेल तें होईल."

## ३२

अभयनें दीनबंधूला सरळ घरीं जाण्यासाठीं रवाना केलें. त्याच्यावर पोलिसांची इतकी सक्त नजर नव्हती. एकतर तुरुंग खचाखच भरले होते. दुसरें, बहुतेक सर्व प्रमुख नेते पकडले गेले होते म्हणून दीनबंधूसारख्या कार्यकर्त्यांना पकडण्याच्या बाबतींत सरकार जरा शिथिल झालें होतें. आतां कांहीं निवडक व्यक्तींवरच सरकारचा डोळा होता. त्यामुळें फारसा त्रास न होतां दीनबंधू आपल्या गांवीं पोहोंचला. परंतु घरीं जाण्यापूर्वीं तो अगोदर अभयच्या घरीं गेला. त्यावेळीं रात्रीचे अकरा वाजले होते. त्यानें हळूच मारलेली हांक कानीं पडतांच अभयची आई खडबडून जागी झाली व तिनें विचारलें, " कोण आहे ? "

" मी दीनबंधू आहे माताजी."

" ये बेटा, माझा अभय कुठें आहे ? जेव्हांपासून गेला तेव्हांपासून जिवाला चैन नाहीं. तो जेलमध्यें आहे कीं बाहेर ? त्याला गोळीबिळी तर नाहीं ना लागली कुठें ? " आईनें एका दमांत विचारलें.

" छे ! छे ! आजपावेतों अगदीं सुरक्षित आहे तो."

" ईश्वरा, तुझी लीला धन्य आहे ! एकदां माझा, अभय मला डोळ्यांनीं सुखरूप दिसूं दे म्हणजे मी सत्यनारायण करीन."

" महादेवाचं दर्शन घेऊन तो घरीं येण्याच्या मार्गावरच आहे. दीडदोनशें मैलांचा रस्ता आहे, दोनचार दिवसांत तो इकडे पोहोंचेल." तेवढ्यांत विजयाहि तेथें आली. गेल्या कांहीं दिवसांत काळजीमुळें ती अतिशय खंगली होती. तिला पाहतांच दीनबंधूचे डोळे

भरून आले. आपल्या भावना कशातरी आवरून त्यानें सांगितलें कीं, "अभयकुमारनं साधूचा वेष धारण केला असून तो पायवाटेनं येत आहे. पोलिस हात धुऊन त्याच्या शोधांत आहेत."

"होय बेटा! पोलिसांनीं जिकडे तिकडे पत्रकं चिकटविलीं आहेत म्हणे! आपल्या घरासमोरहि पत्रकं लागलीं आहेत. पोलिसांनीं सतरा वेळां घरीं येऊन चौकशीहि केली कीं, "अभय कुठें आहे? बऱ्या बोलानं सांगा नाहीं तर तुम्हांला कैद करतों. तुम्हांला त्याची बातमी नाहीं हें कसं शक्य आहे?" त्याच्या पत्रांवरून कांहीं सुगावा लागावा म्हणून ४-५ वेळां झडती घेतली गेली. मी तर डोळ्यांत प्राण आणून त्याची वाट पाहते आहे. दीनबंधू! सोन्यासारखा माझा मुलगा! जर का पोलिसांच्या तावडींत सांपडला तर ते त्याची काय गत करतील काय जणं? पत्रकांतील भाषा पाहून तर माझ्या पोटांत गोळाच उठला. त्यांना त्याच्या रक्ताची तहान लागली आहे जणूं! परमेश्वरा! तूंच या मुलीच्या सौभाग्याचं रक्षण कर–" गहिंवरलेल्या आवाजांत आई म्हणाली.

दीनबंधू स्वतःच भयाकुल झाला होता. तो कसलें सांत्वन करणार? परंतु कांहीं तरी बोलायचें म्हणून तो म्हणाला, "छे! उगीच कशाला अशुभाचा विचार करतां आई! त्याच्या जिवाला कांहीं धोका नाहीं. जेल मात्र तो टाळूं शकत नाहीं. पांच सहा वर्षं जेलमध्यें सडावं लागलं तरी आश्चर्य नाहीं."

"त्यासाठीं माझं मन पूर्णपणें तयार आहे. तुरुंगाची मला मुळींच चिंता नाहीं. परंतु पत्रकं पाहून भलत्याच शंकेनं मन व्याकुळ झालं. 'कैद चुकविल्यास गोळी घालूं" असंहि त्यांत लिहिलं आहे."

"तो कशाला कैद चुकवील? आतां बाहेर राहण्यांत कांहीं अर्थ नाहीं व जेलमध्यें जाणं हाच धर्म आहे असं त्याला पटलं तर सरळ

तुरुंगांत जाऊन तो स्वतःच पोलिसांच्या स्वाधीन होईल. तो गांधींचा अनुयायी आहे. तो कशाला जेल चुकवील? "

"आतां कुठें माझा जीव हलका झाला. या दीड महिन्यांत कांहींच समाचार कळला नाहीं. अन् एकाहून एक भयंकर अफवा ऐकल्या म्हणून मी घाबरलें. पण आज तूं आलास आणि प्रत्यक्ष तुझ्या तोंडचा समाचार ऐकून मन शांत झालं. जा बेटा ! तूंहि तावडतोब घरीं जा. तुझी लक्ष्मी सुद्धां तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसली आहे. परंतु सर्वत्र गुप्त पोलिसांचा संचार आहे. जरा जपून जा हं ! "

दोघांच्या संवादांत विजयानें अजिबात भाग घेतला नाहीं. परंतु तें संभाषण ऐकून तिचाहि जीव भांड्यांत पडला.

दीनबंधूला तिनें अतिशय श्रद्धेनें नमस्कार केला.

## ३३

अभय महादेवाच्या पहाडावरून उतरूं लागला तेव्हां अंधार झाला होता. एरव्ही त्याचा प्रवास नेहमीं रात्रींचाच असे; पण या निर्जन, अज्ञात जंगलांत रात्र कुठें नि कशी काढायची ? हिंस्र पशूंचीहि या बाजूस बरीच भीति आहे म्हणे. आपणांस मृत्यूचें भय वाटत नसलें तरी विनाकारण एखाद्या हिंस्र पशूचें भक्ष्य कशाला बनायचें,असें त्याला वाटलें.

ती अमावास्येची रात्र होती कीं काय कुणास ठाऊक ? डोळ्यांत बोट घातलें तरी दिसणार नाहीं इतका दाट अंधार होता. वाट चुकल्यास सरळ यमराजाचें घरच ! अभय घाबरला. भीतीनें त्याला दरदरून घाम सुटला. त्याचे पाय लटपटूं लागले. असहायपणें शेवटीं तो एका दगडावर बसला. त्याच्या तोंडून एकाएकीं निघाले "अरे रामा ! "

"बेटा ! घाबरूं नकोस–" अंधारांतून प्रेमळपणें उच्चारलेले शब्द उमटले. साक्षात् परमेश्वरच धावून आल्याचा त्याला भास झाला.

आनंदामुळें शब्द फुटेना तेव्हां त्यानें आपली काठी दरवाजावर आपटून आवाज केला.

" घाबरूं नकोस. मीहि तुझ्यासारखाच एक माणूस आहे. जवळच इथें माझी झोपडी आहे. तिथें आजची रात्र कशीतरी काढ."

हें ऐकतांच अभयला धीर आला, निश्चित मनानें त्या माणसाच्या आवाजाच्या मागें मागें तो जाऊं लागला. कांहीं न बोलता दहा मिनिटें चालल्यावर ती अज्ञात व्यक्ति म्हणाली, " हं थांब. ही माझी झोपडी आली. मी आंत जाऊन दिला लावतों."

अंधाराची संवय झाल्यामुळें त्याला आतां थोडें फार दिसूं लागलें होतें. समोर एक कुटि होती. तो दिवा त्याला अगदीं विजेच्या प्रकाशाइतका चक्क वाटला. त्या प्रकाशांत ती अपरिचित व्यक्ति त्यास प्रथमच दिसली. तो एक साधू असून, त्याची दाढी पोटापर्यंत व जटा कंबरेपर्यंत होत्या. वय सत्तर ऐंशी वर्षांचें ! इतक्या निर्जन आणि निबिड अरण्यांत राहणें म्हणजे काय सामान्याचें काम आहे ? जीव-जिवाणूं, हिंस्र पशू, भूत-पिशाच्च इत्यादींची यांना भीति कशी वाटत नाहीं ? यांच्याजवळ कुठली तरी शक्ति, सिद्धि जरूर असली पाहिजे. त्याखेरीज इकडे राहणें कसें शक्य आहे ? "

" मला तर अंधाराची नित्याचीच संवय आहे. आज किती तरी दिवसांनंतर तुझ्यासाठीं मी दिवा लावीत आहे." स्वामीजी म्हणाले.

" आपली भेट झाली, मी अगदीं धन्य झालों. नाहीं तर माझी काय गत झाली असती, कोण जाणें ? "

" त्यांत धन्य होण्यासारखं काय आहे ? महादेव पहाडावरून उतरतांना मी तुला दुरून पाहिलं होतं तेव्हां तूं या वाटेनं उतरणार हें मी ओळखलं. तुझं साहस पाहून मी चकित झालों. अंधार पडल्यावर या वाटेनं जाण्यास कुणीहि धजत नाहीं. तूं घाबरूं नये म्हणून तुझी वाट पाहात मी इथें थांबलों." त्यांचें लक्ष त्याच्या चेहऱ्यावर व

विशेषत: त्याच्या दाढीकडे गेलें व त्यांनीं विचारलें, “इतक्या तरुण वयांत तूं संसार सोडलास ? काय फार मोठं दु:ख आहे ?”

स्वामीजींच्या स्नेहपूर्ण वागण्यानें अभयचा त्यांच्यावर विश्वास बसला. त्यांच्या समोर अंत:करण खुलें केल्यास कांहीं हरकत नाही, उलट मिळाल्यास कांहीं मार्गदर्शन मिळेल असें त्याला वाटलें.

“तसं नव्हे स्वामीजी ! मीं संसार सोडला नाहीं. माझं दु:ख व्यक्तिगत नसून सामाजिक आहे. सध्यां देशावर फार मोठं संकट आहे. देशाची इतकी विपन्नावस्था आहे कीं अशा परिस्थितींत कोणत्याहि स्वाभिमानी माणसाचं जिणं कठिण ! इंग्रज सरकार निरपराध जनतेस खूप गांजीत आहे. त्याचंच मला दु:ख आहे.”

“परंतु छळ करण्याचं कारण काय ?”

“महात्मा गांधींनीं स्वातंत्र्यासाठीं आंदोलन सुरू केलं आहे. ती एक क्रांतीच आहे म्हणा ना ! सारा देश त्या क्रांतीनं हादरला आहे व त्या क्रांतीला ठेंचण्याचा सरकारनं विडा उचलला आहे. सरकारच्या अत्याचारांना सीमा उरली नाहीं. जनता अगदीं त्रस्त झाली आहे.”

“आलं लक्षांत. १८५७ मध्येंहि असेच, याहून भयंकर अत्याचार घडले होते. ४२ मध्यें त्याचीच पुनरावृत्ति होत आहे. मग त्यांत घाबरायला काय झालं ? बेटा, रक्ताचा अर्घ्य अर्पण केल्याखेरीज स्वातंत्र्यदेवी कधीं प्रसन्न होते का ? आपण अखंड आपलं कर्तव्य करीत राहिलं पाहिजे. स्वातंत्र्यदेवीचं आगमन झाल्याखेरीज राहणार नाहीं, यावर विश्वास ठेव.”

१८५७ ची गोष्ट ऐकतांच अभय आश्चर्यचकित झाला. जुना राष्ट्रीय इतिहासहि स्वामीजींना संपूर्ण माहीत आहे तर ! त्यानें विचारलें, “सत्तावन सालीं काय काय घडलं, तें आपणांस कसं कळलं महाराज ?”

“मी जरी त्यावेळीं नसलों तरी याच जागीं माझे गुरु त्या

ग्रं. क्र. ८२३०
दि. बा.वा.

वेळीं राहत होते. वीस वर्षांपूर्वी त्यांनीं समाधि घेतली. सत्तावनचं बंड झालं तेव्हां माझे गुरुजी इथंच राहत असत. त्यांनीं तो काळ पाहिला होता. नागपूरवर इंग्रजांचं आक्रमण झाल्यावर, आप्पासाहेब भोसल्यांनीं जेव्हां पळ काढला, तेव्हां याच कुटींत ते कांहीं महिने राहिले. गुरुजीं-जवळ कांहीं काळ कंठून मग चित्रकूटाकडे गेले. राणी लक्ष्मीबाईलाहि माझ्या गुरूंनीं पाहिलं होतं. त्यावेळीं ते बदरीनारायणाच्या यात्रेहून परत येत होते. त्या बंडाचा बींमोड करण्यासाठीं इंग्रजांनीं कांहीं एक करायचं शिल्लक ठेवलं नाहीं. त्यांचं आसन हालतां हालतां पुन्हा त्यांचा पक्का जम बसला. त्यावेळीं त्यांचं नशीब जोरावर होतं. देशाचं भोक्तृत्व संपलं नव्हतं. म्हणून हजारों भारतीयांबरोबर राणी लक्ष्मी-बाईसहि बलिदान करावं लागलं ! हा तर एक यज्ञ आहे. अनेक आहुती दिल्यानंतर त्याची पूर्णाहुति होते. आहुति देण्यासाठीं आजहि देश आतुर झाला आहे. कोणतंहि बलिदान वाया जात नाहीं. हें सारं अवश्य सफल होईल."

"स्वामीजी ! खरंच असं होईल ना ! का उगाच मला धीर देण्यासाठीं म्हणून असं म्हणतां !"

"नाहीं बेटा. खोटं आश्वासन देऊन मला काय करायचंय् ? आम्ही संन्यासी माणसं ! राणीच्या सरदारांनाहि गुरुजींनी हेंच सांगितलं, कीं 'तुम्हांला आहुति द्यावी लागेल. परंतु पूर्णाहुतीस अजून अवधि आहे.' राणीच्या मृत्यूनंतर जी निराशेची आणि वैफल्याची भावना पसरली, तिच्यामुळें किती तरी बंडवाले हिमालयाकडे निघून गेले. त्यांच्यापैकीं कांहीं तर अजूनहि तिकडे तपश्चर्या करतांना आढळतील."

"परंतु महाराज ! त्यांनीं संसार कां सोडला ? रणक्षेत्र कां सोडलं ?"

"बेटा, मला त्यांची मन:स्थिति कळते. ते हताश मन:स्थितींत गेले; हें खरं असलं तरी तेथें जाऊन त्यांची वृत्तीच बदलली. तुम्ही

लोक देशाच्या राजनैतिक उद्धारासाठीं प्रयत्न करतां, तर आम्ही आध्यात्मिक उद्धारासाठीं प्रयत्न करतों. राजनैतिक स्वातंत्र्यानंतर सारे प्रश्न सुटतील, असं तुम्हांला वाटतं तर आध्यात्मिक मूल्यांची प्राणप्रतिष्ठा झाल्याखेरीज या विशाल सुसंस्कृत देशांत शांतता नांदणार नाहीं; ही आमची धारणा. भारताचा मूळचा पिंड आध्यात्मिक आहे. त्याविरुद्ध जाऊन जर कोणी या देशाची पुनर्रचना करण्याचा प्रयत्न केला, तर तो असफल ठरेल. गंगामाईचा प्रवाह कधीं उलट दिशेनं वाहूं शकतो का ?"

"मग आमचा राजनैतिक क्रांतीचा मार्ग निरर्थक आहे का स्वामीजी ?"

"नाहीं बेटा ! मला तसं म्हणायचं नाहीं. राजनैतिक स्वातंत्र्यानं आध्यात्मिक उद्धाराचा मार्ग मोकळा होईल. तेव्हां तो निरर्थक आहे असं मी कसं म्हणूं ? माझं म्हणणं इतकंच कीं तें एक साधन मात्र आहे; साध्य नव्हे. वरच्या मजल्यास पोहोंचण्याची ती एक आवश्यक पायरी आहे. परंतु तीच अंतिम पायरी नव्हे. हें जर मनांत स्पष्ट असलं तर निराश होण्याचा प्रसंग येणार नाहीं. सत्य हें स्वप्नासारखं न भासतां निर्भेळ सत्यदर्शन होईल. स्वातंत्र्यप्राप्ति म्हणजे भारताच्या महत्कार्याचा प्रारंभ आहे, अंत नव्हे."

"ही तर दूरच्या भावी कालांतील गोष्ट आहे. आज सरकारच्या निर्घृण दडपशाहीमुळं आमचं स्वातंत्र्य आम्हांला दुरावलं आहे असा भास होत आहे. ही जी विफलता आणि नैतिक पतन आपल्या देशांत आज दिसत आहे, त्यावरून आणखी कांहीं काळ तरी आम्हांला उठतां येणार नाहीं असं वाटतंय्."

"किती वेडा आहेस बेटा ! कालचक्र तीव्र गतीनं फिरत असतं. इंग्रजांच्या राज्याचा ज्या दिवशीं या देशावरून अस्त होईल तो दिवस कांहीं फार लांब नाहीं. आजची उफाळलेली हिंसा म्हणजे

विझण्यापूर्वी वाढलेला ज्योतीचा प्रकाश होय. इंग्रजी साम्राज्याचा अंत होण्यांतच जर तुझं सुख सामावलं आहे, तर नीट ऐक. आतां हें राज्य म्हणजे कांहीं दिवसांचाच खेळ आहे. स्वामी रामतीर्थांनीं भविष्यवाणी केली होती कीं, "विसाव्या शतकाच्या मध्यकालांत भारत स्वतंत्र होईल. परंतु खऱ्या अर्थानं सुवर्णयुग सुरु होण्यास आणखी कांहीं वर्षांचा अवधि लागेल." १८५७ प्रमाणें १९५७ हि चिरस्मरणीय वर्ष ठरेल हें निर्विवाद!"

हें ऐकतांच अभयकुमारच्या मनास शांति मिळाली. भविष्यवाणी खरी ठरो किंवा न ठरो, परंतु स्वामीजींचें बोलणें विचारपूर्ण वाटलें. वाटून स्वतःला दूरदृष्टि प्राप्त झाल्याप्रमाणें त्याला वाटलें. कांहीं वेळ विचारमग्न होऊन अभय म्हणाला, "भावी काळांत काय घडेल, हें देवच जाणे! परंतु तुम्ही म्हणतां त्याप्रमाणं राजकीय स्वातंत्र्य लांब नसलं, तर मग विफलतेचं कांहींच कारण नाहीं. आमच्यासारख्या तरुणांचं म्हणाल तर आम्ही स्वातंत्र्यासाठीं आपलं सर्वस्व पणाला लावलं आहे. स्वातंत्र्य मिळालं तर आम्ही स्वतःला धन्य समजूं. मिळालेल्या स्वातंत्र्याचा उपभोग कसा करावा आणि भारताची पुनर्रचना कशी करायची तें पुढची पिढी बघेल. आमचं कर्तव्य फक्त स्वातंत्र्यासाठीं आहुति देण्याचं! त्यानंतरची चिंता नवी पिढी वाहील."

"बेटा, तूं फार समंजसपणाचं बोललास. मंदिराच्या पायांतील पाषाणाचं काम तुझं! तुमच्यासारखे निःस्वार्थी तरुण पाया रचण्याच्या कामीं आल्याखेरीज स्वातंत्र्यमंदिर कसं उभारलं जाणार व त्यावर सुवर्णकलश कसा चढणार? तुमच्यासारख्यांच्या आत्मोत्सर्गावर कदाचित् कुणी अश्रू ढाळणार नाहींत, पण पायांतील पाषाण कुणाच्या जमेंत नसला तरी त्याखेरीज मंदिर होणं अशक्य! मंदिराला तोच प्राणभूत असतो. म्हणून माझ्या मुला! राणी लक्ष्मीबाईपासून आज-पर्यंत जसे शहीद झाले, तसंच तुझं काम! तुमच्यासारखे लोक

पाषाणवत् नसून, खरं म्हणजे देवतातुल्य आहांत. मी तुला प्रणाम करतों." असें म्हणून त्या वृद्ध साधूनें खरोखरच अभयसमोर आपलें मस्तक टेकलें.

अभयला संकोचानें गुदमरल्यासारखें वाटूं लागलें. तो म्हणाला,

"महाराज, हें काय? आपण इतके थोर, ज्ञानवृद्ध, तपोवृद्ध! आपणांसमोर मी लेकरासारखा! अंगिकारलेल्या मार्गापासून मी ढळूं नये असा आपण मला आशीर्वाद द्या. तुफान होवो कीं आकाश कोसळो, माझा निश्चय अढळ राहो!"

"असंच होईल बेटा! असंच होईल! फार मोठं भाग्य घेऊन तूं जन्माला आला आहेस."

## ३४

किर्र जंगलाचा रस्ता असला, कीं अभय दिवसा चालत असे आणि रात्रीं मुक्काम करी. परंतु वस्तीचें गांव आल्यास एखाद्या धर्मशाळेंत नाहीं तर मंदिरांत दिवस घालवून रात्रीं चालायचा. कसे तरी एकदां घरीं पोहोंचून विजयाला व आईला भेटायचें हेंच त्याचें तूर्त ध्येय होतें. एकदां त्यांना डोळे भरून पाहिलें कीं मग कोणत्याहि भवितव्यास तोंड देण्यास तो तयार होता. परंतु त्यापूर्वी त्यांच्या भेटीची एक विलक्षण अनिवार्य ओढ त्याला वाटूं लागली. चालतांनाहि त्याच्या डोक्यांत भेटीचेच विचार थैमान घालीत. त्यांना सोडून त्याला दीड महिना, म्हणजे एकंदर ५० दिवस झाले होते. पण या पन्नास दिवसांत जणूं काय पन्नास वर्षांचा अनुभव त्यानें मिळवला होता. आणि त्या प्रत्येक अनुभवाच्या आघाताप्रत्याघातानें त्याला समूळ हादरून टाकलें होतें. असे खोलवर अनुभव त्याला यापूर्वी कधींच आले नव्हते. त्याग आणि आदर्श तेजस्वीपणा, भ्याडपणा, उन्नति-अधोगति या साऱ्यांचें दर्शन त्यास घडलें होतें. विष आणि अमृत दोन्ही देणाऱ्या या

महान् समुद्रमंथनानें त्यास समूळ हालवलें होतें. विश्वाचें असें विराट् स्वरूप त्यानें या पूर्वी कधीं पाहिलें नव्हतें आणि अगोदर जर कोणी त्याबद्दल सांगितलें असतें तर त्यावर त्याचा विश्वास बसला नसता. परंतु हें सारें पाहून त्याच्या मनांत असा प्रश्न येई कीं, 'काळपुरुषाच्या या महायात्रेंत मानवाच्या अपरिहार्य अशा उत्थान आणि पतनाच्या वेळीं त्याच्यासारखा क्षुद्र पामर काय करूं शकणार? भवितव्याच्या या विराट् नाटकांत त्याची भूमिका किती क्षुद्र आहे! कांहीं तरी केल्या-सारखें आपल्याला जें वाटतें आहे तें कुठल्या तरी अगाध शक्तीच्या प्रेरणेनें! तुफानानें खवळलेल्या समुद्राच्या लाटावर तरंगणारें तृण आपला निश्चित मार्ग कधीं ठरवूं शकतें का? वारा वाहील त्या दिशेनें जाण्यापलीकडे त्याच्या हातीं होतें काय? त्याच्या इच्छा-अनिच्छेचा प्रश्नच येत नव्हता; म्हणून अभयनें यापुढें आपली जीवननौका सर्वस्वी नियतीच्या प्रवाहांत सोडून दिली होती. वल्हीं मारणें बंद केलें होतें. कारण वल्हविणारा कोणी दुसराच होता. त्याच्या मनांत काय होतें हें पूर्णपणें अज्ञात होतें. त्याच्यासमोर श्रद्धेनें मान लवविण्या-खेरीज अभयच्या हातांत कांहींच नव्हतें.

बस्! एकच दुर्दम्य इच्छा. आईच्या चरणांवर एकदां अश्रूंचा अर्घ्य अर्पण करायचा आणि विजयाचें मस्तक आपल्या छातीवर घेऊन तिचे अश्रू आपल्या हातांनीं पुसायचे! ईश्वरानें एवढीच कृपा जरी आपल्यावर केली तरी आपण धन्य होऊं. पावलागणिक त्याचें विचारचक्र सुरू होतें. घर जवळ येऊं लागलें तसतशी त्याची गति वाढूं लागली. धोका पत्करूनहि आज तो दिवसां चालला. चालून चालून त्याचे आधींच फुटलेले पाय आतां पूर्ण थकले होते. अंग दुखत होतें. कधीं कधीं दिवसभर उपाशीं रहावें लागे. कांहीं मिळालें नाहीं तर विहिरीच्या पाण्यावरच भूक भागवावी लागे. परंतु आतां थांबण्याची त्याची इच्छा नव्हती. पण आतां आपल्याजवळ जास्त वेळ नाहीं असें

त्याला वाटूं लागलें. एकच आस त्याच्या अंतरांत होती. शक्य तेवढ्या लवकर घर गाठावें ! त्यांत अंतर्भूत असलेल्या धोक्याचा विचार करायलाहि त्याला फुरसत नव्हती. चालतां चालतां रात्र झाली आणि तो एका तहसिलीच्या गांवीं पोहोंचला. तेथून २० मैलांवर त्याचें घर होतें. आज जर विश्रांति घेतली नाहीं, तर अतिश्रमानें आपण कोलमडून पडूं अशी भीति त्याला वाटली. आपल्या प्रिय जनांना भेटल्याखेरीज मरण्याची त्याची इच्छा नव्हती. अजून सबंध दिवसाचा प्रवास उरला होता. तो थकून चूर झाला होता. विश्रांतीची त्याला अत्यंत जरूर होती. म्हणून वाटेंत लागलेल्या त्या गांवीं विश्रांति घेण्याचें त्यानें ठरविलें.

गांवाच्या बाहेर असणाऱ्या एका घरांत त्याला प्रकाश दिसला. तेथेंच तो शिरला आणि दाराशीं उभा राहून म्हणाला, "ओम् भवति भिक्षां देहि ! भिक्षा मिळेल का आई ?"

एकाच हांकेंत दरवाजा उघडला गेला आणि मध्यम वर्गाची स्त्री दाराशीं दिसली. पंचवीस सव्वीस वर्षांचें तिचें वय असावें. साध्या पांढऱ्या साडींत ती फार सोज्वळ दिसत होती.

हातांत कमंडलु घेतलेला, धुळीनें भरलेला एक तरुण योगी पाहून व त्याच्या भव्य आणि सात्त्विक व्यक्तित्वावरून हा भोंदू नसून खरा साधू आहे असें तिला वाटलें. इतक्या कोंवळ्या वयांत संसार सोडणारा तो साधू पाहून तिचें मन द्रवलें. ती म्हणाली, "यावं महाराज ! घरीं बसल्या बसल्या आपल्यासारख्या महात्म्यांचं दर्शन घडलं, हें माझं केवढं भाग्य ! काय आज्ञा आहे ?"

"आज्ञा कांहीं नाहीं, माई ! चतकोर भाकरीचा तुकडा आणि रात्रीं निवाऱ्याला जागा ! बस्, इतकंच पाहिजे. आपल्या घरांतील एखादी निवांत जागा मिळाल्यास मला भजन-पूजन करायला बरं होईल."

"वा ! वा ! अवश्य ! सारं घर आपलंच आहे. आपलं भजन

मला ऐकतां येईल का ? "

" माई ! मी मूकपणें मानसपूजा करतों. दिव्याची सुद्धां मला आवश्यकता नसते. आमच्यासारख्या भ्रमण करणाऱ्या साधूंचा हाच मार्ग असतो. "

" जशी आपली इच्छा ! यावं माझ्याबरोबर " !

तें घर फारसें मोठें नव्हतें. मुलांच्या अस्तित्वाचें कुठें चिन्हहि दिसत नव्हतें. एका खोलीसमोर पोलिसची वर्दी दिसतांच तो चमकला. अरे ! आपण तर वाघाच्या गुहेंतच सांपडलों ! आल्या पावलीं परत जावें, असें त्याला वाटलें. परंतु तसें केल्यास उगाच संशय यायचा. शिवाय ही स्त्रीतर फार साध्वी दिसत आहे. आला प्रसंग निभावला पाहिजे असा विचार करून तो सावध झाला.

माडीवरील एक खोली त्याला देण्यांत आली. पाण्याचा तांब्या-भांडें ठेवीत ती स्त्री म्हणाली,

" आपण थोडा वेळ विश्रांति घ्या बाबाजी. मी लवकरच भात टाकतें. हे सुद्धां क्लबमधून येतील तोंपर्यंत! "

" आपले पति काय करतात माईजी ! "

" पोलीसमध्यें फौजदार आहेत. "

" असं ? " अकस्मात् त्याच्या तोंडांतून हा उद्‍गार निघाला. आपल्या स्वरांतील कातरता त्या स्त्रीच्या लक्षांत तर आली नाहीं ना अशी त्याला भीति वाटली.

" होय बाबाजी ! फक्त आम्हीच दोघं आहोंत घरांत. मूलबाळ कांहीं नाहीं. किती उपास-तापास, व्रत-वैकल्यं केलीं. पण अजन परमेश्वरानं प्रार्थना ऐकली नाहीं. साधु-सतांचा आशीर्वाद कधीं वांया जात नाहीं. म्हणून कोणी साधू-संन्यासी माझ्याकडून कधीं विन्मुख जात नाहीं. कोणत्या रूपांत परमेश्वर कधीं दर्शन देईल याचा काय नेम " ?

" तुमच्यासारख्या साध्वी स्त्रियांना मी काय आशीर्वाद देणार ? पण तुमची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून ईश्वराला प्रार्थना मात्र मी करूं शकतों. "

ता स्त्री मनोभावें नमस्कार करून खालीं गेली आणि स्वयंपाकाला लागली. तिचे यजमान क्लबमधून आले. तिनें दोघांचीं पानें बरोबर घेतलीं.

आग्रहानें वाढलें. तिचे पति मधून मधून आपल्याकडे रोखून पांहत आहेत कीं काय असा त्याला संशय आला.

फौजदारसाहेबांना यांत कांहीं नवें नव्हतें. त्यांना आतां पत्नीच्या स्वभावाची सवय झाली होती. ते तिच्या नेमधर्मांत कधीं व्यत्यय आणीत नसत. ते घरीं आले कीं नेहमी नित्य नवा अतिथि किंवा ब्राह्मण पंक्तीला असे. आपल्या पत्नीला तेवढेंच समाधान मिळतें, तर आपण उगीच तिचें मन कशाला मोडा, असा ते विचार करीत. त्यांचा हा उदारपणा आणि समंजसपणा याच्यामागें एक रहस्य दडलें होतें. आपल्याला मूलबाळ नाहीं, याचें आपल्यापेक्षां आपल्या पत्नीला जास्त दुःख होतें, हें त्यांना ठाऊक होतें. या देशांतील अन्य स्त्रियांप्रमाणें तीहि आपलें दुःख मूकपणें सहन करीत होती. परंतु तें दुःख जितकें अव्यक्त, तितकेंच खोलवर होतें. तिच्या एखाद्या दीर्घ निःश्वासांत तें अधून मधून व्यक्त होई.

फौजदारसाहेबांनीं दोघांची डॉक्टरकडून तपासणी करून घेण्याबद्दल अनेकदां म्हटलें. पण त्यांची पत्नी म्हणे, " संतान होणें न होणें देवाच्या आधीन आहे. माझें कांहीं पूर्वजन्मीचें पाप असलें, तर तें व्रतेंवैकल्येंच करून नाहींसें होईल. डॉक्टर त्याला काय करणार ? "

परंतु पतीच्या आग्रहाखातर ती शेवटी तयार झाली. डॉक्टरी तपासणींत तिची प्रकृति पूर्णपणें निर्दोष असून फौजदारसाहेबांच्या प्रकृतींत दोष निघाला. हें कळतांच ते वरमले. पण ही गोष्ट त्यांनीं पत्नीपासून लपवून ठेवली. " डॉक्टरांना कांहीं समजलं नाहीं." इतकेंच त्यांनीं सांगितलें.

" मग ? मी आधींच नव्हतें का म्हणत ! निरर्थक पैसे खर्च करण्यांत अर्थ काय ? " म्हणून पत्नी म्हणाली. पण या प्रकारानंतर नैतिक दृष्टया त्यांना पत्नीसमोर नेहमींच कमीपणा वाटे. त्यामुळें पत्नीच्या पोथीपूजेंत त्यांनीं कधींहि व्यत्यय आणला नाहीं. तिच्या चारित्र्यावर त्यांचा पूर्ण भरंवसा होता. देवधर्मामुळें तिला मानसिक शांति मिळते तर बिघडलें कुठें ? असें त्यांना वाटे.

त्यांच्या घरच्या देवधर्मामुळें त्यांच्या पत्नीला शेजारपाजारच्या बायका फार मान देत. त्या त्यांच्याकडे येत, तीर्थप्रसाद नेत. घरांतील या वातावरणामुळें फौजदारसाहेबांवर पत्नीचा बराच वचक होता.

जेवण आटोपल्यावर फौजदारसाहेब खोलींत गेले आणि पत्नीला म्हणाले, " या साधूच्या चेहऱ्यांत अभयकुमारचं बरंच साम्य दिसतंय. हा तोच तर नसेल ना ? "

" कोण अभयकुमार ? "

" तो नाहीं का प्रसिद्ध क्रांतिकारक ? ज्याला पकडण्याबद्दल सरकारनं दहा हजार रुपयांचं इनाम जाहीर केलं आहे ? त्या पोस्टरमध्यें तूं त्याचा फोटो पाहिला नाहींस का ? "

आतां पत्नीलाहि आठवण आली व तिला दोघांच्या चेहऱ्यांत साम्य वाटूं लागलें. तो क्रांतिकारी साधूच्या वेषांतहि लपत छपत फिरत असेल कदाचित् ! अशा प्रकारच्या कितीतरी गोष्टी तिनें पूर्वीं ऐकल्या होत्या.

" असेल कदाचित् तोच ! पण आपल्याला त्याच्याशीं करायचंय् काय ? "

" वा ! त्याला पकडलं तर मला दहा हजारांचं इनाम मिळेल ना ? बढती मिळेल ती वेगळीच ! "

" काय त्याला पकडायचं ? आपल्याकडे आलेल्या अतिथिदेवाला पकडायचं ! छे ! मी असं होऊं देणार नाहीं. "

"परंतु त्याला पकडलं नाहीं, तर काय होईल आहे ठाऊक? एका क्रांतिकारकास आश्रय दिल्याबद्दल माझी नोकरी तर जाईलच, शिवाय मला जेलमध्यें जावं लागेल तें वेगळंच".

"अग बाई! जेलमध्यें?" ती घाबरली. या विचित्र अतिथीच्या सत्काराबद्दल इतकी जबर किंमत द्यावी लागेल हें तिच्या ध्यानीमनीं नव्हतें. तिच्यापुढें धर्मसंकट येऊन उभें राहिलें.

लहानपणापासून 'अतिथि देवो भव' या सिद्धांताचे संस्कार तिच्या मनावर बिंबले होते. आणि आज आपल्या छत्राखालीं निवाऱ्यासाठीं आलेल्या एका अतिथीचा विश्वासघात करायचा? अशक्य! परमेश्वर आपणांस या अपराधाबद्दल कधींहि क्षमा करणार नाहीं. गतजन्मीच्या क्षीण असलेल्या पुण्याचा संचय तर बाजूलाच राहिला, उलट या जन्मीचें नवें पाप शिरावर येणार! पुन्हां याचें परिमार्जन जन्म जन्म करीत बसावें लागणार!

परंतु दुसरीकडे पतीनें उपस्थित केलेला कायद्यांतील पेंचप्रसंगहि समोर होता. पतीची नोकरी सुटून त्याला जेलमध्यें जायला भाग पाडणें, हा तरी आपला धर्म आहे का?

"परमेश्वरा! तूंच सांग मी काय करूं? इकडे आड नि तिकडे विहीर! काय करावं, माझं डोकंच चालत नाहीं." फौजदारसाहेबांनीं पाहिलें कीं आपली गोळी अचूक लागली. खरें पाहिलें तर नोकरी सुटणें किंवा जेलमध्यें जाणें यापेक्षां दहा हजार रुपयांचा लखलखाट आणि सर्कल इन्स्पेक्टरचा झगमगाट त्यांना दिपवीत होता. पत्नीसमोर त्यांनीं टाकलेला डाव यशस्वी झाला. पोलिसी खाक्या म्हणतात तो हाच! अभयकुमार आज ना उद्यां पकडला जाणारच! कोणी ना कोणी त्याचें श्रेय घेणारच! मग तें मीच कां घेऊं नये? लक्ष्मी स्वतः आपल्या पायांनीं चालत येते असें लोक म्हणतात, तसाच अभयकुमारहि आपल्या घरीं आला नाहीं का? आपण क्लबहून घरीं येतों काय नि अभयकुमार आढळतो काय?

कुणाला सांगितलें तर खरें सुद्धां वाटणार नाहीं. या विलक्षण घटनेंत मला तरी ईश्वराचाच हात दिसतो. पत्नीच्या देवधर्मामुळें अभयकुमार आपण होऊन घरीं चालत आला. माझ्या भाग्यामुळें तो माझ्या हातानें पकडला जाईल असा योग दिसतो. आपली पत्नी म्हणजे खऱ्या अर्थानें आपली सहधर्मचारिणी आहे. आपखुशीनें आलेल्या भाग्यास जर लाथाडलें तर प्रारब्ध मला हसणार नाहीं का? अशी सुवर्णसंधि पुनः पुनः का येत असते? ती संधि मीं जर साधली नाहीं तर मी मूर्खच म्हणायचा!

नोकरीमुळें पोलिसी वृत्ति आणि पत्नीमुळें पापभीरुपणा–दोन्हींचा संयोग त्यांच्या ठिकाणीं झाला होता. त्यामुळें दोन्ही वृत्तींचा संघर्ष होई. त्यांच्या मनांत विचाराचें वादळ उठलें कीं नेहमी त्यांचा जो क्रम असे, तोच त्यांनीं आज केला. त्यांनीं तांब्या उचलला आणि संडासाची वाट धरली. अर्ध्या पाऊण तासाचा त्यांचा हा नित्याचाच क्रम होता. मग अशा आणी-बाणीच्या वेळीं तर अधिकच वेळ लागे. परंतु बाहेर येतांना मात्र त्यांच्या मनानें अंतिम निर्णय घेतलेला असे, मग तो बरोबर असो कीं चुकीचा!

संडासाचा दरवाजा बंद झाल्याबरोबर चोर पावलांनीं त्यांची पत्नी अभयकुमारच्या खोलींत गेली व म्हणाली, "बाबाजी! मी जें सांगतें तें निमूटपणें ऐका! नाहींतर अनर्थ होईल! तुम्ही कोण आहांत तें मी जाणत नाहीं. पण जर का तुम्ही सुप्रसिद्ध क्रांतिकारक अभय-कुमार असाल तर याच पावलीं मार्गाला लागा. क्षणाचाहि विलंब केल्यास तुमची धडगत नाहीं. तुम्हांला पकडण्याची तयारी होत आहे. तुम्ही माझे अतिथिदेव आहांत. पण या वेळीं तुम्हांला ताबडतोब निघून जाण्यास सांगणं यांतच आदरातिथ्य आहे. तोच माझा धर्म आहे. आपण मला क्षमा करा. आणि जर का तुम्ही अभयकुमार नसून, खरोखरीच संन्यासी असाल तर कितीहि दिवस इकडे रहा. घर तुमचंच आहे." असें म्हणून ती त्याच क्षणीं निघून गेली.

आपला कमंडलु आणि काठी घेऊन अभयकुमार त्याच पावलीं बाहेर

निघाला. फौजदाराच्या पत्नीनें हळूच दरवाजा लावला आणि देवाचें नांव घेत आपल्या अंथरुणावर ती जाऊन पडली.

आणि तिकडे फौजदारसाहेब समोर उपस्थित झालेला पेंचप्रसंग सोडवण्यांत मग्न होते. दहा हजार रोख रुपये आणि सर्कल इन्स्पेक्टरकी यांचे हवेंतले किल्ले करण्यांत ते मग्न झाले! किल्ला जंगी असल्यामुळें वेळ लागणें साहजिकच होतें.

## ३५

दरोगासाहेबांना जेव्हां कळलें कीं पक्षी हातांतून निसटला, तेव्हां त्यांनीं खूप थैमान घातलें. परंतु त्यांना बायकोबद्दल संशय आला नाहीं हें नशीब! ते म्हणाले, " हे क्रांतिकारक मोठे धूर्त असतात. मी घरीं येतांच बच्चंजींनीं ताडलं की मी पोलिस ऑफिसर आहे म्हणून! आपण झोपायला जाणार इतक्यांत स्वारी फरारी झाली. पण कुठवर निसटणार? नागपूरकडे गेला तर तिकडे पोलिसांचा अगदीं सक्त पहारा आहे. मोठा आलाय् साधू बनून हिंडणारा! "

दरोगासाहेबांनीं क्षणहि गमावला नाहीं. त्यांनीं गणवेष चढवला. मोटार सायकल उचलली आणि अधिकाऱ्यांना रिपोर्ट करण्याकरितां ते नागपूरला रवाना झाले. त्यामुळें अभयकुमारच्या घराभोवतींचा पहारा अधिक कडक झाला. घुघरीकांडास दोन आठवडे झाले तरी त्याचा सूत्रधार अजून हातीं लागत नव्हता. यांत पोलिसांची नाचक्की होत होती. दिल्लीला जो साप्ताहिक रिपोर्ट जाई, त्यांत अभयकुमारला पकडण्याचे प्रयत्न चालू आहेत, याचा दोनदा उल्लेख करावा लागला. आतांहि जर सांपडला नाहीं तर पुन्हां तिसऱ्यांदा तोच उल्लेख करावा लागेल आणि यांत आपलें नाक खालीं होईल, अशी गव्हर्नरसाहेबांना धास्ती पडली होती. ते दररोज पोलिस डिपार्टमेंटला फोन करून अभयकुमाराच्या हालचालीचा मागोवा घेत; परंतु महादेव आणि सात-

पुढच्याच्या जंगलांत असेपर्यंत त्याचा कांहीं थांगपत्ता लागला नाहीं. त्या वरून हा इसम अतिशय धोक्याचा आहे याचा त्यांनीं कयास बांधला होता. दरोगासाहेबांनीं त्याच्या हालचालीची ताजी बातमी पुरवतांच पोलिसखात्यांत खळबळ माजली. ताबडतोब गव्हर्नरसाहेबांना कळविण्यांत येऊन नागपूरच्या आसपास असलेल्या पन्नास मैलांच्या टापूंतील पोलिसांना सावध करण्यांत आलें. तो रात्रीं घरीं पोहोंचेल म्हणून रात्रींचा बंदोवस्त जास्तच कडक झाला.

आपल्या स्वागताची एवढी जंगी तयारी होत आहे, याची अभयला कल्पनाहि नव्हती. इतक्या थाटामाटाच्या बादशाही स्वागताची कल्पना असती, तर आपल्या या वाढलेल्या महत्त्वाबद्दल त्याला अभिमान वाटला असता. माणूस स्वतःला नेहमीच कमी लेखत असतो. पण आपले शत्रू आपल्यापायीं आकाश पाताळ एक करीत आहेत असें कळलें म्हणजे स्वतः-बद्दल त्याच्या कल्पना वाढतात. अर्थात् अभयच्या दृष्टीनें त्याला कांहींच महत्त्व नव्हतें. पण आपल्या स्वैर संचाराचे दिवस आतां संपले याची मात्र त्याला खात्री पटली होती. जेलच्या विशाल फाटकाच्या आंत दडण्यापूर्वीं आपल्या प्रियजनांना डोळे भरून पाहण्याची त्याची इच्छा होती. ती पूर्ण झाली कीं नंतर कांहींहि सहन करण्याची त्याची तयारी होती. त्याची ही यःकश्चित् इच्छाहि ईश्वर पूर्ण करणार नाहीं काय?

मध्यरात्रीच्या सुमारास त्यानें दरोगासाहेबांचें घर सोडलें आणि आगगाडीच्या छोट्या लाईनच्या बाजूनें तो नागपूरकडे जाऊं लागला. पोलिसांच्या ससेमिऱ्यापासून वांचण्याकरितां पक्का रस्ता त्याला सोडावा लागला. कारण त्यावर पोलिसांच्या मोटारींची सारखी ये-जा असे.

ती कृष्णपक्षाची अंधारी रात्र होती. वाट उमगत नव्हती. पण अन्धारांत चालण्याचा अभयला सराव झाला होता. तो अनवाणी चालला होता. त्यामुळें काटेकुटे बोचत. पाय दुखावला जाई. कांट्यांना पुष्कळदां

अडकून त्याची कफनी फाटे. परंतु त्याचें या साऱ्या गोष्टींकडे लक्ष होतें कुठें ?

त्याच्या डोळ्यासमोर आतां फक्त दोन मूर्ती होत्या. विजया आणि आई ! मूर्तिमंत करुणा आणि वेदना ! या दोघीजणींनीं त्याच्यावर प्रेमाचा वर्षाव केला होता. त्याच्यासाठीं त्यांना किती कष्ट भोगावे लागले ! देशाचें पारतंत्र्य नाहींसें करण्याचें कंकण बांधलेल्या व्यक्तीशीं त्यांचें भवितव्य निगडित झालें. हें त्यांचें दुर्दैव ! या देशांत अशा कितीतरी स्त्रिया यापूर्वीं झाल्या, दीडशें वर्षांच्या गुलामीच्या काळांत कितीतरी हुतात्मे येथें झाले. मंगल पांडे ! झांशीची राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे यांच्यापासून तों चाफेकर, खुदीराम बोस, चंद्रशेखर आझाद, रामप्रसाद बिस्मिल, अशफाकुल्लाह, जतीनदास, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव इत्यादि देशासाठीं हुतात्मा होणाऱ्यांची एक परंपरा निर्माण झाली. त्यांचे मार्ग भिन्न असले तरी ध्येय एकच होतें. त्यांना एकच ध्यास, एकच धुंदी ! त्यांच्याहि स्त्रियांवर असाच धाय मोकलून रडण्याचा प्रसंग आला नाहीं का ? त्यांच्याच नेत्रांतील आंसवांनीं भारताच्या नद्यांना वेळोवेळीं पूर आले नसतील का ? त्यांच्या असीम दुःखांची कल्पना कोण करूं शकतो ? ज्यांच्या पुरुषांनीं स्वातंत्र्यदेवीला आपल्या उष्ण रक्ताचें अर्घ्यदान दिलें त्यांच्या उदात्त परंपरेंत विजया आणि आई, तुम्ही दोघी बसणार आहांत. तुमच्या या सौभाग्याचा मला हेवा वाटतो.

चालण्याच्या गतीबरोबर अभयच्या विचारांची गतीहि वाढत होती !

## ३६

दरोगासाहेब मोटार सायकलवर बसून रवाना होतांच त्यांची पत्नी देवघरांत गेली आणि देवाला नमस्कार करून म्हणाली, " हे ईश्वरा ! आज तूं आम्हांला कलंकापासून वांचवलंस ! नाहीं तर आमच्या घरीं आलेल्या अतिथीला घातक्यांच्या हातीं स्वाधीन करण्याचं पातक

आमच्या शिरावर आलं असतं! इतक्या विशुद्ध चारित्र्याच्या सुकुमार तपस्व्यामागें पोलिसांनीं हात धुऊन लागावं ही तुझी लीला विचित्र नाहीं का? स्वत:च्या घराला जो पारखा व्हावा, आपल्या देशांत जो बंडखोर ठरावा आणि आपल्याच लोकांनीं ज्याचा पाठलाग करावा, असं त्यानं केलंय् तरी काय? आपली मातृभूमि स्वतंत्र व्हावी, विदेशी राज्य नाहींसं होऊन लोकांना सुखानं राहतां यावं हाच त्याचा प्रयत्न आहे ना? गांधी महात्मा तरी हेंच सांगतात ना? या देशांतील प्रत्येक नागरिकाची इच्छाहि अशीच असणार! मग या सुकुमार तरुणाच्याच मागं सरकार हात धुऊन कां लागलं आहे? आणि इकडे आम्ही मात्र खुशाल ऐषआरामांत जीवन कंठीत आहोंत."

तिनें जपाची माळ काढली आणि अभयकुमाराच्या सुरक्षिततेसाठीं जप सुरू केला. त्या वेळीं रात्रीचे अडीच वाजले असतील.

दुपारीं दीडचा सुमार होता. कांहीं लोक कामांत तर कांहीं आरामांत मग्न होते. त्यामुळें सर्वत्र सामसूम होती. आई आणि विजया जेवणें आटोपून जरा विश्रांति घेत होत्या, तोंच बाहेरून हांक आली,

"साधूला भिक्षा वाढतां का आई?"

आवाज ऐकतांच आई चमकली. आवाज कांहींसा परिचित वाटला. हा भास तर नव्हे ना! त्या एकदम खडबडून उठल्या आणि बाहेर गेल्या.

समोर फाटके आणि मळके कपडे घातलेला एक साधू उभा होता. त्याच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते.

"कोण अभय?"

"होय आई! अगोदर मला आंत येऊं दे. बाहेर गुप्त पोलिस आहेत." अभयकुमार आंत येतांच आईनें दार बंद करून अभयला छातीशीं धरलें. दोघांचें हृदय पाण्याच्या रूपानें पाझरूं लागलें. विजया तें दृश्य पाहून द्रवली. अभयनें तिलाहि जवळ घेतलें.

तिघेंही कांही वेळ मूक होतीं. भावनावेगानें त्यांचा कंठ दाटला. एक अपूर्व समाधान आणि शांति त्यांना मिळाली. इतक्यांत बाहेर शिटीचा कर्णकर्कश आवाज आला.

"अगबाई! पोलिस! आतां काय करूं!"

"कांहीं नाहीं. पकडले जाण्यापूर्वी तुम्हांला एकदां डोळे भरून पाहिलं; आतां मला कशाचीहि पर्वा नाहीं. पोलिस आले नसते तरी मी स्वतःच ठाण्यावर जाणार होतों."

"निरर्थक पकडलं जाण्यांत काय फायदा?" विजयानें विचारलें.

"बाहेरचं काम आतां संपलं. शिवाय यापुढं कैद टाळणं अशक्यच आहे. मी कोणतंहि अश्लाघ्य कृत्य केलं नाहीं. इतक्यावर त्याचे जे काय परिणाम होतील ते भोगायला मी आनंदानं तयार आहें."

अभयचा तो दृढ निश्चय इतका सांसर्गिक होता, कीं त्या दोघींना आपल्या काळजीचा भार क्षणभर हलका झाल्यासारखें वाटलें. इतक्यांत बाहेर पोलिसांच्या मोटारीची घरघर ऐकूं आली. बंदुकी घेतलेल्या शिपायांच्या पांचसहा लॉऱ्या आल्या आणि त्यांनीं साऱ्या घराला वेढा घातला. अभयनें स्वतःच दार उघडलें.

हातांत पिस्तूल घेऊन डिप्टीसाहेब पवित्र्यांत उभे होते. अभय दिसतांच त्यांनीं त्याच्यावर झडप घातली.

"इतकं नाटक करण्याची काय जरूर तुम्हांला काय पाहिजे?" अभयनें शांतपणें विचारलें.

"हूं! म्हणे नाटक! तुमचंच नांव अभयकुमार ना?" डिप्टीसाहेबांनीं दरडावून विचारलें.

"होय!"

"तुम्ही या क्षणीं कैद झालांत. आतां आमच्याबरोबर चलावं लागेल. यापुढें कसे निसटतां ते पाहूं!"

"निसटण्याचा प्रश्नच कुठं येतो ? तुम्ही आतां आलां नसतां तर मीच स्वत: ठाण्यावर येणार होतों ! "

"बोलणं तर ऐका ! म्हणे ठाण्यावर आलों असतों ! खून पाडणारे कधीं ठाण्यावर येत असतात होय ? " डिप्टीसाहेबांनीं तिरस्कारयुक्त स्वरांत म्हटलें. 'ठाण्यावर यायचं असतं, तर आजपर्यंत पोलिसांच्या हातीं तुरी देण्याची काय गरज होती महाराज ! परंतु शेवटीं आमच्या तावडींत तुम्ही सांपडलाच ! " डिप्टीसाहेब ऐटींत म्हणाले.

आईनें विजयाला खूण केली. तिनें देवघरांतून कुरवंडीचें तबक आणलें.

' क्षणभर थांवा. मला याला जरा ओवाळूं द्या ! "

आईनें अभयला ओवाळून त्याच्या हातावर दहीं टाकलें. अभयनें आईला नमस्कार केला. आईचें मन गहिवरलें. तिच्या डोळ्यांतून आंसवें गळूं लागलीं. कांहीं अक्षता जवळच्या पोलिस ऑफिसरांवर फेकून ती म्हणाली,

"तुम्हीसुद्धां माझे देशबांधव आहांत. ईश्वर तुमचं कल्याण करो ! "

आशीर्वादाच्या या अमृतवर्षावानंतर ऑफिसरांना क्षणभर लाजल्यासारखें होऊन ते किंचित वरमले आणि म्हणाले, "चला साहेब, उशीर होतोय् !" अभयकुमारनें निघण्यापूर्वीं विजयाकडे पाहिलें. ती मूर्तिमंत करुणा बनून एका कोपऱ्यांत उभी होती. सारे प्राण डोळ्यांत आणून ती आपल्या पंचप्राणांना पहात होती. कारण पुन्हा तो कधीं दिसेल याची शाश्वति नव्हती.

तिची ती मूर्ति अभयच्या अंत:करणांत कायमची कोरली गेली. अभय मोटारींत बसला, तेव्हां त्याच्या मनांत एक विलक्षण समाधान विलसत होतें. विषाद नाहींसा होऊन त्याची जागा अपूर्व उल्हासानें घेतली होती. प्रियजनांची भेट झाल्यामुळें भवितव्याशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य त्याच्यांत आलें होतें.

मोटारीची घरघर सुरू झाली. त्याच वेळीं मेघांचा गडगडाट सुरू झाला व पावसाचे टपोरे थेंब पडूं लागले.

आपल्या अंतरांतली आग विझवण्याकरितां तर पावसाचें आगमन झालें नाहीं ना? अभयला वाटलें!

## ३८

अभयकुमारला पकडल्याची बातमी आय. जी. साहेबांनीं ताबडतोब गव्हर्नमेंट हाऊसमध्यें आणि साऱ्या वर्तमानपत्रांना कळवली. दुसऱ्या दिवशीं सकाळीं मोठमोठ्या शीर्षकांत बातमी झळकली—

भयंकर क्रांतिकारक पकडला गेला"! "आपल्या घरांत शिरत असतां पडलेला पोलिसांचा पोलादी पंजा!" "घुघरी-कांडाचा नेता कैद!" "पोलिसांचा चतुर चक्रव्यूह!!"

त्या दिवसांत पोलिसांचा वचक सर्वत्र होता. वर्तमानपत्रांवरहि जबरदस्त नियंत्रण होतें. साऱ्या बातम्या पोलिसांच्या दृष्टिकोणांतून दिल्या जात. पोलिसांच्या तारा सर्वत्र गेल्या. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यांत आल्या. शासनानें आज मोठा विजय संपादन केला होता. त्याचाच माज साऱ्यांना चढला होता.

## ३९

अभयच्या कैदेमुळें आईला जबरदस्त हादरा बसला. कारण अभयवर खुनाचा आरोप ठेवण्यांत आला होता. आन्दोलनाच्या प्रारंभींच तो सर्वांबरोबर पकडला गेला असता, तर त्यांना त्याचें कांहींच वाटलें नसतें. परंतु पोलिसांच्या भित्तिपत्रकांत जें कांहीं लिहिलें गेलें होतें आणि त्याला पकडण्यासाठीं सारें पोलिस खातें ज्या हिरीरीनें सरसावलें होतें तें पाहून त्यांना एकंदरींत लक्षण कांहीं ठीक वाटलें नाहीं. कांहीं तरी अशुभ होणार या आशंकेनें त्यांचें मन चरकलें व त्या

दिवसापासून त्यांनीं अंथरूण धरलें. अंथरुणावर पडल्या पडल्या त्यांचा सतत जप चालूं होता.

आजकाल विजयाचेंहि मौन असे. मनांतल्या मनांत सारें कांहीं निमूटपणें ती सहन करी. त्या दोघींमध्यें आजकाल क्वचितच संभाषण होई. परंतु दोघी परस्परांचें दु:ख पूर्णपणें जाणत होत्या. दीनबंधू त्यांच्याकडे नियमितपणें येत. खाप्री स्टेशनवर अभयचा निरोप घेतल्या-पासून शांताहि विजयाला भेटण्यास वरचेवर येई. ती आजकाल जणूं कांहीं यांच्या कुटुंबांतलीच बनली होती. ती येतांच तिच्या नांवा-प्रमाणें त्यांना शांति मिळे. अभयबद्दल तिच्या मनांत असलेली श्रद्धा त्याच्या प्रियजनांची सेवा करून ती व्यक्त करी.

## ४०

सीताबर्डीच्या पोलिस ठाण्यांत अभयची रवानगी झाली. एका दुर्गंधियुक्त गलिच्छ हवालतींत त्याला बंद करण्यांत आलें. झोपण्यासाठीं एक तरट आणि काळें कांबळें दिलें गेलें.

हवालतीचा दरवाजा बंद झाला. जंगी कुलुपें ठोकून पोलिस निघून गेले. अभयनें जमिनीला माथा टेकून प्रार्थना केली, " हे मातृभूमि ! माझं सर्वस्व तुला अर्पण आहे. भविष्यांत जें कांहीं भोगावं लागेल, तें सहन करण्याचं मला सामर्थ्य दे. तुझ्या मुक्ततेसाठीं मी प्राणहि अर्पण करावयास तयार आहें." आणि नंतर त्या घाणेरड्या जागीं तो इतका डाराडूर झोपला कीं त्याच्याकडे पाहून घोडे विकून निश्चिंतपणें झोपणाऱ्या सौदागराचीच आठवण यावी. पांच मिनिटांतच तो घोरूं लागला. पहारेकरीसुद्धां आश्चर्यचकित झाले. खुनाच्या आरोपाबद्दल धरला गेलेला इतका फक्कड आरोपी त्यांनीं पाहिला नव्हता.

सकाळीं आठ वाजेपर्यंतहि जेव्हां तो उठला नाहीं तेव्हां दरवाजा तून एका मोठ्या काठीनें टोचून टोचून त्याला उठवण्यांत आलें.

प्रार्तविधीसाठीं हातांत हातकड्या घालून त्याला बाहेर काढलें, तेव्हां सूर्याचा प्रकाश असह्य होऊन त्यानें डोळे बंद केले. आतां अंधारच त्याचा सखा बनला होता.

अकरा वाजतां काळ्या मोटारीनें बंदुकींच्या पहाऱ्यांत त्याला सेंट्रल जेलमध्यें नेण्यांत आलें. फाटकावर त्याच्या दाखल होण्याची नोंद करण्यांत आली. नांवगांव, अंगावरच्या खुणा, सारा तपशील नमूद झाला व जेलचें फाटक बंद झालें. त्यावेळीं बाहेर जाण्यासाठीं पुन्हां हें फाटक उघडेल कीं नाहीं, ही शंका त्याच्या मनांत चमकली. परिचित आणि ज्ञात विश्वांतून, एका अपरिचित, अज्ञात विश्वांत तो आला होता. एक भिंत, दुसरी भिंत, तिसरी भिंत ओलांडून फांशीघरांतल्या कोठडींत त्याला बंद करण्यांत आलें. हवालतीच्या गलिच्छ कोठडीपुढें ही जागा त्याला एखाद्या राजमहालासारखी वाटली. त्या लोखंडी गजांतून त्यानें बाहेर पाहिलें. सभोंवतालीं हिरवीं झाडें सळसळतांना दिसलीं. तीं दिसतांच तो प्रफुल्ल झाला आणि मग पाय ताणून जो झोपला तो ३६ तास! मध्यें एक दोनदां गटागटा पाणी पिण्यासाठीं उठला तेवढाच काय तो! त्याचें शरीर आणि मन–दोन्ही थकून चूर झालीं होतीं. आणि या छोट्याशा कोठडींत संत्र्यांच्या पहाऱ्यांत, त्याला इतकें सुरक्षित वाटलें कीं अनेक दिवसांनंतर त्याला निश्चितपणें झोंप लागली! त्याची ती झोप इतकी गाढ होती कीं जणूं कांहीं तुर्यावस्थाच! जेल सुपरिंटेंडेंट, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट, डी. आय. जी. इत्यादि मोठमोठे अधिकारी येत आणि त्याला पाहून जात. परंतु त्याला कशाचाहि पत्ता नव्हता! गव्हर्नरसाहेबांच्या बायकोनेंहि या प्रसिद्ध क्रांतिकारकाला पाहण्याची इच्छा दर्शविली. परंतु गव्हर्नरसाहेबांनीं नकार दिला.

एखाद्या अजब घरांतील प्राणी असावा, अशा प्रकारें सारे त्याला पाहत होते त्याच्या सुदृढ गोऱ्या शरीराला काळ्या दाढीमुळें रुबाबदारपणा आला होता. जेलचा पहारेकरी वॉर्डर म्हणूं लागला कीं कोणी महान

साधू जेलमध्यें आला आहे. आपणांस कोणी पाहत नाहीं याची खात्री करून त्यांच्यापैकीं एकानें तर त्याच्या कोठडीजवळ जाऊन तेथील भूमीला वंदन केलें !

## ४१

अभय तुरुंगांत गेला त्यावेळीं राजबंद्यांना वर्तमानपत्रें दिलीं जात नसत. पण साखरेच्या पुडचाबरोबर बांधलेलें एखादें वर्तमानपत्र गुप्तपणें येऊनच जाई. सारे राजबंदी त्या वर्तमानपत्रावर असे तुटून पडत कीं जणूं काय प्रेमपत्रच ! त्यावेळीं तुरुंगातील नियम फारच कडक होते. परंतु तुरुंगांतील वॉर्डर आणि कामकरी लोकच नियम मोडण्यांत मदत करीत. त्यांना राजबंद्यांबद्दल सहानुभूति असे. शिवाय कांहीं राजबंदी धनिक होते. त्यांची सेवा केल्यास मेवा मिळत असे. जो जितका जास्त धनिक तितकी जास्त त्यास सेवा लागे. कारण शरीरानें तो तुरुंगांत असला तरी त्याचें मन संसारांत गुंतलेलें असे व क्षणोक्षणीं बाह्य जगाची त्यास आठवण येई. बाह्य जगाच्या बारिक सारिक गोष्टींची बित्तंबातमी मिळाल्याखेरीज त्याचें मन स्वस्थ राहात नसे. अशा लोकांना येणाऱ्या चिठ्ठ्या रोज चालूं असत. अर्थात अशा तऱ्हेचा पत्रव्यवहार महाग पडे तो भाग वेगळा ! पण त्यांना पैशाची पर्वा करण्याचें कारणच नव्हतें. त्यांचें दुःख इतकेंच होतें कीं त्यावेळीं बाहेर व्यापार आणि काळ्या बाजाराच्या मार्गानें लक्ष्मीला नुसता पूर आला असतांना ते आंत कोंडले गेले होते. यावेळीं त्यांची सुटका झाल्यास ते हां हां म्हणतां लखपति बनूं शकतील. आणि मग आन्दोलनास हजारों रुपयांची मदत करूं शकतील. लढाई बंद होऊन केव्हां एकदां तडजोड होते इकडे त्यांचें सारें लक्ष वेधलेलें असे. त्यांच्या सुटकेचें भविष्य वर्तवून त्यांचे सहराजबंदी त्यांच्याकडून हलवापुरीची मेजवानी झोडीत. अस्सलाबरोबर नकलीहि विकलें जातें त्याप्रमाणें खऱ्या देशभक्तांबरोबर असे बेगडी देशभक्तहि बरेच पकडले गेले होते.

जेलमध्यें असेपर्यंत जणूं काय जीव जातो इतके ते घावरेघुबरे होत. परंतु जर का एकदां सहीसलामत सुटका झाली तर शुभ्र खादीहि अगोदर यांच्याच अंगावर दिसे. परीटघडीची गांधी टोपी हे अशा दिमाखानें घालीत कीं जणूं सारी क्रांति यांच्याच पराक्रमाच्या जोरावर झाली ! परंतु त्यांना जो तुरुंगवास घडला होता, तो त्यांच्या इच्छेमुळें नसून पोलिसांच्या विशेष सावधगिरीमुळें घडला होता. असे लोक आंत राहिले काय किंवा बाहेर राहिले काय, त्याचा देशाच्या क्रांतीवर काय परिणाम होणार होता?

परंतु सुटकेनंतर आपल्या केसालाहि धक्का न लागतां आपण बचावलों म्हणून त्यांना हायसें वाटे. जबरदस्तीनें त्यांच्यावर लादल्या गेलेल्या त्यागाची किंमत ते अशा हिरीरीनें वसूल करीत कीं सांगतां सोय नाहीं. खऱ्या क्रांतिकारकांचें तेजहि त्यांच्यासमोर फिकें पडे. रिकाम्या भांड्याचेच निनाद ते !

परंतु यापेक्षां निराळ्या कार्यकर्त्यांचाहि एक वर्ग होता. पुढचें मागचें कांहींएक न पाहतां या लोकांनीं आंदोलनांत उडी घेतली होती. त्यांच्या गणतींत हिशोब नांवाची चीज नव्हती. प्रेमाच्या साम्राज्यांत लाभ आणि हानीचा विचार केला जात नाहीं. मग तें प्रेम व्यक्ति, देश, धर्म किंवा ईश्वर कुणाच्याहि ठायीं असो, प्रेमाच्या साम्राज्यांत जे विहार करतात ते कधीं अगोदर गणित करीत बसतात का ? झांशीच्या राणीनें जर असलें गणित केलें असतें तर तिनेंहि इतर राजांप्रमाणें इंग्रजांचे आश्रित होऊन सुखानें राज्य केलें असतें. परंतु असल्या हिशोबाची राखरांगोळी करूनच मग ती आपल्या सर्वस्वाचा होम करूं शकली. मीराबाईनेंहि आधीं राजवैभवावर पाणी सोडलें व नंतरच गिरिधराच्या शोधांत ती निघाली. सॉक्रेटिसनें आपल्या आत्म्याची हांक ऐकण्याकरितां अधःपतित झालेल्या त्या युगाची विचारसरणी जुमानली नाहीं व खुशाल विषाचा पेला प्राशन केला. आपल्या क्षणिक भौतिक सुखाचाच विचार केला असता तर येशू सुळावर चढला असता का ?

काळाच्या पडद्यावर ज्यांचीं पावलें उमटलीं त्यांनीं आपल्या जीवनाच्या जमाखर्चाची कधीं खतावणी केली होती का ?

त्यांच्या अंतरात्म्याची उत्कट हांक, त्यांच्या ध्येयाचें आव्हान त्यांना पुरेसें होतें. त्यासाठींच त्यांनीं जन्म घेतला आणि धूमकेतूप्रमाणें क्षणाकरितां ते चमकले. आपल्या दिव्य ज्योतीनें साऱ्या जगाला प्रकाशित करून ते अंतर्धान पावले. त्यांची केवळ स्मृतीच शतकानुशतकें साऱ्या विश्वास प्रेरणा देत राहिली. ते एक ठिणगी घेऊन आले आणि तींत स्वत:ला भस्म करून निघून गेले. मरणानें ते अमर झाले. अशांची परंपरा या जगांत नेहमीं अखंड राहिली म्हणूनच हें जग टिकलें आहे. नाहीं तर केव्हांच प्रलय झाला असता !

अशा दिव्य धूमकेतूंनीं ऑगस्ट क्रांतीच्या कितीतरी युवकांना प्रेरणा दिली होती. त्यांपैकीं ज्यांचा राजकारणाशीं एरव्ही कांहीं संबंध नव्हता असेहि कांही विद्यार्थी, अध्यापक, कामकरी, सर्व साधारण कार्यकर्ते त्या क्रांतींत सामील झाले होते. दीनबंधूसारखे स्वयंसेवकांच्या श्रेणीचे लोकहि त्यांत होते. अशा वर्गांत स्त्रियांचा भरणा अधिक होता. त्यांची निष्ठा आणि तळमळ पराकोटीची होती. त्यांच्यांतील तेज आणि पावित्र्य अद्वितीय होतें. प्रौढ माणसें त्यांना सल्ला देत कीं– "ही वेळ मोठी बिकट आहे. पुढचा मागचा नीट विचार करून मगच पाऊल उचला." परंतु त्यांच्या ओठावर एकच गीत असे–

"सरफरोशी की तमन्ना अब हमारे दिलमें है।
देखना है जोर कितना बाजुए कातिलमें है ।। "

(आत्माहुति देण्यासाठीं आम्ही आतुर झालों आहोंत; आतां फक्त मारणाऱ्याच्या बाहूंत किती शक्ति आहे तेंच बघायचें आहे).

## ४२

प्रौढ आणि शहाणीं सुरतीं माणसें त्यांना सांगत, " मूर्खांनो ! तुमची ही गद्धेपंचविशी आहे. म्हणून तुम्ही ही घोडचूक करीत आहांत !

जरा जास्त पावसाळे जाऊं द्या कीं आपसुख आमच्यासारखे पुढचा मागचा विचार करून वागाल."

अभयकुमारला पकडून तुरुंगांत आणल्याबरोबर त्याच्या आगमनाची बातमी सर्वत्र पसरली. सेंट्रल जेलमध्यें त्यावेळीं एकंदर बाराशें राजबंदी होते. सारा तुरुंग त्यांनींच भरल्यामुळें दीर्घ मुदतीची शिक्षा झालेले किती तरी गुन्हेगार सोडले गेले. "अ" वर्गाच्या राजबंदींची बरॅक फांशी-घरालगतच होती. परंतु दोन्हींमध्यें इतक्या जंगी भिंती होत्या कीं इकडचा आवाजहि तिकडे जाणें कठिण होतें. फक्त सकाळ संध्याकाळची प्रार्थना मात्र कानावर पडे सकाळची प्रार्थना जास्त स्पष्ट ऐकूं येई. त्यावेळीं संत विनोबा त्याच जेलमध्यें होते. त्यांच्या निर्देशनाखालीं म्हटली जाणारी प्रार्थना अभयकुमाराला अतिशय मंगल व शांतिदायक वाटे.

त्याच्या कैदेनंतर तिसऱ्या दिवशीं वॉडरनें एक चुरगळलेला कागद त्याच्या हातीं हळूंच कोंबला! कागद नीट करून अभय वाचूं लागला. " हे-वीरशिरोमणी, आम्ही तुमचं स्वागत करतों. आपल्या त्यागावर आणि तपस्येवर आम्ही मुग्ध आहोंत. आपल्या सुखदु:खांत आम्ही आपले सहभागी आहोंत. आपल्या थोरवीबद्दल आम्ही सारे आपणांस श्रद्धापूर्वक वंदन करतों."

आपले,

सेंट्रल जेलचे राजबंदी

कागदाच्या या छोटयाशा कपटयानें अभयकुमारास अतीव सुख मिळालें आपण एकाकी नाही, हें जाणून त्याला आनंद झाला. एकले-पणाची भावना मनुष्यास कमकुवत बनवते. किती तरी अज्ञात डोळे आपणांस न्याहाळत आहेत, किती तरी अज्ञात हृदयांची स्नेहभावना आणि आशीर्वाद आपल्याबरोबर आहेत; इतका मोठा निधि असल्यावर आनंदाला काय तोटा? या विचारानें अभय हर्षित झाला. त्याची ती मस्ती पाहून वॉर्डर आणि अधिकारी विस्मयानें गुंग झाले.

तुरुंगांत आल्यानंतर एका आठवड्यांतच अभयकुमाराविरुद्ध खटला सुरू झाला. खास सरकारी गॅझेट निघालें व श्री. चौधरी, स्पेशल मॅजिस्ट्रेट म्हणून नियुक्त करण्यांत आले. ह्यांच्याच मुलांना एके काळीं अभयची शिकवणी होती. तुरुंगांतल्या एका खोलींतच कोर्ट भरे. पोलिस, सरकारी वकील, त्यांचे साक्षीदार, सारा सरंजाम आधीपासूनच तयार होता. नाटकाच्या पुढील अंकाची पूर्वतयारी आगाऊच जय्यत करण्यांत आली होती. अभय पकडला जाण्याच्या पहिल्या अंकाचाच काय तो अवकाश होता. त्याखेरीज पडदा वर जाणें अशक्य होतें. परंतु एकदांचा तो पकडला गेला आणि लगेच नाटकाचा अंक सुरू झाला.

अभयवर ठेवण्यांत आलेले आरोप अतिशय गंभीर स्वरूपाचे होते. घुघरीचे सर्कल इन्स्पेक्टर लाला बाबूराम आणि मुन्शी मुन्नूखां यांच्या हत्येसाठीं अज्ञ जनतेला भडकवण्याचा आरोप तर त्याच्यावर होताच. परंतु मुंबईहून आणलेलीं पत्रकें वांटलीं गेल्यानंतर जी कांहीं हिंसा घडली त्या सर्वांबद्दल तोच जबाबदार धरण्यांत आला. अडाणी जनतेला भडकविणाऱ्या नेत्याचा अपराध भयंकर स्वरूपाचा गणला जातो. इतक्या आरोपांपैकीं एखादा आरोप जरी सिद्ध झाला तरी फांशीची शिक्षा अटळ होती. आणि त्याच्यावर तर थोडे ना थोडके नव्हे तीन चार आरोप होते. म्हणून या खटल्यास प्रथमपासूनच खळबळजनक आणि गंभीर स्वरूप प्राप्त झालें होतें. कायद्याप्रमाणें त्याला अन्तिम दंडच दिला जाईल हें जवळ जवळ निश्चितच होतें.

खटला सुरू होतांच साऱ्या शहरांत आणि प्रांतांत घालमेल सुरू झाली. आरोपीचा बचाव करण्यासाठीं वकिलांच्या मोठमोठ्या कमिट्या स्थापन झाल्या. फंड जमविण्यांत आला. अनेकांनीं गुप्तपणें देणग्या दिल्या. अभयकुमारचें वकीलपत्र मिळावें म्हणून वकील आणि बॅरिस्टर यांच्यांत

जणु कांहीं स्पर्धाच माजली. खूप धांवपळ सुरू झाली. पण या सर्व गोष्टींचा अभयकुमारवर अजिबात परिणाम झाला नाहीं. बचावासाठीं वकील देण्यास त्यानें नकार दिला. तो जन्मजात सत्याग्रही होता. जें काय सत्य आहे तें कबूल करायचें आणि जें असत्य आहे तें नाकारायचें असा त्यानें निश्चय केला. कारण जें केलें त्यासाठीं बचाव देण्याचें प्रयोजनच नव्हतें आणि जें नाहीं केलें, त्यासाठींहि बचावाची काय गरज होती ?

वकील लोक म्हणूं लागले, "तुम्हांला कायद्यांतील खाचाखोंचा ठाऊक नाहींत. त्यामुळें तुमची केस बिघडण्याची शक्यता आहे. एखादे वेळीं प्राणदंडापर्यंतहि मजल जाऊं शकते. म्हणून खटल्याच्या बाबतींत सर्व तऱ्हेची सावधगिरी बाळगणं अवश्य आहे. आम्हांला तुमच्यापासून कपर्दिकहि फी नको. सारा खर्च फंडांतून होईल."

अभय म्हणाला, "कायद्याच्या पुस्तकांतहि सत्यसंशोधनाचाच मार्ग असणार ना? शिवाय पुस्तकं वाचूनच सत्य कळतं असं नव्हे. साऱ्या घटनांचा नीट तपास करून सत्य शोधून काढणं हें न्यायालयाचं कर्तव्य आहे. मीहि या बाबतींत अवश्य ती मदत करीन."

"पण साहेब! हा राजकीय मामला आहे हें आपण जाणतांच! इंग्रजी राज्याच्या विरोधाचं आपण कंकण बांधलं आहे. आणि हें राज्य, हीं न्यायालयं सारीं त्यांचीं आहेत. इतर बाबतींत ते कितीहि न्यायप्रिय म्हणवत असले, तरी राजकीय बाबतींत अगोदर साम्राज्यवादी नीति आणि मगच न्याय! युद्धकाळांतील संकटपरंपरा आणि जर्मनांचा बांबवर्षाव अशा आणीबाणीच्या वेळीं भारताच्या नेत्यांनीं आपल्या पाठींत खंजीर खुपसला आहे अशी त्यांची कल्पना आहे. यावेळीं त्यांचा 'मूड' आणि समतोलपणा पार गेला आहे. म्हणून कायद्याच्या मदतीची मी शिफारस करीत आहे."

"आपल्या भावनांबद्दल मला पूर्ण आदर आहे. हें आपण

माझ्या कल्याणासाठींच सांगतां हें मीं जाणतों. कायद्यावर असणारा आपला विश्वासहि आपल्या दृष्टीनं वाजवी आहे. परंतु इतक्या मोठ्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पार्श्वभूमीवर चालणाऱ्या या खटल्यापुढें कायद्याचा तरी काय पाड ? मी जें कांहीं केलं तें माझ्या अंतःप्रेरणेनुसार ! कायद्याचीं पुस्तकं वाचून नव्हे. जें मला सत्य, शिव, आणि सुंदर वाटलं त्याचीच मीं उपासना केली. ही प्रेरणा मला प्रत्यक्ष जीवनांतून मिळाली, पुस्तकांतून नव्हे. इतर खटल्यांच्या बाबतींत आपले कायदे धन्वन्तरी-सारखे रामबाण ठरूं शकतात. पण या खटल्याच्या बाबतींत नव्हे. आपण मला क्षमा करा आणि मला सर्वस्वीं माझ्या दैवाच्या हवालीं करा. आपण ज्ञानवृद्ध, वयोवृद्ध आहांत. सत्याच्या मार्गावर मी शेवट-पर्यंत अढळ राहावं असा आशीर्वाद आपण मला द्या."

बॅरिस्टरसाहेबांनीं आपल्या खिशांतून रुमाल काढून घाम पुसला व पुस्तक मिटून बाजूला सारलें. असा आरोपी त्यांनीं जन्मांत पाहिला नव्हता. एक निश्वास टाकून ते म्हणाले, "जशी आपली मर्जी !"

## ४४

अभयनें बचावास नकार दिला ही बातमी सर्वत्र पसरली. आतां आंदोलन निवळत चाललें होतें, म्हणून वर्तमानपत्रांवरील नियंत्रणहि सैल झालें व तुरुंगांत राजबंदींना वर्तमानपत्रें मिळूं लागलीं. या खटल्याच्या बातम्या आगाखान पॅलेसमध्यें आणि अहमदनगरच्या किल्ल्यांत वाचल्या जाऊं लागल्या. कायदेशीर सल्ला नाकारतांना अभयनें जे मुद्दे मांडले त्यांचीहि वर्तमानपत्रांतून चर्चा झाली. हा खटला विचित्र आणि असामान्य असल्याची चर्चा सगळीकडे होऊं लागली.

बरोबर साडे दहा ते साडेचार कोर्ट बसत असे. फक्त मध्यें अर्ध्या तासाची विश्रांति असे तेवढीच काय ती ! अभयकुमाराच्या हातांत हातकड्या असून पोलिस त्याला जखडून असत. त्याची दाढीहि

अजून तशीच होती. पांढऱ्या शुभ्र खादीचा कुडता आणि लुंगीप्रमाणें लपेटलेलें धोतर! तो गुन्हेगारांच्या कठड्यांत येतांच सगळीकडे निस्तब्ध शांतता पसरे. त्याच्या आकर्षक आणि प्रभावशाली व्यक्तित्वासमोर सारें न्यायालय निस्तेज दिसे. त्याचा चेहरा पूर्णपणें निर्भय व निश्चित असे.

बचाव समितीतर्फे चार वकील आणि स्थानिक दैनिकांचे बातमीदार खटल्याच्या वेळीं हजर असत. अभयच्या कुटुंबीयांनीं हजर राहण्याची परवानगी मागितली, ती नाकारण्यांत आली. एका परीनें हें बरें झालें असें अभयला वाटलें.

दहा दिवसांत सरकारकडून ७७ साक्षीदार सादर केले गेले. त्यांचें नांव गांव सारा तपशील लिहिला जाई. त्यांना पढविण्यांत पोलिसांनीं खूप परिश्रम घेतले होते. खटला जिंकण्यासाठीं पोलिस खात्याने जिवाचें रान केलें होतें. अभयच्या वतीनें प्रतिप्रश्न विचारण्यास कुणीहि नव्हतें. म्हणून साक्षीदार भराभर उरकले. प्रत्येकाची साक्ष आपटल्यावर अभयला विचारण्यांत येई,

"तुम्हांला या साक्षीदारास कांहीं विचारायचं आहे काय?"

"नाहीं; त्याची सत्यासत्यता पडताळून पाहण्याच्या दृष्टीनं आपणांसच त्यांना कांहीं विचारायचं असल्यास विचारा; मला जें काय सांगायचं आहे तें शेवटीं सांगेन!"

अदालतीतर्फे कांहीं ठराविक चाकोरीचे प्रश्न विचारले जात. एरव्ही साक्षीदार झटपट उरकले जात. सारे साक्षीदार संपल्यावर आरोपीच्या वक्तव्यासाठीं पांच दिवसांनंतरची तारीख देण्यांत आली.

न्यायालयानें विचारलें–

"तुम्हांला लिहिण्यासाठीं लेखनसामुग्री किंवा इतर पुस्तकांची गरज असल्यास सांगा. तुम्हांला अवश्य तें देण्यांत येईल."

"माझ्या घरून गीता, रामायण आणि गांधींची आत्मकथा मागवून द्यावी."

त्याची इच्छा लगेच पूर्ण करण्यांत आली.

## ४५

ठरलेल्या वेळीं आरोपीच्या वक्तव्यासाठीं न्यायालय सुरू झालें. अभय आपल्या वक्तव्यांत काय म्हणतो हें जाणण्याची सर्वत्र उत्सुकता होती. कारण त्यानें वकिलांची मदत अजिबात घेतली नव्हती. कायद्याचेंहि त्यास ज्ञान नव्हतें. अज्ञानामुळें त्याच्या तोंडून एखादी गोष्ट अशी न निघो कीं ज्यामुळें फांशी अटळ होईल, याची लोकांना धास्ती पडली. त्याचें वक्तव्य सुरू झालें आणि कोर्टांत निःस्तब्ध शांतता पसरली. एखाद्याचा निःश्वासहि स्पष्ट ऐकूं यावा इतकी शांतता सगळीकडे होती. फक्त घड्याळाची होणारी टिक् टिक् क्षणोक्षणीं जाणाऱ्या काळाची आठवण करून देत होती.

अभयचें नांव गांव विचारल्यावर कोर्टानें प्रश्न केला,

"तुमचा धंदा काय?"

"युनिव्हर्सिटींत रीसर्च स्कॉलर होतों."

"उपजीविकेचं साधन?"

"कांहीं शिकवण्या करीत होतों. आईहि अधून मधून कांहीं काम करते."

"तुम्ही या आंदोलनांत भाग घेतला होता का?"

"होय!"

"एखाद्या राजकीय पक्षाचे तुम्ही सभासद आहांत का?"

"नाहीं."

"मग तुम्ही आंदोलनांत उडी कां घेतली?"

"हें आंदोलन कोणत्याहि विशिष्ट पक्षाचं नसून ही जनतेची क्रांति आहे. जनतेचे पुढारी महात्मा गांधी यांनीं या आंदोलनाचं नेतृत्व केलं. राजेमहाराजे, विद्यार्थी, सरकारी, नोकर, सर्वांनाच त्यांत भाग घेण्यासाठीं त्यांनीं आवाहन केलं. यांत भाग घेणं हें प्रत्येक देशप्रेमी भारतीयाचं कर्तव्य आहे, असं वाटल्यामुळं मीं यांत उडी घेतली."

"जर गांधीजींनीं या आंदोलनाचं नेतृत्व केलं तर मग या आंदोलनांत हिंसा कशी काय घडली? ते तर अहिंसेचे पुरस्कर्ते आहेत ना?"

"होय, गांधीजींनीं कधींहि कुणाला हिंसा करण्यास सांगितलं नाहीं. हिंसा हें दुर्बलांचं शस्त्र आहे असं ते मानतात. ते दुर्बल नसल्यामुळें हिंसेची कांस धरण्याचं त्यांना कांहींच कारण नाही."

"मग जी इतकी हिंसा घडली तिचं कारण काय?"

"ब्रिटिश सरकारनं देशांत जे हिंसापूर्ण निर्घृण अत्याचार केले त्याची ही प्रतिक्रिया होती."

"म्हणजे तुम्हांला म्हणायचंय् काय?"

"हेंच कीं हें युद्ध म्हणजे विश्वव्यापी हिंसेचीच एक आवृत्ति होय. युद्धाच्या मदतीसाठीं भारतांत जे प्रयत्न झाले ते हिंसापूर्ण होते. सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर ते केले गेले, जनतेच्या जोरावर नव्हे. जनता त्याखालीं भरडली जात आहे. या युद्धामुळं जगांत मोठी क्रांति घडत आहे. साम्राज्यांची उलटापालट व नवी घडामोड होत आहे. परंतु भारतीय जनतेला मात्र त्यांत कांहीं एक करतां येत नव्हतं. उलट त्यांना लाचार बनवून बाजूला फेकण्यांत आलं. राष्ट्रीय भारताच्या आत्म्यास हा अपमान असह्य झाला. अशा विस्फोटक अवस्थेंत साऱ्या भारताला लोटण्याची जबाबदारी ब्रिटिश शासनाची आहे."

"परंतु या खटल्याशीं त्याचा काय संबंध?"

"त्यामुळें या क्रांतीची पार्श्वभूमि आपणांस समजेल आणि न्याय-अन्याय ठरवणं आपणांस सुकर होईल. आरोपी या नात्यानं ही सर्व

बाजू आपणांसमोर ठेवणं हें मी माझं कर्तव्य समजतों. त्याचा स्वीकार करणं न करणं आपल्यावर अवलंबून आहे. परंतु त्यापूर्वी सारं कांहीं स्पष्टपणें सांगण्याची सवलत आपण मला द्याल अशी आशा आहे."

"अवश्य! आपणांस ती सवलत मिळेल."

"धन्यवाद! मला असं म्हणायचं आहे कीं ब्रिटिश शासनानं या देशाचं वातावरण अस्वाभाविक, अमानुष आणि हिंसामय बनवून टाकलं. अशा वातावरणांत देशांत जी कांही हिंसा घडली, तीहून अधिक कशी घडली नाहीं हेंच आश्चर्य आहे.

स्वातंत्र्य आणि लोकशाही यासाठीं आम्ही लढत आहोंत अशी इंग्रजांनीं घोषणा केली. भारतीय नेते म्हणाले, 'तुमची घोषणा खरी असेल तर भारताला स्वातंत्र्य देणं ही तुमच्या हातची गोष्ट आहे. त्याच्या-करितां युद्धाचीहि जरूर नाहीं. भारताला स्वातंत्र्य दिलं तर तुमच्या वाणींत आणि कृतींत मेळ आहे, हें जगासमोर सिद्ध होईल. आणि मग भारत तुमच्या खांद्याशीं खांदा भिडवून युद्धांत साथ देईल व लढाईंत तुमचं पारडं वजनदार होईल.' पण इंग्रजांना हें पटलं नाही. त्यांची नियत साफ नव्हती. इंग्रजांचं वरून बोलणं एक आणि वागणं दुसरं. संकट अगदीं गळ्यापर्यंत आलेल्या अवस्थेंतहि जर तोंडांतून रामनाम निघत नाहीं, तर उद्या शिरसलामत सुटका झाल्यावर तुमचा काय भरंवसा? म्हणजे तुमच्या या साऱ्या घोषणा पोकळ असून अर्थशून्य आहेत असा याचा सरळ अर्थ निघतो. अशा घोषणांवर कसा भरंवसा ठेवायचा?

ही परिस्थिति असह्य असल्यामुळें ती ताबडतोब बदलणं अवश्य होतं. व त्याकरितां थांबणं अशक्य होतं. गांधीजीही यापुढें थांबण्यास तयार नव्हते. जगांत सर्वत्र हिंसेचं थैमान चालूं होतं. विराट् स्वरूपांत नरसंहार चालूं होता. हें सत्र असंच चालूं राहिल्यास जगांतून साऱ्या मानवतेचं उच्चाटन होईल अशी भीति त्यांना वाटली. त्यापासून वांचण्या-

साठीं ईश्वरानं त्यांना अहिंसेचा मार्ग दाखवला. अहिंसेचे पुजारी या नात्यानं केवळ भारताचे नव्हे तर साऱ्या विश्वाचे ते सेवक आहेत. ही आपल्या कसोटीची वेळ आहे, असं त्यांना वाटलं. सगळीकडे हिंसेची आग भडकली असतां, अहिंसा पणास लावण्याचा हाच क्षण आहे असं ते म्हणाले. मुंबईच्या भाषणांतहि त्यांनीं हेंच सांगितलं, कीं " मी यावेळीं अहिंसा कसोटीला लावली नाहीं तर देवाच्या घरीं मला त्याचा जाब द्यावा लागेल. मी तुला अहिंसेचा परिस दिला असतां तूं योग्य वेळीं त्याचा कां उपयोग केला नाहींस ? असं देव विचारील त्यावेळीं मी काय उत्तर देऊं ? " म्हणून यावेळीं प्राणांचा होम करूनहि अहिंसा पणास लावण्याचं त्यांनीं ठरवलं. अहिंसा त्यांच्या जीवनाचा धर्म बनला. केवळ भारताच्या नव्हे तर साऱ्या विश्वाच्या कल्याणासाठीं त्यांनीं अहिंसेची कांस धरली.

ते जर अहिंसेचे पुजारी म्हणवतात, तर इतक्या मोठ्या प्रमाणावर भारतांत हिंसा घडली तरी कशी, आणि चौरीचौराच्यावेळीं ज्याप्रमाणें त्यांनीं आंदोलन परत घेतलं त्याप्रमाणें यावेळीं कां परत घेतलं नाहीं ? यावेळच्या हिंसेची जबाबदारीहि त्यांच्यावर येत नाहीं का, असा कोणी सवाल करील. परंतु ही विचारसरणी सदोष आहे. कारण ब्रिटिश शासनानं अहोरात्र हिंसेस चालना देऊन द्वेष आणि संघर्ष निर्माण करावा आणि त्याचं खापर मात्र गांधींच्या माथीं फोडावं हा कुठला न्याय ? गांधीजींचं म्हणणं ब्रिटिशांनीं मान्य करून त्याप्रमाणें आचरण केलं असतं, तर गांधीजींनीं साऱ्या देशास आटोक्यांत ठेवलं असतं. दक्षिण आफ्रिकेंत रंगरूटांची भरती त्यांनीं केली खरी, पण परिणाम काय झाला तर दंगा ! दुसरं कांहीं नाहीं. अशा परिस्थितींत त्याच्यावर जबाबदारी कशी येऊं शकणार ? त्यांच्या अहिंसेमुळेंच याहून जास्त व्यापक आणि भीषण स्वरूपाची हिंसा घडली नाहीं हें नशीब समजा. पण आपण मात्र हिंसेच्या बाबतींत कांहींहि करायचं शिल्लक ठेवलं नाहीं."

"ऑर्डर ! ऑर्डर ! अशा तऱ्हेचे रिमार्क ( शेरा ) न्याया-

अनुक्रम ३८६२७ वा. वा. दिनांक २००

लयावर करणं योग्य नव्हे."

"छे! छे! न्यायालयावर शितोडे उडवण्याचा माझा अजिबात मानस नव्हता. मी केवळ ब्रिटिश सरकारला उद्देशून बोलत होतों. "आपण" म्हणजे सरकार एवढंच माझं म्हणणं!"

"ठीक आहे." असें म्हणून मॅजिस्ट्रेटसाहेब लिहिण्यांत गढले. अभयचें सुरू असलेलें वक्तव्य ते शब्दशः लिहीत होते; त्यामुळें बराच वेळ लागत होता. पोलिसवाले म्हणत, "या साऱ्या गोष्टींचा इकडे काय संबंध?" त्यांच्यापैकीं कांहीं जांभया देऊं लागले.

न्यायालयानें मध्येंच विचारलें,

"या आंदोलनांत भाग घेण्यांत तुमचा काय उद्देश होता?"

"आपल्या देशाचं स्वातंत्र्य!"

"स्वातंत्र्य म्हणजे?"

"म्हणजे परकीय शासनापासून मुक्तता."

"एकूण तुम्हांला इंग्रजी शासन हटवायचं आहे."

"अवश्य."

पोलिसवाल्यांच्या कंपूमधून हातकड्यांचा आवाज येऊं लागला. आतां चांगला कचाट्यांत सांपडला, असें त्यांना सूचित करायचें होतें.

"कोणत्याहि मार्गानं?'

"स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं कोणताहि मार्ग उचित आहे."

"हिंसेचाहि?"

"अगदीं अपरिहार्य झालं तर हिंसाहि. अमेरिका हिंसेनं स्वतंत्र झाली. आयर्लंडहि सशस्त्र क्रांति करूनच स्वतंत्र झालं. तरी या देशाचं स्वातंत्र्य ब्रिटिश सरकार आज मान्य करतंच ना? गुलामगिरीपेक्षां अहिंसा पतकरली!"

"एकूण तुम्ही हिंसेवर विश्वास ठेवतां तर!"

"मुळींच नाहीं...... मीं जें म्हटलं त्याचा असा अर्थ होत नाहीं.

मला असं म्हणायचं होतं कीं अमेरिका आणि आयर्लंड हिंसेच्या मार्गानं स्वतंत्र झाले म्हणून ते कांहीं दोषी नाहीं."

"– आणि भारतानंहि स्वातंत्र्यासाठीं हिंसेचा उपयोग केला तर कांहीं गैर नाहीं, असाच याचा अर्थ निघतो ना ?"

"परंतु भारताला अमेरिका आणि आयर्लंडचा मार्ग स्वीकारण्याची गरजच काय ? भारताला जसे गांधी लाभले आहेत तसे त्या देशांना लाभले नाहींत. आणि गांधींचा अहिंसेचा मार्ग हिंसेच्या मार्गापेक्षां लाखपटीनं जास्त समर्थ असल्याबद्दल माझी खात्री आहे."

"एकूण असं तुम्हांला म्हणायचं होतं तर?" न्यायालय म्हणालें.

पोलिसचे आतांपर्यंत उभे असलेले एकदोन इन्स्पेक्टर खिडकीच्या चौकटीवर जाऊन बसले.

"गांधीजींच्या तत्त्वज्ञानावर माझा पूर्ण भरवंसा आहे. आणि अहिंसेच्या मार्गानेंच भारत लवकर स्वतंत्र होऊं शकेल, याबद्दल मला संदेह नाहीं. भारताची विशिष्ट जीवनपरंपरा, विचारप्रणाली आणि आध्यात्मिक बैठक या सर्वांचा विचार केला असतां अहिंसेनंच स्वातंत्र्याची किमया घडण्याची शक्यता आहे. हिंसेची प्रतिक्रिया म्हणजे अधिकाधिक हिंसा ! त्या दुश्चक्रापासून मानवाला मुक्तता मिळणं शक्य नाहीं. क्रोधाचा प्रतिकार शांतीनं, द्वेषाचा प्रेमानं, हिंसेचा अहिंसेनं झाला तरच तें दुश्चक्र थांबेल आणि मग मानवाला मुक्तीची कांहीं आशा दिसेल. आणि एकदां तो मुक्त झाला कीं त्याच्या उन्नतीचीं दारं खुलीं झालीं असं समजा. मानवांच्या समस्या सोडवण्यास हिंसा असमर्थ व निष्फळ ठरली. उलट अहिंसा मात्र पूर्णपणें समर्थ ठरेल. इतका अद्भुत परिस गवसला असतां दुसऱ्या नकली फत्तरांची आम्हांस गरज काय ? भारताला हिंसेचा मार्ग चोखाळण्याची कांहीं एक जरूर नाहीं."

न्यायालय एकसारखें लिहीत होतें. गाडी भलतीचकडे जात आहे, असें वाटून पोलिसवाले चुळबुळ करूं लागले. दगडाच्या फरशीवर त्यांच्या

बुटांच्या टांचा आदळण्याचा आवाज होऊं लागला. न्यायालयानें विचारलें,

"मुंबई काँग्रेसच्या अधिवेशनाला तुम्ही गेलां होतां ना ?"

"होय."

"मग ?"

"मग काय ?"

"म्हणजे तिथें झालेलीं पुढाऱ्यांचीं भाषणं ऐकलीं का ?"

"हो ना ! त्यासाठींच तर गेलों होतों."

"नेत्यांच्या धरपकडीनंतर तिथें कापाकापी, लुटालूट, जाळपोळ झाली हें तर तुम्हांला ठाऊक आहे ना ?"

"होय ; त्यासंबंधींच्या वातम्या कानावर आल्या."

"परंतु तें सारं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलं का ?"

"तें सारंच्या सारं व्यक्तिशः पाहणं किती अशक्य आहे ? इतकं अफाट मुंबई शहर ! सर्व ठिकाणीं एकच माणूस कसा हजर राहूं शकेल !"

"मग तुम्हांला हें कसं कळलं ?"

"वर्तमानपत्रांवरून ! लोकांच्या सांगण्यावरून."

"तेथून तुम्ही कांहीं पत्रकं आणलीं होतीं ना ?"

"होय."

"कोठें आणलीं ?"

"इथेंच नागपूरला !"

"त्यांचं काय केलं ?"

"तीं सगळीकडे पाठवलीं."

"अस्सं ! कुठें ? कुठें ?"

"चोहोंकडे."

"घुगरीलाहि तीं पत्रकं पोहोंचलीं ना ?"

"पोहोंचलीं असावींत."

"तुम्हांला निश्चित ठाऊक नाहीं वाटतं ? त्या अग्निकांडाच्या आणि

हत्येच्या दिवशीं तुम्ही घुगरींतच होतां ना?"

"अगोदर होतों. परंतु घटना घडायच्या वेळीं मी तिथें नव्हतों. दुसरीकडे गेलों होतों."

"लोकांना भडकावून, आणि चिथावणी देऊन! होय ना?"

"—मुळींच नाहीं—त्यांना शांत करून."

"म्हणजे काय?"

"म्हणजे असं कीं आमगांवांत फागू गोळीला बळी पडल्यामुळें आणि बाबा राघवदासांना पकडल्यामुळें जनतेचा क्षोम अनावर झाला होता. त्यामुळें कांहींहि विपरीत घडूं शकत होतं. परंतु मी त्या गांवाच्या प्रमुखांना शांत केलं आणि अहिंसा धारण करण्याबद्दल बजावलं. आणि त्याचा त्यांच्यावर परिणामहि झाला असा माझा विश्वास आहे."

"म्हणजे? तुम्ही तिथें पत्रकं वांटलीं नाहींत?"

"मुळींच नाहीं."

"मग हा लाल कागद तिथें कोठून पोहोंचला?"

"मला काय ठाऊक? मी मुंबईहून जीं पत्रकं आणलीं तीं पांढरीं होतीं."

"परंतु हा लाल कागद वांटण्यासाठींच तुम्ही घुघरीला गेलांत याबद्दल पोलिसांनीं साक्षीदारहि आणले आहेत."

"पोलिसांचे साक्षीदार सर्वस्वी खोटे आहेत!"

पोलिसवाल्यांना हें चांगलेंच झोंबलें. त्यांच्या कंपूंत खळबळ माजली.

"कशावरून?"

"त्यांच्या एका साक्षीदारानं सांगितलं कीं त्या घटनेच्या दिवशीं सकाळीं मिरवणूक निघण्याच्या अगोदर मी घुगरींत होतों. आणि दुसऱ्या साक्षीदारानं सांगितलं कीं घटनेनंतर पकडल्या गेलेल्या व्यक्तीच्या खिशांत हा लाल कागद सांपडला. परंतु त्यांच्या एकाहि साक्षीदारानं हें सांगितलं नाहीं कीं हा कागद स्वत: त्यांच्याजवळच होता आणि त्यांनींच

हा कुणाच्या तरी खिशांत कोंबला."

"हें सिद्ध करण्यासाठीं तुम्ही एखादा साक्षीदार आणूं शकतां का ?"

"मी कशाला साक्षीदार आणूं ? आरोप पोलिसांनीं ठेवला. साक्षीदारहि त्यांनींच सादर केले. आरोप शाबीत करण्याचा त्यांचाच अट्टाहास आहे. ज्याअर्थीं खरे साक्षीदार ते सादर करूं शकत नाहींत त्याअर्थीं त्यांचा खटला निखालस खोटा आहे."

पोलिसवाल्यांत पुन्हां चुळबुळ सुरू झाली.

"तुमच्याजवळ फक्त पांढरींच पत्रकं होतीं, लाल नव्हतीं, यासंबंधीं पुरावा म्हणून तुम्ही कुणी साक्षीदार आणल्यास तुमच्या विधानास पुष्टि मिळेल." कोर्टानें सल्ला दिला.

"सत्य स्वयंसिद्ध असतं. त्याला साक्षीची जरूर नाहीं. त्याची तरफदारी करण्यास कोणी मिळालं नाहीं म्हणून तें असत्य ठरत नाहीं. समर्थनाची आवश्यकता असत्यास असते. कारण बनवाबनवीखेरीज तें रेसभरहि पुढें सरकूं शकत नाहीं. परंतु सत्य हें सूर्यप्रकाशाइतकं लख्ख असतं, तें दिसण्यासाठीं लामणदिव्याची काय जरूर?"

"तुम्ही जर लाल पत्रकं वांटलीं नाहींत तर घुगरीची जनता भडकली ती कशामुळें?"

"निरपराध शेतकरी फागू याचा बळी, बाबा मानवदासासारख्या साधूची कैद हीं कारणं मीं अगोदर सांगितलींच. शिवाय सर्कल इन्स्पेक्टर लाला बाबूराम यांच्या गोळीबारामुळें झालेला एका निरपराध स्त्रीचा मृत्यु! आपल्या धर्मांत असणारी स्त्रियांची प्रतिष्ठा आपण जाणतांच! त्या बाबतींत भारतीय जनता अगदीं मर्मस्थलापर्यंत दुखावली जाते. अन् बिचाऱ्या फागूचा तर राजकारणाशीं कांहीं एक संबंध नव्हता. त्याच्यावर विनाकारण गोळी झाडून त्याच्या आईचा म्हातारपणचा आधार हिरावण्यापलीकडे काय साध्य झालं? बाबा मानवदासांना त्या प्रदेशांतील जनता धर्मात्मा मानते. त्यांना कां म्हणून कैद करण्यांत

आलं? आणि या कारणांमुळें जनता जर भडकली तर दोष कुणाचा? सरकारचं माथं फिरून जर सरकारनंच सत्तेचा दुरुपयोग केला तर देशांत अराजक माजेल, हेंहि सरकारला उमगूं नये काय? घुगरीच्या हत्याकांडास जर कुणी जबाबदार असेल तर ते पोलिस–"

"सर! या विधानाचा आम्ही तीव्र निषेध करतों." एक पोलिस ऑफिसर न्यायालयास म्हणाला.

"हें विधान धादांत खोटं आहे." आणखी एकदोन ऑफिसर गुरगुरले.

"साहेब! पोलिसांच्या अशा बेजबाबदार वर्तनाचं मला आश्चर्य वाटतं. आरोपी तर मी आहें. परंतु मिरच्या मात्र यांना झोंबतात. जणूं कांहीं त्यांच्यांतच कांहीं पाणी मुरतं आहे. स्वतःच्या बचावासाठीं आरोपी या नात्यानं हें सारं म्हणायचा हक्क मला पोहोंचतो कीं नाहीं असा माझा सवाल आहे. अन् तो हक्क नसल्यास या खटल्यांत मला अजिबात भाग घ्यायचा नाहीं." असें म्हणून अभयकुमार खरोखरीच खालीं बसला. कोर्टांत खळबळ माजली. सरकारी वकीलांची कुरबुर सुरू झाली.

"त्याला सारं कांहीं म्हणायचा हक्क आहे." असें इतर वकील आपसांत कुजबुजूं लागले. बातमीदारांनींहि आपल्या लेखण्या सरसावल्या!

कोर्ट म्हणाले, "आपल्या बचावासाठीं आरोपीला सारं कांहीं म्हणण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यानंतर त्या विधानांची छाननी करणं आणि तीं मान्य किंवा अमान्य करणं न्यायालयावर अवलंबून आहे. पण आपली कैफियत सादर करण्याची आरोपीस पूर्णपणें मुभा आहे."

"धन्यवाद." अभय पुढें म्हणाला,

"कैफियत सादर करण्याची मला पूर्ण मुभा आहे तर मला असं म्हणायचं आहे कीं घुगरीच्या हत्याकांडास पोलिस जबाबदार आहेत, मी नव्हे. आणि त्याबद्दल जर कुणाला फांसावर चढवायचं असेल तर

पोलिसवाल्यांना किंवा राजधानींत बसल्या बसल्या जे त्यांना आदेश देतात त्यांना."

अभयकुमारच्या या विधानानें न्यायालयांत एकदम स्तब्धता पसरली. पोलिस ऑफिसरांची संतापानें आग झाली. न्यायालयाच्या बाहेर जर कुठें सांपडला तर याच्या राई राईइतक्या चिंधड्या उडवूं अशा रोषानें ते अभयकडे पाहूं लागले. बातमीदार त्याच्या तोंडातून पडणारा शब्द न् शब्द टिपत होते. न्यायालय म्हणालें,

"पण आरोप तुमच्यावर आहे. खटला तुमच्याविरुद्ध चालूं आहे. पोलिसांविरुद्ध नव्हे. मग या साऱ्या गोष्टींत त्यांना ओढण्यांत काय अर्थ ? मी तर–"

"सर ! खटला माझ्याविरुद्ध आहे, मी जाणतों. पण खटला खुनाचा असल्यामुळें खुनास कोणी प्रवृत्त केलं हें जाणणं जरूर आहे. घुगरीच्या हत्याकांडास कोण जबाबदार आहे हें सांगण्याकरितां मीं पोलिसांचा उल्लेख केला. खरा न्याय मिळण्याच्या दृष्टीनं सारं सत्य आपणांसमोर ठेवणं मला अवश्य वाटलं. माझ्यावर असा आरोप आहे कीं दोन सरकारी नोकरांची हत्या मीं केली किंवा करवली. परंतु ही हत्या पोलिसांनीं चिथावल्यानंतर घडली. निरपराध जनतेवर गोळी झाडून एका स्त्रीची निर्घृण हत्या करण्याचं पोलिसांना काय कारण ? जर खरा न्याय द्यायचा असेल तर माझ्याबरोबर त्यांच्यावरहि खटला कां चालूं नये ? "

"हूं ! काय वाह्यात गोष्टी करतो हा !" अशा अर्थाचा ध्वनि त्या कोपऱ्यांतून आला. मॅजिस्ट्रेटसाहेबहि अडचणींत सांपडले. ते म्हणाले,

"आतां वेळ बराच झालाय्. उरलेली कैफियत उद्यां सादर केली जाईल."

अभयकुमार आपल्या कोठडींत जाण्यास निघाला. तो दृष्टिपथांतून अदृश्य होईपर्यंत पोलिसवाले त्याच्याकडे संतप्त नेत्रांनीं पहात होते.

संध्याकाळीं एक गुप्त रिपोर्ट सरकारकडे पोहोचला. " अभयकुमार मॅजिस्ट्रेट चौधरीच्या मुलांना शिकवत असे. म्हणून त्याच्या बाबतींत त्यांच्याकडून नरमाई दाखवली जात आहे आणि त्यामुळें पोलिसांच्या इभ्रतीस धक्का पोहोंचत आहे, म्हणून योग्य ती कारवाई केली जावी. "

## ४६

त्या दिवशीं चौधरी मॅजिस्ट्रेट घरीं येतांच त्यांच्या पत्नीनें विचारलें, " मास्तरसाहेबांची कैफियत कशी काय होती ? "

" ठीक होती. परंतु त्यानं अशीं कांहीं विधानं केलीं कीं ज्यामुळं पोलिसवाले सपाटून चिडले. "

" चिडेनात का ? त्यांच्या चिडण्याशीं काय करायचंय् ? निकाल तर तुम्हांलाच लिहायचाय् ना ! "

" पोलिसवाले जर चिडले तर ते काय करूं शकत नाहींत ? आजकाल सरकारांत त्यांचाच वचक आहे. "

" असेल ! फार तर ते लोक एखाद्यावर गोळी झाडतील. पण न्याय देणारे मॅजिस्ट्रेट तर तुम्ही आहांत ना ! एखाद्या निरपराध माणसास खुशाल फांसावर तर तुम्ही लटकवूं शकत नाहीं ना ? " चौधरी-साहेब यावर कांहींच बोलले नाहींत, पण त्यांची पत्नीच पुढें म्हणाली,

" कां ? तुम्ही असे गप्प कां ? मास्तरांच्या विरुद्ध कांहीं पुरावा तर मिळाला नाहीं ना ? "

" नाहीं, अजून तरी पुरावा मिळाला नाहीं; पण पुढेंमागें पोलिसांनीं एखादा पुरावा सादर केल्यास गोष्ट वेगळी."

" पण तरीहि फांशी देण्याचं काय कारण ? जो आपल्याकडे मुलासारखा वागला त्याला आपल्याच हातानं फांशी व्हावी हा कुठला न्याय ? आपल्या स्वतःच्या मुलांना आपण फांशीचा हुकूम देऊं शकतां का ? "

" भलतीच अभद्रवाणी तोंडांतून कशाला काढतेस ? "

" मग मी तुम्हांला बजावून ठेवतें कीं माझ्या जिवांत जीव असेपर्यंत तुमच्या हातून असला अन्याय मी घडूं देणार नाहीं. याचं प्रायश्चित्त आपणांस जन्मोजन्मीं भोगावं लागेल. खरंच जर तुम्हांला त्याचा गुन्हा पटला तर गोष्ट वेगळी. पण धड पुरावाहि सिद्ध न होतांच जर तुम्ही त्याला फांसाला लटकावलं तर मला हें सहन होणार नाहीं, साफ सांगतें. गाईसारखा गरीब मुलगा खाटकाप्रमाणं सुळीं देणं सर्वथैव अयोग्य आहे. याबद्दल परमेश्वराला जाब तरी काय देणार ? बोला ! येऊन जाऊन साहेबालाच खूश करायचंय ना ! पांच सात वर्षांची कैद त्याकरितां पुष्कळ झाली. विनाकारण बिचाऱ्याचं घर बेचिराग करण्याचा तुम्हांला काय अधिकार ? ज्यांत आपल्या सदसद्विवेकबुद्धीस तिलांजलि द्यावी लागतें, अशा नोकरीस आग लागो ! "

पत्नीचें हें रौद्ररूप पाहून साक्षात् चंडिका समोर अवतरल्याचा चौधरींना भास झाला. मॅजिस्ट्रेटसाहेब आपल्या पत्नीस पुरेपूर जाणून होते. त्यांचा तिच्याबरोबर आज चोवीस वर्षांचा सतत सहवास होता. चौधरींच्या नव्याण्णव टक्के गोष्टींत ती मुळींच ढवळाढवळ करीत नसे. पोथी-पूजा करणाऱ्या जुन्या स्त्रियांपैकीं ती एक होती. गीता, रामायण, भागवत आदि पोथ्यांखेरीज इतर पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें वाचण्याची तिला अभिरुचि नव्हती व फुरसतहि नव्ती. आपल्या अपरोक्ष आपले पति काय करतात याची तिला दखल नव्हती. पतीची निष्ठापूर्ण सेवा करणें एवढाच धर्म तिला अवगत होता. त्यामुळें त्यांच्यांत मतभेद होण्याचे प्रसंग फारसे उद्भवत नसत. परंतु एखाद्या धार्मिक बाबतींत जर का तिच्या भावना दुखावल्या गेल्या, तर ती आपल्या पतीवर असा कडाडून हल्ला चढवी कीं मॅजिस्ट्रेटसाहेबांनाहि पत्नीसमोर मान तुकवावी लागे.

एखाद्याच वेळीं प्रकट होणाऱ्या पत्नीच्या या स्वरूपास मॅजिस्ट्रेट-साहेब चांगलेच घाबरत. कारण अशा बाबतींत मॅजिस्ट्रेटसाहेबांची मात्रा

लागू पडत नसे.

अभयकुमारची बाबहि अशाच प्रकारची होती. म्हणून चौधरीजी या बाबतींत बेचैन होते. हा खटला चालविण्यासाठीं स्पेशल मॅजिस्ट्रेट-म्हणून ज्या दिवशीं त्यांची नियुक्ति झाली त्याच दिवसापासून त्यांच्यांत आणि पत्नींत झटापट सुरू झाली. हा खटला एखाद्या दुसऱ्या मॅजिस्ट्रेट-जवळ द्यावा किंवा चौधरींनीं एखादी दीर्घ मुदतीची सुट्टी तरी काढावी असें तिचें म्हणणें होतें. आणि इतक्यावर जर खटला चालवावा लागलाच तर आपल्या सदसद्विवेकबुद्धीच्या विरुद्ध निकाल देऊं नये, असें तिचें स्पष्ट मत होतें. पत्नीनें सुचविलेले पहिले दोन मार्ग मान्य केल्यास चौधरी जबाबदारी टाळूं पहातात, असा आरोप त्यांच्यावर येण्याचा संभव होता. त्यामुळें त्यांच्या दृष्टीनें विचार करण्यासारखा त्यांतल्या त्यांत तिसरा मार्ग होता. तो मार्ग जास्त सुरक्षित असूनहि त्यांना सारखी धास्ती वाटत होती. कोर्टांतून येतांच त्यांची पत्नी त्यांना रोज खटल्याची बातमी विचारीत असे. आज त्यांच्याकडून अभयची कैफियत ऐकतांच ती प्रसन्न झाली. तिची ती प्रसन्नता पाहून चौधरीहि खुश झाले. पत्नीनें स्वयंपाक्यास हांक मारून सांगितलें, "अरे! जरा शिरा कर बघूं! साहेब थकून आलेत! शिवाय आजच ताजं तूप आलंय्—"

चौधरी मनांतल्या मनांत हसले. आजपर्यंत कितीदां तरी ते थकून आले होते. पण शिरा मात्र नेहमीं झाला नाहीं!

रात्रीं चौधरीसाहेब झोपण्याच्या तयारींत असतांना बाहेर एक चपरासी आला आणि चौधरींना हांक मारून म्हणाला, "साहेबांनीं सलाम सांगितला आहे."

## ४७

रात्रीं अकरा वाजतां चौधरीसाहेब जेव्हां परत आले, तेव्हां त्यांचा नूर पाहून त्यांची पत्नी मनांतल्या मनांत चरकली. त्यांचा चेहरा

कावराबावरा झाला होता. सर्वांगास घाम सुटला होता. आल्याबरोबर त्यांनीं कपडे बदलले आणि ते एकदम संडासाकडे गेले.

ते कांहीं एक बोलेनात त्यामुळें काय झालें आहे हें समजेना. शेवटीं त्यांच्या पत्नीनें विचारलें,

" कां हो ? झालं तरी काय ? "

" आहे असाच कांहीं सरकारी मामला ! अतिशय गुप्त स्वरूपाच असल्यामुळें सांगूं शकत नाहीं. " असें म्हणून चौधरी टाळाटाळ करूं लागले.

" मी काय कुणाला सांगायला थोडीच जाणार ! कमींतकमी मला सांगायला काय हरकत आहे ? तुमची ही अवस्था पाहून मला काय वाटत असेल याची कल्पना तरी करा ! मनांतल्या मनांत विचार करून जिवाला लावून घ्याल तर जास्तच त्रास होईल म्हणून विचारतें; नाहीं तर मला तरी विचारायची काय जरूर ? " ती चौधरींचें डोकें चेपूं लागली. शेवटीं मोठ्या प्रयासानें चौधरींकडून गोष्ट कळली, कीं पोलिसवाल्यांनीं चौधरीविरुद्ध सरकारांत तक्रार केली आहे कीं, "मॅजिस्ट्रेटसाहेब आरोपीस फार सूट देत आहेत. व प्रत्यक्ष खटल्याशीं संबंध नसलेल्या गोष्टी सांगण्याची त्यास मुभा देत आहेत. त्या साऱ्या गोष्टी जर का वर्तमान-पत्रांत प्रसिद्ध झाल्या तर सरकारच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोंचेल. शिवाय मॅजिस्ट्रेटसाहेबांत कार्यकुशलताहि नाहीं ती वेगळीच ! सरकार-जवळ असाहि रिपोर्ट पोहोंचला आहे कीं आन्दोलनाच्या अगोदर अभय चौधरींकडे शिकवणी करीत होता. आणि त्याच्याच प्रभावामुळें चौधरींच्या मुलांनीं मिरवणुकींत भाग घेतला होता. सरकारच्या एकनिष्ठ सेवकांच्या घरांत बंडखोरीचें हें बीज असावें हें सरकारला अजिबात पसंत नव्हतें. कारण सरकार मॅजिस्ट्रेटकडून संपूर्ण निष्ठेची अपेक्षा करीत होतें महायुद्ध आणि आंदोलन यांचा जबरदस्त ताण पडत असल्यामुळें आपले सरकारी नोकर या संकटसमयीं किती एकनिष्ठपणें साथ देतात इकडे

सरकारचें लक्ष होतें साहेबांनीं असेंहि सांगितलें कीं जे एकनिष्ठ राहतील त्यांच्यासाठीं बढती, पदव्या, किताब इत्यादींचीं द्वारें मोकळीं आहेत. जे कच खातील त्यांना बरखास्त केलें जाईल. इतकेंच नव्हे तर विश्वासघाताबद्दल सरकार त्यांना पकडूंहि शकतें. बंडखोरांना मुळींच गय केली जाणार नाहीं. उलट त्यांना कायमचा धडा शिकवला जाईल. म्हणजे सरकारला विरोध करण्याची हिंमत पुन्हा कुणाला होणार नाहीं. समजलांत ?" आणि हें "समजलांत" टेबलावर इतक्या जोरानें मूठ आदळून समजावलें गेलें कीं संबंध टेबल हादरलें आणि त्यावरील पिस्तूलहि थरारलें. मॅजिस्ट्रेटसाहेबांच्या मनासहि चांगलाच हादरा बसला. "यावेळीं जर का कमकुवतपणा दिसला तर तावडतोब डिपार्टमेंटल चौकशी सुरू होईल; समजलांत !"

पुन्हां तेंच मूठ आपटणें आणि गरजणें ! शेवटीं साहेबांनीं असेंहि बजावलें कीं "तुमचा विचार काय आहे, तो मला आतांच्या आतां या क्षणीं कळायला पाहिजे. नीट विचार करा. मी इतक्यांत आलोंच." आणि जातां जातां जोरानें ते म्हणाले, "ऑर्डर्ली ! हे साहेब इकडे बसले आहेत. नीट लक्ष असूं दे."

साहेब आंत गेले. एक पेग चढवून थोड्या वेळानें बाहेर आले. आतां त्यांचा चेहरा पूर्वीपेक्षां लालबुंद दिसत होता.

"मग काय ठरवलंत शेवटीं ?" साहेबांनीं विचारलें.

"सर ! मी सरकारी नोकर आहें. जोंपर्यंत नोकरी करीन तोंपर्यंत सरकारचा हुकुम मानणं माझं कर्तव्य आहे. तें मी पुरेपूर बजावीन."

"शाबास !" साहेब पाठ थोपटून म्हणाले, "मी सुद्धां पोलिसांना हेंच सांगितलं कीं चौधरींच्या बाबतींत तुम्ही अगदीं निर्धास्त असा." आणि साहेब स्मित करूं लागले. आतां ते हुबेहूब मेणाच्या चित्रासारखे दिसत होते.

त्यानंतर साहेबांनीं अगदीं मिठ्ठास वाणीनें गोष्टी केल्या आणि लवकरच रिकाम्या होणाऱ्या एका जिल्ह्याच्या जागेवर योग्य हिंदी माणसाची

आवश्यकता असल्याबद्दल सांगितलें. चौधरीसाहेबांनीं खटला जर चटपट उरकला तर त्या जागीं त्यांचीच शिफारस करण्यांत येईल; कारण त्यांचें "कॉन्फिडेन्शिअल्" चांगलें होतें. अभयची शिकवणी आणि मुलांचें मिरवणुकींत सामील होणें. केवळ याच दोन गोष्टी त्यांच्या विरुद्ध होत्या. पण चौधरीसाहेबांनीं जर यापुढें नीट सहकार्य दिलें, तर या दोन्ही गोष्टी सांवरतां येतील. बड्या साहेबांच्या बंगल्यांतून चौधरीसाहेब परत निघाले तेव्हां पुन्हां एकदां साहेबांनीं बजावलें,

"I hope you understand the situation".

"Yes Sir!" चौधरीसाहेब सलाम करीत म्हणाले.

परंतु घरीं जाऊं लागतांच त्यांच्या डोळ्यांसमोर काजवे चमकूं लागले आणि अंगाला दरदरून घाम सुटला.

## ४७

आपली कैफियत सादर करून अभय कोठडींत परतला. त्या दिवशीं तो प्रसन्न होता. आज किती तरी दिवसांनंतर अशी प्रसन्नता त्याला लाभली होती. अनेक दिवसांपासून मनांत सांठलेल्या गोष्टी व्यक्त न झाल्यामुळें त्याचा जीव गुदमरला होता. त्या साऱ्या व्यक्त केल्यामुळें त्याला आज हलकें वाटत होतें. ज्या वेळीं सर्वत्र भीति आणि दुराचाराचें वातावरण असतें, त्या वेळीं भोंवतालच्या नगाऱ्यांच्या आवाजांत सत्याची तुतारी कोणास ऐकूं आली नाहीं, तरी एक काळ असा येतो कीं नगाऱ्याचा ध्वनि बंद होतो आणि सत्यसंगीताच्या स्वरांमध्यें कालावधीमुळें शक्ति निर्माण होऊन ते अधिक मधुर आणि प्रभावी ठरतात. दोन हजार वर्षांपूर्वी येशूला जेव्हां जेरुसलेमच्या निर्जन स्थानीं सुळीं देण्यांत आलें त्या वेळीं "हे प्रभ्, तूं मला विसरलास का?" हे त्याचे आर्त स्वर ईश्वराशिवाय कुणालाहि ऐकूं गेले नाहींत. भोवतालचे वृक्ष, दऱ्याखोरीं,

यांतच ते विरून गेल्याचा भास झाला. परंतु समयाच्या मेघांवर आरूढ होऊन ते स्वर साऱ्या विश्वांत घुमले आणि ख्रिस्ती लोकांना ते स्वर चिरवेदनेची अमरवाणी ठरले.

म्हणून तो जेव्हां प्रसन्न अंतःकरणानें आपल्या कोठडींत परतला तेव्हां शेजारच्या एका फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यानें विचारलें,

"का हो भय्या ! सुटलांत वाटतं ?"

"छे ! सुटलों तर नाहीं. पण मनावरचं मोठं दडपण दूर झालं."

त्या कैद्यास कांहींही आकलन झालें नाहीं. पण अभयच्या त्या आनंदाचा संसर्ग त्यालाहि लागला.

आपल्या कोठडींत जाऊन तो झोपला तेव्हां वास्तविक बाहेर कुलूप जडलें असूनहि त्या पन्नास फुटांच्या जागेचे आपण सर्वाधिकारी आहोंत आणि आपला एकान्त कुणी भंग करूं शकत नाहीं, याचें त्यास समाधान वाटलें. तसें पाहिलें तर माणसाचें सुख मोठमोठ्या हवेल्यांवर किंवा मोटारगाड्यांवर अवलंबून नसतें. तें त्याच्या वृत्तीवर, मनाच्या समाधानावर अवलंबून असतें. या जगांत येण्यापूर्वीं माणसाला आईच्या पोटांतील सहासात इंचांची जागा पुरते. आणि मेल्यानंतरहि सहासात फुटांच्या जागेपेक्षां जास्त कांहीं लागत नाहीं. शेवटीं साऱ्यांना एक दिवस मातींतच मिळायचें असतें. एकूण जीवनांतील सारी धावपळ, सारा संघर्ष सहासात इंचांच्या जागेची व्याप्ति सहासात फुटांची करण्यासाठीं आहे. मग कोठडींतल्या पन्नास साठ फुटांच्या जागेचा सार्वभौम अधिकार प्राप्त झाला असतांना तक्रार करण्याचें त्याला कारणच काय होतें ?

आणि तो तुरुंग, त्यांतील दगडी भिंती, लोखंडी काळे गज बाहेरून कितीहि भेसूर आणि भीतिदायक वाटत असले तरी त्यांच्या अंतरंगांत किती आपुलकी, किती जिव्हाळा भरला होता. भगवान् कृष्णाचा जन्म तुरुंगांत झाला, विश्वांतील मोठमोठे तत्त्ववेत्ते, देशभक्त, सत्यासाठीं झगडणारे

शूर सैनिक या साऱ्यांना तुरुंगानेंच आश्रय दिला. त्या त्या काळचें शासन जेव्हां दुर्जनांनीं बळकावलें, त्यावेळीं सज्जनांना कोणीं निवारा दिला? समस्त मानवजातीच्या क्रांतीस आणि प्रगतीस जन्म देणारा तुरुंग, अभयला मातेप्रमाणें वात्सल्यपूर्ण आणि प्रेमळ वाटला. तुरुंगानें जर निवारा दिला नसता तर रानोवनीं एखाद्या शापित प्राण्याप्रमाणें त्याला भटकत राहावें लागलें असतें. त्याचे मारेकरी त्याच्या रक्तासाठीं आसुसल्यामुळें सतत पाठलाग करीत राहिले असते. या साऱ्या व्याधीं-पासून सुटका झाल्यामुळें त्याला तुरुंग एखाद्या मंदिराप्रमाणें मंगल वाटल्यास नवल तें काय?

## ४८

दुसऱ्या दिवशीं सकाळीं वर्तमानपत्रांत अभयकुमारच्या कैफियतीची सविस्तर बातमी झळकली. त्याचा निर्भीडपणा, स्पष्टवक्तेपणा, तर्कशुद्ध विचारसरणी इत्यादींची प्रशंसा सर्वत्र होऊं लागली. तुरुंगांतील राजबंद्यांत एक नवा जोम, नवा उत्साह आला. आपल्यामधील एक इतका सडेतोड आणि निर्भीड निघाला, हें पाहून त्यांचा ऊर भरून आला. बाहेरच्या जनतेवरहि त्याचा चांगला परिणाम झाला. गांधीजींनीं साध्यासुध्या माणसाचा कायाकल्प वीर पुरुषांत केला याचें हें प्रत्यंतर होतें.

परंतु दुसऱ्या दिवसापासून न्यायालयाचा नूर पालटला. पोलिसांचा पहारा आणि देखरेख सक्त झाली. आरोपीची उरलेली कैफियत एका दिवसांतच समाप्त करण्यांत आली. तींत त्यानें स्वत: निरपराध असल्याची घोषणा केली होती. तरीसुद्धां कोर्टाच्या रेकॉर्डवर असें नमूद करण्यांत आलें कीं, "घुघरीच्या हत्याकांडाची प्रत्यक्ष जबाबदारी अभयकुमारवर असल्यामुळें, त्याला फांशीच दिली जावी."

शुक्रवारीं अकरा वाजतां कोर्ट सुरू होतांच स्पेशल मॅजिस्ट्रेट श्री. चौधरी यांनीं खून आणि बंडखोरीसाठीं लोकांना प्रवृत्त केल्याच्या

आरोपावरून अभयकुमाराला फांशीची शिक्षा सुनावली. त्याच वेळीं पाठीमागें लोखंडी कड्यांचा खणखणाट झाला व अभयकुमाराच्या पायांत बेड्या ठोकल्या गेल्या. मॅजिस्ट्रेटसाहेब मात्र त्यानंतर आरोपीच्या नजरेस नजर भिडवूं शकले नाहींत. ते सरळ पोलिसांच्या निळ्या मोटारींत जाऊन बसले. आणि घरीं जातांच झोपायच्या खोलींत जाऊन त्यांनीं दाराला आंतून कडी घातली व पलंगावर जाऊन अंग टाकलें.

चौधरींच्या पत्नीला जेव्हां ही बातमी कळली, तेव्हां ती देवघरांत होती. हतबुद्ध होऊन किती तरी वेळ तेथेंच पाषाणाप्रमाणें निश्चल बसली होती ! जणूं काय शिळा झालेली शापदग्ध अहिल्याच !

फरक इतकाच कीं तिच्या नेत्रांतून झरझर अश्रूंच्या सरी ओघळत होत्या. सकाळपासून तिनें कांहीं खाल्लें नव्हतें. आणि आतां पाणीहि वर्ज्य केलें !

## ४९

फांशीची शिक्षा ऐकून अभयकुमार सुन्न झाला. मृत्यू समोर आला म्हणून नव्हे, तर ही शिक्षा त्याला सर्वथैव अनपेक्षित अशी होती. जीवन आणि मृत्यू यांतील सीमारेषा नाहींशा झाल्याप्रमाणें वाटाव्या, असे कांहीं प्रसंग या आंदोलनांत त्याच्यावर आले होते. एकदां गोळी लागतां लागतां तो बचावला होता. नऊ ऑगस्टनंतर मुंबईस आणि अन्यत्र झालेला स्फोट त्यानें पाहिला; तेव्हां तळहातीं शिर घेऊन मगच क्रांतियज्ञांत उडी घ्यायची याची त्याला पूर्णपणें जाणीव होती. यावेळीं क्रांतीहून दूर राहणें तर अशक्य अशी ग्वाही त्याच्या मनानेंच त्याला दिली होती. ही क्रांति जनतेची आहे. यांत इतक्याच दूर जाईन त्यापुढें नाहीं. असली मर्यादा शक्य नव्हती. तो तर एक महापूर होता. त्यांत उडी मारायची कीं नाहीं एवढाच निर्णय मनुष्याधीन होता पण

एकदां उडी घेतल्यानंतर एखाद्या भोवऱ्यांत सांपडून आपण रसाताळाला जाणार, कीं एखाद्या अदृश्य शिलेवर आपटून चूर चूर होणार, याचें भाकित कोणी करूं शकत नव्हतें. ' मातृभूमीच्या शृंखला नाहीशा करून स्वातंत्र्याच्या स्वर्गास पोहोंचण्याचा हाच मार्ग आहे. ' अशी ज्याची निष्ठा असेल त्यानेच या वैतरणींत उडी घ्यावी. कबीराप्रमाणें आपल्या घरादारावर निखारे ठेवण्यास जे तयार असतील त्यांनीच यांत शिरावें ! म्हणून त्या पावसाळ्या अंधाऱ्या रात्रीं दीनबंधूबरोबर निघतांना अभयनें जेव्हां आपल्या आईचा आणि पत्नीचा निरोप घेतला, तेव्हां ही आपली अंतिम यात्रा तर नव्हे ना, असा विचार त्याच्या मनांत चमकल्याशिवाय राहिला नाहीं. नंतरहि एक दोन प्रसंगीं "आपल्याला या संसारांतील मोहमाया सोडून आतां चंबूगबाळें आवरण्याची तयारी केली पाहिजे" असें वाटायला लावणारे कांहीं प्रसंग त्यावर आले. कायावाचामनें-करून त्या यज्ञाच्या साफल्यासाठीं प्राणांची पूर्णाहुतीहि द्यावी लागेल, हें त्याला ठाऊक होतें. परंतु ज्या स्वरूपांत ही शिक्षा त्याला दिली गेली, त्या स्वरूपांत ती दिली जाईल असें त्याला स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. खुनाचा आरोप ! आणि त्या आरोपासाठीं फांशी ! गांधींच्या विचारप्रणालीवर पूर्ण निष्ठा असल्यामुळें स्वप्नांतहि कुणाला दुखवण्याचा विचार त्याला कधी शिवला नाहीं. गांधीजींच्या तत्त्वज्ञानाच्या बाबतींत त्याच्या मनांत कांहीं शंका कुशंका उरल्या नव्हत्या. पण तेंच आपलें जीवितकार्य मानण्याचा त्यानें कधीं विचार केला नव्हता. राजकारणाशीं त्याचा अर्थाअर्थी संबंध नव्हता. आंदोलन संपल्यानंतर राजकारणांत त्याला भाग घ्यावयाचा नव्हता. तो मुख्यत्वेंकरून एक विद्यार्थी होता. ज्ञानार्जन, अध्ययन, अध्यापन यासंबंधींच त्याला अभिरुचि होती. आणि हेंच तो आपलें जीवितकार्य मानत होता. परंतु तो एक सुशिक्षित, सुसंस्कृत भारतीय युवक असल्यामुळें, या विशाल देशाची गुलामगिरी त्याला असह्य झाली. आणि देशाच्या दास्यविमोचनासाठीं गांधीजींनीं

सोपा आणि सुंदर मार्ग दाखवला; हें त्याला पटल्यामुळें तो मुंबईस गेला. "भारत छोडो" या घोषणेनें आकर्षित झाला. तेथें गांधींनीं विद्यार्थ्यांना केलेलें आवाहन, त्यानें प्रत्यक्ष ऐकलें आणि तें स्वीकारण्याचा त्यानें त्याच क्षणीं मनांत निश्चय केला. गांधीजींनीं आपल्या अंतिम भाषणांत सांगितलें : "करेंगे या मरेंगे." त्यानेंहि निश्चय केला "करेंगे या मरेंगे." हीं घोषवाक्यें म्हणजे केवळ क्षणिक आवेश वाढविण्यासाठीं केलेली पोपटपंची नव्हती हें त्याला पुरेपुर ठाऊक होतें. त्या घोषणा म्हणजे अंगार असून प्रत्यक्ष मृत्यूशीं खेळण्याचें निमंत्रण देण्यासाठीं आल्या होत्या. सर्वस्वाचा होम करण्याची ज्याची तयारी असेल, त्यानेंच या खेळांत भाग घ्यावा, हें पूर्ण जाणून मगच तो त्यांत सामील झाला होता. त्याबद्दल त्याला दुःख किंवा पश्चात्ताप कधींहि झाला नाहीं. परंतु नरहत्येचा आरोप येऊन त्याबद्दल त्याला फांशी दिली जाईल, असें मात्र त्याला कधीं वाटलें नव्हतें. देशासाठीं फांसावर चढणें कोणाहि देशभक्तास गौरवास्पदच वाटेल. पण खोटया आरोपावरून फांसावर लटकावलें जाण्याची कल्पना त्याला सर्वस्वीं अनपेक्षित होती. उलट लोकांच्याकडून नरहत्या घडूं नये यासाठीं त्यानें घुघरीला जाण्याचा विचार केला होता. परंतु तें राहिलें बाजूलाच ! अन् तोच बद्दल आरोपी ठरला. सत्याचा असा धडधडीत विपर्यास ! न्यायाचें, नीतीचें असें विडंबन ! जाणून बुजून इतक्या भयंकर असत्यासाठीं एका निरपराध व्यक्तीला जें साम्राज्य फांसावर लटकावतें, त्याचें वर्तमान कसेंहि असलें, तरी भविष्य मात्र खात्रीनें सुरक्षित राहूं शकत नाहीं. आणि ही शिक्षा कुणाकडून मिळावी तर चौधरी मॅजिस्ट्रेटकडून ! ज्यांच्याशीं त्याचे कौटुंबिक संबंध होते ! न्यायप्रिय म्हणून ज्यांचा लौकिक होता ! आपल्या बाबतींत गय केली जावी असें त्याचें म्हणणें नव्हतें. पण धडधडीत अन्याय तरी व्हायला नको होता ! त्यानें जर कुणाची हत्या केली असती, तर त्यानें स्वतःच तें कबूल केलें असतें. जीव वांचवण्याकरितां असत्याचा

आश्रय त्यानें कधीं धरला नसता. केल्या कर्माचें फळ भोगणें योग्यच आहे. परंतु जें केलेंच नाहीं, ज्याचा स्वप्नांतहि विचार केला नाहीं, त्याचें फळ भोगावें लागणें म्हणजे अंधेरनगरी नव्हे काय? तुमच्या हातीं पाशवी सत्ता आहे, पोलिस तुमचे, तुरुंग तुमचे, मारेकरीहि तुमचेच! इतक्या मोठ्या अन्यायावर जगणारी, इतक्या मोठ्या असत्यावर आधारलेली तुमची सत्ता किती दिवस टिकूं शकेल?

त्याचें मन त्याला म्हणालें, "अभयकुमार, आज तुझें ऐकतो कोण? साऱ्या विश्वांत हिंसेचा दावानल उफाळला आहे. न्याय, सत्य, मानवता यांचा राजरोसपणें खून होत आहे. मनुष्यांतील मानवता आणि देवांतील देवपणा कांहीं काळासाठीं झोपीं गेला आहे. विधात्यानें जणूं पाशविकतेस सध्यां पूर्ण सूट दिली आहे. जा, मनसोक्त हैदोस घाल. किती खालच्या पातळीला उतरायचें असेल तर उतर. आपली सारी हौस पुरवून घे! कारण सूर्योदयापूर्वीं निशेचा दाट काळोख पसरावा लागतो आणि पुनर्जन्मापूर्वीं माणसास मरावें लागतें. अभय! तुलाहि आतां मरणासाठीं तयार राहिलें पाहिजे. या घोर अन्यायाच्या पार्श्वभूमीवर तुझा मृत्यू अधिक भव्य दिसेल. तूं तर केवळ एकदांच मरणार. मग तुला फांशी देणारे ज्यामुळें अधिक पश्चात्तापदग्ध होतील अशाच रीतीनें मेलेलें काय वाईट? या फांशीची किंमत आपणांस महाग पडली, असेंच त्यांना वाटलें पाहिजें. कारण जितका घोर अन्याय तितकेंच घोर प्रायश्चित्त!

आणि त्याला एकाएकीं वाटूं लागलें कीं आपला मृत्यू विफल जाणार नाहीं. तो मनांतल्या मनांत हर्षित झाला. अशा प्रकारच्या मृत्यूचें सौभाग्य किती कमी लोकांना प्राप्त होतें! ईश्वर किती दयाळू आहे!

असा विचार मनांत येतांच तो धन्यवाद देण्यासाठीं न्यायालयाकडे वळला. परंतु ती खुर्ची रिकामी आढळली. त्यानें वकिलांना व वार्ताहरांना नमस्कार केला. त्याचा संयम आणि मनाचा समतोलपणा

पाहून ते स्तिमित झाले. आणि त्यांना वाटलें "खरोखरीच हा एक वीर पुरुष आहे."

तो आपल्या कोठडीकडे जाऊं लागला. पायांत बेड्या पडल्यामुळें चालायला त्रास होत होता, तरी संथ पावलें टाकीत तो मजेंत चालला होता. हातांत हातकड्या होत्या. त्या लोहशृंखलांच्या छन् छन् स्वरांत आपला स्वर मिळवून तो गाऊं लागला,

"सुलीका पथ ही सीखा हूं
सूविधा सदा बचाता आया
मैं बलिपथ का अंगारा हूं
जीवनज्वाल जगाता आया."

तो आपल्या कोठडींत पोहोंचला तेव्हां त्याच्या त्या सोबत्यानें विचारलें,

"काय झालं दादा!"

"फांशीची सजा झाली, दोस्त!"

"बापरे! फांशी! तुम्ही तर असे खुशींत दिसतां कीं जणूं काय सुटकाच झाली!"

"अरे! सुटलों नाहीं तर काय! आतां सुटायला कसला उशीर! बस्! आतां इकडून जायचाच अवकाश कीं, स्वतंत्र भारतांत जन्म घेतलाच समजा!" आणि पुन्हां अभय गाऊं लागला,

"इस गुलामीमें तो हमको कोई खुशी आयी न नजर
चल दिये सुएं अदम जिन्दाना फैज़ाबादसे."

## ५०

अभयच्या आईनें फांशीच्या शिक्षेची बातमी ऐकली तेव्हां तिचा स्वत:च्या कानावर विश्वासच बसेना. "छे! हें कसं शक्य आहे? कुणी तरी कांहींतरीच ऐकलं असेल. जिवंतपणीं माणसास फांशी? जो जीव

मनुष्यानं दिला नाहीं तो त्याला घेण्याचा काय अधिकार? ईश्वराखेरीज हा अधिकार कुणासहि नाहीं. एका माणसानं दुसऱ्या माणसाच्या पापपुण्याचा न्यायनिवाडा कां म्हणून करावा? तो काय सर्वज्ञ आहे? माझ्या अभयचा दोष तरी काय? कुणाच्या हिंसेचा विचारही त्याच्या मनाला शिवला नाहीं. त्यानं जें काय केलं तें देशासाठीं केलं; मग इतका कठोर प्राणदंड त्याला कां व्हावा? माझा म्हातारपणाचा आधार नष्ट व्हावा, असा कोणता अपराध मीं केला? विजयाचं कोणतं पाप आडवं आलं, ज्यामुळें एका वर्षांतच तिच्या कपाळीं वैधव्ययोग यावा आणि तिच्या भावी बालकास पितृवियोग घडावा? वास्तविक मीच अभयच्या खांद्यावरून अंतिम यात्रा करायची; अन् परमेश्वरा, हें तूं उलटं काय रचलंस? माझ्याच कपाळीं त्याची अंतिम यात्रा पाहण्याचा योग आणलास! तुझ्याच घरीं जर न्याय नाहीं, तर सत्तेनं अंध बनलेल्या या विदेशी शासनास काय म्हणायचं? अभय! अभय! तुझी ही काय दशा झाली रे!"

आजपर्यंत आईनें अतिशय विवेक धारण केला होता. किती वेळां हुंदके आले ते तिनें आंतल्या आंत जिरवले. रक्ताचे अश्रूहि निमूटपणें आंतल्या आंत गिळले. विजयाचा धीर सुटूं नये, म्हणून तिनें संयम राखला. परंतु तिचें मन आंतल्या आंत गुदमरत होतें. धुमसत होतें. पण या भीषण बातमीनें तिला आमूलाग्र हादरून टाकलें. आज तिचा तोल सुटला. लेकराप्रमाणें धाय मोकलून ती रडूं लागली. आपलें दुःख गिळून विजयाहि तिचें सांत्वन करूं लागली. परंतु आकाशच कोसळल्यावर कोण कसें सावरणार? शेवटीं विजयानें विचार केला, मोकळेपणीं रडून, दुःखाचा पूर एकदां निघून जाऊं दे. तिला पुन्हा पुन्हा दुःखाचे उमाळे येत. पुन्हा कांहीं वेळ ती निपचित पडून राही. पुन्हां दुःखावेग येई. त्या दिवशीं तिची सारी रात्र याच अवस्थेंत गेली.

आणि विजया! तिची अवस्था कशी वर्णावी? जीवनांतील सारा

रस, सारें आकर्षण एका क्षणांत नाहींसें झालें. आणि एका असीम शून्यतेनें तिचें मन भरून गेलें. एक प्रकारची सर्वव्यापी विषण्णता आणि अभेद्य जडता तिच्यांत आली. केवळ श्वासोच्छ्वासाच्या रूपानेंच ती जिवंत होती. कुसुमकोमल हृदय असलेला तिचा सोबती विदेशी शासनाच्या क्रूर हिंसेला बळी पडला. तिचा संताप अनावर झाला. देश स्वतंत्र असता तर अशा घटना घडल्या नसत्या. पण अशा घटना घडल्याखेरीज देश तरी कसा स्वतंत्र होणार? स्वातंत्र्यदेवीच्या चरणावरील रक्ताचा अभिषेक पुरा झाल्याखेरीज तिचें आगमन कसें होणार? आणि या अभागी देशांतील युवकांच्या प्राणांचें चीज कसें होणार? गुलाम नागरिकांच्या जीवनास मोल तें काय असणार? त्यांना मानसन्मान नाहीं, त्यांच्या गुणांचें चीज नाहीं. पारतंत्र्याच्या विशाल राहूनें साऱ्या देशास भयंकर ग्रासलें होतें. भारतीय नागरिक म्हणजे काळे, निर्जीव, दगडामातीचे पुतळे! त्यांना शोभेच्या वस्तूप्रमाणें बंगल्यांत ठेवले काय आणि ठोकरीनें उडविले काय, सारखेंच! त्यांचे मोठमोठे पुढारी, बुद्ध आणि येशूच्या तोडीचे गांधीजी सुद्धां खुशाल तुरुंगांत कोंबावेत! त्यापुढें अभयसारख्या एका विश्व-विद्यालयाच्या विद्यार्थ्याची काय कथा! त्यावर गोळी झाडली काय किंवा फासांवर लटकवलें काय, सारखेंच! हिंदुस्थान आणि इंग्लंडच्या दरम्यान पसरलेल्या सात समुद्रांवर त्यामुळें एकतरी तरंग उमटणार होता काय?

## ५१

तिसऱ्या दिवशीं विजयाला तुरुंगांतून एक पत्र आलें.

फांशीची शिक्षा मिळाल्यापासून अभयला एखाद्या बादशहाच्या इतमामानें ठेवण्यांत येऊं लागलें. त्याला साऱ्या सवलती मिळूं लागल्या. त्याला सर्व कांहीं मिळूं शकत होतें. पण त्याला कांहींच नको होतें. आपल्याला प्राप्त झालेली मन:शांति आईला आणि विजयाला

प्राप्त व्हावी. असें झालें तर तो शेवटच्या क्षणापर्यंत समाधानानें राहूं शकेल. एवढीच एक इच्छा आतां त्याला उरली होती. त्याचा जीव वांचावा असें त्यानें कधींच मागितलें नव्हतें. जी गोष्ट अपरिहार्य आहे, तिचा हंसतमुखानें स्वीकार झाला; तर आपल्याला मृत्यूहि मंगल वाटेल, अशा विचारानें त्यानें पत्र लिहिलें,

सेंट्रल जेल---

प्रिय विजया !

माझी फांशीची शिक्षा ऐकून तुला जबरदस्त हादरा बसला असेल. मलाहि बसला. किती झाले तरी आपण मानव आहोंत. माया-मोहानें भरलेलें आहोंत. त्यामुळें जीवनासंबंधीं आपली आसक्ति सुटत नाहीं. तेव्हां जीवनाचा अंत होण्याच्या कल्पनेने दु:ख होणें स्वाभाविक आहे.

पण जरा नीट विचार केला, तर या घटनेंत तेवढें कांहीं वाईट नाहीं, असें दिसून येईल.

किती झालें तरी जीवन हें क्षणभंगुर आहे. थोर अवतारी पुरुषहि मृत्यूच्या मगरमिठींतून निसटूं शकले नाहींत. हा देह म्हणजे मातीचा घट ! केव्हां ना केव्हां तो फुटणारच, प्रश्न फक्त कालावधीचा ! कोणी आधीं जाईल; कोणी नंतर; परंतु जाणें कोणी टाळूं शकत नाहीं.

जाणें जर अटळच आहे, तर ज्यायोगें मृत्यु जास्त दिव्य आणि भव्य ठरेल अशा रीतीनें जाण्यांतच पुरुषार्थ आहे. देशासाठीं आपल्या प्राणाचें बलिदान करण्याचें सौभाग्यहि किती लोकांना लाभत असतें ? या भाग्यासाठीं ईश्वरानें माझी निवड केली यांत मी स्वत:ला धन्य मानतों. पूर्वजन्मींच्या संचिताखेरीज हें शक्य नव्हतें.

तसं पाहिलं तर मरण मोठंसं कठिण का आहे ? आत्महत्या केली तर क्षणांत जीव जाऊं शकतो. आगगाडीखाली चेंगरून, विहिरींत पडून, विष खाऊन, गळयाला फांस लावून—मरण्याचे हजारों मार्ग आहेत. पण

आत्महत्या करणारा भ्याड ठरतो. कारण त्याच्या मुळाशीं निराशा आणि विफलता असते.

आणि त्या उलट राष्ट्रप्रेमाच्या अपराधाबद्दल परकीय सरकाराकडून फांशी व्हावी, याहून मर्दपणाचा आणि सुखद मृत्यु अन्य कोणता? समज मी हार्टफेलनें किंवा मोटारीखालीं एखाद्या किडचा-मुंगीप्रमाणें चिरडून मेलों असतों, तर त्या मृत्यूचें काय प्रयोजन उरलें असतें? चार दोन शेजाऱ्या-पाजाऱ्यांनीं येऊन रडून सहानुभूति व्यक्त केली असती, इतकेंच!

पण आतां! या मृत्यूनंतर तूं एका हुतात्म्याची पत्नी म्हणवशील. आईलाहि हुतात्म्याची माता बनण्याचा गौरव प्राप्त होईल, आणि मला सद्गति मिळेल. भगवान कृष्णाची वाणी तूं विसरलीस वाटतं!–

"हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं, जित्वावा भोक्ष्यसे महीम्"।

इतक्या वैभवशाली मृत्यूनंतरहि स्वर्गाची प्राप्ति होणार नाहीं का?

हा तर काळाचा महिमा आहे! आपल्या तत्त्वासाठीं ज्यांना आज फांसावर लटकविलें जातें, त्यांचीच उद्यां पूजा होते. प्रचलित युगाविरुद्ध बंड पुकारून लोकांना खऱ्या ज्ञानाचा मार्ग दाखविला म्हणून सॉक्रेटिस मरणानें अमर झाला आणि त्याला जहर देणाऱ्यांचें पृथ्वीवर नांवनिशाणहि उरलें नाहीं. उलट त्यानें दाखवलेला मार्ग आज सर्वमान्य झाला. सत्याचा प्रचार केला म्हणून येशूला सुळीं देण्यांत आलें. आणि तें सुळाचें चिन्ह धर्मचिन्ह मानलें जाऊं लागलें. संतांचा छळ करणें आणि उद्धारकर्त्यांवर दगडफेंक करणें ही जगाची नित्याची वहिवाट आहे. परंतु त्याच पाषाणाचें रूपांतर कांहीं काळानंतर पुष्पांत होतें. विशिष्ट आदर्शा-साठीं, सिद्धांतासाठीं बंड पुकारून पाशवी शक्तीशीं झुंज देणाऱ्या आणि त्या प्रीत्यर्थ आत्मोत्सर्ग करणाऱ्या अशा लोकांची अखंड परंपरा आपल्या देशांत आहे. राणा प्रताप, छत्रपति शिवाजी, गुरु गोविंदसिंग, महाराणी लक्ष्मीबाई आणि ब्रिटिशांच्या राजवटींत झालेलें असंख्य शहीद! अशांची उज्ज्वल परंपरा असंख्य युवकांना नेहमीं स्फूर्ति देत राहील! शहीदांच्या

उज्ज्वल मालिकेंत माझ्यासारख्या सर्वसामान्य माणसास बसण्याचें भाग्य मिळालें, हें माझें सौभाग्यच नव्हे काय? तूं नीट शांतपणें विचार कर, म्हणजे तुला माझें म्हणणें पटेल. हा क्षण दुःखाचा नसून सुखाचा आहे. शोकाचा नसून हर्षाचा आहे. मग सांग पाहूं आपल्या बाबतींत ईश्वर दयाळूच नाहीं का?

माझीं स्वतःसंबंधीं कांहीं स्वप्नें होतीं. डॉक्टरेटची पदवी मिळवावी, प्रोफेसर होऊन ज्ञानार्जन आणि ज्ञानप्रसारांत जीवन व्यतीत करावें. आपलें छोटसें घरकुल असावें; त्याची सम्राज्ञी तूं आणि देवता आई! तुझ्या मांडीवर चिमुकला छकुला खेळावा, त्याच्या मंजुळ आवाजानें आपलें घरकुल निनादून जावें. आपण दोघांनीं आईची झटून सेवा करावी. आईनें माझ्यासाठीं सोसलेल्या साऱ्या कष्टांचें परिमार्जन करावें!

अन् विजया! तुझ्या प्राप्तीनें तर मला जणूं कांहीं सर्वस्वच मिळालें. आपल्या संपन्न काकांचें कुटूंब सोडून तूं माझ्यासारख्या निष्कांचनाशीं आपली जन्माची गांठ बांधलीस. खांचा-खळग्यांनीं भरलेल्या आपल्या जीवनांत तूं कधींहि उणीव भासूं दिली नाहींस. तुझ्या आगमनाबरोबर आमच्या झोपडींत सहस्रमंगल दीप उजळल्याप्रमाणें सर्वत्र प्रकाश विखुरला. तुझ्या पावलांनीं आमच्याकडे साक्षात् लक्ष्मी आणि अन्नपूर्णाच अवतरली.

तुझ्या दिव्य प्रीतीनें मला जें अनुपम सुख मिळालें, तें मी कसा विसरूं? उदात्त प्रीति मनुष्याच्या जीवनांत किती क्रांति घडवूं शकते याचा मला प्रत्यय आला. तुझ्या अलौकिक दिव्य प्रीतीनेंच स्वातंत्र्य-संग्रामांत उडी घेण्याची मला प्रेरणा झाली. तूं तेजस्वी असल्यामुळें कर्तृत्वहीन आणि भ्याड पुरुषावर तूं कधींहि प्रेम केलें नसतेंस, हें मला पुरेपूर ठाऊक आहे.

आपलें प्रीतिजीवन अल्प राहिलें तरी त्याचें अतुल वैभव आणि अपरिमित आनंद अमान्य करतां येईल का? त्या दिव्य क्षणांची स्मृति हाच आपला आधार!

आपल्या प्रीतीचें प्रतीक तुझ्या कुशींत श्वास घेत आहे. तें ईश्वराचे वरदानच आहेत ! तो तुझें जीवन उजळील. पित्याची अद्भुत जीवन-कहाणी तूं त्याला मोठ्या अभिमानानें ऐकवशील. मी स्वातंत्र्य पाहूं शकलों नाहीं, तरी माझ्या मुलानें तें पाहिलें; या कल्पनेनें माझ्या आत्म्यास शांति मिळेल. आजची पिढी स्वातंत्र्यासाठीं लढत आहे, ती उद्यांच्या पिढीची गुलामगिरींतून सुटका करण्यासाठींच ना ?

म्हणून म्हणतों, विजया ! ही वेळ अश्रू ढाळण्याची नव्हे. उत्सव करण्याची आहे. मीराबाईची प्रीति गिरिधरनागराच्या प्रीतींत विलीन झाली. ज्योतींत ज्योत मिळाली. विवाहाच्या वेळीं तूं मला वरमाला घातलीस ना ? तशीच फांशीची दोरी समजायची ! दोन्ही प्रीतीचींच प्रतीकें ! एक मानवाचें मानवाशीं मीलन घडवून आणणारी, तर दुसरी मानवाचें परमेश्वराशीं मीलन घडवणारी ! दोन्ही दिव्य शक्तीचींच स्वरूपें ! एकींत मानवाच्या प्रेमाची परिपूर्ति होते, तर दुसरींत देश-प्रेमाची ! प्रेमाचा पंथ एकच, मग तें मानवाचें प्रेम असो किंवा देशाचें, किंवा धर्माचें ! तत्त्व एक, फक्त आविष्कार भिन्न ! प्रीतीचें आलिंगन जितक्या आनंदानें स्वीकारतो, तितक्याच आनंदानें आणि फक्कडपणें फांशीच्या दोरीचाहि जो स्वीकार करतो, तोच खरा पुरुष ! कारण खरें प्रेम दिव्यत्वाकडे नेतें, विलासाकडे नव्हे. ज्या देशाच्या अन्नजलावर हें शरीर पोसलें गेलें, त्याच देशाच्या सेवेंत तें अर्पण व्हावें, याहून दुसरें सुख कोणतें ?

"मिट्टी ओढावन, मिट्टी बिछावन, मिट्टीसे मिल जाना होगा
करले सिंगार चतुर अलबेली साजन के घर जाना होगा ! "

म्हणून विजया, यावेळीं तूं आपली मनःशांति ढळूं देऊं नकोस. आईलाहि या बाबतींत मदत कर. तूं शूर आहेस. शूर-पत्नि आहेस. तेव्हां स्वाभिमानाला आणि गौरवाला धक्का पोहोचेल, अशी कोणतीहि गोष्ट तुझ्या हातून घडणार नाहीं, यावर माझा विश्वास आहे. आईला हें

पत्र दाखव आणि तिला सांग कीं अभयच्या जन्माच्या वेळीं तूं जितकी प्रसन्न होतीस तितकीच मृत्यूच्या वेळींहि राहा. कारण तुझ्या पुत्राचें मरण हें मरण नसून साक्षात् अमरत्व आहे. मी पुन्हां भारतांतच जन्म घ्यावा अशी माझी इच्छा आहे. भारत स्वतंत्र व्हावा, हीच आई मला लाभावी. आणि विजया राणी ! तुझी नि माझी तर जन्मजन्मांतराची साथ आहे. ती साथ शरीर नष्ट झालें म्हणून नष्ट थोडीच होणार आहे ? तें शरीरातीत असें आत्म्याचें मीलन आहे. जुनीं वस्त्रें सोडून नवीन धारण केलीं, तरी आत्मा हा शाश्वत, चिरंतनच असतो.

"वासांसि जीर्णानि यथा विहाय, नवानि गृह्णाति नरोऽपराणि ।
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही–"

ही गीतेची शिकवण तुला ठाऊकच आहे. तूं समजूतदार आहेस विजया ! आपण गीता नेहमीच वाचतों पण त्यानुसार आचरण करण्याचा क्षण आज आला आहे. आज आपणांस गीतेची लाज राखायची आहे. आज आपल्या परिक्षेची वेळ आहे. आपण या परिक्षेंत यशस्वी होऊं असा मला विश्वास आहे. तुझी आणि आईची मला भेटायला येण्याची इच्छा असल्यास येऊं शकतां. तुम्हांला त्यांत कांहीं तथ्य वाटत असल्यास माझी कांहीं हरकत नाहीं. परंतु भेटीनंतर दु:खांत भर पडायला नको याची काळजी घ्या. नाहीं तर ती भेट निरर्थकच ठरेल. आईला नीट सांभाळ आणि तो अजात शिशु तुला सदोदित आठवण करून देईल, कीं मी तुझ्याहून अभिन्न होतों आणि सदैव अभिन्न राहीन.

तुझाच,
अभय

## ५२

अभयकुमाराच्या फांशीच्या बातमीनें सारा देश हादरला.

खटला ऐकून त्याला फांशीची शिक्षा दिली जाईल असें कुणालाहि

वाटलें नव्हतें. फार तर दीर्घ मुदतीच्या तुरुंगवासाची शिक्षा होईल, अशी सर्वसामान्यपणें कल्पना होती. परंतु या घटनेवरून सरकार हिंसेसाठीं आसुसलें असून; लोकांमध्यें दहशत निर्माण करण्याचा त्याचा हेतु आहे, हें स्पष्टपणें दिसलें. बचावसमितीची धांवपळ सुरू झाली. फंडासाठीं धडाधड पैसे गोळा होऊं लागले. सरकारी नोकरांनींहि गुप्तपणें धन दिलें. हायकोर्टाकडे अपील झालें. तें फेटाळलें गेलें. प्रीव्ही कौंसिलकडे दुसरें अपील गेलें. फांशीचा दिवस दोन वेळां निश्चित झाला. आणि दोन वेळा लांबणीवर ढकलला गेला. पण जेव्हां प्रीव्ही कौंसिलनेंहि अपील फेटाळलें, तेव्हां जनतेंत घोर निराशा पसरली. आतां फक्त व्हाइसरॉयकडे दयेसाठीं अर्ज पाठवणें उरलें होतें. अभय या सर्व गोष्टींच्या विरुद्ध होता. व्हाइसरॉयसमोर हात पसरून प्राणांची भीक मागणें त्याला पसंत नव्हतें. प्राणाचें मोल द्यायचेंच आहे तर उजळ माथ्यानें कां देऊं नये? भारताचे नवयुवक आपल्या मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं हसत खेळत प्राण देऊं शकतात हें एकदां साऱ्या जगाला कळूं दे. ज्यांच्या वीरमरणाचीं सुवर्णाक्षरें इतिहासाच्या पानावर झळकलीं त्या हुतात्म्याच्या पंक्तींत तो बसणार होता. त्याच्या पुण्यस्मृतीवर कुठल्याहि प्रकारचें लांच्छन त्याला नको होतें. मीराला चावा घेण्यासाठीं जे भुजंग पाठविले गेले, त्यांची तिनें शाळिग्राम मानून पूजा केली. आजहि त्याच्या गळ्यांत पडणारी फांशीची दोरी एका अर्थानें हाराप्रमाणेंच नव्हती काय? तो तर त्या मंगल वेळेची प्रतीक्षा करीत होता. त्याच्या जिवाशिवाची आज भेट होणार होती, मग ती भेट टाळण्यासाठीं धांवपळ कशाला?

शिवाय या धांवपळींतून कांहीं निष्पन्न होणार नाहीं असें त्याचें मन ग्वाही देत होतें. नुकतेंच त्याला विजयाचें पत्र मिळालें होतें. त्यांत लिहिलें होतें कीं "अभयच्या पत्रानें त्या दोघींना खूप मनःशांति मिळाली आणि त्यांचेंहि मन त्या दुर्धर प्रसंगासाठीं आतां पूर्ण तयार झालें होतें." हें वाचून त्याला अतिशय आनंद झाला. याहून दुसरें त्याला काय

पाहिजे होतें ? परमेश्वराला शांत मनानें भेटायला जाण्याची तो तयारी करूं लागला. गीता-रामायणाचें वाचन व अहोरात्र भजन ! एका विलक्षण प्रकारच्या मस्तीनें तो धुंद झाला होता. त्याचा जगासंबंधींचा मोह कमी होऊं लागला. वायूच्या तरल पंखावरून आपण आकाशांत स्वैर विहार करीत आहोंत, असें त्याला वाटूं लागलें. मनांत कोणतीहि इच्छा किंवा वासना उरली नव्हती. तो अतिशय विवेकी असल्यामुळें जीवनांत जें कांहीं मिळालें, त्याबद्दल त्याला परम संतोष होत होता. सुमाता, सुपत्नि लाभल्यामुळे अल्पकाळ कां होईना, त्यानें आपल्या झोपडींत स्वर्गसुखाचा आस्वाद घेतला होता. त्याचें घर म्हणजे जणुं मंगलमंदिर ! शांति आणि सौख्याचा मंगल दीप तेथें सतत तेवत होता. कॉलेजचें त्याचें शिक्षण पुरें झालेंच होतें. थोडा अवधि आणखी मिळाला असता तर डॉक्टरेटहि मिळाली असती. त्याचे विद्यार्थी आणि सहकारी त्याच्याकरितां जीव टाकत होते, इतका तो लोकप्रिय होता. या आंदोलनांत शिरल्यापासूनहि, साथीदारांच्या अकृत्रिम प्रेमाचा त्याला अनुभव आला. जी नेहमीं विजयाला साथ देईल, अशा शांतासारख्या निष्ठावंत स्त्रीचा स्नेह मिळाला. दीनबंधू-सारख्या प्रौढ मित्राचा लाभ झाला, ज्याचें आईकडे नेहमी लक्ष राहील. आणि वात्सल्यानें परिपूर्ण अशी आवडती मातृभूमीहि लाभली. सर्व-श्रेष्ठ परमेश्वराला सर्वांचीच लाज आहे, चिन्ता आहे. मग अशा सुंदर जगांत आपल्या आईला आणि पत्नीला मागें सोडून जातांना चिन्ता कर-ण्याची त्याला काय जरूर ? आणि खरोखरीच त्यानें चिंता करणें सोडून दिलें. अहोरात्र एका अपूर्व समाधानानें मन भरून येऊन सूरदासाच्या शब्दांत तो म्हणाला, "जैसे राखहुं वैसे रहुं" (ठेविलें अनंतें तैसेंची राहावें) परमेश्वरा ! तूं जें देशील त्याचा प्रसाद म्हणून मी स्वीकार करीन. मग तूं खुशाल विष दे किंवा अमृत ! काय द्यायचें काय नाहीं याचा विचार तुलाच ! माझें काम फक्त प्रसन्न चित्तानें ग्रहण करण्याचें ! तेव्हां तुझी आज्ञा मला शिरोधार्य आहे ! "

अभयकुमारची फांशी रद्द व्हावी, म्हणून साऱ्या देशांतून व्हाइसरॉयकडे हजारों तारा गेल्या. असेंब्लीच्या सभासदांचे आणि भिन्न संस्थांचें डेप्युटेशनहि गेलें. "या प्रकरणांत आपले हात बांधलेले आहेत, लंडननें आंखलेल्या नीतिबरहुकूम आम्हांला चालावें लागतें. शिवाय ब्रिटिश साम्राज्याविरूद्ध बंड पुकारणाऱ्याच्या बाबतींत कोणतीहि दयामाया दाखवायची नाहीं; असें ब्रिटिश सरकारचें धोरण आहे;" असें उत्तर मिळालें. परंतु लोकांना उगाच आशा होती की शेवटच्या क्षणापर्यंत कांहीं ना कांहीं होईल, आणि फांशी टळेल. चौधरींच्या पत्नीनें शतचंडीचें अनुष्ठान करविलें. दीनबंधु आणि लक्ष्मीनें व्रतेंवैकल्यें केलीं. घरोघरीं रुद्राभिषेक, जपतप इत्यादि सुरू झाले. यज्ञ, हवनाच्या द्वारें ईश्वराला आवाहन होऊं लागलें. कसेंहि करून या सुकुमार युवकाचे प्राण वांचावेत, म्हणून ज्याची जशी श्रद्धा होती, त्या प्रमाणें सर्वांनीं आटोकाट प्रयत्न केले. ज्या तत्त्वासाठीं अभयचें बलिदान होत होतें तीं तत्त्वें भारतीय जनमनाच्या अंतःकरणांत ठसलीं होतीं. सहानुभूतीचें आणि स्नेहाचें हें विशाल स्वरूप पाहून आईस आणि विजयास अपार शांति मिळाली. आपलें दुःख स्वतःपुरतें सीमित नाहीं या जाणीवेनें त्यांना आपल्या दुःखांत विरंगुळा वाटला.

पण ही सारी सद्भावना, हे उपासतापास यांचा कांहीं परिणाम होईल का? सर्वांचा वाली परमेश्वर इतक्या लोकांची आर्त प्रार्थना ऐकून तरी द्रवेल का? क्षणांत आशा तर क्षणांत निराशा! अशी त्या दोघींची मनःस्थिति होती. त्या दोघी एकमेकींना म्हणत, "देवा! पुढें होणार तरी काय?"

"कांहींहि नाहीं—!" असे शब्द अचानक त्यांच्या कानीं पडले.

त्यांनीं मागें वळून पाहिलें, तो समोर एक भव्य साधू! त्याची शुभ्र दाढी आणि जटा पाहून क्षणमात्र त्या चरकल्या. त्यावेळीं मध्यरात्रीचा

सुमार होता. अस्वस्थ होऊन आई अंथरुणावर तळमळत होती. या वेळीं अकस्मात हे साधू आले तरी कोठून ?

"आपण कोठून आलांत महाराज ? अन् सध्यां कांहीं होणार नाहीं असं जें आपण म्हणालांत त्याचा काय अर्थ ?" आईनें विचारलें.

"मी महादेवाच्या जंगलांतून आलों माताजी ! शंकराचं दर्शन घेऊन परत येत असतांना अभय माझ्या झोपडींत रात्रभर निवाऱ्यासाठीं राहिला होता. त्याला फांशीची शिक्षा झाल्याचं मला कळलं, म्हणून मुद्दाम मी तुम्हांला भेटायला आलों. आज तीस वर्षांनंतर, प्रथमच मी आपली झोपडी सोडून बाहेर पडलों. कारण प्रसंगच तसा आला".

"आमच्यासारख्या अनाथांवर आपली फार मोठी कृपा झाली. आपण अंतर्ज्ञानी आहांत महाराज ! कांहीं अमंगल तर होणार नाहीं ?"

"मंगल काय, अमंगल काय, हा तर आपल्या दृष्टीचा प्रश्न आहे. आई ! आज आपणांस जें अमंगल वाटतं; तेंच उद्यां मंगल ठरतं व आजचं मंगल उद्यां अमंगल ठरतं. मंगल अमंगलाचा निर्णय तो सर्वज्ञ परमेश्वरच करूं शकतो."

"आपलं म्हणणं योग्य आहे महाराज ! पण हा पुत्रमोह सुटत नाहीं, त्याला काय करूं ? त्याचंच जास्त दुःख आहे."

"आई ! हा मोह सोडून द्या. अभय आतां केवळ तुमचाच पुत्र राहिला नसून साऱ्या भारतवर्षाचा पुत्र आहे. त्याची चिंता परमेश्वराला आहे. भविष्य कोणाला टाळतां येणार ? अभयचा मृत्यू अटळ आहे. पण तो त्यानं अमर होईल. आणि तुम्ही त्याच्या जन्मदात्री असल्यामुळं तुम्हांलाहि तो अमर करील. अभयचं बलिदान व्यर्थ जाणार नाहीं, ही पक्की खूणगांठ बांधून ठेवा. रात्रीचा दाट काळोख पसरला कीं कांहीं काळ कांहीं एक सुचेनासं होतं. पण त्या नंतरच पूर्व दिशेला सूर्याचीं किरणं फांकतात. त्याचप्रमाणें याहि प्रसववेदनांतून कांहीं तरी जरूर निष्पन्न होईल. झांशीच्या राणीला एक शताब्दि थांबावं लागलं.

पण अभयला इतकं थांबावं लागणार नाहीं. स्वातंत्र्यदेवीच्या आवाहनासाठीं त्याला जाऊं द्या आई ! अगदीं प्रसन्न चित्तानं जाऊं द्या ! त्यांत कांहीं अमंगल नाहीं, ही काळ्या दगडावरील रेघ समजा ! "

"हें खरं का स्वामीजी ? " आईनें उल्हासानें विचारलें.

"होय ! सारं कांहीं परमेश्वराच्या पूर्वयोजनेनुसार घडत आहे. अभयला कोणी मारूं शकत नाहीं. अभय मरूं शकत नाहीं. परमेश्वरानं आपल्या लीलेसाठीं अभयची निवड केली, याबद्दल तुमचं अभिनंदन करायला मी आज आलों. त्याच्या प्रखर तेजाला आपल्या मोहपटलाचं ग्रहण लागूं देऊं नका."

"समजलं गुरुदेव ! यापुढें माझी कांहीं तक्रार राहणार नाहीं." आई म्हणाली.

"माई ! तुमचं कल्याण असो. तुम्ही तर साक्षात् भगवति आहांत. मी तुम्हांला प्रणाम करतों." असें म्हणून त्यांनीं आईला वंदन केलें आणि जाण्यासाठीं आपली काठी उचलली.

"महाराज, कांहीं घेतां का ? " आईनें आग्रहपूर्वक विचारलें.

"नाहीं आई ! या वेळीं कांहीं नको. माझी आतां निघायची वेळ झाली." असें म्हणून ते तावडतोब मार्गाला लागले. त्यांनीं एकदाहि मागें वळून पाहिलें नाहीं. कांहीं वेळ त्यांच्या खडावांचा आवाज ऐकूं आला आणि नंतर अंधारांत ते दिसेनासे झाले !

ते गेले त्या दिशेला आईनें जमिनीला माथा टेकून वंदन केलें.

आणि घड्याळांत पाहिलें, तर रात्रीचे साडेतीन वाजले होते. तेव्हांपासून आईची जी झोप उडाली, ती उडालीच. विजयाचीहि तशीच अवस्था झाली. आई उठली आणि देवाजवळ जप करीत बसली. विजया अंथरुणावरच पडून शून्यपणें अंधाराकडे टक लावून पहात होती. तिचें अंतःकरण बधिर झालें होतें. तिच्या साऱ्या भावना सुन्न झाल्या होत्या.

सकाळीं साडेसहाला लोखंडी खिळ्यांचे बूट वाजवीत जेलचे दोन वॉर्डर जमादार आले आणि त्यांनीं सांगितलें,

"आज पहाटेच अभयकुमारला फांशी झाली. नातेवाईकांना त्याचं शरीर हवं असल्यास मिळूं शकेल!"

आईच्या कानीं ही वार्ता येतांच ती जागच्या जागीं खिळली. तिच्या डोळ्यांना अश्रूंच्या धारा लागल्या.

विजया झटकन् उठली. आत्मसंयमन करून आणि प्रसंगावधान राखून म्हणाली,

"होय, आम्हांला शरीर पाहिजे. आठ वाजेपर्यंत आम्ही तें घ्यायला येतों."

## ५४

अभयच्या फांशीची बातमी साऱ्या शहरांत आगीप्रमाणें पसरली. बातमी ऐकतांच प्रत्येकानें हातांतलें काम जसेंच्या तसेंच टाकून जेलकडे धांव घेतली. स्त्री, पुरुष, पोरें, म्हातारे कोतारे! तासाच्या आंतच जेलच्या विशाल आवारांत तीळ ठेवायलाहि जागा उरली नाहीं. सर्वांच्या चेहऱ्यावर दुःख आणि संताप स्पष्टपणें दिसत होता. कांहीं झोपून उठल्याबरोबर बातमी कानीं पडतांच तसेच्या तसेच आले होते. स्त्रियांना वेणीफणी करण्याचीहि शुद्ध राहिली नाहीं. इतक्या विराट जनसमूहाचें तें प्रक्षुब्ध स्वरूप पाहून अधिकारी वर्गाची पांचावर धारण बसली.

मृत शरीर नातलगांना देण्यांत यावें असा हुकुम कसा काय दिला गेला याचेंच लोकांना आश्चर्य वाटलें. सरकारचें सर्वत्र कडक आणि दडपशाहीचें धोरण पाहून या सवलतीची लोकांना अपेक्षा नव्हती. फांशी देण्याचा समय निश्चित झाल्यावर, सकाळ-संध्याकाळ सरकारकडे अभय-कुमारच्या बारीक सारीक गोष्टींचा रिपोर्ट जात असे. डोळ्यांत तेल

घालून तो रिपोर्ट पाहिला जाई. कांहीं अधिकाऱ्यांचें मत पडलें कीं अंत्य संस्कारासाठीं शव नातलगांना देणें अवश्य आहे. सरकारचा फांशीचा हेतु साध्य झालाच आहे. मग त्या नंतर एवढी सवलत द्यायला काय हरकत आहे ? इंग्रज अधिकाऱ्यांमध्यें या बाबतींत मतभेद होता. कोणी म्हणत शव द्यावें, कारण त्या नंतर शवाची जी मिरवणूक निघेल त्यामुळें सरकारशीं बंड करणाऱ्यास काय गति मिळते, हें सर्व लोकांना दिसेल व दहशत बसेल. पण कांहीं म्हणत, त्याच्या नातलगांना बोलावून जेलमध्येंच त्याचा अग्निसंस्कार उरकून घ्यावा. मिरवणूक निघाल्यानें असंतोष वाढेल आणि शांतता व सुरक्षितता यांना धोका पोहोंचेल.

अशा वातावरणांत अभयच्या फांशीची बातमी जेव्हां सरकारकडे गेली तेव्हां शव नातलगांना देण्यांत यावें, हा निर्णय घेण्यांत आला. सरकारी रिपोर्टांत हेंहि नमूद करण्यांत आलें कीं, "पांचला फांशी दिली जाणार" ही बातमी त्याला तीन वाजतां कळली, तेव्हां तो अगदीं शांत, अविचल आणि गंभीर होता. तो लवकर उठला आणि प्रातर्विधी आटपून त्यानें गीतापठणास प्रारंभ केला :

"अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् । विनाशमव्ययस्यास्य न कश्चित कर्तुमर्हति ।। १७ ।।

अन्तवन्त इमे देहा नित्यस्योक्ता : शरीरिण :। अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युध्यस्व भारत ।। १८ ।।

य एनं वेत्ति हन्तारं यश्चैनं मन्यते हतम् । उभौ तौन विजानीतो नायं हन्ति न हन्यते ।। १९ ।।

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूय :। अजोनित्य: शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते न हन्यमाने शरीरे । वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् । कथं स पुरुष : पार्थ कं घातयति हन्ति कम् ।। २१ ।।

आणि नंतर---

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावक :। न चैनं क्लेदयंन्त्यापो न शोषयति मारुत : ।। २ : २३।।

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च। नित्य : सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः।। २: २४।।

अव्यक्तोऽयमचिन्त्योऽयमविकार्योऽयमुच्यते । तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि।। २ : २५।।

त्याचें हें गीतापठण तुरुंगाचे संत्री भक्तिभावानें हात जोडून ऐकत होते. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते. गीतेनंतर त्यानें प्रार्थना केली. दोन तीन भजनें आणि रामधुन म्हटली. इतकें होईतों पावणेपांच झाले. जेल सुपरिंटेन्डेन्टनें विचारलें,

"तुमची अंतिम इच्छा काय आहे?"

"अंतिम इच्छा? ब्रिटिश शासन नाहींसं होऊन, देश स्वतंत्र व्हावा याखेरीज दुसरी काय इच्छा असणार?"

"ती गोष्ट माझ्या हातची नाहीं. पण व्यक्तिगत इच्छा कांहीं असल्यास–"

"व्यक्तिगत इच्छा? कांहींच नाहीं."

"आपल्या मृत शरीराबद्दल आपणांस कांहीं म्हणायचं आहे का?"

"होय, माझ्या नातलगांना तें देण्यांत यावं. जिवंत असतांना मी त्यांना भेटूं शकलों नाहीं. कमींत कमी मेल्यावर तरी त्यांना एकदां मला पाहतां यावं!"

"ठीक आहे. चला आतां. वेळ झाली." सुपरिंटेंडेन्ट म्हणाले.

अभय उभा राहिला. त्याचे हात मागे बांधण्यांत आले. पायांना वेड्या पडल्या. काळी टोपी घालण्यांत आली. त्याच्या डोळ्यांसमोर काळोख पसरला. या काळोखाच्याबाहेर यापुढें तो कधींहि पडणार नव्हता. परंतु त्याचें अंतर्मन एका चिरंतन प्रकाशानें भरलें होतें. त्यानें

त्याचा आत्माहि प्रकाशित झाला होता. तो मनांत म्हणूं लागला,

'ओम् असतो मा सद्गमय,
तमसो मा ज्योतिर्गमय ! !
मृत्योर्माऽमृतंगमय ! ! "

"असत्यांतून सत्याकडे, अंधारांतून प्रकाशाकडे, मृत्यूंतून अमरत्वाकडे मला घेऊन चल."

यानंतरचें काम चटपट उरकलें. त्याच्यासाठीं मातीचें एक वर्तुळाकार स्थान तयार करण्यांत आलें होतें. तेथें त्याला उभें करण्यांत आलें. आणि त्याच क्षणीं फांसाच्या दोरीचा वेढा त्याच्या गळ्याभोंवतीं पडला. क्षणभर गारगार वाटलें, त्यानें मोठ्यांदा जयघोष केला,

"स्वतंत्र भारत अमर हो ! "–

– आणि दुसऱ्याच क्षणीं झटका बसला. आपल्या गळ्यावर कुणी तरी गरम गरम लोखंडी कांब हाणीत आहे असें त्याला वाटलें. लगेच तो मूर्च्छित झाला आणि मग शून्य—विराट् शून्य ! ! !

शव नातलगांना देऊन त्याच्या अंतिम इच्छेचा मान राखण्यांत आला.

आय. जी. पोलिस अधिकारी एक इंग्रज असून जरा कडक होता. पण तो यावेळीं दौऱ्यावर होता. फांशीची आणि मिरवणुकीची बातमी कळतांच तो ताबडतोब राजधानींत परतला आणि गव्हर्नमेंट हाऊसमध्यें जाऊन त्यानें त्या निर्णयांचा जोरानें निषेध केला. मिरवणूक काढणें म्हणजे विद्रोहाच्या भावनेला चालना देणें होय, असें त्याचें मत होतें. परंतु तोंपर्यंत मिरवणूक जेलच्या फाटकांतून निघून आतां शहराच्या मुख्य रस्त्यावर आली होती. एका विशाल तिरंगी झेंड्यानें शव आच्छादलें होतें. त्यावर फुलांचा खच पडला होता. अभयच्या गौरवर्ण मुखावरील वाढलेली दाढी एखाद्या योगिराजाप्रमाणें शोभत होती. त्याच्या चेहऱ्यावर परमसमाधान दिसत होतें. जणूं कांहीं समाधींत लीन झालेला एखादा तपस्वी ! दुःखाची पुसटहि रेषा तेथें नव्हती. त्याचें हें भव्य

आणि दिव्य स्वरूप पाहून लोक आदरानें तन्मय होत आणि अथांग वेदनेनें त्यांचें मन भरून जाई.

पांढरी साडी नेसलेली विजया शवाजवळून अनवाणी चालली होती. कपाळाचें कूंकू कायमचें गेलें होतें. तिच्या डोळ्यांत टिपूसहि नव्हतें. ती सुन्नपणें चालली होती. तिच्या खांद्यावर हात ठेवून शांता चालली होती. दीनबंधूच्या डोळ्यांतून अविरत अश्रुधारा पाझरत होत्या. मिरवणुकींत सुमारें तीस चाळीस हजार स्त्रीपुरुष होते. कडेवर मुलें घेऊन चाललेल्या स्त्रियाहि होत्या. चौधरींची पत्नि आणि जेलमधील कर्मचाऱ्यांच्या बायकाहि त्या मिरवणुकींत होत्या. अशी शानदार मिरवणूक, असा शाही निरोप शहराच्या इतिहासांत अभूतपूर्व होता.

स्मशानाकडे जातांना जवळच्या रस्त्यानें न जातां शहरांतील प्रमुख विभागांतून मिरवणूक नेण्याचें ठरलें होतें. हें पाहून आय. जी. पी. खवळला. त्याच्या मोटारीची धांवपळ सुरू झाली. डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें मिरवणूक जवळच्या रस्त्यावरून नेण्यासंबंधीं हुकूम दिला. परंतु मिरवणुकीच्या नेत्यांनीं उत्तर दिलें, कीं " सर्व लोकांची अभयकुमारचें अंत्यदर्शन घेण्याची इच्छा आहे. म्हणून आम्ही मुख्य रस्त्यांवरून मिरवणूक नेत आहोंत. शांतता भंग पावणार नाहीं याबद्दल आम्ही दक्षता बाळगूं. फक्त पोहोंचायला एक दोन तास उशीर होईल इतकेंच ! "

जिल्हाधिकाऱ्यानें ताबडतोब वरिष्ठ अधिकाऱ्याला कळविलें आणि १४४ कलमलागू झालें व अमुक मार्गानेंच मिरवणूक जाईल असा निर्बंध घालण्यांत आला.

आधींच संतप्त झालेली जनता आणखीच प्रक्षुब्ध झाली आणि १४४ कलम भंग करून पूर्वनियोजित मार्गावरून जाऊं लागली. पोलिसांच्या मोटारी शीघ्रगतीनें चोहोंकडे धावूं लागल्या. गणवेष घातलेले पोलिस काठ्या आणि बंदुकी घेऊन लॉऱ्यांमधून येऊन थडकले. पाहतां पाहतां परिस्थिति बिकट झाली. मिरवणूक पुढें घुसूं लागली. पोलिसांनीं

गराडा घालून मिरवणूक मोडण्याचा प्रयत्न केला. परंतु तो अयशस्वी झाला. तेव्हां त्यांनीं हवेंत वायबार सोडले. त्यामुळें मिरवणूक पांगली. या धक्काबुक्कीपासून शवाचें संरक्षण करण्यासाठीं स्वयंसेवक आणि पोलिस यांची झुंज झाली. दहशत बसविण्याकरितां पोलिस मधूनमधून हवेंत बार करीत होते. या साऱ्या भाऊगर्दींत विजया आणि शांता शवाच्या जवळ उभ्या राहून ताटीला घट्ट पकडून होत्या. चोहोंकडून त्यांच्याभोंवतीं गर्दीचा लोंढा उसळला. त्या चेंगरूं लागल्या. शांता प्राण पणाला लावून विजयाचें संरक्षण करूं लागली. परंतु पोलिसांचे गुद्दे अनवधानानें विजयाच्या पाठीवर पडले. त्यांच्या बुटांच्या लोखंडी टांचा लागून ती खालीं कोसळूं लागली.

"शांताताई, मला भोंवळ आल्यासारखं वाटतंय्" असें विजयानें म्हणतांच, शांतानें चटकन् स्वयंसेवकांच्या मदतीनें विजयाला सांवरलें. विजया ताबडतोब बेशुद्ध झाली.

"अरे पाहतां काय ? विजयाताई बेशुद्ध झाल्या. बाजूला व्हा, जरा हवा येऊं द्या. पाणी आणा चटकन्–" कुणी तरी म्हणालें.

कोणी पाणी आणायला, कोणी डॉक्टरांना बोलवायला धावले. जवळच्या दुकानांतून एक माणूस ओला टॉवेल घेऊन धावत आला. त्यानें तो टॉवेल तिच्या कपाळावर ठेवला. कांहीं लोक वारा घालूं लागले व मिरवणूक तेथेंच थांबली.

पोलिस ऑफिसर या घटनेमुळें चरकले. जर का या बाईचें हार्ट फेल झालें तर परिस्थिति फारच गंभीर होईल या कल्पनेनें त्यांच्या तोंडचें पाणी पळालें. मिरवणुकीचा मार्ग नियंत्रित करण्याचा हुकूम परत घेण्यांत आला. पोलीसहि हटविण्यांत आले.

एका झाडाखालीं चादर अंथरून बेशुद्ध झालेल्या विजयाला निजविलें. तिला सातवा महिना होता. दुःख, परिश्रम आणि धक्काबुक्कीमुळें तिला अवेळीं रक्तस्राव सुरू झाला.

घटनास्थलाचें निरीक्षण करण्याकरितां आय. जी. पी. मोटारीनें

तेथें आले. त्यांनीं विजयाची अवस्था पाहून तिला आपल्या मोटारीनें दवाखान्यांत पोहोंचवण्याबद्दल म्हटलें. विजयानें डोळे उघडले आणि एक क्षण त्याच्याकडे पाहून मानेनेंच नकार दिला.

आय. जी. पी. कांहीं वेळ हतबुद्ध होऊन तेथें उभा राहिला आणि डोकें खाजवीत चालता झाला.

इतक्यांत एका प्रायव्हेट डॉक्टरची मोटार आली. आणि तींतून विजयाला स्त्रियांच्या दवाखान्यांत दाखल करण्यांत आलें. शांता दीनबंधूला म्हणाली, " तुम्ही पुढें जाऊन क्रियाकर्माची व्यवस्था करा. विजयाच्या अशा नाजुक स्थितींत तिला सांभाळणं जरूर आहे. मी तिच्याजवळच राहतें. "

एका तासांतच मिरवणूक स्मशानावर पोंहोंचली.

इकडे लेडी डॉक्टरनें विजयाला इंजेक्शन देऊन औषधपाणी सुरू केलें. शहरांतील प्रमुख लेडी डॉक्टरांना कळल्यामुळें त्याही मदत करण्यासाठीं धावून आल्या !

डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट आणि 'पोलिसांतर्फे विजयाच्या प्रकृतीसंबंधीं वारंवार चौकशी होऊं लागली. इंजेक्शनाचा कांहीं एक परिणाम न होतां, ती कांहीं केल्या शुद्धीवर येईना. तेव्हां आईलाहि दवाखान्यांत बोलावून आणलें. त्यांनीं आपलें मन प्रयासानें कां होईना, अभयच्या मृत्यूसाठीं तयार केलें होतें, परंतु ही घटना सर्वथैव अनपेक्षित असल्यामुळें त्यांचा जीव मुठींत आला.

" काय झालं माझ्या पोरीला ? " आई कळवळून म्हणाली.

" मानसिक आणि शारीरिक परिश्रमामुळं स्राव सुरू झाला. तो बंद करण्याचा आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोंत ! " लेडी डॉक्टर म्हणाली.

आईला एकदम आठवलें, " खरंच, सातवा महिना लागला नुकताच ! परमेश्वरा ! आहे तरी काय तुझ्या मनांत ! "

आईनें विजयाचें डोकें आपल्या मांडीवर घेतलें. सर्व तऱ्हेचे उपाय

चालू होते पण परिणाम कांहीं होईना.

शेवटीं एक लेडी डॉक्टर म्हणाली, 'हेमरेज' झाल्यामुळें रक्तस्राव थांबणं कठीण आहे."

शांतानें विचारलें, "आयुर्वेद किंवा होमिओपॅथीनं कांहीं गुण येईल का? एखाद्या वैद्याला आणलं तर चालेल का?"

"प्रयत्न करून पहा. कोणत्या का उपायानं होईना, रोग्यास गुण आला म्हणजे झालं." लेडी डॉक्टर म्हणाली. लेडी डॉक्टरच्या मोटारीनें जाऊन शांतानें एका वैद्याला, आणि रामकृष्ण आश्रमाच्या स्वामीजींना आणलें. त्यांनीं खूप प्रयत्न केले. पण विजयानें डोळे कांहीं उघडले नाहींत. गेल्या तीन चार महिन्यांत जे कष्ट तिनें मूकपणें भोगले, ते आंतल्या आंत तिला जणूं काय पोखरीत गेले. त्यामुळें आंतून पोखरला गेलेला तिच्या देहाचा डोलारा असा कोसळला कीं साक्षात् धन्वन्तरीहि तिला वांचवूं शकला नसता. कारण जगण्याची तिची इच्छाच सरली होती. आज दिवस उजाडतांच तिच्या पतीची प्राणज्योत मावळली होती. त्याबरोबर तिचीहि जीवनज्योत क्षीण होऊं लागली. त्यांचें इतकें तादात्म्य होतें कीं भिन्न शरीरें असलीं तरी त्यांचा आत्मा एकच होता. इतकी एकात्मता, इतकें अद्वैतत्व दुर्मिळ असतें.

डॉक्टरच्या व वैद्याच्या तीन तासांच्या धावपळीनंतरहि विजयानें आईच्या मांडीवर प्राण सोडला! आईचें करुण क्रंदन ऐकवत नव्हतें! "परमेश्वरा! तुझ्या मनांत आहे तरी काय? हें सारं डोळ्यांनीं पहावं असं मीं कोणतं पाप केलं आहे? तूं मलाहि कां नेत नाहींस?"

शांतानें तिचा हात धरून त्यांना पलंगावरून उठविलें. आणि खादीची शुभ्र पांढरी चादर विजयाला पांघरली. आईला एका मोटारीं-तून घरीं पोहोचवलें. आणि 'दोघांसाठीं एकच चिता रचण्यांत यावी', असा निरोप दीनबंधूला कळवला. ही वातमी ऐकतांच दीनबंधू हाय खाऊन मटकन् खालीं बसला. मोठ्या प्रयासानें स्वयंसेवकांनीं त्याला सांवरलें.

"खरोखरीच विजया भाग्यवान् आहे ! अगदीं सीता-सावित्रीच जणूं कांहीं ! तिचं अंत्य दर्शन झालं हें आमचं मोठं भाग्य ! " स्त्रिया म्हणूं लागल्या.

साऱ्या शहरांतील लोकांची दर्शनासाठीं रीघ लागली. त्यामुळें अंत्यविधी थोडे लांबणीवर पडले.

दिवस आणि रात्रीच्या संधिकाळीं दीनवन्धूनें अग्नि दिला. एक विशाल चिता बनवण्यांत आली. एका बाजूला शुभ्रवस्त्रावृत अभय होता. ध्यानस्थ आणि समाधिस्थ ! दुसऱ्या बाजूला पीतवस्त्र नेसलेली, कुंकुम-तिलक लावलेली, फुलांच्या माळा घातलेली विजया !

तें भव्य दृश्य पाहून साऱ्यांचें मस्तक नत होत होतें. नेत्रांतून अश्रू ओघळत होते. दीनबंधूनें अग्नि दिला त्यावेळीं अभय आणि विजयाच्या जयजयकारानें सारें आकाश दुमदुमलें.

हां हां म्हणतां चितेंतून विक्राळ ज्वाला निघूं लागल्या. जमलेल्या लोकांनीं भक्तिभावानें चितेला नमस्कार केला आणि लोक आपापल्या घरीं परतले. दीनवंधू, शांता आणि एक स्वयंसेवक तेथेंच थांबलीं.

चिता जोरजोरानें जळत होती ! तिच्या ज्वाला अस्मानाला जाऊन भिडत होत्या. "या ज्वाला म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या विजयपताकाच ठरणार नाहींत काय ? भवितव्याच्या उदरांत काय साठलें आहे कुणास ठाऊक ? "

शांताच्या मनांत विचार आला. तीं तिघें जरा दूर जाऊन एका झाडाखालीं बसलीं. तेथें एक अंध भिकारी हातांत एकतारी घेऊन बसलेला त्यांना दिसला. शांताची चाहूल लागतांच तो म्हणाला,

"कोण आहे ? "

"आम्ही क्रियाकर्म करण्यास आलों आहोंत."

"कुणाचं ? ज्याला आज फांशी झाली त्याचं ? "

"होय ! "

" त्याची बायकोहि त्याच्याबरोबर सती गेली ? "

" होय. सतीच समजा. आपल्या पतीच्या कांहीं तासांनंतरच तिनं प्राण सोडला. "

" धन्य आहे, धन्य आहे ! दोघं फारच भाग्यवान आहेत. असे पराक्रमी लोक जिथें निर्माण होतात तो भारत देश खरोखरीच धन्य होय. परमेश्वरा, तुझी लीला अगाध आहे. " आणि तो भिकारी गाऊं लागला,—

" रहना नहिं देश बिराना है। "

तो गाण्यांत इतका मस्त झाला कीं त्याला दुसऱ्या कुणाचें भान उरलें नाहीं. तो म्हणूं लागला,

" यह संसार झाड और झांखर, आग लगे बरि जाना है। "

आतां शांताचा स्वत:वरील तोल सुटला. मागें जळणाऱ्या चितेकडे पाहात हुंदके देऊन ती रडूं लागली—

भिकाऱ्यानें एकदम गाणें बंद केलें आणि तो म्हणाला—

" अरे माई ! तुम्ही रडतां ? "

" हो बाबा ! काय करूं ? अगदीं असह्य झालं ! "

" वा ! त्यांत रडायला काय झालं ? या दोघांना जी गति मिळाली, त्यासाठीं मोठमोठे तपस्वी झुरतात. ऐक माई ! जे आज रडतात ते उद्यां हंसतात. जे आज हंसतात ते उद्यां रडतात. हें तर विधिलिखित आहे. ही कोणी मिटवूं शकत नाहीं. मग तूं कां रडतेस ? नाहीं, माई, नाहीं. ही रडण्याची वेळ नव्हे. आनंद मनवण्याची आहे. " आणि तो म्हणूं लागला.

" मन मस्त हुवा तब क्यों बोले, हीरा पाया गांठ गठियायो,
बार बार वाको क्यों खोले.
हंसा पावे मानसरोवर ताल तलैया क्यों डोले,
कहे कबीर सुनो भाई साधो साहेब मिल गये तिल ओले। "

हें भजन ऐकून त्या तिघांना विरंगुळा वाटला.

शांतानें थंड होणाऱ्या चितेंतून राख घेऊन मस्तकाला लावली,

चितेला साष्टांग नमस्कार केला आणि म्हटलें,

"भारताच्या स्वातंत्र्याच्या उपासकांनो! तुमचा जयजयकार असो! ईश्वर करो आणि तुमचं स्वप्न लवकर साकार होवो!"

त्या दिवशीं रात्रीं पोलिसचे डी. आय. जी. टायगरसाहेब जेवतांना आपल्या पत्नीला म्हणाले, "आतां इंडियाला अधिक दिवस बाँडेजमध्यें ठेवणं कठीण आहे असं दिसतं."

अभयकुमार आणि विजयाच्या अनुपम त्यागानं शासनासहि हादरा बसला. आपल्या हृदयावर इतका खोलवर घाव झाला आहे कीं तो कधीं भरून येणार नाहीं, असें जनतेला वाटलें.

स्थानिक वृत्तपत्रांत दुसऱ्या दिवशीं मिरवणूक, तींत झालेली धक्काबुक्की, चेंगराचेंगरी, विजयाचा मृत्यू, अग्निसंस्कार इत्यादि साऱ्या बातम्या ठळक अक्षरांत विस्तृत छापल्या गेल्या. आणि शेवटल्या पानावर एक खळबळजनक बातमी होती कीं चौधरी मॅजिस्ट्रेटनें आपल्या नोकरीचा राजीनामा दिला!

## ५५

आईच्या दृष्टीनें जीवनांत कांहीं स्वारस्य उरलें नाहीं. ती म्हणाली, "मी आतां काशीला जाऊन राहतें." शांतानें तिची बरीच समजूत घातली. तिची सेवा करण्याचें आश्वासन दिलें. पण ती म्हणाली, "नाहीं बेटा, तूं आतां मला अडवूं नकोस. परमेश्वरानं माझे सारे पाश नाहींसे केलेच आहेत. यापुढें मी संसारांतून निवृत्त व्हावं, असाच त्याचा हेतु दिसतो. आतां मला काशींतच मन:शांति मिळेल. मला जाऊं दे."

आईला जें कांहीं भोगावें लागलें तें पाहून यापुढें त्यांना अडविण्याची तिचीहि हिंमत झाली नाहीं.

घरांतलें सारें सामान शांताच्या हवालीं करून आई काशीला रवाना झाली.

# ५६

काशीच्या दशाश्वमेध घाटावर एक म्हातारी गीता व रामायणाचा पाठ करतांना आणि मधून मधून चरखा चालवितांना नेहमी दृष्टीस पडे. भजन-पूजन आणि गंगास्नान या खेरीज त्या म्हातारीस दुसरा कोणताहि व्याप नव्हता.

ती फारशी कुणाशीं बोलत नसे. मंदिराच्या बाजूला असलेल्या छोट्याशा खोलींत ती राहात असे.

चरख्यावर काढलेलें सूत विकून आणि कुणी दिलेल्या शिधासामुग्रीवर तिचा निर्वाह चाले. अधून मधून उपासहि घडत. पण त्याबद्दल तिची कांहीं तक्रार नसे. उलट तेथें आल्यापासून तिला बरीच मन:शांति मिळाली होती.

दिवसामागून दिवस, महिन्यामागून महिने आणि वर्षामागून वर्षें गेलीं, पण त्या म्हातारीचें भजन-पूजन आणि चरखा या नित्यक्रमांत कधीं अंतर पडलें नाहीं. बाह्य जगाशीं तिचा जणू कांहीं संबंध नव्हता, इतकी ती अंतर्मुख झाली होती.

अकस्मात् एक दिवस तिच्या कानीं बातमी आली, " इंग्रज भारत सोडून जात आहेत. देश स्वतंत्र होत आहे. आणि १५ ऑगस्ट १९४७ या दिवशीं आपला तिरंगी झेंडा सर्वत्र फडकणार."

तिच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर स्मित विलसलें. आणि डोळ्यांत आंसवें ! पण तीं आंसवें दु:खाचीं नसून आनंदाचीं होतीं. तिनें परमेश्वरास मनोभावें नमस्कार केला.

१५ ऑगस्ट १९४७ !

पहाटें ब्राह्ममुहूर्तावर ती म्हातारी उठली. प्रात:स्नान, पोथीपूजा आटोपून गीता, रामायण वगैरे आपल्याजवळच्या पोथ्या मोठ्या काळजीनें तिनें व्यवस्थित बांधून ठेवल्या. कांहीं वेळ चरखा चालवून तोहि बंद केला.

आणि नंतर अतिशय शांत चित्तानें उठून ती गंगाकिनारीं गेली. भगवान् सहस्ररश्मि उदय पावण्याच्या तयारींत होता. अंगाभोंवतीं घट्ट साडी लपेटून ती गंगेंत उतरली व उगवत्या सूर्यनारायणास अर्घ्य देऊन म्हणाली, " स्वतंत्र भारतांत प्रथमच उगवणाऱ्या सूर्यनारायणा ! तुला वंदन असो ! शेंकडों वर्षांनंतर स्वतःवरील कलंक धुऊन नव्या तेजानं आज तूं उदय पावत आहेस. तुझ्याच दर्शनासाठीं आज मी इतके दिवस थांबलें होतें. तुला शतशः प्रणाम ! "

अर्घ्य देतांना तिच्या कानीं प्रभातफेऱ्या आणि मिरवणुकींचे जयघोष पडत होते. " स्वतंत्र भारत झिंदाबाद ! स्वतंत्र भारत अमर हो ! " तिनें वळून पाहिलें. दूर कुठेंतरी उंचावर राष्ट्रीय निशाण डौलानें फडकत होतें. तिचें अंतःकरण भरून आलें. त्या तिरंगी झेंड्यास तिनें अत्यंत भक्तिभावानें नमस्कार केला. तिचा चेहरा एका अपूर्व पावनदीप्तीनें आणि परम समाधानानें उजळला. आणि मग गंगेच्या खोल पाण्यांत शिरत ती म्हणाली,

" आई गंगे ! मला आपल्या कुशींत घे ! " पोहणें येत नसल्यामुळें हां हां म्हणतां तिला जलसमाधि मिळाली !

लोकांचें लक्ष जातांच ते नदीकडे धांवले, " अरे ती पाहा एक बाई पाण्यांत बुडते आहे ! धांवा ! धांवा ! ती बाई बुडाली ! ! "

परंतु तिला कोणी वांचवूं शकलें नाहीं.

जवळच मंदिरांत स्वातंत्र्य-उत्सवाप्रीत्यर्थ पूजाअर्चा चालली होती. ब्राह्मण मंत्र म्हणत होते. " ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना । "

दुसऱ्या दिवशीं स्थानिक वृत्तपत्रांत एका कोपऱ्यांत एक बातमी होती.

" दशाश्वमेध घाटासमोर काल सकाळीं सूर्योदयाच्या वेळीं एका म्हातारीनें गंगेंत बुडून आत्महत्या केली ! "

IRBK 0108230
IRBK-0108230
वाचनालय
अनुक्रम 30622
विभाग
क्रमांक
नों. दि. ५/७/७५